पाणिनि व पाणिनीय व्याकरणसंप्रदाय

★

लेखक

प्रा. म. दा. साठे

एम्. ए., एल्. टी.

किंमत ४ रुपये

जोशी आणि लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता, पुणें २.

पाणिनि व पाणिनीय व्याकरणसंप्रदाय

★

लेखक
प्रा. म. दा. साठे
एम्. ए., एल्. टी.

प्रथमावृत्ति १९६२

किंमत ४ रुपये

जोशी आणि लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता, पुणें २.

प्रकाशकांचें निवेदन

आमचे स्नेही व आम्हीं प्रकाशित केलेल्या 'महाराष्ट्र-जीवन' या ग्रंथाचे एक लेखक **प्रा. म. दा. साठे**, एम्. ए., एल्. टी. यांचें "**पाणिनि व पाणिनीय व्याकरणसंप्रदाय**" हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास आम्हांस आनंद होत आहे. प्रा. साठे हे संस्कृतज्ञ पंडित असून गेल्या वर्षी त्यांनीं संपादित केलेला **लघुसिद्धान्त-कौमुदीचा** विस्तृत विवेचनासह मराठी अनुवाद विद्वानांच्या आदरास पात्र झाला आहे. त्या पुस्तकाला आनुषंगिक असें हें संस्कृत व्याकरण-परंपरेच्या इतिहासाचें पुस्तक आहे.

या पुस्तकांत पाणिनीच्या कालापासून म्हणजे इ. स. पूर्व सुमारें ६०० पासून तों आजतागायत अडीच हजार वर्षांची संस्कृत व्याकरणाची थोर परंपरा–या दीर्घ कालांतील प्रसिद्ध वैयाकरण व त्यांची प्रचंड ग्रंथसंपत्ति–यांचें साधार व सुबोध वर्णन केलें आहे. कॉलेज विद्यार्थ्यांस संस्कृत व्याकरणाचा कांहीं भाग नेमलेला आहेच; त्यांना व इतरांनाहि हें पुस्तक वाचनीय व उद्‌बोधक होईल अशी आम्ही आशा करतों.

कै. म. म. **वासुदेवशास्त्री अभ्यंकर** हे पाणिनीय व्याकरण-परंपरेंतील एक नामांकित विद्वान् होऊन गेले. त्यांचेच चिरंजीव **म. म. प्रा. काशिनाथशास्त्री अभ्यंकर**, एम्. ए. हे ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास लाभले हें आम्ही आमचें भाग्य समजतों. **म. म. प्रा. काशिनाथशास्त्री अभ्यंकर**, एम्. ए. यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन या ग्रंथाचें सूक्ष्म वाचन करून प्रस्तावना लिहून दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

जोशी आणि लोखंडे
प्रकाशक

मुद्रक :
प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
टिळक रस्ता, पुणें २.

प्रकाशक :
दे. श्री. जोशी व म. द. लोखंडे,
जोशी आणि लोखंडे प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २.

प्रस्तावना

माझे मित्र प्रा. महादेव दामोदर साठे, एम्. ए., एल्. टी. यांनीं 'पाणिनि व पाणिनीय व्याकरणसंप्रदाय' हा ग्रंथ लिहिला असून त्याचीं मुद्रितें मला पहावयास मिळालीं. ग्रंथलेखन चालू असतांनाही कांहीं बाबतींसंबंधानें आमचें बोलणें चालू असे. या ग्रंथांत पाणिनीविषयीं व त्याच्या वेळच्या वाङ्मयीन, शैक्षणिक, राजकीय व कौटुंबिक परिस्थितीविषयीं त्यानें रचिलेल्या अष्टाध्यायीसूत्रांतून निष्कर्षरूपानें निघणारी माहिती त्यांनीं या ग्रंथांत मोठ्या साक्षेपानें दिली आहे. ही माहिती त्यांनीं निरनिराळ्या अनेक ग्रंथांतून काढून विचारपूर्वक संकलित केली आहे; इतकेंच नव्हे तर, संकलन करीत असतां एखाद्या बाबतींत मिळालेल्या माहितींत मतवैचित्र्य दिसून आलें तर योग्य निष्कर्षही दिला आहे. प्रा. साठे हे स्वतः संस्कृतज्ञ व वैयाकरण आहेतच. त्यांत देखील संस्कृत पाठशाळेमध्यें परंपरागत पद्धतीनें त्यांनीं व्याकरणशास्त्राचा अभ्यास केला असल्यामुळें व त्यांची ग्रंथोपस्थितीही चांगली असल्यामुळें आधुनिक टीकाकारांनीं आपण काढलेल्या निष्कर्षांना दिलेले आधार व त्यांनीं केलेलीं विधानें शास्त्राधारपूर्वक आहेत किंवा नाहींत यांची छाननीही त्यांनीं उत्तम प्रकारें केली आहे. त्यांनीं 'नामूलं लिख्यते किंचित्' या वचनाप्रमाणें आपल्या विधानांना व सिद्धान्तांना जागोजागीं आधार दिले असून तसा ऋणनिर्देशही केला आहे.

या ग्रंथाचें वैशिष्ट्य हें आहे कीं, पाणिनीय व्याकरण-संप्रदायाचा इतिहास पाणिनिपूर्वकालापासून तों कै. म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर-पावेतों अद्ययावत् दिलेला असून या कालांतील सर्व प्रमुख वैयाकरणांची व त्यांच्या ग्रंथांची माहिती वाचावयास सांपडते. शेवटीं या संप्रदायांतील अर्थविचारावरही एक प्रकरण देऊन व्याकरणाच्या दुसऱ्या भागाचेंही

त्यांनीं दिग्दर्शन केलें आहे. ग्रंथाचे शेवटीं दोन परिशिष्टें जोडून पाणिनीयव्यतिरिक्त इतर व्याकरण-संप्रदायांची माहिती, तसेंच पाणिनि-कालीन समाजजीवन याविषयींचीही माहिती थोडक्यांत दिली असून, वाचकाला इतर प्रमुख संस्कृत व्याकरणाच्या संप्रदायांची ओळख करून देण्याचें महत्त्वाचें कार्य त्यांनीं केलें आहे. प्रा. साठे यांनीं हा ग्रंथ अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिला असून यांत त्यांची सूक्ष्मदृष्टि दिसून येते. अशा प्रकारच्या ग्रंथलेखनाला शास्त्रीय अध्ययनाची जितकी जरूर असते, तितकीच ग्रंथलेखन मार्मिक व मुद्देसूद असून वाचकाला कळण्यास सुलभ असें करण्याची कुशलताही अंगीं असावी लागते. प्रा. साठे यांच्या-जवळ शास्त्रीय विद्वत्ता व लेखन मनोरंजक करण्याची कला हीं दोनही असल्यामुळें त्यांचें लेखन भरपूर माहिती करून देणारें असूनही कंटाळवाणें होत नाहीं. मराठी वाङ्मयांत अशा ग्रंथाची उणीव अभ्यासकांना भासत होती ती प्रा. साठे यांनीं दूर केल्याबद्दल, तसेंच हा ग्रंथ लिहून मराठी वाङ्मयामधील शास्त्रीय ग्रंथांमध्यें महत्त्वाची भर घातल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें योग्य व जरूर आहे.

९८१ सदाशिव पेठ,
पुणें २.
दि. ३–२–६२

काशिनाथ वासुदेव अभ्यंकर
माननीय प्राध्यापक, भांडारकर इन्स्टिट्यूट, पुणें,

लेखकाचें मनोगत

सन १९६१ च्या सप्टेंबर महिन्यांत माझा ‘ लघुसिद्धान्तकौमुदी-विस्तृत विवेचनासह मराठी अनुवाद ’ हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्याला जोडून प्रस्तुत प्रबंध प्रस्तावनादाखल जोडण्याचें मनांत होतें; कारण ‘लघुसिद्धान्तकौमुदी’ हा ग्रंथ जरी पंडित वरदराजानें संपादन केलेला असला तरी तो भट्टोजी दीक्षितांच्या सिद्धान्तकौमुदीचीच संक्षिप्त आवृत्ति; व ‘ सिद्धान्तकौमुदी ’ हा सर्वमान्य प्रक्रिया-ग्रंथ भट्टोजीनें पाणिनीच्या ‘ अष्टाध्यायी ’ ग्रंथावर आधारलेला आहे. तेव्हां मूळ ग्रंथ व त्याचा कर्ता पाणिनि आणि त्याचा व्याकरणसंप्रदाय यांची माहिती दिल्यास ती वाचकांना व अभ्यासकांना उपयोगी पडेल अशा उद्देशानें हा प्रबंध लिहिण्याचें मनांत आणलें. त्याप्रमाणें त्याचें हस्तलिखितही तयार झालें. पण मूळ ग्रंथच अनेक अडचणींमुळें—विशेषतः दि. १२ जुलैच्या पुरामुळें—प्रसिद्ध होण्यास विलंब लागला. तशांत या दीर्घ प्रस्तावनेसाठीं थांबलों असतों, तर आणखी किती विलंब लागला असता तें देवच जाणें ! म्हणून कॉलेज-विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं लघुसिद्धान्तकौमुदीचें सानुवाद विवेचन प्रसिद्ध करून तो ग्रंथ हातावेगळा करण्याचें ठरविलें.

या प्रबंधाचीं एकंदर दहा प्रकरणें असून शेवटीं पाणिनीयव्यतिरिक्त व्याकरणसंप्रदायांचें एक परिशिष्ट जोडलें आहे. मूळ ग्रंथांत पाणिनि व तत्कालीन वाङ्मयीन, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे परिस्थितीची माहिती पाणिनीनें रचलेल्या चार हजार सूत्रांवरून कशी व किती मिळते हें मांडण्याचा प्रयत्न केला असून, त्याचा व्याकरणसंप्रदाय पुढें दोनअडीच हजार वर्षांत अगदीं अद्ययावत् कसा प्रगत होत गेला हें कांहीं प्रकरणांत सांगितलें आहे.

व्याकरणाचे शब्दप्रक्रिया आणि अर्थप्रक्रिया असे दोन भाग असतात. त्यांत अर्थप्रक्रियेपैकीं कारकविचाराचाच विचार एका प्रकरणांत केला आहे. अर्थप्रक्रियेच्या सर्व अंगांचा विचार करावयाचा झाल्यास त्यासाठीं वेगळाच ग्रंथ होईल. शक्य झाल्यास तोही यथावकाश प्रसिद्ध करण्यांत येईल.

ऋणनिर्देश— हा प्रबंध तयार करतांना अनेक ग्रंथांची मदत झाली. यांचा उल्लेख जागोजाग वाचकांस पहावयास मिळेलच. परंतु त्यांतल्या

त्यांत वाराणसीचे प्राध्यापक डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांचा ‘ इंडिया ॲज् नोन् टु पाणिनि ’ (India as Known to Paṇini) व पुण्याचे प्रसिद्ध वैयाकरण म. म. प्रा. का. वा. अभ्यंकर, एम्. ए. यांचा महाभाष्य, उपोद्घात, भाग ७ वा, यांचा प्रामुख्यानें निर्देश केला पाहिजे. कै. म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर, यांचा महाभाष्याचा मराठी अनुवाद, डॉ. बेलवलकरांचा ‘ सिस्टिम्स् ऑफ् संस्कृत ग्रामर ’ (Systems of Sanskrit Grammar) या ग्रंथांचें व इतर ग्रंथांचें परिशीलन केलें. या सर्वांचा परिपाक म्हणजे प्रस्तुत प्रबंध होय. इंग्रजी ग्रंथांतून ही माहिती सर्वत्र विखुरलेली आहे. मराठींत पाणिनि व पाणिनीय व्याकरणसंप्रदाय यांवर स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध नाहीं, हें लक्षांत घेऊन मी या कार्याला ‘ तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ’ या वचनाप्रमाणें उद्युक्त झालों ! तें कितपत सिद्ध झालें आहे हें वाचकांनींच ठरवावयाचें आहे. ज्यांच्या ग्रंथांचा मला उपयोग झाला, त्यांचें ऋण मान्य करणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास म. म. प्रा. का. वा. अभ्यंकर यांनीं आनंदानें संमति दिली, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

शेवटीं प्रतिभा प्रेसचे सर्वश्री जोशी–लोखंडे, विशेषतः श्रीयुत नानासाहेब जोशी, यांनीं या ग्रंथाच्या प्रकाशनाचें कार्य अंगावर घेतलें नसतें, तर हा ग्रंथ तसाच पडून राहण्याची शक्यता होती ! शास्त्रीय ग्रंथाच्या प्रकाशनाविषयींची त्यांची कर्तव्यनिष्ठाच या प्रसंगीं दृग्गोचर होते. यासाठीं त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. संस्कृतप्रचुर ग्रंथ बिनचूक मुद्रित होणें, ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. या कामीं श्री. त्र्यं. रा. दामले, हे संस्कृतज्ञ मुद्रितें तपासण्याच्या कामीं उपयोगीं पडले म्हणून त्यांचा आभारी आहें. हा ग्रंथ अशा शुद्ध स्वरूपांत बाहेर पडला याचें बरेंचसें श्रेय त्यांच्याकडे आहे. तसेंच ‘ प्रतिभा ’ प्रेसचे कंपोजिंग कॉन्ट्रॅक्टर श्री. द. उ. पुरोहित यांनीं हें अवघड काम दक्षतेनें पार पाडलें याबद्दल मी त्यांचेही आभार मानतों.

वसंतपंचमी, शके १८८३
‘पारिजात’, ८५४ सदाशिव, पुणें २.

म. दा. साठे.

कै० तीर्थस्वरूप त्रिंबक दामोदर साठे

तथा दादा

यांच्या पूज्यस्मृतीस

सादर समर्पण.

अनुक्रमणिका

प्रकरण		पृष्ठ
१.	पाणिनीचा काल	१
२.	नांव, जन्मस्थळ व पूर्व वैयाकरणांचें ऋण	१८
३.	अष्टाध्यायी व तिचें तांत्रिक स्वरूप	३३
४.	पाणिनीला ज्ञात असलेलें संस्कृत वाङ्मय	५३
५.	पाणिनिकालीन शिक्षण व शिक्षणपद्धति	७०
६.	पाणिनिकालीन राजकीय परिस्थिति	८३
७.	पाणिनि ते पतंजलि	९२
८.	पतंजलि ते कैय्यट	१०९
९.	कैय्यट ते नागेश	१२४
१०.	पाणिनीय व्याकरणांतील अर्थप्रक्रिया	१४३
	परिशिष्ट १— पाणिनीयव्यतिरिक्त इतर व्याकरणसंप्रदाय	१६३
	परिशिष्ट २— पाणिनिकालीन समाजदर्शन	१७७

पाणिनि व पाणिनीय व्याकरणसंप्रदाय

१. पाणिनीचा काल

येन धौता गिरः पुंसां विमलैः शब्दवारिभिः ।
तमश्चाज्ञानजं भिन्नं तस्मै पाणिनये नमः ॥

जगांतील अत्यंत अद्भुत गोष्टींपैकीं पाणिनीची 'अष्टाध्यायी' हा सूत्रात्मक ग्रंथ होय असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. पाश्चात्त्य ग्रंथकारांनीं व इतर विद्वानांनीं तर या ग्रंथाची मुक्त कंठानें स्तुति केली आहे. त्यांच्या ग्रंथांतील अनेक वचनांनीं हें सिद्ध होण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, वेबर म्हणतो, 'पाणिनीचें व्याकरण हें सर्व जगांत श्रेष्ठ आहे. संस्कृत भाषेंतील धातु व त्यांपासून साधलेले शब्द आणि त्यांविषयीं त्यानें केलेलें विवेचन यांत त्यानें कोणतीहि उणीव ठेविली नाहीं.'[१] तर गोल्डस्टुकर (Goldstucker) चें मत असें आहे कीं, पाणिनीचें व्याकरण म्हणजे संस्कृत भाषेचा एक इतिहासच आहे म्हणा ना. तो प्राचीन वाङ्मयाचा एक मध्यबिंदूच आहे. शास्त्रीय प्रगतीच्या भूमींत याच्याइतकें दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाचें मूळ खोल गेलेलें नाहीं.[२]

---

१. "Panini's grammar is superior to all similar works of other countries by the thoroughness with which it investigates the roots of the language and the formation of its words."

'History of Indian Literature'. p. 216

२. "Panini's work is indeed a kind of natural history of the Sanskrit language. It is the centre of a vast and important branch of ancient literature. No work has struck deeper roots than his in the soil of scientific development of India."

— Goldstucker.

पाणिनीचा काळ—

प्रथमतः पाणिनीचा काल ठरविल्याशिवाय आपल्याला पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. कारण काल व स्थल हे इतिहासाचे दोन नेत्र आहेत व त्यांत विकार असल्यास इतिहासाला काणत्व येतें. प्राचीन ग्रंथकारांविषयीं इतिहासाच्या अभावीं त्यांच्या कालाची नेहमींच ओढाताण होते. हा काल नक्की करण्यासाठीं ग्रंथाच्या अंतर्गत व बाह्य पुराव्यांवरून कांहीं अनुमान निघतें का पहावयाचें असतें. पण यांतहि मतभिन्नतेला चांगलाच वाव असतो हें महाभारत, कालिदास, चाणक्य यांच्या कालनिर्णयावरून ध्यानांत येईल. मात्र कांहीं ग्रंथकारांच्या ग्रंथांतील अंतर्गत पुराव्यांवरून त्यांचा काल निश्चित करतां येतो. उदाहरणार्थ, महाभाष्यकार पतंजलि याच्या महाभाष्यांत 'वर्तमाने लट्'। या पाणिनीच्या ३।२।१२३ सूत्रांतील व्याख्यानांत 'इह पुष्यमित्रं याजयामः' किंवा 'अनद्यतने लङ्'। ३।२।१११ या सूत्रावरील 'साकेतमरुणद्यवनः' या उदाहरणानें पतंजलीचा काल इ. स. पू. १५० हा निश्चित झाला. कारण वरील दोन उदाहरणांत नकळत दोन ऐतिहासिक घटनांचा उल्लेख आहे! पण पाणिनीच्या बाबतींत तसें कांहींच नाहीं. त्याचा काल ठरविण्यासाठीं अंतर्गत पुरावा म्हणजे त्यानें रचिलेलीं जवळजवळ चार हजार सूत्रें. या सूत्रांची अनेक दृष्टींनीं छाननी करून संशोधकांनीं त्याचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. गोल्डस्टुकरच्या मतें पाणिनीचा काल इ. स. पू. सातव्या शतकाच्या अलीकडे येऊं शकत नाहीं. त्याचें म्हणणें असें कीं, निरुक्तकार यास्क व बुद्ध यांच्या मधल्या काळांत पाणिनीचा काल आहे.[३] डॉ. भांडारकरांचेंहि तेंच मत आहे पण ते वेगळें कारण देतात. ते म्हणतात कीं, पाणिनीच्या अष्टाध्यायींत दक्षिण देशाचा उल्लेख नाहीं. प्रो. पाठक त्याचा काल महावीराच्या पूर्वीचा म्हणजे इ. स. पू.

---

३. "The investigation of the relative position which Panini holds in ancient Sanskrit literature is more likely to lead to a solid result, than speculations as to the real date of his life." (Panini, His place in Sanskrit Literature. p. 67.)

सातव्या शतकाचा अखेर मानतात.[४] देवदत्तपंत भांडारकर तो इ. स. पू. सहाव्या शतकाचा मध्य मानतात. याचप्रमाणें शारपेंटिअर, (Carpentier), रायचौधरी, ग्रिअर्सन, मॅक्डोनेल, बोथलिंग्, वेबर, लीबिश् (Liebich) वगैरेंनीं वेगवेगळा काल (इ. स. पू. ७ वें शतक तें इ. स. पू. ४ थें शतक) ठरविला असून कारणेंहि वेगवेगळीं दिलीं आहेत. त्यांपैकीं कांहींचा विचार येथें करावयाचा आहे.

(१) वेदांग ज्योतिष—

पाणिनीच्या सूत्रांपैकीं 'श्रविष्ठाफल्गुन्यनुराधास्वातितिष्यपुनर्वसुहस्तविशाखाऽषाढाबहुलाल्लुक्' । ४।३।३४ असें एक सूत्र आहे. यांत श्रविष्ठा म्हणजे धनिष्ठा नक्षत्राला पहिलें स्थान आहे. यावरून ज्या कालांत वर्षगणना दक्षिणायन संपून उत्तरायण लागण्याच्या (Winter solstice) वेळीं होती तो पाणिनीचा काल असावा. या नक्षत्रांत सूर्य आणि चंद्र असण्याचा काल गणिताप्रमाणें इ. स. पू. १३७२ ते इ. स. पू. ४०५ हा आहे[५]. अयन-बिंदु पश्चिमेकडे एक अंश सरकण्यास सत्तर वर्षें लागतात. या हिशेबानें नक्षत्राचे $१३\frac{१}{३}$ अंश मागें टाकण्यास सुमारें ९३३ वर्षें लागतात. पुढें महाभारतांत 'श्रवणादीनि ऋक्षाणि'[६] असा उल्लेख आहे. यावरून पाणिनीचा काल या संधिकालांत म्हणजे इ. स. पू. ४०५ (पांचवें शतक) असावा. कारण महाभारतांत अन्यत्र म्हणजे वनपर्व अ. २३०–१० मध्यें श्रविष्ठेपासूनहि कालगणना होत असल्याचा उल्लेख आहे. लोकमान्य टिळकांच्या मतें वेदांगज्योतिषकालीं धर्मकार्यासाठीं कृत्तिका नक्षत्रापासून प्रारंभ होत होता. वर्षारंभाचें नक्षत्र श्रविष्ठा होतें. श्रविष्ठा नक्षत्राचा काल इ. स. पू. १३७२ ते इ. स. पू. ४०५ होता असें मागें

---

४. A. B. O. R. I. XI Page 83.

५. 'In 1372 B. C. the sun, moon and श्रविष्ठा were in conjunction at the time of Winter Solstice.'

(Prof. Jogesh Chandra Ray.)

६. अश्वमेध पर्व, अ. ४४।२.

सांगितलेंच आहे. इ. स. पूर्व ४०५ हा काल कमींत कमी (Lower limit) येतो. तेव्हां या अनुमानाप्रमाणें मध्यंतरीच्या हजार वर्षांत केव्हांतरी पाणिनि होऊन गेला, असें म्हणतां येईल. दुसरें असें कीं, काल ठरविण्याची ही सर्व इमारत सूत्रांत श्रविष्ठा नक्षत्राला पहिलें स्थान आहे यावर उभारलेली आहे. पण पाणिनीनें हेतुतः त्या नक्षत्राला पहिलें स्थान दिलें या म्हणण्यास पुरावा नाहीं. शिवाय सूत्रांत जीं इतर नक्षत्रनामें दिलीं आहेत तीं सूर्यमार्गावर (Ecliptic) क्रमानें आढळत नाहींत. तेव्हां हा मुद्दा फारसा उपयोगी पडत नाहीं.

(२) सूत्रांतील कांहीं शब्द--

सूत्रांतील कांहीं शब्दांच्या उल्लेखांवरून पाणिनि बुद्धोत्तर कालांत होऊन गेला असें कांहींचें मत आहे. उदाहरणार्थ, निर्वाण[७], कुमारश्रमण[८] चीवरायते[९], सङ्घ[१०], औत्तराधर्य[१०], निकाय इत्यादि शब्द पाणिनीच्या सूत्रांत आढळून येतात. पण हे शब्द बुद्धपूर्व कालांत नव्हते हें कशावरून? 'निर्वाण' शब्द गीतेंतहि आहे[११]. पाणिनीनें 'कुमारश्रमणा' (Maiden nuns) हा शब्द २।१।७० या सूत्रानें साधला आहे. पण 'अविवाहित संन्यासिनी' बुद्धानंतरच होत्या व पूर्वीं अस्तित्वांत नव्हत्याच यालाहि पुरावा नाहीं. काशिकाकारानें पुढें सातव्या शतकांत 'काशिका' ग्रंथ लिहिला. त्यांत सूत्र ३ । १ । २० याचें व्याख्यान करतांना 'संचीवरयते भिक्षुः' (Donning the monk's robe) असें उदाहरण दिलें आहे. पण काशिकाकार बौद्ध होता तेव्हां त्यानें 'भिक्षु' शब्द योजणें साहजिकच होतें. आतां 'सङ्घे चानौत्तराधर्ये' । ३।३।४२ या सूत्रांतील 'सङ्घ' आणि 'अनौत्तराधर्य' या शब्दांबद्दल मात्र तसें म्हणतां येत

---

७. निर्वाणोऽवाते। ८।२।५०.

८. कुमारः श्रमणादिभिः। २।१।७०.

९. पुच्छभाण्डचीवराण्णिङ्। ३।१।२०.

१०. सङ्घे चानौत्तराधर्ये। ३।३।४२.

११. शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति। गीता अ. ६।१५.

नाहीं. बौद्धसंघांतील भिक्षु उत्तर आणि अधर (वरचा आणि खालचा) असा फरक करीत नसत. " Such a Sangha was a typical religious institution which did not know that distinction of upper and lower classes. It was a democratic body " (India as known to Panini by Dr. V. S. Agrawal. p. 459.)

बुद्धसंघांत उच्चनीच भाव नव्हता. कोणी तरी एक मठाधिपति आणि इतर त्याचे शिष्य असा भेदभाव (उत्तराधर्य) नव्हता. पाणिनीनें अशा संघालाच वरील सूत्रानें 'निकाय' अशी संज्ञा दिली आहे. उ० भिक्षुनिकायः (समानदर्जाच्या भिक्षूंचा संघ). तसें नसलें व खालीवर अशी श्रेणी असली तर ' निचय ' रूप होतें, ' निकाय ' होत नाहीं. असा विशिष्ट संघ बुद्धभिक्षूशिवाय नव्हता असा याच्या मुळाशीं दावा आहे. यावरून बुद्धकालानंतर पाणिनि होऊन गेला असें कित्येकांचें मत आहे.

(३) बाह्य पुरावा :—पाणिनि आणि नंद घराणें—

नंद घराण्यांतील राजे राज्य करीत असतां पाणिनीचा उल्लेख बौद्ध व इतर वाङ्मयांत आढळतो. म्हणजे तो कोणत्या तरी नंद राजाचा समकालीन होता. त्यांपैकीं कांहीं दंतकथा असण्याचाही संभव आहे. उदाहरणार्थ, राजशेखर कवीनें आपल्या काव्यमीमांसा ग्रंथांत एका श्लोकांत असें म्हटलें आहे कीं, वर्ष, उपवर्ष, पाणिनि, वररुचि, पिंगल, पतंजलि आणि व्याडि या सर्वांच्या विद्येची पारख पाटलिपुत्र राजधानींत झाली.[१२] आतां हे सर्व विद्वान् समकालीन नव्हते हें उघड आहे. फार तर इतकें म्हणतां येईल कीं, सर्वांना या नंद राजघराण्याचा आश्रय असावा, व कदाचित् पाणिनीचा आश्रयदाता या घराण्यांतील महापद्मनंद असावा. पंचतंत्रांत एक दंतकथा आहे कीं, पाणिनि, जैमिनि व पिंगल यांच्या मृत्यूला अनुक्रमें सिंह, हत्ती व मगर कारणीभूत

---

१२. अत्रोपवर्षवर्षाविह पाणिनिपिङ्गलाविह व्याडिः।
वररुचिपतञ्जली इह (पाटलिपुत्रे) परीक्षिताः ख्यातिमुपजग्मुः॥
(काव्यमीमांसा).

झाले ![13] सोमदेवाच्या कथासरित्सागरांत व क्षेमेंद्राच्या बृहत्कथामंजरींतही पाणिनि नंद घराण्याशीं संबद्ध होता असें म्हटलें आहे. 'मंजुश्री-मूलकल्प' नांवाचा ग्रंथ अलीकडे उपलब्ध झाला आहे त्यावरूनही वरील विधानाला बळकटी येते असें डॉ. जयस्वाल यांचें म्हणणें आहे. चिनी प्रवासी युअन च्वांग आपल्या ग्रंथांत म्हणतो कीं, पाणिनीच्या जन्मस्थलीं (शलातुर) गांधार प्रदेशांत गेलों असतां मला अशी दंत-कथा सांगण्यांत आली कीं, पाणिनीनें आपला अष्टाध्यायी ग्रंथ पूर्ण केल्यानंतर त्यानें तो नंद सम्राटाकडे पाठविला. त्यावर तो संतुष्ट होऊन तो ग्रंथ आपल्या राज्यांत शिकविण्यांत यावा असा आदेश त्यानें आपल्या अधिकाऱ्यांना दिला. या सर्व बाबतींत अडचण आहे ती ही कीं, नंद घराण्याचा आदि आणि अंत ठरविण्याची. इतकें म्हणतां येईल कीं, नंद घराण्यांतील शेवटचा राजा इ. स. पू. ३२६ पावेतों होता. पाणिनीचा समकालीन महापद्मनंद किंवा त्याचा पिता महानंद याचा काल सुमारें इ. स. पू. ४४६ ते इ. स. पू. ४०३ होता. या नंद कथेला वाङ्मयांतही आधार मिळतो. 'उपज्ञोपक्रमं तदाद्याचिख्या-सायाम्'। २-४-२१ या सूत्रावर काशिकाकार व्याख्यान करतांना 'नंदोपक्रमाणि मानानि' असें उदाहरण देतो. म्हणजे नंदवंश राज्य करीत असतांना प्रथमतःच वजनें आणि मापें यांना अधिकृत स्वरूप आलें.[14]

---

१३. सिंहो व्याकरणस्य कर्तुरहरत् प्राणान् प्रियान्पाणिनेः।
मीमांसाकृतमुन्ममाथ सहसा हस्ती मुनिं जैमिनिम् ॥
छंदोज्ञाननिधिं जघान मकरो वेलातटे पिङ्गलम् ।
अज्ञानावृतचेतसामतिरुषां कोऽर्थस्तिरश्चां गुणैः ॥

१४. 'In the illustration 'नन्दोपक्रमाणि मानानि' we have an allusion that the weights and measures of the country were standardised for the first time by King Nanda.'

'India as known to Panini,' p. 464.

(४) यवन आणि यवनानी—

पाणिनीच्या एका सूत्रांत[१५] ' यवन ' शब्द आला असून त्याचें स्त्रीलिंगी रूप ' यवनानी ' होतें असें म्हटलें आहे. पाणिनीचा नक्की काल ठरविण्यास हें सूत्र कित्येकांच्या मतें फारच उपयोगी आहे. कारण यवन म्हणजे ग्रीस देशांतील अयोनिया प्रांतांतील रहिवासी (Ionians). यामुळें कित्येकांच्या मतें (यांत बर्नेल, वेबर वगैरे येतात) अलेक्झांडरच्या स्वारीनंतर (इ. स. पू. ३२७) भारतीयांचा ग्रीक लोकांशीं संबंध आला. ज्या अर्थी ' यवन ' (Ionian) शब्द पाणिनीच्या सूत्रांत आहे त्या अर्थी पाणिनीचा काल अलेक्झांडरच्या स्वारीनंतरचा असावा. यवन शब्दाचें स्त्रीलिंगी रूप ' यवनी ' न होतां ' यवनानी ' होतें असेंहि त्या सूत्रांत म्हटलें आहे. पुढें कात्यायन वार्तिककारानें ' यवनाल्लिप्याम् ' असें वार्त्तिक करून ' यवनानी ' म्हणजे ' यवनांची लिपि ' असा अर्थ घ्यावा असें म्हटलें आहे. लिपि हा इराणी ' डिपि ' शब्दाचा अपभ्रंश आहे. यावर आक्षेप असा कीं, यवन लोकांशीं भारतीयांचा संबंध किंवा ओळख अलेक्झांडरच्या स्वारीनंतर झाली असें हे टीकाकार गृहीत धरून चालले आहेत. पण तें चूक आहे. ऐतिहासिक दृष्ट्या तत्पूर्वी निदान दोन शतकें तरी भारतीयांना ग्रीक माहीत होते. आयोनिया आणि पाणिनीची जन्मभूमि गांधार हे दोन प्रांत ग्रीक सम्राट् डरायस (इ. स. पू. ५१६) याच्या आधिराज्यांत मोडत होते. 'यवनानी' लिपि फक्त गांधार देशांतच प्रचलित होती. यावर प्रो. कीथ म्हणतो, ' If it is borne in mind that Panini was a native of Gandhara according to Hieun Tsaing, a view confirmed by the references in his grammar, it will not seem far-fetched to consider that it was most probably from the older tradition that the name यवनानी was derived.' (Aitareya Āranyaka, p. 23.)

१५. ' इंद्रवरुणभवशर्वरुद्रमृडहिमारण्ययवयवनमातुलाचार्याणामानुक् । ' ४।१।४९.

(५) पाणिनि आणि दक्षिण देश—

पाणिनीच्या सूत्रांवरून त्याचें भौगोलिक ज्ञान समजून येतें. त्याच्या याविषयीच्या ज्ञानाच्या चतुःसीमा उत्तरेस कम्बोज, दक्षिणेस गोदावरी-कांठचा अश्मक [अर्वाचीन पैठण], पश्चिमेकडे सौवीर [सिंध] आणि पूर्वेकडे कलिंग व आसाममधील सुरमा खिंड अशा होत्या. दक्षिणेकडील भाग त्यास माहीत नव्हता हें म्हणणें बरोबर नाहीं, हें 'अन्तरदेशे' ८।४।२४ व 'अयनं च' ८।४।२५ या सूत्रांवरून सिद्ध होतें, इतकेंच नव्हे तर सागरांतील कांहीं द्वीपेंही त्याला माहीत होतीं. निरुक्तकाराला [यास्काला] दक्षिण देश माहीत होता हें 'विजामातृ' ६·९ या शब्दावरून स्पष्ट होतें. हा शब्द दाक्षिणात्य लोक वापरीत. त्याचा अर्थ जो श्वशुराला वधूनिमित्त रक्कम देतो तो. दक्षिण देश हा त्या वेळीं सुद्धां संस्कृत विद्येसाठीं प्रसिद्ध होता. वार्तिककार कात्यायन हा दाक्षिणात्यच होता. कात्यायन आणि पाणिनि यांत फार झालें तर शेंदीडशें वर्षांचें अंतर असेल. त्याच्या संबंधांत पतंजलीनें महाभाष्यांत 'प्रियतद्धिताः दाक्षिणात्याः' असें म्हटलें आहे [महाभाष्य–भाग १, पान १८, म. म. अभ्यंकरकृत]. तेव्हां डॉ. भांडारकर म्हणतात कीं, पाणिनीच्या अष्टाध्यायींत दक्षिण देशाचा उल्लेख नाहीं तें बरोबर नाहीं व त्यावरून पाणिनीचा काल ठरविणें तेंहि बरोबर नाहीं.

(६) पाणिनीचें भौगोलिक ज्ञान—

पाणिनीच्या सूत्रांत उशीनर, गौड, प्राच्यभरत वगैरे देशांचीं नांवें आलीं आहेत. त्यांवरून एवढेंच सिद्ध होईल कीं, पाणिनीचा काल अत्यंत प्राचीन नसून ज्या वेळीं आर्य संस्कृतीचा व संस्कृत भाषेचा प्रसार या देशांत झाला होता असा काल म्हणजे उपनिषत्कालानंतर असावा. हा काल साधारणपणें पाली व प्राकृत यांचा सार्वत्रिक फैलाव होण्यापूर्वींचा असावा असें दिसतें.[१६]

---

१६. पहा, 'व्याकरण-महाभाष्य' भाग ७ वा, पान ५.
(प्रा. का. वा. अभ्यंकरकृत).

शिवाय पाणिनीचीं 'भिद्योद्ध्यौ नदे' ३।१।११५ व 'पुष्यसिध्यौ नक्षत्रे' ३।१।११६ अशीं दोन सूत्रें आहेत. यांत भिद्य व उद्ध्य या दोन नदांचीं नांवें आहेत व पुढील सूत्रांत पुष्य व तिष्य या दोन नक्षत्रांचीं आहेत. हीं नांवें लोकांत पूर्ण प्रचारांत होतीं असा काल म्हणजे इ० सनापूर्वी बरींच शतकें असावा.[१७]

(७) पाणिनीचीं सूत्रें आणि संस्कृत भाषा—

पाणिनीनें जीं व्याकरणसूत्रें रचिलीं तीं कोणत्या भाषेसाठीं रचिलीं हाही मुद्दा त्याचा काल ठरविण्यासाठीं विचारांत घेतला पाहिजे. पाणिनिकालीं संस्कृत भाषा ही बोलभाषा होती व ती वैदिक संस्कृतापासून दूर दूर जात होती असें दिसतें. पाणिनीनें आपलें व्याकरण वैदिक संस्कृत व भाषा (बोलभाषा) या दोहोंसाठीं रचिलें. त्याप्रमाणें फरक दाखविण्यासाठीं सूत्रांतून 'छंदसि' किंवा 'भाषायाम्' अशीं पदें घातलीं आहेत.[१८] 'छंदसि' या पदानें सुरुवात असलेलीं तीस तरी सूत्रें असतील व सूत्रांत कोठेंतरी 'छंदसि' पद असलेलीं सूत्रेंहि अनेक आहेत. कोणी म्हणतात, पाणिनिकालीं शिष्ट लोक संस्कृतभाषा बोलत होते. त्या भाषेचें व्याकरण त्यानें रचिलें. पाणिनीनें आपल्या दृष्टिपथांत वेगवेगळ्या प्रदेशांतील बोलभाषेंतील बारकावे आणले होते यांत शंका नाहीं. कारण सूत्रांत 'उदीच्याम्', 'प्राच्याम्' अशीं पदें आढळतात. प्रांताप्रांतांतले लोक बोलतांना कसे आघात करतात किंवा हेल काढतात हेंहि त्यानें 'उदक् च विपाशः' ४।२।७४ या सूत्रांत दाखविलें आहे आणि त्यावरूनच काशिकाकारानें 'अहो महती सूक्ष्मेक्षिका वर्तते सूत्रकारस्य' असे गौरवपर उद्गार काढले आहेत. स्वरयुक्त उच्चारण्याच्या बाबतींत बियास

१७. कित्ता. सिध्य म्हणजेच तिष्य।

१८. भाषायां सदवसश्रुवः। ३।२।१०८; सख्यशिश्वीति भाषायाम्। ४।१।६२; विभाषा भाषायाम्। ६।१।१८१; प्रथमायाश्च द्विवचने भाषायाम्। ७।२।८८; पूर्वं तु भाषायाम्। ८।२।९८; छंदस्यपि दृश्यते। ६।४।७३ वगैरे तीस सूत्रें.

(विपाशा) नदीच्या उत्तरेकडील लोक कसे स्वर (accents) उच्चारतात हें या सूत्रांत फार बारकाईनें पाणिनीनें दाखविलें आहे !

गोल्डस्टुकरनें एका ठिकाणीं असें विधान केलें आहे कीं, पाणिनीला उपनिषद्वाङ्मय माहीत नव्हतें ! हें म्हणणें सत्याला धरून नाहीं. कारण पाणिनीचें ' जीविकोपनिषदावौपम्ये '। १।४।७९ असें सूत्र असून त्यांत ' उपनिषद् ' शब्द आला आहे. पाणिनीला औपनिषदिक वाङ्मयच काय पण त्या वेळचें विदग्ध वाङ्मयही परिचित होतें असें म्हणावें लागतें. शिशुक्रंदीय, यमसभीय, इंद्रजननीय व इतर अनेक काव्यांचा उल्लेख त्याच्या सूत्रांत आहे.[१९] त्याचप्रमाणें भिक्षुसूत्रें आणि नटसूत्रें यांचाही अष्टाध्यायींत उल्लेख आहे.[२०] यावरून पाणिनीचा काल बराच अलीकडे येतो. याउलट गोल्डस्टुकर म्हणतो कीं, पाणिनीला आरण्यकें, उपनिषदें, प्रातिशाख्यें, वाजसनेयी संहिता, शतपथ ब्राह्मण, अथर्ववेद आणि षड्दर्शनें माहीत नव्हतीं ! तर त्याला ऋग्वेद, सामवेद व कृष्णयजुर्वेद माहीत होते. हें विधान किती विसंगत आहे हें वर दाखविलेंच आहे.

पाणिनीला महाभारत कोणच्या तरी स्वरूपांत माहीत होतें.[२१]

पाणिनीचा काल ठरविण्यासाठीं महत्त्वाचे कांहीं अंतर्गत आणि बाह्य पुरावे दिले. कांहीं लहानसहान पुरावेहि कांहीं लोक पुढें करतात, त्यांसंबंधीं थोडें विवेचन करणें प्राप्त आहे.

पाणिनीच्या सूत्रांत जसा ' यवन ' शब्द आलेला वर दाखविला आहे, त्याप्रमाणें यस्क, मनु वगैरे शब्दहि आले आहेत.[२२] त्यावरून असें सिद्ध करण्याचा प्रयत्न होतो कीं, यास्काचार्य व स्मृतिकार मनु यांच्यानंतरचा

---

१९. शिशुक्रन्दयमसभद्वन्द्वेन्द्रजननादिभ्यश्छः । ४।३।८८

२०. पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः । ४।३।११०

२१. Bhandarkar Commemoration Volume (Utgikar), p. 340.

२२. यस्कादिभ्यो गोत्रे । २।४।६३; मनोरौ वा । ४।१।३८.

पाणिनीचा काल असावा. पण हें म्हणणें तितकेंसें बरोबर नाहीं. कारण यस्क व मनु हीं गोत्र-नांवें असल्यानें तीं यास्क व मनु यापूर्वी कित्येक शतकें प्रचारांत असणें संभवनीय आहे.

(८) पाणिनि आणि कौटिल्य—

असें दाखविण्यांत येतें कीं, कौटिल्य आणि पाणिनि यांच्या भाषेंत तर साम्य आहेच, पण कित्येक शब्दहि समान दाखवितां येतील. डॉ. अग्रवाल यांनीं अशा बऱ्याच शब्दांची यादी दिली आहे. उदाहरणार्थ— मैरेय, कापिशायन, देवपथ, आक्रन्द, उपनिषद्, विनय, परिषद्, विश्य, श्वागणिक, आपमित्यक, याचितक, यौजनशतिक, दूत, अषडक्षीण, व्युष्ट, वैयुष्ट, केदार, पारिखेयी, माहिष, अध्यक्ष, युक्त, अवक्रय वगैरे. पाणिनि आणि कौटिल्य यांमध्यें एक शतकाचा तरी फरक असावा. अर्थात् पाणिनि हा कौटिल्यपूर्व आहे.

नाणीं :— नाण्यांच्या उल्लेखांवरूनहि असें दाखवितां येईल कीं, पाणिनीची अष्टाध्यायी कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या पूर्वीची आहे. कारण पाणिनीच्या सूत्रांतील निष्क, सुवर्ण, शाण आणि शतमान हीं नाणीं फार जुनीं असून तीं कौटिल्याला माहीत नव्हतीं असें दिसतें. त्याचप्रमाणें अष्टाध्यायींतील विंशतिक आणि त्रिशतक हीं नाण्यांचीं नांवेंहि अर्थ-शास्त्रांत नाहींत. पाणिनीच्या शतमान नाण्याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत आहे. विंशतिक आणि कार्षापण (वीस माष किंवा चाळीस रति वजनाचें नाणें) नंदराजे असतांना चालू नाणें होतें. यावरून पाणिनीचा काल ठरविण्यास मदत होते.[२३]

२३. 'On the basis of his numismatic data Panini thus belongs to the period of transition between the age of बिंबिसार and कौटिल्य, i. e. between the sixth and the fourth century B. C. A date in the fifth century B. C. admirably reconciles the coin-references of the अष्टाध्यायी'.

'India as known to Panini,' page 473.

(९) आयुधजीवी टोळ्यांचे (Tribes) उल्लेख—

पाणिनीच्या सूत्रांत त्या काळच्या आयुधजीवी टोळ्यांचा उल्लेख आहे.[२४] 'पर्श्वादि' गणांत खालील आयुधजीवी गणांचा समावेश होतो—पर्शु, असुर, रक्षस्, वाल्हीक, वयस्, वसु, मरुत्, सत्वत्, दशार्ह, पिशाच, अशनि, कार्षापण. तर 'यौधेय' गणांत यौधेय (कौशेय), शौक्रेय, शौभ्रेय, धार्तेय, धार्तेय, ज्यावाणेय, त्रिगर्त, भरत आणि उशीनर. यांपैकीं कांहीं टोळ्यांचा उल्लेख ग्रीस आणि पर्शिया यांच्या इतिहासांत सांपडतो व त्यावरून पाणिनीचा काल ठरविण्यास मदत होते. उदाहरणार्थ–'पर्शु' नांवाचा आयुधजीवी संघ पर्शियांतील 'पार्स' नांवाशीं जुळतो व हा शब्द बेहिस्टन शिलालेखांत आहे. बॅबिलोनियांत तोच शब्द पर्-सु असा असून तो पाणिनीच्या 'पर्शु' शब्दाच्या अगदीं जवळचा आहे. 'पर्शु' हें एका प्रांताचें नांवहि होतें आणि तेथें राहणाऱ्याला 'पार्श्व' म्हणत. या भागांतील बरेच लोक ग्रीक सैन्यांत असत. त्या वेळीं वायव्येकडील प्रांत आणि पर्शिया यांचें दळणवळण होतें आणि पाणिनि हा वायव्यप्रांतांतील रहिवासी असल्यामुळें त्याला ह्या आयुधजीवी टोळ्या व त्यांचीं नांवें ऐकून माहिती असलीं पाहिजेत.[२५] असाच 'वृक' नांवाच्या आयुधजीवी लोकांचा अष्टाध्यायींत उल्लेख आहे.[२६] त्या गणांतील व्यक्तीला 'वार्केण्य' म्हणत. (वृक + एण्य = वार्केण्य). टोळींतील लोकांना 'वृकाः' नांव होतें. कदाचित् हे लांडग्यासारखे क्रूर आणि खादाड असावेत ! याही नांवाचा उल्लेख शिलालेखांत सांपडतो. ही टोळी शकांपैकीं असावी.

(१०) पाणिनि 'कन्था' शब्द शेवटीं असलेल्या गांवांचीं नांवें वर्णु (बन्नु) व उशीनर देशांत असल्याचें सांगतो.[२७] उ० छिन्नकन्थम्, मद्गुर-

२४. पर्श्वादियौधेयादिभ्यामणञौ । ५।३।११७.

२५. आयुधजीविसङ्घाञ्ञ्यड्वाहीकेष्वब्राह्मणराजन्यात् । ५।३।११४.
दामन्यादित्रिगर्तषष्ठाच्छः । ५।३।११६. दामन्यादि गणांत आयुधजीवी-संघवाचक वीस शब्द आहेत.

२६. वृकाट्टेण्यण् । ५।३।११५.

२७. संज्ञायां कन्थोशीनरेषु । २।४।२०

कन्थम् इत्यादि. पाणिनीनें हा शब्द सिथिअन भार्षेतून घेतला आहे असें पाश्चात्त्य संशोधक म्हणतात. तो मूळ नगरवाचक आहे. उ० समरकंद, खोकंद इत्यादि. त्याचप्रमाणें एका सूत्रांत जाबाल आणि हैलिहिल (विष) शब्द आहेत.[२८] ते मूळ सेमिटिक आहेत. ही सर्व परिस्थिति डरायस् (इ. स. पू. ५२२ ते ४८६) व झर्केक्स (Xerxes) (इ. स. पू. ४८५ ते ४६५) या वेळची असल्यानें पाणिनीचा काल ठरविण्यास अप्रत्यक्षपणें बाह्य पुरावा म्हणून मदत होते.

(११) त्याचप्रमाणें एका सूत्रावरच्या गणसूत्रांत 'क्षुद्रक-मालव' असा शब्द सेना या अर्थी पाणिनीनें साधला आहे.[२९] वेबरच्या मतें या 'क्षुद्रक-मालव' सेनेनें अलेक्झांडरच्या सेनेला प्रतिकार केला असें नमूद आहे. त्या अर्थी पाणिनीचा काल यानंतरचा असावा. ग्रीक इतिहासांत Oxydrakai आणि Mallvi असा त्यांचा उल्लेख आहे. परंतु ही सेना तात्पुरती व हंगामी नसून कायम स्वरूपाची असल्यानें पाणिनीनें हें गणसूत्र स्वतःच रचिलें असावें. क्षुद्रक आणि मालव या दोन टोळ्या आपापसांत भांडत असत. अलेक्झांडरच्या सेनेला प्रतिकार करतांना सेनापति कोणाचा असावा याविषयीं भांडण झालें असें ग्रीक इतिहासकार डायोडोरस (Diodoros) म्हणतो.[३०] पतंजलीच्या भाष्यांतहि 'एकाकिभिः क्षुद्रकैर्जितम् । असहायैरित्यर्थः' (१-८३. १-१३२.) असा उल्लेख आहे. तात्पर्य, पाणिनि आणि ग्रीक इतिहासकार या दोघांच्याही मतें क्षुद्रक–मालव नांवाची सेना शिकंदराच्या स्वारीपूर्वीच अस्तित्वांत होती.

(१२) इतर मतें— रा. ब. चिंतामणराव वैद्य मात्र पाणिनीचा

---

२८. महान्व्रीह्यपराह्णगृष्टीष्वासजाबालभारभारतहैलिहिलरौरवप्रवृद्धेषु । ६ । २ । ३८.

२९. खण्डिकादिभ्यश्च । ४।२।४५ (क्षुद्रकमालवात्) सेनासंज्ञायाम् । (ग. सू.)

३०. 'Diodoros expressly states that the Kshudraka-Malavas could not agree as to the choice of a leader and ceased in consequence to keep the field together'.

(Alex. Invasion, p. 268 f. n.)

काल खिस्तपूर्व आठवें शतक मानतात तर कै॰ **इतिहासाचार्य राजवाडे** तो खिस्तपूर्व ७०० च्या अलीकडे बिलकुल ओढतां येत नाहीं असें ठासून सांगतात.[३१] इतरांपेक्षां त्यांचीं कारणें निराळीं आहेत. त्यांचा थोडक्यांत निष्कर्ष खालीलप्रमाणें आहे—

पाणिनीचें 'अरण्यान्मनुष्ये'। ४-२-१२९ असें सूत्र आहे. त्यांत पाणिनि सांगतो कीं, 'अरण्य' शब्दाला वुञ् (अक) प्रत्यय लागून 'आरण्यक' म्हणजे 'अरण्यांतील मनुष्य' असा अर्थ होतो. पुढें वार्तिककार कात्यायन याच सूत्रावर एक वार्त्तिक करतो[३२] व 'आरण्यक' शब्दाचा अर्थ केवळ 'रानवट मनुष्य' नसून ब्राह्मणग्रंथाचे भाग,—रानवट न्याय, रानांतले बौद्ध विहार, रानांतील वाट, रानहत्ती असेही इतर अर्थ देतो. त्यांत 'रानांतील बौद्ध विहार' हा अर्थ पाणिनीला ज्या अर्थीं माहीत नव्हता, त्या अर्थीं बौद्ध विहार निर्माण होण्यापूर्वीं पाणिनि झाला व ते निर्माण झाल्यानंतर कात्यायन झाला, म्हणजे पाणिनि खिस्तपूर्व ५६३, निदान खिस्तपूर्व ४८३ च्या पूर्वीं झाला असावा. तसेंच ब्राह्मणग्रंथाच्या अध्यायाला 'आरण्यक' म्हणतात हेंही पाणिनीच्या वेळीं प्रचारांत नव्हतें, पण वार्त्तिकावरून कात्यायनाच्या वेळीं होतें असाही निष्कर्ष निघतो. म्हणजे पाणिनि आरण्यकें रचण्यांत येण्यापूर्वीं होऊन गेला असावा. हा काल फारच मागें जातो !

दुसरा एक कालनिर्णयाचा पुरावा म्हणजे 'कम्बोजाल्लुक्'। ४-१-१७५ हें सूत्र होय. या सूत्रांत फक्त 'कम्बोज' शब्दाचाच निर्देश पाणिनीनें केला आहे. परंतु कात्यायनानें या सूत्रावर 'कम्बोजादिभ्य इति वक्तव्यम्' असें वार्त्तिक करून चोल, केरल, शक व यवन हे चार शब्द अधिक घातले आहेत. म्हणजे हे चार शब्द पाणिनीला माहीत नसावे असें अनुमान निघतें. पण दुसऱ्या एका सूत्रांत 'यवन' शब्द तर आला आहे.[३३] यावर राजवाड्यांचें म्हणणें असें कीं, 'कम्बोजाल्लुक्'

३१. राजवाडे–लेखसंग्रह, भाग ३ पान १३७.

३२. पथ्यध्यायन्यायविहारमनुष्यहस्तिषु इति वाच्यम्। (कात्यायन)

३३. 'इन्द्रवरुणभवशर्व......' इत्यादि। ४।१।४९.

या सूत्रानें ' तद्राज ' प्रत्ययाचा लुक् सांगितला आहे. म्हणून ' कम्बोज देशाचा राजा ' या अर्थी झालेल्या प्रत्ययाचा ' लुक् ' सांगितला आहे. आतां पाणिनीला ' यवन ' शब्द माहीत असूनहि वरील सूत्रांत त्यानें त्याचा निर्देश केला नाहीं, त्या अर्थी पाणिनीला ' यवन ' म्हणजे ' यवन लोक ' एवढाच अर्थ माहीत असावा किंवा विवक्षित आहे. यवनांच्या देशाला, राजाला, लिपीला किंवा अभिजनाला काय म्हणत याविषयीं तो कांहींएक सांगत नाहीं. त्यावरून पाणिनि भारतांत अशा वेळीं झाला असला पाहिजे कीं, ज्या कालीं यवन शब्दाचें स्त्रीलिंगी रूप यवनानी होतें एवढेंच त्याला माहीत होतें ! पण कात्यायनाच्या वेळीं त्याला अधिक माहिती होती ती ही कीं, यवन जनपदाच्या (Ionia) राजाला यवन म्हणतात, त्या प्रदेशांतील लोकांच्या लिपीला ' यवनानी ' म्हणतात व तेथील नागरिकाला यवन (Ionian) म्हणतात इत्यादि माहिती कात्यायनाच्या वेळीं ठाऊक होती म्हणून त्यानें वार्त्तिकें करून या सर्वांचा निर्देश केला. भाषेंत जो शब्द ज्या अर्थी रूढ होता तोच पाणिनीनें सूत्रांत गोवला; म्हणजे पाणिनिकालीं यवनांचा संबंध फार दूरचा व अल्प असला पाहिजे. कात्यायन, नंद व अलेक्झांडर हे समकालीन होते म्हणजे खिस्तपूर्व ३५० ते ३२३ च्या काळांतले होते. तत्पूर्वी दोन-तीन शतकें तरी पाणिनि होऊन गेला असावा.

तिसरा एक पुरावा ते भाषेचा देतात तो असा. पाली, अर्धमागधी वगैरे भाषांचा वाचक जो ' प्राकृत ' शब्द किंवा संस्कृत भाषावाचक ' संस्कृत ' शब्द हा पाणिनीच्या अष्टाध्यायींत नाहीं. पाणिनि ज्या भाषेचें व्याकरण लिहितो तिला तो ' भाषा ' म्हणतो, वैदिक भाषेला ' छंदस् ' म्हणतो व अपभ्रष्ट भाषेला ' म्लेच्छ ' म्हणतो. त्या अर्थी स्वतंत्र भाषा-वाचक ' प्राकृत ' शब्द रूढ होण्यापूर्वी पाणिनि झाला हें निश्चित दिसतें. गौतमबुद्ध पाली भाषेंत बोले. ती गौतमाच्या पूर्वी कांहीं शतकें उत्पन्न झाली असली पाहिजे. ' कुमारश्रमण ' शब्द सूत्रांत आला आहे असें मागें सांगितलें आहे. पण सनातन वैदिक धर्मांत कुमारी श्रमणांची चाल होती. गार्गी, धारिणी, सुलभा व मैत्रेयी या वैदिक धर्मांतल्या ' कुमारी

श्रमणा ' म्हणजे अविवाहित प्रौढ स्त्रिया संन्यासदीक्षा घेतलेल्या प्रसिद्ध असून ' श्रमण ' शब्द बुद्धपूर्व आहे.

याशिवाय पर्शु, असुर वगैरे आयुधजीवी लोकांचा निर्देश पाणिनि-सूत्रांत आहे हें मागें दाखविलेंच आहे. त्यावरून राजवाडे पाणिनि इ. स. पू. ८५० ते इ. स. पू. ५३८ पर्यंत केव्हां तरी झाला असावा असें म्हणतात.

सारांश, लेखाचा मुख्य हेतु पाणिनीचा काल ठरविण्यासाठीं संशोधकांनीं कोणकोणते अंतर्गत व बाह्य पुरावे पुढें केले आहेत हें दाखविण्याचा आहे. राजवाडे यांनीं हा लेख सन १९१० मध्यें भा. इ. सं. मं. च्या इतिवृत्तांत प्रसिद्ध केला. त्यावर केसरींत डॉ. गर्दे, प्रो. पाठक व आचार्य गजेंद्रगडकर यांनीं आक्षेप घेतले. त्यावर राजवाड्यांनीं त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनें कडाडून हल्ला चढविला आहे.[३४]

डॉ. बेलवलकरांच्या मतें पाणिनीचा काल इ. स. पू. ७०० ते इ. स. पू. ६०० असावा.[३५] त्यांनीं दिलेलीं कारणें इतरांसारखींच आहेत पण कांहीं नवीन आहेत. ते म्हणतात, 'यवन' यांतील व (v) च्या उच्चाराचें साम्य ग्रीक अक्षरांतील r (digamma) शीं आहे व ग्रीक अक्षरसमूहांतून या 'डिग्मा'चें उच्चाटन ख्रिस्तपूर्व ८०० पूर्वींच झालेलें असल्यानें पाणिनि त्यापूर्वीचा असावा. त्यांनीं इतिहासाचार्य राजवाड्यांना उचलून धरलें आहे. पाणिनीनें 'सङ्कलादिभ्यश्च'। ४।२।७५ या सूत्रांत ज्या ' सङ्कल ' (ग्रीक सङ्गल) शहराचा उल्लेख केला आहे, तें शहर अलेक्झांडरनें उद्ध्वस्त केलें, कारण तेथील लोकांनीं त्याला प्रतिकार केला होता. तेव्हां अलेक्झांडरच्या स्वारीनंतर पाणिनि झाला असला पाहिजे या म्हणण्याला कांहीं अर्थ राहत नाहीं. विष्णुपुराण आणि महाभारताच्या भीष्मपर्वातील

३४. पहा— केसरी आश्विन शु॥ १ शके १८३२. (सन १९१० दि. ३० ऑगस्ट).

३५. Systems of Sanskrit Grammar by Dr. Belwalkar. p. 15.

अध्याय ११ यांतील माहितीला आपण पुराण म्हणून मागें टाकतों तें बरोबर नाहीं. त्या माहितीचा उपयोग पाणिनीचा काल ठरविण्यासाठीं होतो. 'शक' शब्दाचा निर्देश कात्यायनाच्या वार्त्तिकांत असल्यानें तो पाणिनीला माहीत नसावा. शक म्हणजे सिथिअन्स् (Skythians) आणि त्यांचा पहिला राजा दिऔकस् (Deioces) याचा काल सुमारें इ. स. पू. ७०० आहे. म्हणून पाणिनि तत्पूर्वीचा असावा.

तात्पर्य— पाणिनीचा काल निश्चित करण्यासाठीं आतांपावेतों अनेक अंतर्गत व बाह्य पुराव्यांची कसून छाननी केली. त्यासाठीं अनेक पौर्वात्यांच्या व पाश्चात्यांच्या विधानांची चर्चा केली. वेदांग-ज्योतिष, त्या वेळची प्रचलित संस्कृत भाषा, त्या वेळच्या राजकीय घडामोडी—विशेषतः नंद घराणें व अलेक्झांडरची स्वारी, त्या वेळच्या आयुधजीवी टोळ्यांचे (Tribes) सूत्रांत आलेले उल्लेख, अष्टाध्यायींतील अनेक शब्दांच्या उल्लेखांवरून बुद्ध, चाणक्य वगैरेंच्या कालाशीं तुलना, भौगोलिक नांवें, सूत्रांतर्गत नाण्यांचीं नांवें व कौटिल्याच्या अर्थशास्त्रांतील नाणीं; यवन, यवनानी, निर्वाण, सङ्घ, कार्षापण, शतमान, क्षुद्रक-मालव वगैरे सूचक शब्द—या सर्वांचा खल करून असें म्हणावेंसें वाटतें कीं, पाणिनीचा काल इ. स. पू. ७ वें शतक तें इ. स. पू. ५ वें शतक असा स्थूलमानानें ठरवितां येईल.

---

२. नांव, जन्मस्थल व पूर्व वैयाकरणांचें ऋण

येनाक्षरसमाम्नायमधिगम्य महेश्वरात्।
कृत्स्नं व्याकरणं प्रोक्तं तस्मै पाणिनये नमः ॥

पाणिनीचें नांव —पाणिनि हें व्यक्तिनाम आहे की गोत्रनाम (आडनांव) आहे याविषयीं वाद आहे. पाणिनीच्या एका सूत्रावरून तें गोत्रनाम आहे.[१] बौधायनाचेंहि तेंच मत असून या गोत्राचे भार्गव, च्यवन, आप्रवन, और्व आणि जामदग्न्य असे पांच प्रवर आहेत असें तो म्हणतो (प्रवरकाण्ड ३); तर महाभाष्यावर 'प्रदीप' टीका लिहिणारा कैयट[२] व त्याचेंच अनुकरण करणारा भट्टोजी दीक्षित (सिद्धान्तकौमुदीकार) 'पाणिनि' शब्दाची निराळीच व्युत्पत्ति देतात ती अशी ;—"पणनं पणः । स विद्यते यस्य सः पणी । पणिनः अपत्यं पुमान् पाणिनः । तस्य युवापत्यं पाणिनिः ।" म्हणजे 'पणिन्' चा मुलगा 'पाणिन' व त्याचा नातू पाणिनि. म्हणजे 'पण' शब्दापासून 'पाणिनि' शब्द साधला आहे.

पाणिनीचें जन्मस्थल—कोशकार त्रिकाण्डशेष आणि केशव हे पाणिनीचे पर्यायवाचक इतर शब्द वाहीक, शालङ्कि, दाक्षीपुत्र,[३] शालातुरीय[४] असे देतात. वाहीक आणि शालातुरीय (शलातुराचा नागरिक) या शब्दांवरून पाणिनि औदीच्य किंवा भारताच्या वायव्य भागांतील असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. वाहीक हा गांधार देशाचा एक भाग आहे (वाहीको जनपदः, वाहीको ग्रामः). शलातुर

---

१. 'गाथिविदथिकेशिगणिपणिनश्च'। ६।४।१६५.

२. पाणिनिसूत्र- 'वृद्धिर्यस्याचामादिस्तद्वृद्धम्'। १।१।७३ वरील प्रदीप' पहा.

३. सर्वे सर्वपदादेशा **दाक्षीपुत्रस्य** पाणिनेः। (महाभाष्य १।१।२०, वार्तिक ५).

४. तूदी**शलातुर**वर्मतीकूचवाराड्ढक्छण्ढञ्यकः। ४।३।९४.

हें पाणिनीचें जन्मस्थान होय. 'लाहुर' हा शलातुराचाच प्राकृत अपभ्रंश आहे.[५] शलातुर शब्द पाणिनीच्या ४-३-९४ सूत्रांत आलेला आहे. शलातुर हें गांव पाणिनीच्या पूर्वी अस्तित्वांत होतें व तेथें त्याचे पूर्वज राहत होते. 'शलातुर' शब्दाहून 'अभिजन' (यत्र पूर्वैः उषितं स अभिजनः) या अर्थी प्रत्यय लागून 'शालातुरीय' शब्द साधला आहे. वर्धमान हा 'गणरत्नमहोदधि' ग्रथांत पाणिनीचा उल्लेख 'शालातुरीय' असा करतो (शालातुरीयशकटाङ्गजचंद्रगोमी). चिनी प्रवासी युआन-च्वांग सातव्या शतकांत शलातुराला गेला होता. तेव्हां सुद्धां पाणिनी-विषयींच्या दंतकथा लोकांपासून त्याला कळल्या व पुढें तो म्हणतो कीं तेथें एक पुतळाहि होता. हा पुतळा आज लाहोर म्यूझिअममध्यें आहे; पण रा. ब. के. एन्. दीक्षितांच्या मतें तो गौतमबुद्धाचा असावा. शालातुर म्हणजे 'लाहुर' (लाहोर नव्हे) हें कनिंगहॅमचें संशोधन आहे. हें गांव सिंधु आणि काबूल नदी यांच्या दुआबांत असून संगमाच्या उत्तरेला ४० मैलांवर ओहिंदच्या वायव्येस चार मैलांवर आहे.

पाणिनीचें दुसरें नांव 'दाक्षीपुत्र' आहे हें वर सांगितलेंच आहे. म्हणजे पाणिनीच्या मातेचें नांव दाक्षी होतें. तेव्हां त्याला 'गाङ्गेय'-प्रमाणें 'दाक्षेय' (Metronymic name) म्हणण्यासहि हरकत नाहीं. दाक्षी ही 'दक्ष' कुलांतील होती हें नांवावरून स्पष्ट आहे. त्या वेळीं 'दक्ष' नांवाचा संघ होता. पाणिनीच्या ४-३-१२७[६] सूत्रावर व त्यावरील वार्तिकावर काशिकाकारानें 'दाक्षः संघः', 'दाक्षः घोषः' अशीं उदाहरणें दिलीं आहेत. त्याचप्रमाणें या संघाच्या नांवाचीं गांवेंहि होतीं. उदाहरणार्थ, दाक्षीकुल, दाक्षीकर्ष वगैरे.[७] त्याचप्रमाणें पतंजलीहि दाक्षीकर्षु किंवा दाक्षीकर्षुक असा ग्रामनामाचा उल्लेख करतो. त्याशिवाय

---

५. शलातुर = सलाउर = हलाउर; वर्णव्यत्यासानें लहाउर = लाहुर. व्याकरण महाभाष्य, भाग ७, पान ६ तळटीप. (प्रा. का. वा. अभ्यंकर)

६. सङ्घाङ्कलक्षणेष्वञ्यञिञामण्। ४।३।१२७. घोषग्रहणमपि कर्तव्यम्। (वा. कात्यायन).

७. कूलसूदस्थलकर्षाः संज्ञायाम्। ६।२।१२९ यावर काशिकावृत्ति पहा.

'दाक्षीकर्षु' किंवा 'दाक्षीकन्था' असें एक गांव उशीनर देशाच्या बाहेर होतें असें काशिकाकार म्हणतो.[८] त्यावरून तें वायव्येला होतें. उशीनर हा वाहीक देशाचा एक भाग होता.[९] तात्पर्य, दक्षसंघ प्राच्यभारतांतील नव्हता. प्राच्यभारत कुरुजांगलापासून सुरू होतो आणि येथूनच पूर्व आणि पश्चिम असे देशाचे भाग त्या वेळीं मानले जात असल्यामुळें, 'दक्ष' लोक पश्चिमेकडे गांधार देशांत वास्तव्य करून होते असें दिसतें. **यावरून दाक्षीपुत्र म्हणजे पाणिनि हा गांधार देशांत शलातुर येथील रहिवासी होता असें निश्चयानें म्हणतां येतें.**

पाणिनीविषयीं दंतकथा — सोमदेवाच्या कथासरित्सागरांत आणि क्षेमेंद्राच्या बृहत्कथामंजरींत पाणिनीविषयीं आख्यायिका आहेत.

अथ कालेन वर्षस्य शिष्यवर्गो महानभूत् ।
तत्रैकः पाणिनिर्नाम जडबुद्धितरोऽभवत् ॥ २० ॥
स शुश्रूषापरिक्लिष्टः प्रेषितो वर्षभार्यया ।
अगच्छत्तपसे खिन्नो विद्याकामो हिमालयम् ॥२१॥
तत्र तीव्रेण तपसा तोषितादिन्दुशेखरात् ।
सर्वविद्यामुखं तेन प्राप्तं व्याकरणं नवम् ॥२२॥

—कथासरित्सागरे प्रथमे कथापीठलम्बके चतुर्थतरङ्गः ।

दोनही ग्रंथ काश्मीरांतील गुणाढ्याच्या बृहत्कथेवर आधारलेले आहेत. लहानपणीं पाणिनि मंदबुद्धीचा होता. त्यामुळें अध्ययनांत नेहमीं मागासलेला असे. पुढें त्यानें हिमालयावर जाऊन एकांतांत ईशचिंतन केलें. शिवानें प्रसन्न होऊन डमरु वाजवला व त्यांतूनच प्रसिद्ध 'अइउण्' इत्यादि १४ 'माहेश्वर' सूत्रें निर्माण झालीं. महेश्वरानें तांडवनृत्य करून चौदा वेळां डमरु वाजविला व त्यांतून चौदा सूत्रें निघालीं. पाणिनीची अष्टाध्यायी या चौदा सूत्रांवरच आधारलेली आहे.[१०]

---

८. संज्ञायां कन्थोशीनरेषु । २।४।२०; आणि 'कन्थायाष्ठक् । ४।२।१०२.

९. न द्व्यचः प्राच्यभरतेषु । ४।२।११३.

१०. नृत्तावसाने नटराजराजो ननाद ढक्कां **नवपंचवारम्**। (चौदा वेळां) उद्धर्तुकामः सनकादिसिद्धानेतद्विमर्शे शिवसूत्रजालम् ॥ नंदिकेश्वरकारिका.

पाणिनी आणि व्याडि — पाणिनीच्या व्याकरणानें त्या वेळचीं इतर व्याकरणें मागें टाकलीं. तत्पूर्वी ऐंद्र व्याकरण होतें असा उल्लेख सांपडतो, पण तें आज उपलब्ध नाहीं. पाणिनीच्या सूत्रांतच दहा वैयाकरणांचा निर्देश आहे. ऐंद्र संहितेचा तैत्तिरीय संहितेंत उल्लेख आहे. वर्ष हा पाणिनीचा गुरु होता. संग्रहकार व्याडि पाणिनीचा समकालीन असावा. व्याडीला दाक्षायणहि म्हणतात.[११] त्याचा लक्षात्मक 'संग्रह' नांवाचा ग्रंथ पुढें अस्त पावला.[१२] दाक्षायण नांवावरून दाक्षीपुत्र पाणिनीच्या मातुल घराण्यांतील तो असावा. दक्षाची कन्या ती दाक्षी व दक्षाचा नातू तो 'दाक्षायण' अशी व्युत्पत्ति आहे. पाणिनीचा गुरु वर्ष. त्याला एक उपवर्ष नांवाचा भाऊ होता. त्यानें मीमांसा व वेदान्तसूत्रांवर टीका लिहिली. शंकराचार्यांच्या १-३-२८ सूत्रावरील भाष्यांत त्याचा उल्लेख आहे. छंदःशास्त्राचा मूळ कर्ता पिंगल हा पाणिनीचा धाकटा भाऊ होता असा वेदार्थदीपिका टीकाग्रंथांत उल्लेख आहे. पिंगलानें 'छन्दोविचिति' नांवाचा ग्रंथ रचला. पाणिनीच्या एका गणपाठांत हें नांव आढळतें.[१३]

पाणिनीच्या वेळीं प्राच्य लोकांचें पूर्वेकडील भागांत एक व्याकरण प्रचलित होतें, असें त्याच्याच सूत्रांतील निर्देशावरून कळतें.[१४]

कवि पाणिनि--पाणिनि कवि होता असें कांहींचें म्हणणें आहे, तें वस्तुस्थितीला सोडून आहे. 'जांबवतीविजय' नांवाचें काव्य पाणिनीनें रचलें असें मानतात. 'सदुक्तिकर्णामृत' ग्रंथांतील एका पद्यांत कवि

---

११. 'शोभना खलु दाक्षायणस्य संग्रहस्य कृतिः'–म. भा. भाग २ पृ. ४५३.

१२. 'इह पुरा पाणिनीयेऽस्मिन् व्याकरणे व्याड्युपरचितं ग्रन्थलक्षपरिमाणं संग्रहाभिधानं निबन्धनमासीत्। तच्च कालवशात् सुकुमारबुद्धीन् वैयाकरणान् प्राप्य अस्तमुपागमत्।' (वाक्यपदीय–पुण्यराज टीका). 'संग्रहो व्याडिकृतो लक्षसंख्यो ग्रन्थः।' म. भा. प्रदीपोद्योत.

१३. अणृगयनादिभ्यः। ४।३।७३.

१४. प्राचामुपादेरडज्वुचौ च। ५।३।८०; प्राचां क्रीडायाम्। ६।२।७४.

दाक्षीपुत्राचा उल्लेख आहे. याउलट डॉ. भांडारकरांचें मत आहे. त्यांचें म्हणणें कीं काव्याच्या एकंदर भाषेवरून तें काव्य वैयाकरण पाणिनीचें असणें शक्य नाहीं. प्रो. क्षितीशचंद्र चतर्जींचें तसेंच मत आहे. त्यांच्या म्हणण्याचें तात्पर्य असें कीं, कवि म्हणून पाणिनीचा उल्लेख महाभाष्यांत तर नाहींच, पण पुढेंही पाणिनीय व्याकरणावर जे टीकाकार झाले त्यांच्याही ग्रंथांत नाहीं. पाणिनीचे म्हणून जे श्लोक सांगतात ते इतर कवींच्या नांवावरहि आढळून येतात ! 'जांबवतीविजया'चा कर्ता कोणी तरी नवव्या शतकांतील कविब्रुव (poetaster) असावा ! कवि शब्दाचा तीक्ष्ण बुद्धीचा किंवा सूत्रकार असाहि अर्थ होतो. आतांपावेतों पाणिनीचें नांव, जन्मस्थळ वगैरेचें निवेदन झालें. आतां पुढील विषयाकडे वळूं.

पाणिनिपूर्व वैयाकरण व त्यांचे ग्रंथ— 'व्याकरण' हा शब्द पाणिनीच्या अष्टाध्यायींत नाहीं, पण 'वैयाकरण' मात्र आहे.[१५] असें जरी असलें तरी तो शब्द मुण्डकोपनिषदांत आढळतो.[१६] त्यानंतर यास्काच्या निरुक्तांत 'तदिदं व्याकरणस्य कात्स्न्र्यम्' असें म्हटलें आहे. म्हणजे निरुक्त ग्रंथ हा व्याकरणाचा पूरकग्रंथ आहे असें म्हटलें असून त्या शब्दाचें निर्वचनहि केलें आहे. यास्क आणि पाणिनि यांच्यामध्यें कमींत कमी एका शतकाचें तरी अंतर असलें पाहिजे असें विद्वानांचें मत आहे. निरुक्त आणि पाणिनीची 'अष्टाध्यायी' यांत हा फरक आहे कीं, निरुक्तकार यास्क हा 'निघंटु'मध्यें परिगणन केलेल्या वैदिक शब्दांची फक्त व्युत्पत्ति देतो. भाषेंतील शब्दांकडे लक्ष देत नाहीं; तर पाणिनि वैदिक शब्द आणि लौकिक भाषा (छन्दसि भाषायां च) या दोन्हींचाही आपल्या व्याकरणांत अंतर्भाव करतो. दुसरें असें कीं, यास्काच्या मतें प्रत्येक नाम धातूपासूनच तयार झालें आहे. शाकटायनाचें तसेंच मत आहे[१७]. यास्काच्या

१५. वैयाकरणाख्यायां चतुर्थ्याः । ६।३।७.

१६. शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति । मुण्डकोपनिषद्, प्रथमः खण्डः ।

१७. नाम च धातुजमाह निरुक्ते व्याकरणे शकटस्य तोकम् । निरुक्त १।१२; महाभाष्य ३।१।१३८.

निरुक्तांत व्युत्पत्तीचे सामान्य नियम नसून प्रत्येक शब्दाचें निराळें निर्वचन आहे तर पाणिनीनें आपलें व्याकरण नियमबद्ध केलें आहे.

'व्याकरण' शब्द वेदांत नाहीं. 'चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य पादा...' (ऋ. ८-६९-१२) इत्यादि जें वर्णन आहे तें व्याकरणावरहि ओढून-ताणून लावतां येतें. उदाहरणार्थ, 'चत्वारि शृङ्गाः' म्हणजे शब्दाच्या नामाख्यातोपसर्गनिपाताः' अशा चार जाति; 'त्रयोऽस्य पादाः' म्हणजे वर्तमान, भूत व भविष्य काल, 'सप्तहस्तासः' म्हणजे सात विभक्ति वगैरे. वेदाच्या सर्व शाखांचीं प्रातिशाख्यें होतीं तीं लुप्त झालीं. सध्यां जीं उपलब्ध आहेत तीं पाणिनीनंतरचीं आहेत. प्रातिशाख्यें आणि शिक्षा-ग्रंथ यांत उच्चार, स्वर (उदात्त अनुदात्त, प्लुत), संधि, कांहीं संज्ञा, अक्षर-समाम्नाय व त्यांचे आभ्यंतर व बाह्य प्रयत्न इत्यादि विषयांचा अंतर्भाव होतो. त्यांना शब्दानुशासन किंवा व्याकरण म्हणतां येत नाहीं. प्राति-शाख्याचें मुख्य कार्य वेदांतील पदें, उच्चार व स्वर यांतील बारकावे स्पष्ट करणें हें होय.

प्रातिशाख्यें, निरुक्त आणि अष्टाध्यायी या ग्रंथांतून कमींत कमी चौसष्ट[१८] शब्दकारांचीं किंवा वैयाकरणांचीं नांवें आलीं आहेत. तीं मॅक्स-मुल्लरनें आपल्या 'संस्कृत भाषेचा इतिहास' या ग्रंथांत नमूद केलीं आहेत. त्यांपैकीं पाणिनि आपल्या सूत्रांत दहांचा प्रत्यक्ष उल्लेख करतो तर इतरांचा अप्रत्यक्ष करतो. बोपदेवानें आपल्या 'मुग्धबोध' व्याकर-णांत इंद्र, चंद्र, काशकृत्स्न, आपिशलि, शाकटायन, पाणिनि, अमर आणि जैनेंद्र अशा आठ वैयाकरणाचीं नांवें दिलीं आहेत.[१९] तीं काल-

---

१८. History of Sanskrit Literature, p. 142 by Max Mullar. तैत्तिरीय व मैत्रायणीय प्रातिशाख्यांत २५; ऋक् प्रातिशाख्यांत १८; वाजसनेयीमध्यें ११; ऋक् तंत्रांत ८; निरुक्तांत १२; पाणिनि १०; याशिवाय वार्तिकांतून व महाभाष्यांतून १४; शिवाय प्राच्य, उदीच्य असे प्रकार आहेत ते वेगळेच. (पहा, महाभाष्य ७ वा भाग, पान १२० : प्रा. का. वा. अभ्यंकर).

१९. इन्द्रश्चन्द्रः काशकृत्स्नापिशली शाकटायनः।
पाणिन्यमरजैनेन्द्रा जयन्त्यष्टादिशाब्दिकाः॥ बोपदेव

क्रमानें दिलीं आहेत असें म्हणतां येत नाहीं. देवबोधानें महाभारतावर टीका लिहितांना आरंभींच एक श्लोक दिला आहे, त्यांत ऐंद्र किंवा माहेंद्र व्याकरणाचा गौरव केला आहे.[२०]

ऐंद्र व्याकरणाचा उल्लेख तैत्तिरीय संहितेत (६–४–१) व महाभाष्यांत आहे पण तो अर्थवादात्मक आहे. बौद्ध ग्रंथामध्यें सारिपुत्रानें लहानपणीं ऐंद्र व्याकरणाचें अध्ययन केलें असा उल्लेख आहे. डॉ. बर्नेलच्या मतें ऐंद्र व्याकरण हें पाणिनिपूर्व आहे.[२१] बृहस्पतीनें इंद्राला व्याकरण शिकाविलें अशी आख्यायिका आहे. तें जंबुद्वीपांत चालू होतें. पण पाणिनीच्या व्याकरणानें तें मागें टाकलें. आश्चर्य असें कीं, पाणिनीच्या अष्टाध्यायींत 'इंद्र' वैयाकरणाचा उल्लेख नाहीं. पाणिनीचें व्याकरण 'चान्द्र' व्याकरणाशीं जुळतें तर कालाप किंवा कातंत्र व्याकरण ऐंद्राशीं जुळतें असें डॉ. बर्नलचें व इतर पंडितांचें मत आहे. कातंत्र व्याकरणाचा कर्ता शर्ववर्मा होय. ऐंद्र व्याकरणाच्या तपशिलांत शिरण्याचें तूर्त कारण नाहीं.

आतां पाणिनीच्या अष्टाध्यायींत ज्या वैयाकरणांचा निर्देश आहे तिकडे वळूं.

(१) **शाकटायन**—याचा उल्लेख पाणिनीच्या खालील सूत्रांत आहे.

लङः शाकटायनस्यैव । ३–४–१११ ; व्योर्लघुप्रयत्नतरः शाकटायनस्य । ८–३–१८; त्रिप्रभृतिषु शाकटायनस्य । ८–४–५०. यास्काच्या निरुक्तांत शाकटायनाचा उल्लेख आहे हें वर सांगितलेंच आहे. काशिकाकार 'हीने' ।१–४–८६ या सूत्रावर 'अनुशाकटायनम् वैयाकरणाः'

---

२०. यान्युज्जहार माहेन्द्राद् (माहेशात्) व्यासो व्याकरणार्णवात् ।
पदरत्नानि किं तानि सन्ति पाणिनिगोष्पदे ॥

२१. 'The Aindra treatises belong to a system older than Panini's, though there is perhaps reason to believe that no one of them is as a whole, older than the grammar of the last.' (Dr. Burnell).

असें उदाहरण देतो. याचा अर्थ असा कीं, सर्व वैयाकरण शाकटायनाच्या मागाहून झाले. दुसराहि एक उल्लेख निरुक्तांत आहे. तो असा — ' न निर्बद्धा उपसर्गा अर्थान्निराहुरिति शाकटायनः । उच्चावचापदार्था भवन्तीति गार्ग्यः । ' निरुक्त १·३ शाकटायनाच्या मतानें उपसर्ग धातूपासून वेगळे होतात तेव्हां त्यांना अर्थ नसतो. पण गार्ग्याच्या मतें त्यांना स्वतंत्र अर्थ आहे. शाकटायन हा 'नामान्याख्यातजानि' या सिद्धांताचा कट्टर पुरस्कर्ता होता. ऋक् तंत्र व उणादि सूत्रें हीं शाकटायनानें रचिलीं असें नागेशानें उद्योतांत (महाभाष्य, प्रदीपावर १–१–१ वरील) म्हटलें आहे. पण उणादि सूत्रें पाणिनीचींच आहेत असेंच समजलें जातें. एकंदरींत पाहतां शाकटायन हा पाणिनिपूर्वकालीन महान् वैयाकरण होऊन गेला असें दिसतें. हल्लीं प्रसिद्ध असलेलें शाकटायनाचें 'शब्दानुशासन' हें शाकटायनाचें नसून नवव्या शतकांतील राष्ट्रकूटाचा राजा पहिला अमोघवर्ष सन ८१७ ते ८७७ या कालांतील शाकटायनाचें आहे. कदाचित् पुराण्या शाकटायनाचें नांव त्यानें घेतलें असावें.

(२) शाकल्य—संबुद्धौ शाकल्यस्येतावनार्षे । १–१–१६; इकोऽसवर्णे शाकल्यस्य ह्रस्वश्च । ६–१–१२७; लोपः शाकल्यस्य । ८–३–१९ या तीन सूत्रांत शाकल्याचा उल्लेख आहे. हा ऋग्वेदाच्या पदपाठाचा कर्ता आहे असें समजलें जातें. १–१–१६ यांत पाणिनि म्हणतो कीं, त्यानें पदपाठांत घातलेला 'इति' शब्द अनार्ष आहे. त्याचप्रमाणें ' अप्लुतवदुपस्थिते । ६–१–१२९ या सूत्रांत त्याला 'उपस्थित' अशीहि संज्ञा देतो (उपस्थितः अनार्ष इति शब्दः) सि. कौ. व 'न शब्द-श्लोककलहगाथावैरचाटुसूत्रमंत्रपदेषु ' । ३–२–२३ यांतील 'सूत्रकार' शाकल्यच असावा. या सूत्रानें 'कृञो हेतुताच्छील्यानुलोम्येषु ।' ३-२-२० या सूत्रानें सांगितलेल्या 'ट' प्रत्ययाचा निषेध सांगितल्यानें औत्सर्गिक अण् प्रत्यय होऊन 'शब्दकारः' व 'सूत्रकारः' अशीं रूपें साधलीं आहेत. शाकल्य हा शकलाचें गोत्रापत्य आहे. 'शकल' शब्द गर्गादि-गणांत असल्यानें 'गर्गादिभ्यो यञ्' ४–१–१०५ या सूत्रानें शाकल्य शब्द साधतां येतो.

(३) आपिशलि—हा शाकटायनाप्रमाणेंच पाणिनिपूर्व महान् वैयाकरण होऊन गेला. 'वा सुप्यापिशलेः' । ६-१-९२ या सूत्रांत त्याचा उल्लेख आहे. पाणिनीनंतरच्याहि बऱ्याच ग्रंथांत त्याचा उल्लेख आहे. उदाहरणार्थ, 'आचार्योपसर्जनश्चान्तेवासी ।' ६-२-३६ या सूत्राचें द्वंद्वाचें क्रमवार उदाहरण देतांना 'आपिशलपाणिनीयव्याडीयगौतमीयाः' असें उदाहरण पतंजलीनें दिलें असून 'आपिशलिना प्रोक्तं आपिशलो ग्रंथः' किंवा 'आपिशलमधीते आपिशला ब्राह्मणी' असाहि उल्लेख आहे (भाष्य ४-१-४). काशिकाकारानेंहि 'आपिशल्युपज्ञं गुरुलाघवम्' असें पा. सू. ६-२-१४ वर म्हटलें आहे.[२२] शिवाय भाष्यामध्यें 'तथाचापिशलेर्विधिः' असा महत्त्वाचा उल्लेख आहे.[२३] या उल्लेखांवरून आपिशलीचें सूत्रबद्ध व्याकरण त्या वेळीं उपलब्ध असलें पाहिजे. पाणिनीनें आपिशलि आणि व्याडि यांचा क्रौडयादिगणांत उल्लेख केला आहे.[२४] हरदत्तानें पदमञ्जरी-मध्यें आपिशलि व्याकरणांतील सूत्रच उद्धृत केलें आहे.[२५] याशिवाय काशिका, न्यास, महाभाष्यप्रदीप, तंत्रप्रदीप, धातुवृत्ति इत्यादि ग्रंथांतूनहि आपिशलीचीं अनेक सूत्रें उद्धृत केलीं आहेत. 'अस्' धातूऐवजीं 'स्' हा धातु आपिशलीनें दिला आहे.[२६] आपिशलीच्या व्याकरणाचें 'पुष्करणम्' किंवा 'दुष्करणम्' असें नांव होतें.

(४) गार्ग्य—अड् गार्ग्यगालवयोः । ७-३-९९; ओतो गार्ग्यस्य । ८-३-२०; नोदात्तस्वरितोदयमगार्ग्यकाश्यपगालवानाम् । ८-४-६७ अशा तीन सूत्रांत गार्ग्याचा उल्लेख आहे. ऋक् आणि यजुप्राति-शाख्यांतहि याचा उल्लेख आहे. शाकटायनापासून याचीं मतें निराळीं

२२. मात्रोपज्ञोपक्रमच्छाये नपुंसके । ६।२।१४

२३. 'धेनूरनञि कमुत्पादयति ।' धेनूनां समूहो धैनुकम् । अधेनूनां समूहः आधेनवम् । एवं च कृत्वा आपिशलेराचार्यस्य विधिरुपपन्नो भवति । (भाष्य पा. सू. ४।१।४) पहा.

२४. क्रौडयादिभ्यश्च । ४।१।८०

२५. 'मन्यकर्मण्यनादर उपमाने विभाषा प्राणिषु'

२६. 'अस्ति सकारमातिष्ठते'—आपिशलिः

कशीं आहेत हें मागें दाखविलेंच आहे. गार्ग्य हा सामवेदाचा पदपाठकर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. शाकल्याच्या ऋग्वेद पदपाठांत व गार्ग्याच्या पदपाठांत पद्धतींत फरक आहे. पदांचा अर्थ होत नसतांनाहि गार्ग्यानें पदें पाडलीं आहेत. उपसर्गांना स्वतंत्र अर्थ असतो असें त्याचें मत असल्यानें त्यानें शब्दांच्या अर्थविचाराला प्रारंभ केला असें म्हटलें तरी चालेल.

(५) **गालव**—इको ह्रस्वोऽङ्यो गालवस्य। ६–३–६१; तृतीयादिषु भाषितपुंस्कं पुंवद्गालवस्य। ७–१–७४ आणि वर दिलेलें पा. सू. ८–४–६७ अशा तीन सूत्रांत गालवाचा निर्देश आहे. गालवाचा उल्लेख निरुक्त आणि ऐतरेय आरण्यक (५–३) यांमध्येंहि आहे. एका शिक्षाग्रंथांत तो शाकटायनाचा शिष्य होता असें म्हटलें आहे. गालवाचा पाणिनीशीं मतभेद स्वर, अडागम, ह्रस्व व पुंवद्भाव यांविषयीं आहे.

(६) **भारद्वाज**—ऋतो भारद्वाजस्य। ७–२–६३ याचा उल्लेख एकदाच आला आहे. ऋक् आणि तैत्तिरीय प्रातिशाख्यांत काश्यप आणि भारद्वाज यांचा उल्लेख आला आहे. कदाचित् त्यांनींहि एखादें प्रातिशाख्य रचलें असावें. महाभाष्यांत 'इति भारद्वाजीयाः पठन्ति' असा अनेक वेळां उल्लेख आला आहे.

(७) **काश्यप**—तृषिमृषिकृशेः काश्यपस्य। १–२–२५ व वर 'नोदात्त...' ८–४–६७ अशा दोन सूत्रांत काश्यपाचा उल्लेख असून यजु आणि तैत्तिरीय प्रातिशाख्यांत आला आहे.[२७]

(८) **सेनक**[२८] (९) **स्फोटायन**[२९] आणि (१०) **चाक्रवर्मण**[३०] यांचा एकेकदाच उल्लेख आला आहे. यांचीं नांवें अष्टाध्यायीशिवाय इतरत्र मिळत नाहींत.

पाणिनीनें वर निर्देश केलेल्या दहा वैयाकरणांचा मतभेद लक्षांत घेतां ते मतभेद संधिकार्यें, द्वित्व, आगम, स्वर व गुण यांविषयींच

२७. पहा—शांतिपर्व ३४२।८९

२८. गिरेश्च सेनकस्य। ५।४।११२

२९. अवङ् स्फोटायनस्य। ६।१।१२३

३०. ई ३ चाक्रवर्मणस्य। ६।१।१३०

आहेत; प्रत्ययभेद किंवा शब्दसिद्धि यांविषयीं नाहींत. तसेंच धातुसाधितें किंवा नामसाधितें यांविषयींहि नाहींत. मतभेद दाखविणारीं अठरा सूत्रें आहेत. त्यांत संधिकार्यांत मतभेद आठ सूत्रांत आहे. हे मतभेद लक्षांत घेतां यकाराचें उच्चारण करणारे शाकटायन व स्फोटायन पूर्वेकडील देशांत राहणारे असावेत, तर गार्ग्य व शाकल्य उत्तरेकडील असावेत. 'पुत्र' असें न म्हणतां त्र व्यंजनाला द्वित्व करून 'पुत्त्र' किंवा 'कर्म'चे ऐवजीं 'कर्म्म' असा उच्चारहि होतो. हा द्वित्वाचा प्रघात पूर्वेकडील शाकटायनाच्या प्रदेशांत असावा. आजहि बंगालमध्यें 'कर्म्म' असा द्वित्वयुक्त उच्चार करण्याचा प्रघात आहे. यावरून वरील दहा वैयाकरणांनीं आपापल्या प्रदेशांत प्रचलित असलेल्या संस्कृत भाषेचीं व्याकरणें लिहिलीं असावींत व त्यांत वर्णसंख्या, वर्णोच्चारण, वर्णलोप, संधिकार्यें, स्वर, ह्रस्व-दीर्घविचार व द्वित्व यांविषयींचा विचार प्रामुख्यानें केला असावा.[३१] याशिवाय अप्रत्यक्षपणें म्हणजे नांवांचा निर्देश न करतां 'आचार्याणाम्', 'प्राचाम्', 'उदीचाम्' असा उल्लेखहि सूत्रांतून आढळतो.[३२]

पाणिनीच्या सूत्रांत निर्दिष्ट न झालेले पण पाणिनिपूर्व असलेले 'वैयाघ्रपद्य' व 'काशकृत्स्न' हे दोन वैयाकरण होते. यांचा निर्देश पाणिनीनें गणांत केला आहे. यांपैकीं 'व्याघ्रपाद्' (ज्यापासून 'वैयाघ्रपद्य' शब्द तयार झाला) याचा निर्देश 'गर्गादि' गणांत असून काशकृत्स्नाचा पा. सू. २–४–६९ मधील 'उपकादि' गणांत व पा. सू. ४–२–८० यांतील अरीहणादि गणांत आहे.[३३] यावरून ते पाणिनीपूर्व असावेत. काशिकाकार पा. सू. ४–२–६५ वर उदाहरणें देतांना 'अष्टकं पाणिनीयम्', 'त्रिकाः काशकृत्स्नाः', आणि 'दशकाः वैयाघ्रपदीयाः' अशीं उदाहरणें देतो. त्यावरून वैयाघ्रपदाच्या व्याकरणाचे दहा अध्याय

---

३१. पहा प्रा. का. वा. अभ्यंकर : महाभाष्य, भाग ७, पान १२३–२४

३२. दीर्घादाचार्याणाम् । ८।४।५२; आद्राचार्याणाम् । ७।३।४९ इत्यादि.

३३. उपकादिभ्योऽन्यतरस्यामद्वन्द्वे । २।४।६९; 'वुञ्छण्कठ…' । ४।२।८०.

असावेत असें अनुमान निघतें. शिवाय काशिकाकारानें पा. सू. ७-१-९४ यावर एक जुनी कारिका उद्धृत केली आहे. त्यांतहि या शब्दकाराचा निर्देश आहे.[३४]

भाष्यकारांनींहि आरंभींच आपिशलीबरोबर काशकृत्स्नाचाहि उल्लेख केला आहे. तो 'काशकृत्स्नी मीमांसा' असा आहे. यावरून त्यानें मीमांसेवर एखादा ग्रंथ लिहिला असावा. त्याच्या व्याकरणाचे तीन अध्याय होते हें वर सांगितलेंच आहे. पाणिनीनें पूर्ववैयाकरणांच्या मतांना योग्य आदरभाव दाखवून त्यांच्या मतांचा आपल्या व्याकरणांत अंतर्भाव केल्यानें तीं मागें पडलीं.[३५] पाणिनीनें कांहीं सूत्रें पूर्वसूरींच्या व्याकरणांतून घेतलीं असें दिसतें. उदाहरणार्थ, 'अनुपसर्जनात्'। ४-१-१४ हें सूत्र पतंजलीच्या मतें व वार्तिककार कात्यायनाच्याहि मतें पूर्ववैयाकरणांपासून घेतलें आहे. कात्यायन या सूत्रावरील वार्तिकांत तसें स्पष्ट म्हणतो. त्याचप्रमाणें 'मन्यकर्मण्यनादरे विभाषाऽप्राणिषु'। २-३-१७ हें सूत्र आपिशलीच्या तशाच अर्थाच्या सूत्राचें अनुकरण आहे हें मागें दिलेंच आहे. त्याचप्रमाणें कात्यायन पा. सू. २-१-५१ च्या वार्तिकांत म्हणतो कीं, काशकृत्स्नाचें 'प्रत्ययोत्तरपदयोः' हें सूत्र पाणिनीनें घेतलें.[३६] कात्यायन दुसऱ्या एका सूत्राच्या[३७] वार्तिकांत उदाहरण म्हणून 'पञ्चव्याकरणः' (पांच व्याकरणें शिकणारा) असें देतो. हीं पांच व्याकरणें म्हणजे शाकटायन, आपिशलि, भारद्वाज, पाणिनि आणि काशकृत्स्न यांचीं होत. प्रसिद्ध आठांपैकीं चांद्र, अमर आणि जैनेंद्र या तिघांचीं नांवें यांमधून वगळण्यांत आलीं आहेत.

---

३४. संबोधने तूशनसस्त्रिरूपं सान्तं तथा नान्तमथाप्यदन्तम् ।
माध्यंदिनिर्वष्टि गुणं त्विगन्ते नपुंसके व्याघ्रपदां वरिष्ठः ॥

३५. "Panini by incorporating the grammatical contributions of previous writers into his system practically threw them into oblivian." 'India as knows to Panini', p. 342.

३६. तद्धितार्थोत्तरपदसमाहारे च। २।१।५१.

३७. क्रतूक्थादि सूत्रान्ताट्ठक्। ४।२।६०.

पाणिनीनें पूर्व वैयाकरणांपासून घेतलेल्या संज्ञा—

पाणिनीनें कांहीं संज्ञा (technical terms) स्वतः तयार केल्या तर कांहीं जशाच्या तशाच पूर्वीच्या घेतल्या. त्यांपैकी कांहीं देण्यांत येत आहेत.

अद्यतनी–लुङ् (पा. सू. २–४–३ वरील वार्तिकें) व ३–२ –१०२

अभिनिष्टान-विसर्जनीय (वा शरि । ८–३–३६).

आत्मनेभाषा–आत्मनेपद (भाष्य–पा. सू. ६–३–७–८)

आर्धधातुका–आर्धधातुक (२–४–३५ ' अर्धधातुके ' यावरील भाष्य).

आङ्–टा (आङ् इति टा संज्ञा प्राचाम्) पा. सू. ७–३–१२० भाष्य.

उपग्रह–आत्मनेपद (पा. सू. ३–२–१२७ यावरील कैयटाचा ' प्रदीप ')

उपचार–' अयस्कुम्भ ' यांतील विसर्गाच्या जागचा सकार. ही संज्ञा ऋक् प्रातिशाख्य आणि अथर्वप्रातिशाख्य यांमध्येंहि मिळते. (पहा–काशिका पा. सू. ८।३।४८.

(पा. सू. ४–१–१ वरील वार्तिक, काशिका ८–३–४८).

उपस्थित 'अनार्ष इति' (पदपाठांतील) 'अप्लुतवदुपस्थिते' ६-१-१२९

धु–उत्तरपद (भाष्य–किमिदं धुरिति । उत्तरपदरूपेति) भाष्य–
(३–२२९,२४७–३१८).

कल्म–अपरिसमाप्तकर्म (भाष्य १–३३६) कीलहॉर्न.

चर्करीत यङ्लुगन्त (पा. सू. ६–१–६ आणि ७–४–९२) यावरील भाष्य, निरुक्त २–२८, 'अदादि' गणाचे शेवटीं ' चर्करीतं च ' असा धातुपाठ.

चेक्रीयित–यङ् (भाष्य २–२३२) यङन्तप्रक्रिया.

डु–षट् संज्ञा (आकडारादेका संज्ञा । १–४–१ वरील वार्तिक).

तणि–संज्ञाछन्दसोः (भाष्य २–९९) ङ्यापोः संज्ञाछन्दसोर्बहुलम् । ६–३–६३.

ध्रौव्यार्थ–अकर्मक (पा. सू. ३–४–७६ क्तोऽधिकरणे च ध्रौव्यगति-प्रत्यवसानार्थेभ्यः ')

नाम–प्रातिपदिक (निरुक्त १–१ पा. सू. ४–३–७२)

न्याय्य–उत्सर्ग (भाष्य १–४२९ वर कैयट).

परोक्षा–लिट् किंवा परोक्षभूत (पा. सू. १–२–१८ वरील श्लोकवार्तिक)
प्रक्रम–उरःकण्ठशिरः (पा. सू. १–२–३० वरील वार्तिकाचें पतंजलीचें स्पष्टीकरण १–२०७).
प्रतिकण्ठ–निपातन (पा. सू. प्रतिकण्ठार्थललामं च ४–४–४० प्रतिकण्ठं गृह्णाति प्रातिकण्ठिकः)
प्रत्यङ्ग–अन्तरङ्ग (पा. सू. 'चौ.' ६–३–१३८ वर भाष्य).
प्रसव–पुमान् (भाष्य १–२४५)
प्रसरण–संप्रसारण (पा. सू. १–१–३ वर १४ व्या वार्तिकावर भाष्य १–५०).
ल–लुक् (लुकः एषा पूर्वाचार्यसंज्ञा) पा. सू. ५–२–३७ वरील भाष्य.
लः–लकारः (लः कर्मणि च भावे चाकर्मकेभ्यः। ३–४–६९) प्राचीन संज्ञा-भवन्ती–लट्; श्वस्तनी–लुट्; भविष्यन्ती–लृट्; नैगमी–लेट् (वेदांतील); प्रेषणी–लोट्; ह्यस्तनी–लङ्; अद्यतनी–लुङ्.
व्यक्ति–लिङ्ग (पा. सू. लुपि युक्तवद् व्यक्तिवचने। १–२–५१)
विनाम–णत्व (शिवसूत्रें तीन व चार यांवर कात्यायन)
वृद्ध–गोत्र (भाष्य–पा. सू. १–२–६८ वर; 'वृद्धो यूना तल्लक्षणश्चेदेव विशेषः' १–२–६५) 'अपत्यम् अन्तर्हितं गोत्रम्' कात्यायन ४–१–९० आणि वार्तिक 'वृद्धस्य च पूजायाम्' हें 'जीवति तु वंश्ये युवा।' ४–१–१६३ वरील.
संक्रम–कित् आणि ङित् प्रत्यय ('संक्रमो नाम गुणवृद्धिप्रतिषेधविषयः' (पा. सू. १–१–६ वर काशिका)
संध्यक्षर–ए, ओ, ऐ आणि औ (शिवसूत्र ३–४ वर कात्यायन).
संस्थान–जिह्वामूलीय (पा. सू. २–४–५४ वर वार्तिक)
ह्राद–अनुरणन घोष (पा. सू. 'परः संनिकर्षः संहिता'। १–४–१०९ वर कात्यायानाचें वार्तिक)[३८]

सारांश, पाणिनीला व्याकरण रचण्याच्या बाबतींत त्याच्या पूर्वीच्या व्याकरणकारांची बरीच मदत झालेली दिसते. त्याला अनुकूल अशा

३८. पहा— 'India as known to Panini,' p. 344–46.

अनेक गोष्टी त्यानें त्यांच्यापासून घेतल्या. अक्षरसमाम्नाय त्यानें प्रातिशाख्यग्रंथ व वाजसनेयी प्रातिशाख्य यांतून घेतला. आपल्या सोयीसाठीं त्यानें कांहीं वर्ण गाळून त्यांना इतर वर्णांचे पोटभेद समजून त्यांचा इतर वर्णांत समावेश केला व वर्णांचा क्रमहि त्यानें बदलला. नवा वर्ण मात्र त्यानें एकहि घेतला नाही. गणपाठांतील पुष्कळ गण त्यानें शाकटायन, आपिशलि वगैरे वैयाकरणांपासून घेतले असावेत. धातुपाठाबद्दलहि तसेंच म्हणतां येईल. जरूरीचे बेचाळीस वर्ण घेऊन त्यांची चौदा सूत्रांत उपयुक्त रीतीनें वांटणी केली व त्यांचे बेचाळीस 'प्रत्याहार' करून आपला कार्यभाग साधला. 'प्रत्याहारा'ची कल्पनाहि त्यानें इंद्र, आपिशलि वगैरेपासून घेतली असावी. 'माहेश्वर सूत्रें' कदाचित् 'महेश' वैयाकरणाचीं असावींत. महेश्वरापासून मिळालीं हा केवळ अर्थवाद असून यांचें पावित्र्य व्यक्त व्हावें इतकाच त्याचा अर्थ समजावा ! संधिकार्यांच्या बाबतींतहि प्रातिशाख्य ग्रंथाची त्यानें भरपूर मदत घेतली असावी. त्यानें अनेक संज्ञा पूर्वींच्याच वापरल्या हें वर दाखविलेंच आहे. त्या लोकांत रूढ असल्यानें त्यांची व्युत्पत्ति किंवा स्पष्टीकरण करण्याची त्याला आवश्यकता वाटली नाहीं. कांहीं संज्ञा, उदाहरणार्थ, घि, नदी, निष्ठा वगैरे त्याच्या स्वकल्पित आहेत. नामधातु व दशगणी हीं त्यानें व्याडीपासून घेतलीं असावींत.[३९]

असें जरी असलें तरी पाणिनीनें स्वरचित व्याकरणानें सर्वांवर मात केली व पूर्वसूरींच्या प्रक्रियेंत सुधारणा केली. डॉ. बेलवलकर म्हणतात,

"The work of Panini by its accuracy and thoroughness eclipsed all its predecessors, dominating the thought of generations of the thinkers. It would not be far from the truth to assume that in one way or another Panini's work was an improvement upon those of his predecessors-"— 'Systems of Sanskrit Grammar.' f. n. p. 12

---

३९. महाभाष्य–मराठी अनुवाद, भाग ७ (प्रा. का. वा. अभ्यंकर).

३. अष्टाध्यायी व तिचें तांत्रिक स्वरूप

अज्ञानान्धस्य लोकस्य ज्ञानाञ्जनशलाकया ।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै पाणिनये नमः ॥

अष्टाध्यायीची मूळ संहिता:–पाणिनीच्या व्याकरणाला 'अष्टाध्यायी', (अष्टानामध्यायानां समाहारः) किंवा 'अष्टकम्', (अष्टौ अध्यायाः परिमाणमस्य । तदस्य परिमाणम् । ५·१·५७) अथवा 'पाणिनीयम्' (पाणिनिना प्रोक्तम् । तेन प्रोक्तम् । ४·३·१०१) अशीं नांवें आहेत. पाणिनीच्या व्याकरणाला 'अकालकं व्याकरणम्' असेंहि म्हणतात.[1] याचें कारण असें कीं, पाणिनीनें कालदर्शक संज्ञांच्या व्याख्या देऊन ऊहापोह केला नाहीं. उदाहरणार्थ, 'परोक्षे लिट्' ३।२।११५ या सूत्रांतील 'परोक्ष' शब्दाच्या अर्थाबद्दल पतंजलीनें व इतर वैयाकरणांनीं बराच काथ्याकूट केला आहे.[2]

अष्टाध्यायीची सूत्रसंख्या जवळजवळ चार हजार आहे. जवळजवळ म्हणण्याचें कारण कीं, त्याबद्दल बराच मतभेद आहे. अष्टाध्यायी सहा वेदाङ्गांपैकीं एक आहे व दशग्रंथी ऋग्वेदी त्याचें पठन करतात. वेदाप्रमाणें अष्टाध्यायीची संहिता जरी गुरु-शिष्य-परंपरेनें मुखानें पिढ्यान्-पिढ्या चालत आली तरी मूळ संहितेंत फरक पडला हें निश्चित आहे. यासंबंधीं दोन कारिका प्रसिद्ध आहेत.

(१) त्रीणि सूत्रसहस्राणि तथा नव शतानि च ।
षण्णवतिश्च सूत्राणां पाणिनिः कृतवान् स्वयम् ॥

वरील कारिकेप्रमाणें सूत्रसंख्या ३९९६ येते.

---

१. 'पाणिन्युपज्ञम् अकालकम् व्याकरणम्' पहा—'उपज्ञोपक्रमं तदाद्याचिख्यासायाम्' २।४।२१; 'उपज्ञाते' ४।३।११५; 'मात्रोपज्ञोपक्रमच्छाये नपुंसके ।' ६।२।१४.

२. 'परोक्षे लिट्' । सूत्रावरील भाष्य पहा.

(२) चतुःसहस्री सूत्राणां पञ्चसूत्रविवर्जिता।
अष्टाध्यायी पाणिनीया सूत्रैर्माहेश्वरैः सह॥
(स्वरसिद्धान्तचंद्रिका, श्लोक १५)

या कारिकेप्रमाणें ३९८१ अधिक १४ प्रत्याहारसूत्रें मिळून ३९९५ सूत्रें होतात.[३] दशग्रंथी पाठांत सूत्रांची संख्या ३९८३ आहे. बोथलिंकनें संशोधन करून हीच संख्या मान्य केली आहे. पण यांतहि महाभाष्यांत वार्तिकें म्हणून पठित असलेलीं नऊ व दोन गणसूत्रें, या सूत्रपाठांत सूत्रें म्हणून मागाहून कोणीतरी—बहुतेक काशिकाकारांनीं—घुसडून दिलीं आहेत. त्यावरून भाष्यकारांच्या वेळीं अष्टाध्यायीची मूळ संहिता ३९७२ होती असें दिसतें. याशिवाय पा. सू. १।२।५३ ते ५७ अशीं पांच सूत्रें ('तदशिष्यं संज्ञाप्रमाणत्वात्' ।१।२।५३ पासूनचीं पांच) पाणिनीचीं नसावींत असाहि कांहींचा दावा आहे.* त्यांचें म्हणणें असें कीं, आपणच

३. पहा—'The Text of the अष्टाध्यायी' by K. Madhav Krishna Sharma.

* **टीप**—मूळ वार्तिकें पण सूत्ररूपानें पठित अशीं ९ खालीलप्रमाणें आहेत. (१) वृद्धस्य च पूजायाम्। ४।१।१६३. (२) यूनश्च कुत्सायाम्। ४।१।१६२. (३) कौपिञ्जलहास्तिपदादण्। ४।३।१३२. (४) आथर्वणिकस्येकलोपश्च ४।३।१३३. (५) अचि शीर्षः। ६।१।६२. (६) नित्यमाम्रेडिते डाचि। ६।१।१००. (७) सुट् कात्पूर्वः। ६।१।१३५. (८) अडभ्यासव्यवायेपि ६।१।१३६. (९) आत्मनश्च पूरणे। ६।३।६.

गणसूत्रें— (१) एति संज्ञायामगात्। ८।३।९९.
(२) नक्षत्राद्वा। ८।३।१००.

इतर पांच— (१) तदशिष्यं संज्ञाप्रमाणत्वात्। १।२।५३.
(२) लुब्योगाप्रख्यानात्। १।२।५४.
(३) योगप्रमाणे च तदभावेऽदर्शनं स्यात्। १।२।५५.
(४) प्रधानप्रत्ययार्थवचनमर्थस्यान्यप्रमाणत्वात्। १।२।५६.
(५) कालोपसर्जने च तुल्यम्। १।२।५७.

केलेल्या कांहीं विधींची वस्तुतः मुळींच आवश्यकता नाहीं असें पाणिनीनें स्वतः प्रतिपादन केलें आहे हें लोकव्यवहाराला फार विसंगत दिसतें, म्हणून हीं पांच सूत्रें पाणिनीचीं नाहींतच. पण वास्तविक पाहतां हीं पाणिनीचींच आहेत. 'तदशिष्यम्' इत्यादि शब्दांनीं निर्दिष्ट केलेलीं अष्टाध्यायींत पूर्वीं आलेलीं सूत्रें पूर्व वैयाकरणांचीं आहेत. तीं न केलीं असतां चालेल असें त्याला सुचवावयाचें आहे. कांहींचें म्हणणें असें कीं, एकाच उदाहरणासाठीं जेथें सूत्र आहे, उदाहरणार्थ, 'जागुरूकः' ३।२।१६५ वगैरे, तीं पाणिनीचीं नसावींत. ही पद्धत निरुक्तकाराची आहे. भाष्यकारांनींहि 'नैकं प्रयोजनं योगारम्भं प्रयोजयति' किंवा 'नैकमुदाहरणं योगारम्भं प्रयोजयति' असें अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. मूळ संहितेंत जी भर पडली ती कात्यायनाचीं वार्तिकें अंतर्भूत झाल्यानें किंवा योगविभागानें. 'योगविभाग' म्हणजे एकाच सूत्राचे (योग) सोयीसाठीं दोन भाग करणें. पाणिनीचा सूत्रपाठ एकश्रुतीनेंच सूत्रकारांनीं केला व संधिकार्यें करून संहितारूपानेंच लिहिला गेल्यामुळें योगविभाग जरूर तेथें करतां येतो असें भाष्यकारांनीं व वार्तिककारानें म्हटलें आहे व त्याप्रमाणें कांहीं सूत्रांचा योगविभाग केलाहि आहे. महाभाष्यामध्यें फक्त १२२८ सूत्रांचेंच भाष्यकारांनीं विवेचन केलें आहे. परंतु इतर सूत्रें त्यांना माहीत होतीं हें त्यांच्या उल्लेखावरून ध्यानांत येईल. डॉ. कीलहॉर्नच्या मतें काशिकावृत्तींत वीस सूत्रें अधिक आहेत.

पाणिनीनें रचिलेल्या सूत्रांत अनुनासिक व स्वरितस्वर यांच्या खुणा किंवा चिन्हें असावींत हें 'उपदेशेऽजनुनासिक इत्' । १।३।२; व 'स्वरितेनाधिकारः' । १।३।११ यावरून स्पष्ट होतें असें कांहींचें म्हणणें आहे. परंतु त्यांत कांहीं तथ्य नाहीं. कारण पाणिनि स्वतः मौखिक पद्धतीनें (orally) अध्यापन करी व त्या वेळीं अनुनासिकाचा उच्चार किंवा स्वरित स्वराचा उच्चार करी. तीच प्रथा पुढें चालू राहिली. 'प्रतिज्ञानुनासिक्याः पाणिनीयाः' हें वचन प्रसिद्धच आहे किंवा असें कशावरून समजावयाचें असें कोणी विचारील तर 'व्याख्यानात्' म्हणजे पूर्वपरंपरेवरून हें त्याला उत्तर आहे. वैदिक व लोकभाषा यांचें सूक्ष्म

अध्ययन करून शब्दशास्त्राचा विषय जरी अत्यंत विस्तृत[४] असला तरी सूत्रें शक्य तितकीं संक्षिप्त करून व त्यांची संख्या शक्य तितकी मर्यादित करून आठ अध्यायांत त्यानें संपूर्ण व्याकरण रचलें हें कौतुकास्पद नाहीं असें कोण म्हणेल? या बाबतींत 'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः' ही परिभाषा सार्थ ठरते!

अष्टाध्यायी ग्रंथाचे आठ अध्याय असून प्रत्येक अध्यायाचे चार पाद आहेत. पण प्रत्येक अध्यायांत व पादांत सूत्रांची समान वांटणी झालेली नाहीं. उदाहरणार्थ, दुसऱ्या अध्यायाच्या दुसऱ्या पादांत कमींत कमी ३८ सूत्रेंच आहेत, तर सहाव्या अध्यायाच्या पहिल्या पादांत २२३ सूत्रें आहेत!

सूत्राचें लक्षण—पहिल्यानें सूत्राचें लक्षण देऊन मग त्यांचे प्रकार सांगणें इष्ट होईल.

अल्पाक्षरमसंदिग्धं सारवत् विश्वतोमुखम् ।
अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः ॥

अर्थ—सर्वत्र लागू पडणारें, थोड्या अक्षरांनीं युक्त, असंदिग्ध, केवळ अर्थरहित ध्वनि नसलेलें (अस्तोभ), निर्दोष (अनवद्य), व अर्थपूर्ण सुटसुटीत विधान करणारें जें वाक्य त्यास सूत्र जाणणारे 'सूत्र' म्हणतात. पाणिनिकालीन व नंतरहि भारतीय शास्त्रें अनेक कारणांमुळें सूत्रबद्ध झालीं व त्यामुळें पुढें त्यांच्या अर्थाबद्दल वाद सुरू होऊन त्यांवर वार्तिकें, भाष्य, वृत्ति व टीकाग्रंथ अनेक झाले.

सूत्रांचे प्रकार:—पाणिनीचें लाघवाकडे विशेष लक्ष असल्यामुळें त्यानें सर्वच विधिसूत्रें न करतां सहा प्रकारचीं सूत्रें केलीं. संज्ञा, परिभाषा,

---

४. 'महान् हि शब्दस्य प्रयोगविषयः। सप्तद्वीपा वसुमती त्रयो लोकाश्चत्वारो वेदाः साङ्गाः सरहस्या विभिन्ना एकशतमध्वर्युशाखाः सहस्रवर्त्मा सामवेद एकविंशतिधा बाह्वृच्यं नवधाथर्वणो वेदो वाकोवाक्यमितिहासः पुराणं वैद्यकमित्येतावान् शब्दस्य प्रयोगविषयः' (महाभाष्य, भाग १ पान २१)

विधि, नियम, अतिदेश आणि अधिकार हे ते प्रकार होत.[५] यांत आणखी चार प्रकार घालून सूत्रांचे दहा प्रकार आहेत असेंहि कांहींचें म्हणणें आहे. निषेध, अनुवाद, विकल्प व निपातन हे ते अधिक चार प्रकार होत.[६] यांपैकीं निषेध-सूत्रांचा अंतर्भाव विधिसूत्रांमध्यें करण्यास हरकत नाहीं. कारण तेथें निषेधाचें विधान केलेलें असतें.

(१) **संज्ञासूत्रें**:—अनेक वर्णांना किंवा अनेक शब्दांचें उच्चारण करण्याचा प्रसंग वारंवार येतो तेथें तेथें एक संज्ञाशब्द उच्चारला म्हणजे तेवढ्यानेंच तितक्या वर्णांचा अथवा तितक्या शब्दांचा बोध होतो. प्रत्येक ठिकाणीं तितके वर्ण किंवा तितके शब्द उच्चारावे लागत नाहींत. उदाहरणार्थ, पाणिनीनें स्त्रीलिंगी दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त शब्दाला 'यू स्त्र्याख्यौ नदी' (१-४-३) या सूत्रानें 'नदी' संज्ञा सांगितली आहे. आतां जेथें जेथें दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त शब्दांचा निर्देश करावयाचा तेथें तेथें 'नदी' संज्ञक शब्द म्हटल्यानें चालतें. त्याचप्रमाणें टि, भ, घु, षट्, निष्ठा, घ, गुण, वृद्धि, संख्या, सर्वनाम, निपात, सर्वनामस्थान, विभाषा, संप्रसारण, लोप, अङ्ग, उपधा इत्यादि संज्ञांचें समजावें.*

(२) **परिभाषासूत्रें**:—हींहि लाघवासाठींच आहेत. परिभाषासूत्र हें सर्वव्यापी असतें. ज्याप्रमाणें एका ठिकाणीं लावलेल्या दीपानें सर्व घर उजळून निघतें त्याप्रमाणें परिभाषासूत्र त्या त्या प्रदेशांत जाऊन अर्थ स्पष्ट करतें.[७] उदाहरणार्थ, 'ज्या ज्या सूत्रामध्यें सप्तमींत शब्द उच्चारला असेल

---

५. संज्ञा च परिभाषा च विधिर्नियम एव च।
अतिदेशोऽधिकारश्च षड्विधं सूत्रलक्षणम्॥

६. प्रतिषेधोऽनुवादश्च विभाषा च निपातनम्।
एतच्चतुष्टयं क्षिप्त्वा दशधा सूत्रमुच्यते॥

* अशा एकंदर १०० संज्ञा असून त्यांपैकीं कांहीं पूर्व वैयाकरणांपासून घेतल्या तर कांहीं पाणिनीनें स्वतः तयार केल्या.

७. 'यथा एकदेशस्थः दीपः सर्वं वेश्म अभिज्वलयति तथा परिभाषादीपः सर्वं शास्त्रम् अभिज्वलयति'।

तेथें तेथें सांगितलेलें कार्य अव्यवहित अशा पूर्वीच्याला करावें ' असें एकदा परिभाषासूत्रानें[८] सांगितलें कीं काम झालें. जसें ' इको यणचि ! ' ६। १ ।७७ । सूत्र घ्या. यांत ' अचि ' हें सप्तम्यंत पद असल्यानें वर सांगितलेलें परिभाषासूत्र तेथें उपस्थित होतें व त्यामुळें अच् पुढें असतां अव्यवहित अशा इक्-प्रत्याहारांतील वर्णाला यण् आदेश होतो असा आपोआपच अर्थ होतो. अशी परिभाषासूत्रें अनेक आहेत. उदाहरणार्थ, ' तस्मादित्युत्तरस्य ' । १·१·६७; ' षष्ठी स्थाने योगा ' । १·१·४९: ' येन विधिस्तदन्तस्य ' । १·१·७२; ' अनेकाल्शित्सर्वस्य ' । १·१·५५; ' आदेः परस्य ' । १·१·५४ वगैरे. परिभाषा तीन प्रकारची असते. पाणिनीनें सूत्रानें सांगितलेली. तिला ' सौत्र ' म्हणतात, तर लौकिक, ज्ञापकसिद्ध आणि न्यायसिद्ध असेहि प्रकार आहेत.

(३) **विधिसूत्रें**— धातूच्या व नामाच्या पुढें प्रत्यय सांगणारीं सूत्रें यांना विधिसूत्रें म्हणतां येईल. त्याचप्रमाणें प्रत्यय केल्यानंतर त्या प्रत्ययाला किंवा त्याच्या अवयवाला किंवा प्रकृतीला आगम, आदेश व लोप सांगणारींहि विधिसूत्रेंच समजावयाचीं. ज्यामुळें अनेक उदाहरणांचा संग्रह होईल अशा सामान्य शब्दानें त्या प्रत्ययांचें **विधान** केलें जातें. आतां कोठें तो प्रत्यय व्हावयास नको असेल तर निषेधसूत्रानें तें सांगितलें जातें. पाणिनीच्या सूत्रांपैकीं विधिसूत्रांचें आधिक्य आहे हें सांगावयास नकोच. उदा० ' इको यणचि ।' ६।१।७७ हें विधिसूत्र आहे. येथें इकाला ' यण् ' होण्याचें विधान केलें आहे. निरुक्तांत अशा तऱ्हेचीं विधिसूत्रें सांगून शब्दांचें निर्वचन केलें नाहीं. निरुक्तानें व्युत्पत्तीसाठीं पांच प्रकार सांगितले.[९]

(४) **नियम-सूत्रें**—विधिसूत्रानें सामान्य विधान केल्यानंतर कांहीं उदाहरणांत त्याचा संकोच किंवा नियम करावा लागतो. असें करणाऱ्या

८. तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य । १।१।६६

९. वर्णागमो वर्णविपर्ययश्च द्वौ चापरौ वर्णविकारनाशौ ।
धातोस्तदर्थातिशयेन योगस्तदुच्यते पञ्चविधं निरुक्तम् ।

सूत्रास 'नियमसूत्र' म्हणतात. उदाहरण दिल्यानें हें स्पष्ट होईल. 'शेषो घ्यसखि।' १।४।७ या सूत्रानें ह्रस्व इकारान्त शब्दाला 'घि' संज्ञेचें विधान केलें आहे. त्यामुळें हरिणा, कविना इत्यादि रूपें होतात. त्याचप्रमाणें पति-शब्दाचें 'पतिना' असें रूप होऊं लागेल. परंतु तसा पतिशब्दाला निषेध करून चालणार नाहीं. कारण 'भूपतिना' असें रूप तर व्हावयास पाहिजे. उलट नुसत्या पतिशब्दाचें 'पत्या' व्हावयास पाहिजे. म्हणून पाणिनीनें 'पतिः समास एव। १।४।८ असें नियमसूत्र केलें. त्याचा अर्थ असा कीं, पति शब्दाला घि संज्ञा करावयाची झाल्यास ती समासांतील 'पति' शब्दालाच करावी. म्हणून वरील सूत्र नियमसूत्र झालें.

(५) अतिदेशसूत्रें[10]—हीं सूत्रेंहि पाणिनीनें लाघवाकरितांच केलीं आहेत. 'अतिदेश' म्हणजे कार्याचा व्याप (Extension of application) वाढविणें. मूळ देशाचें (विधिसूत्राचें) थोडें अतिक्रमण करावयाचें. 'वत्' प्रत्यय लावून हें अतिदेशाचें कार्य साधतां येतें. जेथें अर्थ स्पष्ट होत असेल तेथें 'वत्' प्रत्यय लावण्याची आवश्यकताहि नसते. विशेषतः पञ्चम्यन्ताहून वत् प्रत्यय होण्यासारख्या कांहीं ठिकाणीं वत् उच्चारल्याशिवायच अर्थ स्पष्ट होतो. उदा० गोतोणित् ।७।१।९०; असंयोगाल्लिट् कित् ।१।२।५; गाङ्कुटादिभ्योऽञ्णिन् ङित् ।१।२।१ हीं सूत्रें अतिदेशसूत्रें आहेत. 'वत्' लावलेलीं सूत्रें, स्यसिच्सीयुट्...चिण्वदिट् च।६।४।६२; सन्वत्... ।७।४।९३; लोटो लङ्वत् । ३।४।८५ वगैरे.* 'अमक्यासारखें समजावें' असें म्हणणें हा 'अतिदेश' होय. उदा. स्थानिवद्भाव.

---

१०. अतिदेशो नाम इतरधर्मस्य इतरस्मिन् प्रयोगाय आदेशः।
किंवा, मीमांसकांप्रमाणें—"अन्यत्रैव प्रणीतायाः कृत्स्नाया धर्मसंहतेः।
अन्यत्र कार्यतः प्राप्तिरतिदेशः स उच्यते॥"

* पा. सू. १।२।१ पासून पुढील ओळीनें सव्वीस सूत्रें 'अतिदेशसूत्रें' आहेत.

(६) अधिकारसूत्रें [११]—हीं सूत्रें लाघवाकरितां केलीं आहेत. ज्या पदाचा किंवा पदांचा संबंध पुढील अनेक सूत्रांमध्यें होतो व तो संबंध निरनिराळ्या तऱ्हेच्या शब्दांबरोबर होतो त्या पदाचाच फक्त निर्देश करून तेवढेंच स्वतंत्र सूत्र पाणिनीनें केलें आहे. उदाहरणार्थ, 'अनभिहिते' ।२-३-१ हें 'अधिकारसूत्र' आहे. अधिकार आणि अनुवृत्ति यांत फरक आहे. अनुवृत्ति म्हणजे सूत्रांतील एक किंवा अनेक शब्द पुढील कांहीं सूत्रांत घेतले गेल्यावर ती अनुवृत्ति बंद होते. अधिकाराचें क्षेत्र विस्तृत असतें. उदाहरणार्थ, धातोः ।३-१-९१ हा अधिकार तिसऱ्या अध्यायाच्या अखेरपावेतों आहे. किंवा 'प्रत्ययः'। ३-१-१ 'परश्च'। ३-१-२ हे अधिकार पांचव्या अध्यायाअखेरपावेतों चालतात. अमुक सूत्र 'अधिकारसूत्र' आहे हें समजण्याचें लक्षण म्हणजे स्वरितत्व. 'स्वरितेनाधिकारः'। १-३-११ या सूत्रानें स्वरितस्वरयुक्त सूत्राचें उच्चारण केलें म्हणजे तें सूत्र 'अधिकारसूत्र' होतें. स्वरितप्रतिज्ञा ही गुरुशिष्यपरंपरेनें 'व्याख्याना'वरून समजावयाची.

अनेक पदांचेंही अधिकारसूत्र असतें. उदा० 'अलुगुत्तरपदे' । ६-३-१ वगैरे अधिकाराचा संबंध कोठपावेतों आहे हें समजण्यासाठीं 'अवधि' शब्दाचा निर्देश सूत्रांत केलेला असतो. उदा० प्राक्कडारात्समासः। २-१-३; प्राग्दीव्यतोऽण् । ४-१-८३; 'कृत्याः' (प्राङ्ण्वुलः)। ३-१-९५: प्राग्रीश्वरान्निपाताः । १-४-५६ या सूत्रांतून कडार, दीव्यतः, ण्वुलः व रीश्वर हे अवधिवाचक शब्द असून हे शब्द ज्या सूत्रांत असतील त्या सूत्रापावेतों तीं तीं सूत्रें अधिकारसूत्रें म्हणून उपस्थित रहावयाचीं. त्यांचा

११. अधिकारः प्रतियोगं तस्यानिर्देशार्थ इति योगे योगे उपतिष्ठते। एकत्रोपात्तस्यान्यत्र व्यापारः अधिकारः। (श. कौ.)

Superintinding aphorisms which give no meanings of themselves where they are mentioned but give their meaning in the number of aphorisms that follow. e. g. प्रत्ययः; ३।१।१, परश्च ३।१।२, आद्युदात्तश्च ३।१।३ etc. 'Dictionary of Sk. Grammar.' p. 14.

पुनरुच्चार त्यामुळें करावा लागत नाहीं. ‘ रीश्वर ’ आणि ‘ दीव्यतः ’ हे शब्दप्रयोग घालण्यांत पाणिनीनें एक प्रकारचें बुद्धिकौशल्य दाखविलें आहे. पण इतकें खोल जाण्याचें कारण नाहीं. आतांपावेतों सूत्रांचे मुख्य सहा प्रकार सांगितले, पण याशिवायही कांहीं प्रकार आहेत.

अपवादसूत्रें--एखाद्या विधिसूत्रानें कांहीं कार्य सांगितलें म्हणजे कांहीं प्रसंगीं त्याला अपवाद असतात. उदाहरणार्थ, अकारान्त शब्दाचें स्त्रीलिंगीरूप करावयाचें असल्यास पाणिनीनें ‘ अजाद्यतष्टाप् ’ । ४-१-४ या सूत्रानें टाप् (आ) प्रत्यय सांगितला आहे. पण कांहीं शब्द अकारान्त असूनही, उदा० इन्द्र, वरुण वगैरे यांना टाप् लागत नाहीं. तेव्हां ते अपवाद समजून दुसऱ्या एका सूत्रानें[१२] आनुक्-आगम व ई (ङीष्) लागून इन्द्राणी, वरुणानी अशीं त्यांचीं स्त्रीलिंगीं रूपें होतात. तद्धित-प्रत्यय ‘ अण् ’ हा सर्वसाधारण आहे. पण त्याला अपवाद सांगणारीं अनेक सूत्रें आहेत.

निषेधसूत्रें—विधिसूत्रानें एखादें कार्य सांगितलें असतां त्याचा निषेध करणारें निषेधसूत्र असतें. उदाहरणार्थ, तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम् । १-१-९ या सूत्रानें सवर्णसंज्ञा सांगितली. पण पुढील नाज्झलौ।१-१-१० या सूत्रानें कांहीं ठिकाणीं सवर्णसंज्ञेचा निषेध करावा लागला. ज्या ठिकाणीं अपवाद किंवा नियम या दोन्ही तऱ्हा शक्य असूं शकत नाहींत त्या ठिकाणीं निषेधसूत्र सांगितल्याशिवाय गत्यंतर नसतें.

विभाषासूत्रें— कांहीं ठिकाणीं एखादा विधि विकल्पानें सांगितला असतो. ‘ न वेति विभाषा ’ १।१।४४ या सूत्रानें ‘ विभाषा ’ संज्ञेची व्याख्या केली आहे. सूत्रांत ‘ वा, ’ ‘ विभाषा ’ किंवा ‘ अन्यतरस्याम् ’ असे शब्द उच्चारलेलीं सामान्यतः विभाषासूत्रें असतात. या विभाषेचेंहि अनेक प्रकार आहेत. उदा० प्राप्तविभाषा, अप्राप्तविभाषा, उभयत्रविभाषा, व्यवस्थितविभाषा व महाविभाषा. यांचें स्पष्टीकरण करण्याचें हें स्थल नाहीं. उदा० पा. सूत्र. १।२।५८ मध्यें ‘ अन्यतरस्याम् ’ शब्द आहे. पा. सू. १-२-१६ मध्यें ‘ विभाषा ’ शब्द आहे. पा. सू. १-३-९० मध्यें ‘ वा ’ असा शब्द आहे.

---

१२. इंद्रवरुणभवशर्वरुद्रमृडहिमारण्ययवयवनमातुलाचार्याणामानुक्। ४।१।४९.

निपातनसूत्रें—जेव्हां सामान्य विधिसूत्रांनीं एखादा शब्द साधतां येत नसला तर पाणिनि त्या शब्दाचें किंवा शब्दांचें विशेषसूत्रानें 'निपातन'[१३] करतो. उदा० पाणिनिसूत्र ४-१-४२ 'जानपदकुण्ड...' इत्यादि 'निपातन' सूत्र आहे. अशीं अनेक सूत्रें आहेत. पृषोदरादि-गणांतील शब्द निपातनानेंच साधले आहेत.

आतांपावेतों पाणिनीनें रचलेल्या सूत्रांचे प्रकार सांगितले. ते सर्व लाघव साधण्यासाठीं आहेत, हें आपण पाहिलें.

अष्टाध्यायीचें तांत्रिक स्वरूप—

सूत्रांचा क्रम— पाणिनीनें लाघव साधण्यासाठीं सूत्रांच्या वरील प्रकारांशिवाय इतर अनेक साधनें वापरलीं तीं लक्षांत आल्याशिवाय अष्टाध्यायी ग्रंथ समजणें कठीण जाईल. (१) त्यांपैकीं सूत्रांचे ' सपादसताध्यायी ' व ' त्रिपादी ' असे जे दोन भाग ' पूर्वत्रासिद्धम् ' ८-२-१ या सूत्रानें केले आहेत ते लक्षांत घ्यावयास पाहिजेत व पहिले सात अध्याय व आठव्या अध्यायाचा प्रथमपाद यांचा एक गट व आठव्या अध्यायांतील तीन पादांतील सूत्रांचा दुसरा गट असे पाणिनीनें दोन गट मुद्दाम केले. त्याचें कारण असें कीं, त्रिपादींतील सूत्रें पूर्वींच्या सपादसप्ताध्यायींतील सूत्रांच्या दृष्टीनें त्यानें वरील ८-२-१ सूत्रानें असिद्ध ठरविलीं,[१४] म्हणजे त्रिपादींतील सूत्रांनी झालेलीं कार्यें पूर्वींच्या सव्वासात अध्यायांतील सूत्रांना जणूं काय तीं झालेलीं दिसतच नाहींत ! नाहींतर ' विप्रतिषेधे परं कार्यम् ' १-४-२ या पाणिनीच्याच सिद्धान्ताप्रमाणें त्यांना सर्वांच्या अगोदर वाव मिळाला असता. ' कुर्वन्ति ' या ठिकाणीं नकाराला णकार

---

१३. धातुसाधनकालानां प्राप्त्यर्थं नियमस्य च ।
अनुबन्धविकाराणां रूढ्यर्थं च **निपातनम्** ॥ (प्रदीप, कैयटकृत)

१४. सपादसप्ताध्यायीं प्रति त्रिपादी असिद्धा ।
त्रिपाद्यामपि पूर्वं प्रति परं शास्त्रं असिद्धम् । (सि. कौ.

या न्यायानेंच होत नाहीं.[15] पाणिनीनें दुसरा एक सिद्धांत 'विप्रतिषेधे परं कार्यम् ।' १-४-२ या सूत्रानें सांगितला आहे. म्हणजे एकादें उदाहरण साधतांना तुल्यबल अशीं दोन सूत्रें एकसमयावच्छेदेंकरून उपस्थित झालीं तर पर सूत्र बलवान् ठरतें. हा नियम सपादसप्ताध्यायींतील सूत्रांना जसा लागू आहे तसा तो त्रिपादींतील सूत्रांना लागू नाहीं.[16]

या नियमाला 'असिद्धवदत्राभात्' ।६·४·२२ या सूत्रानें अपवाद सांगितला आहे. याला 'आभीय' प्रकरण किंवा 'पूर्वविप्रतिषेधकाण्ड' असेंहि म्हणतात. हें 'आभीय' प्रकरण या सूत्रापासून चौथा पाद संपेपर्यंत म्हणजे पा. सू. ६·४·१७५ पावेतों चालतें.[17]

आतां लाघवाचे आणखी कांहीं प्रकार पाहूं.

(१) प्रत्याहार—पाणिनीनें ही संज्ञा सूत्रांत कोठेंही वापरलेली नाहीं. पण मागाहून तयार झालेली दिसते. 'प्रत्याह्रियन्ते वर्णाः यस्मिन् स प्रत्याहारः' याप्रमाणें ज्यानें वर्णांचा संकोच होतो त्याला प्रत्याहार म्हणावें. पाणिनीनें हे 'प्रत्याहार' आदिरन्त्येन सहेता । १।१।७१ या सूत्रानें साधले आहेत; म्हणजे 'अइउण्' इत्यादि जीं चौदा माहेश्वर सूत्रें आहेत किंवा ज्यांना 'प्रत्याहार' सूत्रें असेंही म्हणतात त्यांत शेवटल्या वर्णाला 'इत्' असें नांव आहे—उदाहरणार्थ, 'अइउण्' यांतील अंत्य णकार इत् आहे. तो व

---

१५. 'कुर्वन्ति' इत्यत्र णत्वे प्राप्ते तस्य असिद्धत्वात् अनुस्वारे परसवर्णे च कृते तस्यासिद्धत्वात् न णत्वम् । सि. कौ. 'अनुस्वारस्य ययि परसवर्णः' । ८।४।५८ या सूत्रावर पहा.

१६. 'रामेभ्यः' हें उदाहरण साधतांना 'भ्यस्' प्रत्यय पुढें असतां 'सुपि च' । ७।३।१०२ या सूत्रानें मागें अकाराला दीर्घ प्राप्त झाला असतां 'बहुवचने झल्येत्' । ७।३।१०३ हें पर सूत्र असल्यानें त्याला एत्व होऊन 'रामेभ्यः' रूप सिद्ध झालें.

१७. 'आ भात्' इत्यत्र अभिविधौ आङ् । तेन भाधिकारमभिव्याप्य इत्यर्थः । (त. बो.) या नियमानें 'बभूव' या ठिकाणीं 'वुक्' ला असिद्धत्व मिळून उवङ् प्राप्त झाला, म्हणून 'वुग्युटावुवङ्यणोः सिद्धौ वक्तव्यौ' असें वार्त्तिक करावें लागलें.

पहिला अ या दोन वर्णांमध्यें इ व उ व स्वतः अ इतक्या वर्णांना 'अण्' म्हणावें; म्हणजे अण् 'प्रत्याहारांत' अ, इ व उ यांचा समावेश होतो. शेवटल्या णकाराचा होत नाहीं. 'यर्' प्रत्याहारांत 'हयवरट्' यांतील यकार व 'शषसर्' यांतील शेवटला रेफ मिळून यर् 'प्रत्याहार' झाला. सूत्रांतील आदि शब्दानें सूत्रांतील पहिलेंच अक्षर असा न घेतां पूर्वीचें घ्यावयाचें. यर् यांत यकार सत्राच्या मध्यें असून पहिला हकार आहे. अर्थात् 'हल्' प्रत्याहारांत हकार आदि आहे. या प्रत्याहारामुळें काय झालें कीं प्रत्याहाराच्या अण्, इण् वगैरेंनीं अनेक वर्णांचा बोध होऊं शकतो. अशा ४२ प्रत्याहारांचा पाणिनीनें सूत्रांत उपयोग करून घेतला आहे.

(२) सूत्रांत क्रियापद सूचित करणें किंवा अध्याहारानें घेणें. सूत्रें अल्पाक्षर असलीं तरी तीं वाक्यें आहेत. 'एकतिङ् वाक्यम्' असें वाक्याचें लक्षण आहे. याला 'आक्षेप' म्हणतात ('येन विना यदनुपपन्नं तत् आक्षेपाल्लभ्यते). त्यामुळें लाघव साधतां आलें.

(३) लाघवाचा आणखी एक प्रकार म्हणजे प्रत्येक सूत्रांत तेच तेच शब्द जरी आवश्यक असले तरी ते न घालतां मागच्या सूत्रांतून पुढें घ्यावयाचे. याला अनुवृत्ति किंवा अधिकार म्हणतात. 'अनुवृत्ति' आणि 'अधिकार' यांतील फरक मागेंच सांगितला आहे. क्वचित् पुढच्या सूत्रांतूनही एखादा शब्द मागें ओढला जातो. अशा वेळीं त्याला अनुवृत्ति न म्हणतां 'अपकर्ष' म्हणतात. कधीं कधीं शब्दांची अनुवृत्ति पुढील प्रत्येक सूत्रांत न जातां कांहीं सूत्रें टाकून पुढें जाते. अशा अनुवृत्तीला 'मण्डूकप्लुति' अनुवृत्ति म्हणतात. बेडूक जसा सर्पाप्रमाणें सरपटत न जातां उड्या मारीत जातो त्याप्रमाणें[१८]. तेव्हां सूत्रांतील शब्द साक्षात् उच्चारलेले, अनुवृत्तीनें किंवा अधिकारानें आलेले, अथवा आक्षेपानें अध्याहृत केलेले असतात. कोठें सूत्रांत चकार घालूनहि काम भागतें.

१८. 'मण्डूकाः यथा उत्प्लुत्य उत्प्लुत्य गच्छन्ति तद्वत्' (महाभाष्य ५।२।४).

(४) अनुबंधांचा उपयोग—

पाणिनीनें सूत्रें रचतांना तीं योजनाबद्ध रचलीं आहेत. ताजमहालाची कल्पना पूर्णपणें विचारांत घेऊन त्यांतील बारीकसारीक गोष्टी लक्षांत आणून कलाकारानें पहिल्यानें नकाशा तयार करून मग (Architect) बांधकामाला सुरुवात केली असली पाहिजे. तद्वतच अष्टाध्यायी रचण्यापूर्वी पाणिनीनें किती बारकावे मनांत योजले हें लक्षांत आलें म्हणजे मन थक्क होतें! तशांत गौरवदोष अर्ध्या मात्रेचाही येऊं नये[१९] अशी पक्की खबरदारी घेतल्यानें सूत्रांत काडीमात्र फरक करतां येत नाहीं. करावासा वाटल्यास आपलेंच कांहींतरी चुकत असलें पाहिजे असें वाटलें पाहिजे. 'शुद्ध अंतःकरणानें एका सुप्रभातीं पूर्वेकडे मुख करून दर्भासनावर बसून पाणिनीनें सूत्रें रचिलीं. त्यांत एकहि वर्ण अनर्थक राहूं नये अशीही काळजी घेतली'[२०] आणि पाणिनि सूत्र रचल्यानंतर पुन्हा त्यांत फिरवाफिरव करीत नाहीं असें पतंजलि महाभाष्यांत म्हणतो.[२१]

वरील म्हणण्याचा प्रत्यय पाणिनीनें अनुबंध किंवा इत्संज्ञक वर्णांचा उपयोग केला आहे त्यावरून स्पष्ट होतो. धातु, प्रत्यय, आगम, आदेश वगैरेंना विशिष्ट हेतूनें, दिसण्यांत निरर्थक पण दुसरें कांहींतरी कार्य साधण्यासाठीं हे अनुबंध जोडलेले असतात. उदाहरणार्थ, 'अ' प्रत्यय सांगावयाचा असला तरी त्याचे अक्, अण्, अप्, ण, क, ट, अच्, अन्, अङ्, अञ्, अम्, अश् वगैरे अनेक अनुबंध जोडून ते उच्चारलेले असतात, कारण त्यांपैकीं प्रत्येकाचें कार्य असतें. उदाहरणार्थ, कधीं वृद्धि होण्यासाठीं तर कधीं न होण्यासाठीं, कधीं उदात्त वगैरे विशिष्ट स्वर होण्यासाठीं तर कधीं विशिष्ट स्त्रीप्रत्यय होण्यासाठीं, आदेश शित् असेल तर सर्वस्थानीं, नसेल तर अंत्यस्थानीं वगैरे.

---

१९. 'एकमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः' (परिभाषा).

२०. दर्भपवित्रपाणिः प्राङ्मुखः आचार्यः शुचावकाशे महता प्रयत्नेन सूत्राणि प्रणयिता स्म। तत्र अशक्यम् वर्णेनापि अनर्थकेन भवितुम्। किं पुनः इयता सूत्रेण (म. भाष्य, भाग १, पान ९७).

२१. न चेदानीमाचार्याः सूत्राणि कृत्वा निवर्तयन्ति। (कित्ता, पान १६.)

धातूंच्या पुढें विशिष्ट अनुबंध असल्यास ते आत्मनेपदी किंवा उभयपदी समजले जातात. जसें ङित् असल्यास आत्मनेपदी, ञित् असल्यास उभयपदी. धातूंच्या मागेंही अनुबंध असतात. ओदित्, ड्वित् (डु), ट्वित् (टु) वगैरे. धातु इरित्, ऋदित, ॠदित्, इदित्, उदित्, ऊदित् किंवा ऌदितही असतो. कोशांत अनुबंधाशिवाय धातु दिलेले असतात पण धातुपाटांत अनुबन्धासह दिलेले असतात. उदाहरण, गम् म्हणजे जाणें. पण धातुपाटांत 'गम्ऌ गतौ' असा ऌदित् पाठ असतो. ऌदित् पाठ असल्यानें सामान्य भूतकाळाचें तृ. पु. ए. व 'अगमत्' असें होतें.

पाणिनीनें 'उपदेशेऽजनुनासिक इत्'।१।३।२ या सूत्रानें 'इत्' संज्ञा सांगितली आहे. याचा अर्थ असा कीं, पाणिनीनें धातु, सूत्रें, गणपाठ, उणादिसूत्रें, लिङ्गानुशासन, आगम, प्रत्यय, आदेश जेव्हां पहिल्यानें पठित केले त्या वेळीं सानुनासिक उच्चारलेला जो स्वर त्याला 'इत्' म्हणावें. 'उपदेशः आद्योच्चारणम्' अशी 'उपदेश' शब्दाची व्याख्या आहे. सानुनासिक स्वरांचें उच्चारण कसें समजावयाचें,[२२] याचें उत्तर मागें दिलेंच आहे कीं, गुरुशिष्यपरंपरेनें 'व्याख्यानात्' जें समजलें गेलें तें. 'उपदेश' कोणाकोणाचा केला याविषयीं प्रसिद्ध कारिकाच आहे.[२३]

(५) **गणपाठ**—पाणिनीनें सारखीं रूपें होणाऱ्या शब्दांचे गट तयार करून त्यांतील एक शब्द प्रथम देऊन त्या नांवानें गण बनविला. जसें नामांचे तसेंच धातूंचेही गट पाणिनीनें लाघवासाठीं तयार केले. धातूंची भ्वादि, अदादि वगैरे दशगणी प्रसिद्धच आहे. नामांचे गण अर्थातच तद्धित प्रकरणांत अधिक आहेत. उदा०–दण्डादिभ्यो यत् ५।१।६६; छेदादिभ्यो नित्यम् ५।१।६४ असे 'दण्डादि' आणि 'छेदादि' गण देऊन त्यांच्यांत अन्तर्भाव होत असलेले शब्द त्या गणांत पठित असतात.

---

२२. प्रतिज्ञानुनासिक्याः पाणिनीयाः। (सि. कौ.)

२३. धातुसूत्रगणोणादिवाक्यलिङ्गानुशासनम् । आगमप्रत्ययादेशा उपदेशाः प्रकीर्तिताः॥

हे गणपाठ तसेच्या तसेच चालत आले आहेत असें समजण्याचें कारण नाहीं. नवीन शब्द तयार करतांना तो ज्या गणांत नसण्यासारखा असेल त्यांत त्याचा अन्तर्भाव होऊन गणांतील शब्दसंख्या वाढलीही असेल ! खुद्द पाणिनीनें असे कांहीं गण 'आकृतिगण' समजावे असें सांगून योजनाही करून ठेवली आहे. पण असे आकृतिगण थोडे आहेत. वार्तिककार कात्यायनानें वार्तिकें करून नवीन शब्दांचें परिगणन केलेलें अनेक ठिकाणीं दिसून येतें. पाणिनीनें 'कम्बोजाल्लुक्' ४।१।१७५ असें सूत्र केलें; पण कात्यायनानें कम्बोज-शब्दाबरोबर आणखी चार शब्द वार्त्तिक करून सांगितले. कारण पाणिनि आणि कात्यायन यांच्या मधल्या काळांत त्या शब्दांची निर्मिति झाली असावी. निरुक्ताप्रमाणें प्रत्येक शब्दाचें निर्वचन न करतां गणपाठ केल्यानें पाणिनीनें फारच लाघव साधलें ! डॉ. बेलवलकर यासंबंधीं आपल्या 'Systems of SK. Grammar' या ग्रंथांत म्हणतात, 'The formation of Ganas, by which are meant lists of words which undergo similar grammatical changes, also tends towards the same result viz. terseness and brevity. Some of these Ganas are complete and some ākriti-gana (आकृतिगण) that is to say, ganas which do not exhaustively enumerate all the words of a class, but rather give merely a few leading types. They have hence been tampered with since his times.' ('Systems of SK. Grammar' p. 23-24.)

पाणिनीच्या पूर्वी हे गणपाठ असले पाहिजेत व त्यांत भर घालून पाणिनीनें त्यांचें परिगणन केलें इतकेंच. गणपाठाविषयीं जें सांगितलें तेंच धातुपाठाबद्दल म्हणतां येईल. गणपाठ आणि धातुपाठ हे पाणिनीचेच आहेत. याबद्दल मध्यंतरीं बराच वाद झाला, त्यांत शिरण्याचें कारण नाहीं. ज्या अर्थी सूत्रांत हे गण सांगितले आहेत त्या अर्थी पाणिनीच्या वेळीं ते असले पाहिजेत किंवा त्यानें स्वतः तरी तयार केले असले पाहिजेत. पाणिनीशिवाय इतरही धातुपाठ अस्तित्वांत आहेत. पाणिनीचा जो धातुपाठ समजला जातो त्यांत २२०० धातु आहेत.

'धातुपाठकोश' नांवाचा ग्रंथ डेक्कन कॉलेजचे डॉ. पळसुले यांनीं नुकताच प्रसिद्ध केला असून त्यावरील प्रबंध पुणें-विद्यापीठ प्रसिद्ध करीत आहे.

पाणिनीचें तंत्र समजणें कठीण आहे. पण तें एकदां आत्मसात् केलें म्हणजे मग मात्र लवकर आकलन होतें. म्हणून विनोदानें अष्टाध्यायीस 'व्याघ्रमुखी गौः असें म्हणण्याचा प्रघात आहे.

अष्टाध्यायींतील अध्यायवार विषयसंगति—

पहिला अध्याय (सूत्रसंख्या ३५१)— अष्टाध्यायीचें तांत्रिक स्वरूप दिल्यानंतर अष्टाध्यायींतील अध्यायवार विषयसंगति देणें इष्ट आहे. आठ अध्यायांतील जवळजवळ चार हजार सूत्रांपैकीं पहिल्या अध्यायांत जवळजवळ साडेतीनशें (३५१) सूत्रें आहेत. अध्यायाच्या चारहि पादांतून मुख्य मुख्य संज्ञा व त्यांच्या व्याख्या दिल्या असून, ग्रंथ समजण्यासाठीं कांहीं नियम लोकांमधील वहिवाटीला अनुसरून दिलेले आहेत किंवा न्यायसिद्ध अथवा युक्तिसिद्ध आहेत. इतरांना सांकेतिक म्हणावें लागेल. अत्यंत संक्षिप्त अशा सूत्रांचा अर्थ बरोबर कळावा म्हणून असें करणें अवश्यच होतें. संज्ञा, परिभाषा व नियम सांगितल्यानंतर त्यांना आनुषंगिक विधि–निषेधहि सांगावे लागले.

दुसरा अध्याय (सूत्रसंख्या २६८)— या अध्यायांत २६८ सूत्रें आहेत. या अध्यायाला 'समर्थः पदविधिः'। २।१।१ या सूत्रानें सुरुवात करून पदविधीला प्रारंभ केला आहे. शब्द सामासिक असल्यास त्यांतील विभक्त शब्दांचा खुलासा केला आहे. म्हणजेच मुख्य चार समास अव्ययीभाव, तत्पुरुष, बहुव्रीहि आणि द्वंद्व व त्यांचे पोट-भेदहि लक्षणें देऊन सांगितले आहेत. हें कार्य पहिल्या दोन पादांत उरकलें आहे. पुढील दोन पादांत कारकविचार असून शब्दांचें लिंग, वचन व विभक्ति यांचा खुलासा केला आहे. तात्पर्य, शब्दापासून जो अर्थ मनांत येतो, तो सर्व अर्थ त्याच्या पोट-विभागावरून होणाऱ्या अर्थांचें संकलन करून येतो हें स्पष्ट केलें आहे.

तिसरा अध्याय (सूत्रसंख्या ६३१)— दुसऱ्या अध्यायांत स्वतंत्र पदांचे परस्परसंबंध व सामासिक शब्दांतील पृथक् पदांचें विवेचन केल्यानंतर पदामधील प्रकृतिप्रत्ययात्मक पोट-विभागाकडे पाणिनीनें लक्ष दिलें. या अध्यायांत धातूंना प्रत्यय लागून वेगवेगळ्या अर्थी कृदन्त रूपें कशीं तयार होतात, याचें मुख्यतः विवेचन केलें असून, शेवटीं शेवटीं तिङन्ताचे प्रत्यय सांगण्यास प्रारंभ केला आहे. धातुपाठांत एकंदर १९४४ धातु असून शिवाय धातुपाठांत नसलेले असे कांहीं सूत्रांतूनच सांगितलेले म्हणून 'सौत्र' धातु आहेत. याशिवाय नामधातूही सांगून त्यांना प्रत्यय लावून होणारीं कृदन्त रूपें दाखविलीं आहेत. हे प्रत्यय कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, अधिकरण, भाव वगैरे निरानिराळ्या अर्थी सांगितले असल्यानें अर्थबोध स्पष्ट होतो. या अध्यायाची सूत्रसंख्या ६३१ आहे. याच अध्यायांत 'उणादयो बहुलम्'। ३।३।१ असें सूत्र आहे. यांत 'बहुलम्' शब्दावरून अशी व्युत्पत्ति प्रत्येक शब्दाची देऊन प्रयत्न करणें शक्य नाहीं असें ध्वनित केलें आहे, कारण शब्द अनंत आहेत. मात्र 'उणादि सूत्रें' त्यानें मान्य केलीं आहेत. तीं पाणिनीचीं कीं शाकटायनाचीं याबद्दल वाद आहे. उणादि शब्द अव्युत्पन्न आहेत अशी परिभाषा आहे.[२४] व्युत्पत्तिशास्त्राच्या (Philology) दृष्टीनें तरीपण त्यांना महत्त्व आहे.

चौथा अध्याय (सूत्रसंख्या ६३३)— या अध्यायांत पहिल्या पादांतील पहिलीं ७५ सूत्रें पुल्लिंगी शब्दावरून स्त्रीलिंगी शब्दांची सिद्धि कशी होते यासाठीं खर्चीं पडलीं आहेत व अध्यायाच्या अवशेष भागांत नामसाधित प्रातिपदिकांचा विचार केला आहे. असें करतांना प्रत्ययांचे निरनिराळे जितके म्हणून अर्थ त्याला आढळले तितके सर्व अर्थ व त्या त्या अर्थी होणारे विशिष्ट शब्द यांचें त्यानें परिगणन केलें आहे. या व पुढच्या अध्यायांत सूत्रांमध्यें निर्दिष्ट केलेल्या गणांची संख्या सुमारें

२४. 'उणादयोऽव्युत्पन्नानि प्रातिपदिकानि। (परिभाषा २२.)

दीडशें आहे व त्यांमध्यें सुमारें सदतीसशें शब्दांचा अंतर्भाव झाला आहे.[२५] यावरून त्या वेळीं बोलल्या जाणाऱ्या भाषेंतील व उपलब्ध वाङ्मयांतील शब्दसमृद्धीची कल्पना येते. या प्रत्ययांना 'तद्धित' अशी संज्ञा आहे. तद्धित प्रत्ययांचे 'तस्यापत्यम्', 'तत्र भवः', 'तत्र जातः', 'तेन रक्तम्', 'तस्य समूहः', 'तेन प्रोक्तम्', 'तस्य निवासः', 'तस्येदम्', 'कृते ग्रंथे', 'तदधीते', 'तद्वेद' असे अनेक अर्थ आहेत. 'स्रौघ्नः' असा शब्द घेतला तर स्रुघ्न देशांत राहणारा, तेथें झालेला, तेथें जन्म पावलेला, त्या देशाचा रहिवासी वगैरे अनेक अर्थ व्यक्त होतात.

पांचवा अध्याय (सूत्रसंख्या ५५५)—या अध्यायांत ५५५ सूत्रें असून मागच्या अध्यायाप्रमाणेंच तद्धित प्रत्यय लावून निरनिराळ्या अर्थीं रूपें कशीं साधतां येतात याचेंच विवेचन केलें आहे व हें सांगून झाल्यावर समास केला असतां शब्दाच्या शेवटीं आढळून येणारे समासान्त प्रत्ययही सांगितले आहेत.

तात्पर्य, तीन, चार व पांच या अध्यायांत पाणिनीनें स्त्रीप्रत्यय, कृत् प्रत्यय व तद्धित प्रत्यय सांगून सर्व नामांची प्रकृति-प्रत्ययात्मक शब्द-सिद्धि कशी होते हें दाखविलें आहे. तिन्ही अध्याय मिळून एकंदर १८१९ सूत्रें खर्ची पडलीं आहेत व यामुळें हा शब्दमहार्णव उत्तीर्ण होण्याचा पाणिनीचा महान् प्रयत्न आहे. हे तीन अध्याय म्हणजे अष्टाध्यायीचें 'हृदय'च आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; आणि वस्तुतः ते अष्टाध्यायीच्याही मध्यभागीं आहेत.

सहावा अध्याय (सूत्रसंख्या ७३६)—या अध्यायाचे तीन भाग पडतात. पहिल्या पादांत २२३ सूत्रें असून विशिष्ट शब्दांचे व धातूंचे बाबतींत त्यांच्यापुढें सांगितलेले प्रत्यय लावले असतांना कांहीं विकृति दृष्टीस पडतात त्या सांगितल्या आहेत. यांत एकादेश, गुण, वृद्धि, पररूप,

---

२५. पहा— व्याकरण महाभाष्य भाग ७, उपोद्घात, पान १६१.
(प्रा. का. वा. अभ्यंकरकृत)

सवर्णदीर्घ, संप्रसारण, प्रकृतिभाव इत्यादि विकृति येतात. पुढील दोन पादांत शब्दांच्या उदात्त, अनुदात्त व स्वरित स्वरांचा विचार केला आहे. याला स्वरप्रक्रिया असें नांव देण्यांत आलें आहे. या बाबतींत प्रत्येक पदामध्यें एकच मुख्य स्वर उदात्त उच्चारला जातो व बाकीचे स्वर अनुदात्त उच्चारले जातात, या वैशिष्ट्याचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. याला अनेक अपवादही सांगितले आहे.

यापुढील चवथ्या पादांत व सातव्या अध्यायाच्या सर्व पादांत 'अङ्गाधिकार' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भागाचें विस्तृत विवेचन केलें आहे. म्हणजे अंग व त्यापुढील प्रत्यय यांच्या विकारांचें संपूर्ण विवेचन पाणिनीनें त्यांत केलें आहे. स्वरप्रक्रियाचे दोन पाद या अध्यायाच्या मध्यभागीं कां घातलें हें समजत नाहीं.

सातवा अध्याय (सूत्रसंख्या ४३८)— सहाव्या अध्यायाच्या शेवटच्या पादांतील अंगाधिकारच या अध्यायांत सविस्तर चालू आहे. महाभाष्य वाचतांना साधारणपणें पहिल्या अध्यायाचा पहिला पाद (यांत नऊ 'आह्निकें' असल्यानें त्यास 'नवाह्निकी' म्हणतात.) व 'अंगाधिकार' प्रकरण हे भाग मुख्यतः गुरुजीपाशीं अध्ययन केले जातात. भाष्याचा इतर भाग विद्यार्थ्यानें स्वतःच टीकांच्या साहाय्यानें वाचावयाचा असतो.

आठवा अध्याय (सूत्रसंख्या ३६३)— या अध्यायांत शब्दांचें द्विरुच्चारण केव्हां होतें व तें झालें असतां दुसऱ्या भागाला होणाऱ्या विकृति व स्वरांत होणारा बदल इत्यादींचा विचार पाणिनीनें पहिल्या पादांत केला आहे. यानंतर पुढील तीन पाद प्रसिद्ध 'त्रिपादी'च्या नांवानें ओळखले जातात. शब्द जवळजवळ उच्चारले गेले असतां एका शब्दाच्या सांनिध्यामुळें दुसऱ्या शब्दाच्या उच्चारावर होणारा परिणाम दाखविणारे कुत्व, षत्व, णत्व, श्चुत्व, जश्त्व यांसारखे वर्णविकार सांगितले आहेत. हीं सूत्रें ग्रंथाच्या शेवटच्या भागांतच येणें इष्ट आहे. अष्टाध्यायीचें पहिलें सूत्र 'वृद्धिरादैच् ।' १।१।१ आहे तर शेवटचें 'अ अ इति'। ८।४।६७ आहे. पण भाष्यकार पतंजलीच्या मतें 'नोदात्त-

स्वरितोदयमगार्ग्यकाश्यपगालवानाम्' । ८।४।६६ हेंच शेवटलें सूत्र आहे. कारण यांत 'उदय' शब्द मंगलकारक आहे तर अगदीं सुरुवातीच्या सूत्रांत 'वृद्धि' शब्द मंगलकारक आहे. प्राचीन दंडकाप्रमाणें ग्रंथाच्या आरंभीं, मध्यें व शेवटीं मंगल शब्दाचा उच्चार करावयाचा असतो व त्यामुळें ग्रंथ निर्विघ्नपणें पार पडतो अशी समजूत आहे. तेव्हां ग्रंथाची समाप्ति नीट व्हावी अशी इच्छा असणाऱ्यानें हा दंडक नीट पाळला पाहिजे[२६]. पतंजलीनें महाभाष्यांत 'सिद्ध' हा मंगल शब्द प्रारंभीं घातला आहे. 'अ अ इति' हें सामान्य सूत्र असून प्रयोगांत विवृत अकार संवृत होतो इतकेंच त्यानें सांगितलें आहे.

---

२६. 'मङ्गलादीनि मङ्गलमध्यानि मङ्गलान्तानि शास्त्राणि प्रथन्ते वीरपुरुषाणि च भवन्ति आयुष्मत् पुरुषाणि च अध्येतारश्च सिद्धार्था यथा स्युः । शिष्यशिक्षार्थं ग्रन्थतो निबध्नाति । समाप्तिकामो मङ्गलमाचरेत् । (महाभाष्य)

४. पाणिनीला ज्ञात असलेलें संस्कृत वाङ्मय

प्रस्तावना— पाणिनीनें संस्कृत भाषेच्या व्याकरणासाठीं आपला अष्टाध्यायी ग्रंथ रचला. या पाणिनीय अष्टकांत जवळजवळ चार हजार सूत्रें असून त्यांच्या साहाय्यानें पाणिनीनें हजारों शब्द प्रकृतिप्रत्ययात्मक साधण्याचा प्रयत्न केला. अर्थात् ही सर्व खटपट त्यानें त्या वेळीं ज्ञात असलेल्या भाषेंतील शब्दसिद्धीसाठींच केली असली पाहिजे. त्या वेळीं वैदिक संस्कृत भाषा व बोलभाषा अशा दोन भाषा असून वैदिक संस्कृत भाषा व्यवहारांतून मागें पडत चालली होती. बोलण्याचें माध्यम अर्थातच संस्कृत होतें. म्हणून पाणिनि ‘ छंदसि भाषायां च ’ असें ठिकठिकाणीं म्हणतो.

पाणिनीनें त्या वेळची संस्कृत बोलभाषाच केवळ लक्षांत न घेतां त्या वेळच्या वाङ्मयांत जे शब्द आढळले तेही लक्षांत घेतले असले पाहिजेत. कारण भाषेला प्रगत स्वरूप आल्याशिवाय तिच्यावर व्याकरणाचे संस्कार होत नाहींत. ज्या भाषेचें व्याकरण झालें आहे, मग ती कोणतीही व कोणत्याही देशांतील अथवा प्रांतांतील असो, ती भाषा ‘ संस्कृत ’ किंवा ‘ सुसंस्कृत ’ झाली असें समजावें. त्या वेळच्या भाषेवर व्याकरणाचे संस्कार झाले म्हणूनच तिला ‘ संस्कृत ’ असें नांव पडलें असावें. पाणिनीच्या व्याकरणांत भाषेला उद्देशून ‘ संस्कृत ’ असा शब्द नाहीं.

पाणिनीला ज्ञात असलेलें वाङ्मय कोणतें याचा उलगडा त्याच्या सूत्रांवरूनच होतो. त्याच्या सूत्रांतून ज्या वाङ्मयाचा व ग्रंथांचा निर्देश आला आहे तें तर त्याला ज्ञात होते यांत शंकाच नाहीं, पण ज्याचा उल्लेख नाहीं असेंहि अनुल्लेखित वाङ्मय बरेंच असावें. बरें, ज्या वाङ्मयाचा उल्लेख आहे तें तरी सर्व आज कोठें उपलब्ध आहे ? म्हणून तें नव्हतेंच असें म्हणतां येणार नाहीं. पाणिनीचा काल हा सामान्यतः इ. स. पूर्व सातवें शतक असला तरी त्या वेळीं बरेंच वैदिक वाङ्मय व त्याचप्रमाणें काव्य वगैरे ललित वाङ्मय लिखित किंवा लोकांना मुखोद्गत असावें. पाणिनीच्या काळीं लिपि अस्तित्वांत होती हे दाखविणारे अनेक

उल्लेख त्याच्या सूत्रांतून दृग्गोचर होतात, ते यथावकाश देण्यांत येतीलच. आतां अष्टाध्यायींत त्या वेळीं ज्ञात असलेल्या वाङ्मयाचे किती प्रकार आढळतात ते क्रमानें पाहूं.

(१) '**दृष्ट**' **वाङ्मय**— 'दृष्ट' म्हणजे (Revealed or Seen) केवळ 'ऐकलेलें.' ज्याचा कर्ता ज्ञात नाहीं असें 'अपौरुषेय' किंवा एकाएकीं उत्स्फूर्त ! पाणिनीच्या मतें सामवेद हा वरील अर्थानें 'दृष्ट' होता हें 'दृष्टं साम' । ४ । २ । ७ या सूत्रावरून कळून येईल. अशीं दोन सामन् 'कालेय' (कलि ऋषीनें दृष्ट) व 'वामदेव्य' (वामदेवाला दृष्ट) पाणिनीनें 'दृष्ट' या अर्थी साधलीं आहेत.[१]

पाणिनीला ऋग्वेद व यजुर्वेद यांच्या संहिता माहीत होत्या व त्यांतील सूक्त, अध्याय आणि अनुवाक हेही माहीत होते, कारण सूत्रांत त्यांचा उल्लेख आहे.[२]

(२) '**प्रोक्त**' **वाङ्मय**— हा दुसरा प्रकार आहे. 'प्रोक्त' म्हणजे (promulgated or enounced by ऋषि) ऋषिप्रणीत.[३] यांत शाखा आणि ब्राह्मणग्रंथ यांचा अंतर्भाव होतो. उदाहरणार्थ, तैत्तिरीय, कठ आणि कालाप या शाखांचा व प्राचीन ब्राह्मणग्रंथांचा सूत्रांतून उल्लेख आहे.[४] 'प्रोक्त' वाङ्मयाचा त्या त्या शाखेचे गुरु आणि शिष्य यांच्या नांवांशीं संबंध असे. जसें—तित्तिरिणा प्रोक्तं अधीयते-'तैत्तिरीयाः'. पा. सू. ४।२।६६ मध्यें 'तद्विषयता' हा शब्द फक्त छंदस् आणि ब्राह्मण यांपुरताच आहे. म्हणजे तैत्तिरीय शाखा किंवा तैत्तिरीय ब्राह्मण यापुरताच 'तैत्तिरीय' शब्द वरील सूत्रानें लावतां येतो. पण पुढें ब्राह्मण-

---

१. 'कलेर्ढक्'। ४।२।८; व 'वामदेवाड्ड्यड्ड्यौ'। ४।२।९

२. 'मतौ छः सूक्तसाम्नोः'। ५।२।५९ व 'अध्यायानुवाकयोर्लुक्'। ५।२।६०

३. छन्दोब्राह्मणानि च तद्विषयाणि। ४।२।६६

४. तित्तिरिवरतन्तुखण्डिकोखाच्छण्। ४।३।१०२; कठचरकाल्लुक्। ४।३।१०७; कलापिनोऽण्। ४।३।१०८; पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु। ४।३।१०५

ग्रंथाच्या अंतर्भूत अशीं आरण्यकें व उपनिषदें यांनाही तो शब्द लावूं लागले—उदाहरणार्थ, तैत्तिरीय आरण्यकें किंवा तैत्तिरीय उपनिषदें अशीं नांवें प्रचारांत आलीं.

वैदिक वाङ्मयांत आणखी एक 'प्रोक्त' वाङ्मयाचा प्रकार आहे. तो म्हणजे वेदाङ्गांत अंतर्भूत असलेलें 'कल्प' वाङ्मय किंवा श्रौतसूत्रें. वास्तविक श्रौतसूत्रें वेदाङ्गाचा भाग असलीं तरी पा. सू. ४।२।६६ मधील 'तद्विषयता' शब्द त्यांना लागू पडत नाहीं, कारण तीं शाखा किंवा ब्राह्मण यांपैकीं नाहींत. परंतु पाणिनीनें काश्यप आणि कौशिक यांच्या कल्पसूत्रांपुरता अपवाद केला आहे, कारण ते दोघे ऋषि होते.[५] म्हणून 'काश्यपिनः', 'कौशिकिनः' असे तीं सूत्रें म्हणणारे किंवा अध्ययन करणारे अथवा जाणणारे या अर्थीं प्रयोग होऊं शकतो. 'तद्विषयता' याची फोड अशी कीं 'तद्' शब्दानें 'अध्येतृ, वेदितृ' प्रत्ययांचें ग्रहण होतें.[६] जसें कठ शाखा अध्ययन करणारे किंवा जाणणारे त्यांनाही 'कठ' च म्हणावयाचें.[७]

'प्रोक्त' वाङ्मयांत पाणिनीनें आणखी दोन ग्रंथांचा समावेश केला आहे. तो म्हणजे पाराशर्य आणि कर्मन्द यांचीं भिक्षुसूत्रें व शिलालिन् आणि कृशाश्व यांचीं नटसूत्रें[८]. आश्चर्य असें कीं, पाणिनीनें या वैदिकेतर वाङ्मयाला 'प्रोक्त' (Secular) म्हटलें ! 'प्रोक्त' वाङ्मय हें ऋषि-प्रणीत असलें पाहिजे व ते ऋषि 'पुराण' असले पाहिजेत. इतके पुराणे कीं याज्ञवल्क्य हा सुद्धां पुराण ऋषींत पाणिनीच्या मतें गणला जात नाहीं ! पण भिक्षुसूत्रें आणि नटसूत्रें यांना 'प्रोक्त' म्हटल्यानें पावित्र्य आलें ! त्यामुळें 'पाराशरिणो भिक्षवः' व 'शैलालिनो नटाः' असे प्रयोग

५. 'काश्यपकौशिकग्रहणं च कल्पे नित्यार्थम्'। पा. सू. ४।२।६६ वरील वार्तिक ६

६. 'तच्छब्देन अध्येतृवेदितृप्रत्ययः परामृश्यते'। त. बो.

७. 'कठेन प्रोक्तमधीयते कठाः'। सि. कौ.

८. पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः। ४।३।११०
कर्मन्दकृशाश्वादिनिः। ४।३।१११

झाले. ‘ पाराशर्याच्या भिक्षुसूत्रांचें अध्ययन करणारे भिक्षु व शैलालीचीं नटसूत्रें म्हणणारे नट ’ असे वाक्यप्रयोग भाष्यकारानें दिले आहेत. ‘ भिक्षुनटसूत्रयोः छान्दसत्वम् ’ असें त्यावर काशिकाकारानें व्याख्यान केलें आहे. याचें कारण असें असावें कीं पाराशर आणि शैलालक या मूळ ऋग्वेदाच्या शाखा होत्या. पुढें त्या ऋषींनींच भिक्षुसूत्रें आणि नटसूत्रें रचल्यानें त्यांना ‘ छान्दसत्व ’ आलें असावें. पाणिनीही वरील सूत्रांना ‘आम्नाय’ समजत होता हें पा. सू. ४।३।१२९ वरून सिद्ध होतें. या सूत्रावर व्याख्यान करतांना काशिकाकार म्हणतो कीं ‘ नटशब्दादपि धर्माम्नाययोरेव प्रत्ययो भवति’. या ‘प्रोक्त’ अधिकारांत अकरा सूत्रें आहेत.[९] ती ४।३।१०१ ते ४।३।१११ पावेतों असून तित्तिरि, वरतंतु, खण्डिक, उख (४-३-१०२), कठ व कलापिन् (४।३।१०७–१०८), वैशम्पायनान्तेवासिनः व कलाप्यन्तेवासिनः (४–३–१०४) यांत हरिद्रु, तुम्बुरु, उलप आणि छगलिन्, अलम्बिन् आणि पिङ्ग येतात. पाराशर्य, शिलालिन् (४।३।११०), कर्मन्द आणि कृशाश्व (४।३।१११), शौनक वगैरे (४।३।१०६), काश्यप आणि कौशिक (४–३–१०३) वगैरे ऋषींचा निर्देश ‘ प्रोक्त ’ अधिकारांत त्या त्या सूत्रांत आला आहे. त्यांपैकीं बरेच कृष्ण यजुर्वेदाच्या वेगवेगळ्या शाखांचे प्रवर्तक आहेत व त्या शाखा त्यांच्या नांवानें प्रसिद्ध आहेत. त्याप्रमाणें अत्रि, भृगु, वसिष्ठ वगैरे मंत्र-द्रष्ट्यांचा उल्लेखही पाणिनि-सूत्रांत आला आहे.[१०]

याप्रमाणें ‘ दृष्ट ’ वाङ्मय व ‘ प्रोक्त ’ वाङ्मयाची माहिती दिली.

---

९. तेन प्रोक्तम् । ४।३।१०१ या ‘ प्रोक्त ’ अधिकारांत ११ सूत्रें आहेत. तित्तिरिवरतन्तुखण्डिकोखाच्छण् । ४।३।१०२; काश्यपकौशिकाभ्यामृषिभ्यां णिनिः । ४।३।१०३; कलापिवैशम्पायनान्तेवासिभ्यश्च । ४।३।१०४; पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु । ४।३।१०५; शौनकादिभ्यश्छन्दसि । ४।३।१०६; कठचरकाल्लुक् । ४।३।१०७; कलापिनोऽण् ४।३।१०८; छगलिनो ढिनुक् । ४।३।१०९; पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः । ४।३।११०; कर्मन्दकृशाश्वादिनिः ४।३।१११

१०. अत्रिभृगुकुत्सवसिष्ठगोतमाङ्गिरोभ्यश्च । २।४।६६

(३) 'उपज्ञात' वाङ्मय हा तिसरा प्रकार वरील दोहोंहून थोडा भिन्न आहे. 'उपज्ञात' म्हणजे 'नवीन ज्ञान' असा आपटे कोशांत अर्थ दिला आहे. (उपज्ञा—knowledge acquired by oneself and not handed down by tradition or invention' आपटे संस्कृत-इंग्रजी कोश). यावरून 'उपज्ञात' म्हणजे नवीन शोधलेलें.[११] पाणिनीनें अशा ज्ञानाला एका सूत्रांत (२।४।२१) 'आद्य आचिख्यासा' असें म्हटलें आहे.[१२] आपिशलि, पाणिनि, व्याडि आणि काशकृत्स्न यांचीं व्याकरणें 'उपज्ञात' या सदराखालीं येतील. वस्तुतः 'उपज्ञात' हा भाग 'प्रोक्त' वाङ्मयाचाच एक अंश आहे. 'पाणिनिना प्रोक्तम्' किंवा 'पाणिनिना उपज्ञातम्' या दोहोंनाही 'पाणिनीयं व्याकरणम्' असें म्हणतां येतें. मुख्य फरक प्रोक्त आणि उपज्ञात यांमध्यें हा आहे कीं, 'उपज्ञात' वाङ्मयाचा कर्ता व्यक्तिशः एकच असतो.

'तदधीते तद्वेद' ४।२।५९ या अर्थीं झालेल्या प्रोक्त प्रत्ययाचा 'प्रोक्ताल्लुक्' ४।२।६४ या सूत्रानें जसा लुक् सांगितला आहे तसा तो 'उपज्ञात' या अर्थींही होतो. म्हणजे पाणिनीनें 'प्रोक्त' किंवा 'उपज्ञात' जें व्याकरण तें 'पाणिनीय' व तें अध्ययन करणारे व जाणणारे तेही 'पाणिनीय'च. 'पाणिनीय' हे वेदाच्या एखाद्या विशिष्ट शाखेला अनुलक्षून नसून तें कोणत्याही शाखेच्या लोकांना लावतां येईल. पाणिनीच्या अष्टाध्यायीला 'अष्टक' नांव आहे. तें म्हणणाऱ्यांना किंवा जाणणाऱ्यांनाही 'अष्टकाः' म्हणतात.[१३]

(४) 'कृत' वाङ्मय[१४]—आतांपावेतों दृष्ट, प्रोक्त उपज्ञात या तीन प्रकारच्या वाङ्मयाची चर्चा केली. आतां 'कृत' वाङ्मय म्हणजे काय व तें इतरांपासून कोणत्या गोष्टींत भिन्न आहे तें पाहूं. एखाद्या विषयाला

११. उपज्ञाते। ४।३।११५
१२. उपज्ञोपक्रमं तदाद्याचिख्यासायाम्। २।४।२१
१३. सूत्राच्च कोपधात्। ४।२।६५
१४. कृते ग्रन्थे। ४।३।११६ व अधिकृत्य कृते ग्रन्थे। ४।३।८७.

धरून किंवा उद्देशून ग्रंथ रचला व तो एका व्यक्तीनें रचला तर त्याला 'कृत' म्हणावें. उदाहरणार्थ, पाणिनीनें रचलेल्या व्याकरणाला 'पाणिनीय व्याकरण म्हणतां येईल, पण 'पाणिनीय ग्रंथ' म्हणतां येणार नाहीं. कारण पाणिनीनें त्याचें 'अन्वाख्यान' केलें असून नवीन कांहीं संशोधन केलें नाहीं. मॅक्समुल्लरचें तेंच म्हणणें आहे.[१५] 'कृता'चा संबंध व्यक्तिनामाशीं असतो तर 'उपज्ञात' वाङ्मयाचा विषयाशीं असतो. 'कृता'चें उदाहरण म्हणजे 'वररुचीनें केलेला ग्रंथ' या अर्थी 'वररुचिना कृतः वाररुचो ग्रन्थः' त्याला 'वाररुच ग्रंथ' म्हणतां येतें, 'वाररुच व्याकरण' म्हणतां येणार नाहीं.

(५) **'व्याख्यान' वाङ्मय** (Literature of Exposition and Commentaries)— वाङ्मयाचा हा आणखी एक प्रकार आहे.[१६] या वाङ्मयांत टीकाग्रंथ व तेही फुटकळ स्वरूपाचे येतात. हे ग्रंथ मूळ स्वरूपाचे नसतात तर इतर विषय कळण्यास सुलभ व्हावेत म्हणून ते रचलेले असतात. वेदाङ्गांचें ज्ञान, किंवा यज्ञांतील विधि यांचें ज्ञान सुलभतेनें व्हावें एतदर्थ हे ग्रंथ असतात. पा. सू. ४–३–७२ मध्यें 'नामिक,' 'आख्यातिक' ह्या व्याकरणाच्या एखाद्या विशिष्ट भागावर व्याख्यान करणाऱ्या ग्रंथाचा उल्लेख आहे.[१७] अशा 'व्याख्यान' वाङ्मयानें मूळ वाङ्मय समृद्ध झालें यांत संदेह नाहीं. फलज्योतिषावर झालेल्या

---

१५. "A work which has been taught and promulgated by a person, is not to be called his book (ग्रन्थ), but bears its own title, such as 'grammar', or, whatever else it may be, together with an adjective derived from the author's name. Panini's grammar, for instance, is not to be called पाणिनीयो ग्रन्थः but पाणिनीयं व्याकरणम्, because it is a canonical work revealed to Panini but not invented by him."

Maxmuller.

१६. तस्य व्याख्यान इति च व्याख्यातव्यनाम्नः । ४।३।६६.

१७. ऋजृद्ब्राह्मणर्क्प्रथमाध्वरपुरश्चरणनामाख्याताट्ठक् । ४।३।७२.

अशा लहानसहान ग्रंथांचा उल्लेख पाणिनीच्या सूत्रांतून आला आहे. त्याचें दिग्दर्शन यथावकाश पुढें करण्यांत येईलच.

आतांपर्यंत पाणिनीनें किती प्रकारच्या वाङ्मयाचे उल्लेख केले आहेत त्याचें विवेचन केलें. आतां अष्टाध्यायींत प्रत्यक्ष कोणत्या ग्रंथांचा निर्देश आला आहे तें पाहूं.

(१) वेदवाङ्मय— थीमच्या मतें पाणिनीनें आपल्या व्याकरणासाठीं खालील वैदिक वाङ्मय डोळ्यांसमोर ठेवलें होतें–ऋग्वेद, मैत्रायणी संहिता, काठक संहिता, तैत्तिरीय संहिता, अथर्ववेद व सामवेद. त्याचप्रमाणें शाकल्याच्या पदपाठाचाही पा. सू. १।१।१६ ते १८ सूत्रांमध्यें उल्लेख आढळतो.[१८] थीमच्या मतें पाणिनीनें साधलेले कांहीं शब्दप्रयोग आज कोठेंही वैदिक वाङ्मयांत आढळत नाहींत. कदाचित् कृष्ण यजुर्वेदाच्या कांहीं शाखावाङ्मयांत ते असावेत. त्या शाखा आज अस्तित्वांत नाहींत.

गोल्डस्टुकरच्या मतें पाणिनीला अथर्ववेद माहीत नव्हता. वेबरच्या मतें हें विधान बरोबर नाहीं. कारण पाणिनीनें 'अथर्वन्'चा उल्लेख आपल्या सूत्रांत केला आहे.[१९] शिवाय 'अथर्वन्' आणि 'आथर्वण' हे दोन शब्द वसन्तादि गणांत आले आहेत.[२०] 'आथर्वणिक' म्हणजे अथर्वन् वेदाच्या शाखेचें अध्ययन करणारा असें पतंजलीनें महाभाष्यांत म्हटलें आहे. (२–३२०). गोल्डस्टुकरच्या मतें पाणिनीला वाजसनेयी संहिता व शतपथब्राह्मण माहीत नव्हते. थीमच्या मतें शुक्लयजुर्वेदांतील कोणत्याच भागाचा उल्लेख अष्टाध्यायींत नाहीं. याचा अर्थ कोणी असा करतात कीं, पाणिनीनंतर वाजसनेयी संहितेचा काल असावा. पण शौनकादि गणांत 'वाजसनेय' शब्द सांपडतो.[२१] पण गणपाठ हे

१८. Vide P. Thieme, 'Panini and The Vedas' p. 63.

१९. दाण्डिनायनहास्तिनायनाथर्वणिक......। ६।४।१७४.

२०. वसन्तादिभ्यष्ठक्। ४।२।६३.

२१. शौनकादिभ्यच्छन्दसि। ४।३।१०६.

पाणिनीचेच आहेत का व आहेत ते तरी मूळ स्वरूपांत आहेत का इत्यादि प्रश्न विवाद्य आहेत. गणपाठांतील शब्दांचा पुरावा कितपत ग्राह्य धरावा हा प्रश्न आहे!

पाणिनीच्या सूत्रांत छन्दस्, मन्त्र, ऋक्, यजुस्, ब्राह्मण आणि निगम असे शब्द आले आहेत. त्याचप्रमाणें 'अमंत्र' शब्दही एका सूत्रांत आहे.[२२] मंत्र आणि ब्राह्मण हे परस्परविरोधी शब्द आहेत. ऋक् ही छंदोबद्ध असते तर यजुस् गद्य असतो.

ऋग्वेद—ऋग्वेदाचा शाकल्यानें केलेला पदपाठ पाणिनीला माहीत होता हें वर म्हटलेंच आहे.[२३] विद्यार्थी शाकल्यशाखेचें पठन करीत असाही उल्लेख आहे.[२४] सध्यां अस्तित्वांत असलेली ऋग्वेदसंहिता शाकलसंहिता म्हणून प्रसिद्ध आहे. ही शाखा 'शैशिरीय' म्हणून ओळखली जाते. पण ती शाकल्याच्याच विद्यार्थ्यांची आहे. 'शैशिरि' शब्द 'गहादि' गण–पाठांत आहे.[२५] शाकल आणि शुनक यांचा जोडीनें नामनिर्देश 'शाकल-शुनकाः' असा 'कार्तकौजपादि' गणांत आला आहे.[२६]

शाकल शाखेच्याच पांच शाखा त्याच्या शिष्यांनीं तयार केल्या. मुद्गल, गालव, वात्स्य, सालीय आणि शैशिरीय या नांवांनीं त्या प्रसिद्ध आहेत.

ऋक्संहितेच्या क्रमपाठाचाही उल्लेख सांपडतो.[२७] याचा कर्ता पाञ्चाल-बाभ्राव्य असून त्याचा उल्लेख पा. सू. ४।१।१०६ मध्यें आहे[२८] व तो

२२. कास्प्रत्ययादाममन्त्रे लिटि। ३।१।३५.
२३. संबुद्धौ शाकल्यस्येतावनार्षे। १।१।१६.
२४. शाकलाद्वा। ४।३।१२८.
२५. गहादिभ्यश्च। ४।२।१३८.
२६. कार्तकौजपादयश्च। ६।२।३७.
२७. क्रमादिभ्यो वुन्। ४।२।६१.
२८. मधुबभ्रोर्ब्राह्मणकौशिकयोः। ४।१।१०६.

कौशिकगोत्री आहे. मत्स्य पुराणांतही (२१।३०) बाभ्रव्य हा क्रम-पाठाचा कर्ता होता अशी परंपरेनें चालत आलेली माहिती (Tradition) दिली आहे. बाष्कल शाखेचा उल्लेख पाणिनि करीत नाहीं; पण त्याचे शिष्य पराशर आणि शिलालिन् यांचा भिक्षुसूत्रें आणि नटसूत्रें यांच्याशीं संबंध असून ते शाखाप्रवर्तकही होते असें दिसतें. बाह्वृचाचा उल्लेख पा. सू. ४।३।१२९ मध्यें आहे. शौनकाचा निर्देश 'शौनकादिभ्यच्छन्दसि' । ४।३।१०६ यांत असून त्याचे विद्यार्थी 'शौनकिनः' म्हटले जात. पैल याचाही उल्लेख पैलादिभ्यश्च । २।४।५९ मध्यें असून त्याचे दोन शिष्य बाश्कलि आणि माण्डूकेय यांचा उल्लेख 'कार्तकौजपादि' गणांत आला आहे.

यजुर्वेद— पाणिनीनें कृष्णयजुर्वेदाचा अनेक वेळां उल्लेख केला आहे. तित्तिरि, वरतंतु, खण्डिक, उख व कलापिन् यांचा उल्लेख मागें आलाच आहे. यजुर्वेदाचा मूळऋषि वैशंपायन होय. वरील ऋषि त्याचे अंतेवासी समजण्यास हरकत नाहीं. वैशंपायनाचें दुसरें नांव 'चरक' आहे. काशिकाकार म्हणतो– 'चरक इति वैशंपायनस्याख्या' पा. सू. ४।३।१०४. कठ आणि चरक यांच्या अनुयायांना पाणिनि 'कठाः' आणि 'चरकाः' म्हणतो (पा. सू. कठचरकाल्लुक् । ४।३।१०७). इतर अनेक शाखांचा उल्लेख मागें आलाच आहे.

शुक्लयजुर्वेदापैकीं 'वाजसनेय' याचा एका गण-पाठांत । ४।३।१०६ उल्लेख आहे तितकाच.

सामवेदाचा निर्देश अनेक ठिकाणीं आला आहे. 'शौचिवृक्षि' आणि 'सात्यमुग्रि' यांचा उल्लेख पा. सू. ४।१।८१ मध्यें आला आहे. त्याच सूत्रांत 'काण्डेविद्धि'चाही निर्देश आहे.[२९] सामवेदाचे दोन भाग कल्पिले आहेत, एक 'आर्चिक' (पा. सू. ४।३।७२) व दुसरा 'गेय' (पा. सू. ३।४।६८). अथर्ववेदाचा उल्लेख अथर्वन् व अथर्वण या शब्दांनीं सूत्रांत आला आहे इतकाच.

---

२९. दैवयज्ञिशौचिवृक्षिसात्यमुग्रिकाण्डेविद्धिभ्योऽन्यतरस्याम् । ४।१।८१.

'ब्राह्मण'-वाङ्मय—पा. सू. ४।३।१०५ या सूत्रांतील 'पुराणप्रोक्त' या शब्दावरून ब्राह्मणग्रंथांपैकीं कांहीं प्राचीन ब्राह्मणें व कांहीं नवीन ब्राह्मणें असा उल्लेख करण्याचा पाणिनीच्या वेळीं प्रचात होता व 'याज्ञवल्क्यादिभ्यः प्रतिषेधः' या वार्त्तिककाराच्या वचनावरून त्याला पुष्टि मिळते.[30] याज्ञवल्क्याचें ब्राह्मण यावरून 'पुराणप्रोक्त' समजलें जात नसे. 'शतषष्टेः षिकन् पथः' या वार्त्तिकावरून 'शतपथ' ब्राह्मण हे कदाचित् पाणिनीनंतरचें असावें.[31] शत अध्यायांच्या 'शतपथ' ब्राह्मणाचा कर्ता याज्ञवल्क्य समजला जातो. यांत अग्निरहस्य, संग्रह आणि परिशिष्ट या तिहींचा अंतर्भाव होतो. ब्राह्मण व कल्प या दोन्ही प्रकारच्या ग्रंथांचा पाणिनीनें एकत्र उल्लेख केला असल्यानें, कांहीं 'ब्राह्मण' ग्रंथांचा कल्प ग्रंथांमध्यें अंतर्भाव होत असला पाहिजे. कुमारिलभट्टांनींही 'अरुणपराशरशाखाब्राह्मणस्य कल्पत्वात्'। असें स्पष्ट विधान केलें आहे.[32] पाणिनीनें 'त्रिंश' आणि 'चत्वारिंश' (तीस आणि चाळीस अध्यायांचे) अशा दोन ब्राह्मणांचा उल्लेख सूत्रांत केला आहे (त्रिंशच्चत्वारिंशतो-र्ब्राह्मणे संज्ञायां डण्। ५।१।६२). भाल्लविनः आणि शाट्यायनिनः हीं 'पुराणप्रोक्त' ब्राह्मणांचीं उदाहरणें पतंजलि महाभाष्यांत देतो.

पाणिनीनें 'अनुब्राह्मणादिनिः' ।४।२।६२ या सूत्रांत 'अनुब्राह्मण' शब्द घातला आहे. त्यावरुन ब्राह्मणासारख्या श्रौतनिर्वचनपर ग्रंथांना त्या वेळीं 'अनुब्राह्मण' ही संज्ञा देण्यांत येत असली पाहिजे. काशिकाकार यावर 'ब्राह्मणसदृशोऽयं ग्रंथः' असें व्याख्यान करतो. तैत्तिरीयसंहितेवरील टीकेंत भट्टभास्कर तैत्तिरीय ब्राह्मणाच्या कांहीं भागाला 'अनुब्राह्मण' म्हणतो.

'सुब्रह्मण्या' या नांवाच्या निगद-ग्रंथाचा उल्लेख पाणिनिसूत्रांत

३०. छन्दोब्राह्मणानि च तद्विषयाणि । ४।२।६६ यावरील चवथें वार्त्तिक.
३१. क्रतूक्थादिसूत्रान्ताट्ठक्। ४।२।६० वरील श्लोकवार्त्तिक.
३२. व्याकरण महाभाष्य–प्रस्तावना खंड, पान १५०.

आला आहे.[३३] पण कोणत्या वेदविभागाला ती संज्ञा असावी हें सांगतां येत नाहीं.

पाणिनिपूर्व वेदाङ्गग्रंथ—

वेदवाङ्मयाप्रमाणें पाणिनीला सर्व वेदाङ्गेंही अवगत असावीं असें त्याच्या सूत्रांमध्यें व गणांमध्यें आलेल्या शब्दांवरून कळतें. शिक्षाग्रंथ, कल्पग्रंथ हे तर पाणिनिपूर्व होतेच, पण यज्ञक्रियेवरही इतर बरेच ग्रंथ असावेत असें सिद्ध होतें.[३४] पाणिनीनें पूर्व वैयाकरणांपासून कोणतें ऋण घेतलें हें मागें दुसऱ्या प्रकरणांत सविस्तर रीतीनें दिलें आहे. 'यस्कादिभ्यो गोत्रे'। २।४।६३ यांत 'यस्क' शब्द आला आहे त्यावरून व उक्थादि गणांतही 'निरुक्त' शब्द असल्यानें यास्काचें 'निरुक्त' पाणिनिपूर्व होतें. छंदाविषयीं विचार केल्यास ऋग्वेद-संहितेंत व निरुक्तांत वृत्तांचें विवेचन आल्यानें छंदोग्रंथही पाणिनीला अवगत होते. वृत्ताप्रमाणें ऋचांचें त्या वेळीं गान केलें जात असे.[३५] छन्दःशास्त्र-प्रवर्तक पिंगल हा पाणिनीचा भाऊ होता अशी आख्यायिका आहे. दोघांचेही प्राण–एकाचा सिंहानें व दुसऱ्याचा मगरानें–घेतला असेंही सुभाषित आहे.

येथपावेतों पाणिनीला ज्ञात असलेल्या वैदिक वाङ्मयाचा विचार झाला. व्याकरणविषयक ग्रंथांचा विचार दुसऱ्या प्रकरणांत झालाच आहे. आतां वैदिकेतर ज्ञात वाङ्मयाचा विचार करूं.

महाभारत—पाणिनीच्या एका सूत्रांत महाभारत शब्द साधला गेला आहे[३६] व त्यांतील वासुदेव, अर्जुन व युधिष्ठिर या तीन प्रमुख

३३. न सुब्रह्मण्यायां स्वरितस्य तूदात्तः। १।२।३७.

३४. क्रतुयज्ञेभ्यश्च। ४।३।६८.

३५. सोऽस्यादिरिति छन्दसः प्रगाथेषु। ४।२।५५.

३६. महान् व्रीह्यपराह्णगृष्टीष्वासजाबालभारभारतहैलिहिलरौरवप्रवृद्धेषु। ६।२।३८.

व्यक्तींचाही निर्देश इतर सूत्रांतून आला आहे.[३७] आश्वलायन गृह्यसूत्रांत (३-४) भारत आणि महाभारत यांचा एकत्र निर्देश आला आहे. आश्वलायन हा महाभारतांतील प्रसिद्ध शौनक ऋषीचा शिष्य होता.

कथावाङ्मय— पाणिनीनें श्लोककार* आणि गाथाकार हे शब्द एका सूत्रानें साधले आहेत.[३८] यावरून त्या वेळीं श्लोकवाङ्मय व गाथा-वाङ्मय अस्तित्वांत असलें पाहिजे. त्याचप्रमाणें आख्यानेंही होतीं. 'आख्यान' शब्द पा. सू. ६।२।१०३ मध्यें आला आहे.[३९] पतंजलि आणि काशिकाकार आख्यानाचीं उदाहरणें म्हणून 'पूर्वयायातम्' आणि 'अपरयायातम्' (ययातीचें पूर्वाख्यान व उत्तराख्यान) किंवा 'पूर्वा-धिरामम्' व 'अपराधिरामम्' (परशुरामाचें पूर्व आणि उत्तर आख्यान) अशीं देतात. याच नांवांचीं आख्यानें याच शब्दांत महाभारताच्या आदिपर्वांत (श्लोक ७० ते ८० व ७१ ते ८८) आलीं आहेत.

काव्य— 'जांबवतीविजय' व 'पार्वतीपरिणय' हीं नाटकें पाणिनीनें रचिलीं असा लोकप्रवाद आहे. पाणिनीच्या एका सूत्रांत त्या वेळीं ज्ञात असलेल्या काव्यांचा उल्लेख आला आहे.[४०] शिशुक्रन्दीय, (लहान मुलांच्या रडण्यावर, कदाचित् बालकृष्णाच्या रुदनावर), यमसभीय, (यमाच्या सभेवर) इंद्रजननीय (इंद्राच्या जन्मावर) व इतर दोघादोघांचा ज्यांत उल्लेख आहे अशा द्वंद्वसमासानें होणाऱ्या सामासिक शब्दांवर—उदाहरणार्थ, देवासुरीय (देव आणि असुर यांच्यावरचें वगैरे). 'इंद्रजनन' हा आकृतिगण असल्यानें त्यांत 'प्रद्युम्नागमन, सीतान्वेषण, विरुद्धभोजन' अशा विषयांवरच्या काव्यांचाही उल्लेख आहे. 'विरुद्धभोजना'वर काय स्वरूपाचें काव्य असेल कोण जाणे !

---

३७. वासुदेवार्जुनाभ्यां वुन्। ४।३।९८ व गवियुधिभ्यां स्थिरः। ८।३।९५.

* तित्तिरि, चरक व उख हे श्लोककर्ते म्हणून लोकांत प्रसिद्ध होते.

३८. न शब्दश्लोककलहगाथावैरचाटुसूत्रमंत्रपदेषु। ३।२।२३.

३९. दिक्छब्दा ग्रामजनपदाख्यानचानराटेषु। ६।२।१०३.

४०. शिशुक्रन्दयमसभद्वन्द्वेन्द्रजननादिभ्यश्छः। ४।३।८८.

नटसूत्रें व भिक्षुसूत्रें—पाणिनीच्या एका सूत्रांत 'नाट्य' शब्द आला आहे.[४१] त्यांत 'नट' शब्दाहून धर्म किंवा आम्नाय या अर्थी ञ्य (य) प्रत्यय सांगितला आहे. 'नाट्य' शब्दानें नटाचा धर्म किंवा आम्नाय असा बोध होत असल्यानें 'नाट्य' या शब्दावरून नटासंबंधीं कांहीं ग्रंथ असला पाहिजे. नटसूत्रांचा व भिक्षुसूत्रांचा उल्लेख अशाच दुसऱ्या एका सूत्रांत आहे.[४२] तेव्हां शिलालिन् आणि कृशाश्व यांनीं हीं नटसूत्रें लिहिलीं असावींत. शिलालीचीं नटसूत्रें आज उपलब्ध नाहींत. पण उपलब्ध असलेलीं भरतनाट्यसूत्रें या शिलालीच्या नटसूत्रांवरच आधारलेलीं असलीं पाहिजेत. याच शिलालीच्या नांवानें आपस्तंब धर्मसूत्रांत 'शैलाल' ब्राह्मणग्रंथांचा उल्लेख आहे. नाट्याला 'आम्नाय' म्हटल्यानें त्याला पावित्र्य आलें. शिलालीच्या नटसूत्रांचा अभ्यास करणारे किंवा तीं जाणणारे (तदधीते तद्वेद) या अर्थी 'शैलालिनो नटाः' असा प्रयोग होतो. 'शैलालिनः' आणि 'शैलालाः' यांत फरक असा कीं नटांना 'शैलालिनः' असा शब्दप्रयोग होतो तर त्या नांवाच्या वैदिकशाखेचें अध्ययन करणाऱ्यांना 'शैलालाः' असा होतो. वैदिकशाखा स्थापन करणाऱ्या शिलालीनेंच पुढें नटसूत्रें लिहिलीं असावींत म्हणून त्यांना पावित्र्य आलें! यावर वेबर म्हणतो—"The growth of a secular text like the Nata-Sutras under the auspices of a Vedic school shows the scope that Vedic literature gave to new intellectual development not directly connected with religion." 'आख्यातोपयोगे' १।४।२९ या सूत्रावर पतंजलि व्याख्यान करतांना म्हणतो कीं, 'यदा आरम्भकाः रङ्गं गच्छन्ति तदा नटस्य गाथाः श्रोष्यामः' म्हणजे रंगभूमीवर नट संगीत गात होते असें दिसतें. 'उपयोग' म्हणजे 'नियमपूर्वकाविद्यास्वीकार' हा अर्थ येथें नसून

---

४१. छन्दोगौक्थिकयाज्ञिकबह्वृचनटाञ्ञ्यः। ४।३।१२९.

४२. पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः। ४।३।११०.
कर्मन्दकृशाश्वादिनिः। ४।३।१११.

Stage direction असा आहे. पाणिनीच्या एका सूत्रांत 'नान्दीकार' शब्द आहे.[४३] 'नान्दीकार' म्हणजे नाटकाचें आरंभीं नान्दी (prologue) गाणारा.

भिक्षुसूत्रें— पाराशर्य आणि कर्मन्द हे भिक्षुसूत्रांचे प्रणेते होत. हीं सूत्रें पण आज उपलब्ध नाहींत. वेबरच्या मतें हीं सूत्रें बुद्धपूर्व आहेत. 'भिक्षु' शब्द बुद्धपूर्व वैदिक वाङ्मयांत आहे. पाराशर्य-सूत्रें म्हणजेच वेदान्तसूत्रें. पंचशिख नांवाचा भिक्षु हा पराशर गोत्राचा असल्यानें (शांतिपर्व ३२०–२४) पाराशर्य-सूत्रें म्हणजेच सांख्य-सूत्रें असण्याचाहि संभव आहे. हीं सूत्रें जाणणारांना किंवा यांचें अध्ययन करणाऱ्यांना 'पाराशरिणो भिक्षवः' किंवा 'कार्मन्दिनो भिक्षवः' असे त्या ग्रंथकारांच्या नांवावरून शब्द तयार होतात. संन्यासदीक्षा घेतलेल्या भिक्षूंच्या आचारा-संबंधीं नियम घालून देणारीं कांहीं सूत्रें असलीं पाहिजेत. त्यांनाच भिक्षुसूत्रें कदाचित् म्हणत असावेत. जैन आचारांगसूत्र व बौद्ध विनय-पिटक हे ग्रंथ याच भिक्षुसूत्रांवर आधारलेले असावेत असें प्रो. का. वा. अभ्यंकर यांचें अनुमान आहे.

ज्योतिष—फलज्योतिष व वेदाङ्गज्योतिष (Astrology and Astronomy)—पाणिनीच्या सूत्रांत 'उक्थादि' गणांत ज्योतिष शब्द आहे.[४४] त्याचप्रमाणें 'ऋगयनादि' गणांत ज्योतिषशास्त्रांतील अनेक शब्द आहेत.[४५] त्यावरून केवळ ज्योतिषशास्त्रच नव्हे तर इतर अनेक शास्त्रें त्या वेळीं होतीं हें सिद्ध होतें. 'उक्थादि' गणांत उक्थ, लोकायत, न्याय, न्यास, निरुक्त, निमित्त, **ज्योतिष**, अनुपद, अनुकल्प, यज्ञ, संहिता, पदक्रम, क्रमेतर, वृत्ति, परिषद्, आयुर्वेद इत्यादि शब्द आहेत, तर 'ऋगयनादि' गणांत व्याकरण, निगम, वास्तुविद्या, क्षत्रविद्या, अङ्गविद्या, उत्पात, उत्पाद, संवत्सर, मुहूर्त, उपनिषद्, **निमित्त** इत्यादि शब्द

४३. 'दिवाविभानिशा.........नान्दी.........'। ३।२।२१.
४४. कतूक्थादिसूत्रान्ताट्ठक्। ४।२।६०.
४५. अणृगयनादिभ्यः। ४।३।७३.

आहेत. यांतील जाड ठशांतील शब्द ज्योतिषशास्त्रांतील असून ते पाणिनीच्या सूत्रांतही सांपडतात.

फलज्योतिष बरेंच प्रगत झालेलें दिसतें. त्यावरून लोकांच्या समजुती दिसून येतात. शरीरावर असलेल्या खुणांवरून किंवा लक्षणांवरून शुभाशुभसूचक गोष्टी वर्तविणें (Divination from bodily signs) वगैरे. उदाहरणार्थ, पुरुषाच्या शरीरावर विशिष्ट ठिकाणीं तीळ असल्यास तो पत्नीला घातक असतो.[४६] उलट स्त्रीच्या तळहातावर विशिष्ट रेषा असल्यास ती पतीला मारक होते. तसेंच ज्योतिषाला प्रश्न विचारून शुभाशुभ पाहणें (Fortune-telling by sooth-sayers). ज्याच्याबद्दल प्रश्न विचारावयाचा तो शब्द चतुर्थींत ठेवावयाचा असा व्याकरणाचा नियम. उदाहरणार्थ, यशोदा गर्गमुनीला कृष्णाबद्दल शुभाशुभ विचारते[४७]. अजूनही माता आपल्या मुलाबद्दल दारावरच्या ज्योतिषाला शुभाशुभ विचारतात. ही चाल पाणिनीच्या वेळींही होती असें दिसतें. त्याचप्रमाणें डावा किंवा उजवा डोळा लवत असल्यास त्याप्रमाणें शुभाशुभसूचकता त्याही वेळीं समजली जात असे.[४८]

वेदाङ्गज्योतिषांत गणित-ज्योतिषाबद्दलचे (Astronomy) विचार पाणिनीला माहीत होते. राशींचें ज्ञान नव्हतें. त्याचप्रमाणें सूर्याच्या अयनबिंदूच्या चलनाचेंही नव्हतें. पण नक्षत्रें, चंद्राची गति, चंद्र आणि नक्षत्रें यांची युति वगैरे माहिती पाणिनीला होती व त्यावरून त्याचा काल ठरविण्यास मदत होते, हें 'पाणिनीचा काल' या पहिल्या प्रकरणांत स्पष्ट केलें आहे.

---

४६. अमनुष्यकर्तृके च। ३।२।५३; लक्षणे जायापत्योष्टक्। ३।२।५२. हन्तेष्टक् स्यादमनुष्यलक्षणे कर्तृकवति। जायाघ्नस्तिलकारकः। पतिघ्नी पाणिरेखा। (सि. कौ.)

४७. राधीक्ष्योर्यस्य विप्रश्नः। १।४।३९. कृष्णाय राध्यति। पृष्टो गर्गः कृष्णस्य शुभाशुभं पर्यालोचयति। (सि. कौ.)

४८. तस्य निमित्तं संयोगोत्पातौ। ५।१।३८. शतिकः धनपतिसंयोगः। शतिकं दक्षिणाक्षिस्पन्दनम्।

तत्त्वज्ञान— पाणिनिपूर्व कालांत तत्त्वज्ञानविषयक बरेंच वाङ्मय अस्तित्वांत असलें पाहिजे. आस्तिक, नास्तिक आणि दैष्टिक असें तत्त्वज्ञान्यांचे प्रकार असत. परलोकांवर विश्वास ठेवणारे ते 'आस्तिक', न ठेवणारे ते 'नास्तिक' (लोकायतिक) व दैवावर विश्वास ठेवणारे ते 'दैष्टिक' समजले जात.[४९] 'मस्करी गोशाल' याचे अनुयायी दैष्टिक असत. 'न्याय' शब्द तीन वेळां सूत्रांतून आला आहे, परंतु तो न्यायदर्शन या अर्थीं आला नसून न्याय-अन्याय या अर्थीं आला आहे. 'मीमांसा' शब्द 'क्रमादि' गणांत आला आहे.[५०]

कांहीं ग्रंथांचीं पारायणें होत असलीं पाहिजेत. 'पारायणतुरायणचांद्रायणं वर्तयति'। ५।१।७२. यांत 'पारायण' शब्द आला आहे. पदपाठ म्हणणाऱ्यांना 'पदक' व क्रमपाठ म्हणणाऱ्यांना 'क्रमक' म्हणत.[५०]

उपनिषदें— पाणिनीच्या सूत्रांत जरी हा शब्द आलेला नाहीं तरी 'ऋगयनादि' गणांत आला आहे हें वर दिलेंच आहे. तरी पण एका सूत्रांत उपनिषद् शब्द वेगळ्या अर्थानें आला आहे. (जीविकोपनिषदावौपम्ये। १।४।७९) उपनिषद् शब्दाचा अर्थ या ठिकाणीं 'गुप्त' (Secret) असा आहे.

लीबिशच्या (Liebich) मतें ऐतरेयब्राह्मण व बृहदारण्यकोपनिषद् हीं पाणिनिपूर्व आहेत.[५१] उपनिषदें म्हणजे (Esoteric religious texts) 'गुप्त अध्यात्मविद्या' असें म्हणतां येईल.

'कल्प' म्हणजे श्रौतसूत्रें व धर्मसूत्रें. पाणिनीच्या 'पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु'। ४।३।१०५ यांत 'कल्प' शब्द आला आहे. काश्यप आणि कौशिक या दोन ऋषींचे पाणिनि कल्पकर्ते म्हणून उल्लेख करतो.[५२]

---

४९. अस्ति नास्ति दिष्टं मतिः। ४।४।६०.

५०. क्रमादिभ्यो वुन्। ४।२।६१.

५१. "On the basis of linguistic evidence, not only the ऐतरेयब्राह्मण but also बृहदारण्यकोपनिषद् are older than Panini." (Panini, page 37).

५२. काश्यपकौशिकाभ्यामृषिभ्यां णिनिः। ४।३।१०३.

तात्पर्य, वरील विवेचनावरून प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें असें दिसून येईल कीं, पाणिनि पवित्र दर्भासनावर बसून पूर्वेकडे मुख करून जेव्हां अष्टाध्यायी हा व्याकरणग्रंथ रचण्यास बसला, तेव्हां त्याच्या डोळ्यांसमोर त्या वेळचें फार मोठें वैदिक वाङ्मय (संहिता, ब्राह्मण, श्रौतसूत्रें, धर्मसूत्रें, अनुब्राह्मणें, आरण्यकें) तर होतेंच, पण त्या शिवाय भिक्षुसूत्रें, नटसूत्रें, आख्यानें, काव्य, लोकगीतें व लौकिक भाषेंतील शब्दप्रयोग हें सर्व होतें. त्याशिवाय का त्यानें जवळजवळ चार हजारें सूत्रें रचून हजारों शब्द साधले? तद्धित प्रत्यय व कृत् प्रत्यय सांगून नामापासून व धातूपासून शब्द साधले, तर सुबन्तें आणि आख्यातें यांसाठींही निराळीं सूत्रें रचिलीं. नामापासून नामधातु तयार करून त्यांची दशलकारात्मकरूपें साधून भाषासमृद्धि केली, इतकेंच नव्हे तर तिचें व्याकरण बनवून तिला स्थायी स्वरूप दिलें. जगांतील अनेक आश्चर्यांपैकीं पाणिनीचें व्याकरण एक आहे यांत शंका नाहीं !

५. पाणिनिकालीन शिक्षण व शिक्षणपद्धति

' महाराष्ट्र-समाजजीवन ' नांवाचा प्रा. सरदार संपादित ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला. त्यांत इ. स. १००० पासून अद्ययावत् शिक्षणाची सर्वांगीण माहिती मिळते. त्यांतल्या त्यांत इ. स. १००० ते १८१८ म्हणजे पेशवाईच्या अंतापर्यंत मध्ययुगीन शिक्षणाची सविस्तर माहिती प्रस्तुत लेखकानें त्यांत दिली आहे. पण इ. स. पूर्व ५०० ते इ. स. १००० या पंधराशें वर्षांत शिक्षणपद्धति काय होती, शिक्षणाचे विषय काय होते, गुरुशिष्यांचे संबंध कसे होते याचा मागोवा घेतल्यास पाणिनीच्या अष्टाध्यायी ग्रंथांत त्याचे स्पष्ट निर्देश दिसतात. भारतीय शिक्षणपद्धतीचा पूर्वकालीन सांस्कृतिक इतिहास लिहावयाचा झाल्यास या ग्रंथाची अवश्य दखल घेतली पाहिजे.

पाणिनिकालीन स्त्रीशिक्षण—पाणिनि आणि त्याच्या ग्रंथावर भाष्य लिहिणारा पतंजलि हे दोघेही त्या कालीं स्त्रियांच्या वेदाध्ययनाचा उल्लेख करतात. पाणिनि सूत्र ४।१।६३ मध्यें ' जाति ' शब्द वापरतो व जाति शब्दानें गोत्र आणि चरण किंवा शाखा यांचा बोध होतो.[1] म्हणजे वेदाच्या कठ शाखेचें अध्ययन करणारी स्त्री ' कठी, ' त्याचप्रमाणें बह्वृच शाखेचें अध्ययन करणारी ती ' बह्वृची ' अशीं उदाहरणें दिलीं आहेत. स्त्रिया वेदाध्ययन करीत असत तेव्हां व्याकरण वगैरे वेदाङ्गांचेंही करीत हें ओघानेंच आलें. उदाहरणार्थ, आपिशलाच्या व्याकरणाचें अध्ययन करणाऱ्या स्त्रीस ' आपिशला ' म्हणत. पाणिनीनें हे शब्दप्रयोग साधण्यासाठीं सूत्रें दिलीं आहेत. ' पाणिनीया ब्राह्मणी ' म्हणजे पाणिनीचें व्याकरण शिकणारी ब्राह्मण स्त्री. ' काशकृत्स्नी ' म्हणजे काशकृत्स्नाचा मीमांसा ग्रंथ शिकणारी स्त्री. यावरून वेद आणि व्याकरण याप्रमाणें

---

१. जातेरस्त्रीविषयादयोपधात् । ४।१।६३
जातिशब्दाची व्याख्या—" आकृतिग्रहणा जातिः लिङ्गानां च न सर्वभाक्। सकृदाख्यातनिर्ग्राह्या **गोत्रं च चरणैः सह** ॥ " भाष्य २।२२५

स्त्रिया मीमांसा विषयही शिकत असत. स्त्रियांसाठीं वेगळीं वसतिगृहें असत हें 'छात्रिशाला' या शब्दावरून स्पष्ट होतें.[2] स्त्री विद्यार्थिनीला 'छात्रि' म्हणत. स्त्रिया आचार्यांचें म्हणजे प्राध्यापकाचें काम करीत असत. जी केवळ आचार्यांची पत्नी असे तिला 'आचार्यांनी' म्हणत,[3] जसें सध्यां स्वतः डॉक्टर नसतांना केवळ डॉक्टराची पत्नी म्हणून त्या स्त्रीला 'डॉक्टरीण' असें म्हणतात त्याप्रमाणें. पण स्वतः अध्यापन करणाऱ्या स्त्रीस 'आचार्या' (या स्वयमध्यापयति) म्हणावें असा पाणिनीनें भेद दाखविला आहे. जी स्त्री स्वतः डॉक्टर आहे तिला 'डॉक्टरीण' न म्हणतां 'डॉक्टर'च म्हणावें लागतें. इंग्रजींत डॉक्टर याचें स्त्रीलिंगी रूप नाहीं. स्वतः डॉक्टर असलेल्या स्त्रीस 'डॉक्टरीण' असें म्हटलें तर त्यांत तिचा अपमान आहे. आतां स्वतः डॉक्टर असून पतीही डॉक्टर असला तर गोष्ट वेगळी. या दृष्टीनें स्त्री-मुख्याध्यापिकेला 'प्राचार्या' म्हणण्याची रूढी पाडली पाहिजे.

एखाद्या वेदशाखेंत स्त्रिया निष्णात असल्या तर त्यांच्या नांवापुढें 'वृन्दारिका' शब्द लावीत. उदाहरणार्थ, कठशाखेचें अध्ययन करणारी स्त्री असून ती जर पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाली तर तिला 'कठ-वृंदारिका' म्हणत, आणि सामान्य मुलगी असली तर नुसतें 'माणविका' म्हणत.[4] 'पूज्यमाना कठी' किंवा 'कठमानिनी' (कठशाखेंत निष्णात असल्याबद्दल अभिमान बाळगणारी).

वर दिलेल्या माहितीवरून पाणिनिकालीन स्त्रिया पुरुषाइतक्याच सुशिक्षित होत्या. त्यांचें मौंजीबंधनही होऊन त्यांना सार्थ वेदपठनाचा

---

२. छात्र्यादयः शालायाम्। ६।२।८६

३. इंद्रवरुणभवशर्व......। ४।१।४९
पुंयोग इत्येव। अन्यथा या स्वयं व्याख्यात्री सा 'आचार्या' एव। (सि. कौ.)

४. वृन्दारकनागकुंजरैः पूज्यमानम्। २।१।६२ 'पूज्यमाना कठी' (with special distinction)

अधिकार असे. पुढें स्मृतिकालांत रजोदर्शनानंतर वेदपठनावर बंदी घालण्यांत आली. त्यामुळें त्यांचें शिक्षण बंद पडलें. अलीकडच्या काळांत सुद्धां कै. राजारामशास्त्री भागवतांनीं आपल्या मुलीचा व्रतबंध केल्याचें ऐकिवांत आहे.

वेदपाठशाळा—वेदाच्या प्रत्येक शाखेचें अध्यापन करणाऱ्या पाठशाला असून त्यांना ' चरण ' नांव असे. ' चरण ' शब्दाचा दुसरा अर्थ शाखा.[५] त्या त्या शाखेचे विद्यार्थी त्या त्या पाठशालांतून शिक्षण घेत. या पाठशालांना त्या त्या शाखाप्रवर्तकांचीं नांवें असत. या पाठशालांतून त्या त्या शाखेच्या ज्ञानाचा विस्तार झाला. पहिल्यानें संहिता, नंतर त्या शाखेचे ' ब्राह्मण '. यांत यज्ञासंबंधीं सर्व विधि, तत्त्वज्ञान, धर्म, त्याचप्रमाणें कल्प किंवा श्रौतसूत्रें यांची प्रगति झाली. आरण्यकें व उपनिषदें यांचाही यांत अंतर्भाव झाला.[६] हीं सर्व पाणिनीपूर्वी अस्तित्वांत होतीं. पुढें पुढें धर्मशास्त्राचाही प्रवेश झाला.[७] म्हणजे हा सर्व ज्ञानविस्तार मूळ शाखेला धरून होत होता. पण पुढें पुढें या शाखांचा ज्ञानाच्या दृष्टीनें अधिक विस्तार होऊन तो शाखेच्या बाहेरही होऊं लागला व शाखाभेद नसल्यानें तो सर्व शाखांना उपयुक्त झाला. उदाहरणार्थ, यास्काचें निरुक्त घ्या किंवा पाणिनीचें व्याकरण घ्या. हीं शास्त्रें एखाद्या विशिष्ट शाखेला उद्देशून झालीं नाहींत. पतंजलि अशा शास्त्रांना ' सर्ववेदपारिषदं हीदं शास्त्रम् ' २–१५८ असें म्हणतो, म्हणजे सर्व वेदांना उपयुक्त हीं शास्त्रें असून एखाद्या विशिष्ट शाखेसाठीं नव्हत.

चरणसंस्थांचें कार्य—पाणिनीच्या सूत्रांतून या संस्थांच्या कार्यांची माहिती मिळते. उदाहरणार्थ, वेदशाखेचें नांव 'कठ' असल्यास मग

---

५. चरणशब्दः शाखानिमित्तकः पुरुषेषु वर्तते । काशिका–' अनुवादे चरणानाम् ' । २।४।३ या सूत्रावर.

६. छन्दो ब्राह्मणानि च तद्विषयाणि । ४।२।६६ । पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु । ४।३।१०५.

७. चरणेभ्यो धर्मवत् । ४।२।४६

तेथें अध्ययन करणाऱ्यास किंवा ती शाखा शिकणाऱ्यास मूळ संस्थापक जो कठ ऋषि त्याच नांवानें ओळखीत. उदाहरणार्थ, 'कठेन प्रोक्त-मधीयते कठाः' कठ ऋषीनें 'प्रोक्त' असलेलें जे अध्ययन करतात तेही 'कठ'च. त्याचप्रमाणें तित्तिरीचे अनुयायी ते 'तैत्तिरीय.'[८] आपल्या-कडेही फर्ग्युसन् कॉलेजांत अध्ययन करणारे ते 'फर्ग्युसोनियन्स' वगैरे नांवानें ओळखले जातात. तैत्तिरीय म्हणजे तित्तिरीच्या शाखेचे अध्ययन करणारे (Students of तैत्तिरीय शाखा). त्यांची पाठशाला वेगळी असे तर कठांची त्यांच्यापुरती असे. आजही वेदपाठशाला असल्या तरी ऋग्वेदी, शुक्लयजुर्वेदी, कृष्णयजुर्वेदांतील हिरण्यकेशी, आपस्तंब वगैरेंसाठीं निर-निराळ्या वेदपाठशाला आहेत. एके ठिकाणीं या सर्वांचें अध्ययन होत असलें तरी गुरुजी त्या त्या शाखेचे असतात.

या शाखा-पाठशाला एका ठिकाणींच नसत; त्यांचा प्रसार सर्वत्र असे. एकेका ठिकाणीं अनेक शाखा-पाठशाला असून त्यांचा उदय व अस्तही होत असे.[९] कांहीं शाखांची पठनपद्धति सारखीच असे.[१०] याला संस्कृतांत 'अनुवाद' म्हणतात. अनुवाद म्हणजे 'Literary Collaboration'.

कठ-शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांना 'काठक' म्हणत (कठानां समूहः काठकम्). पाठशालेंत प्रवेश करतांना (admission or enrolment) कांहीं विधि असे. पाणिनिसूत्र 'वर्णाद्ब्रह्मचारिणि' ५।२।१३४ वरून 'कठत्वं प्राप्तः' म्हणजे कठशाखेंत प्रविष्ट झाला असें म्हणण्यांत येत असे. 'काठक' म्हणजे A Corporation of कठ scholars. सहाध्यायींना 'सब्रह्मचारी' म्हणत.[११]

---

८. तित्तिरिवरतन्तुखण्डिकोखाच्छण्। ४।३।१०२

९. ग्रामे ग्रामे काठकं कालापं च प्रोच्यते। 'तेन प्रोक्तम्'। ४।३।१०१ वरील भाष्य पहा. '**उद्गात्** कठकालापम्'। '**प्रत्यस्थात्** कठकौथुकम्'। (सि. का.) उदय झाला व विस्तार झाला.

१०. अनुवादते कठः कालापस्य। यथा कलापोऽधीयानो वदति तथा कठः। (काशिका)

११. चरणे ब्रह्मचारिणि। ६।३।८६.

स्त्रिया असतील तर 'सब्रह्मचारिणी' म्हणत. विद्यार्थी आपापल्या शाखांचा–पाठशालांचा–अभिमान बाळगीत. उदाहरणार्थ, काठिकया श्लाघते। (कठ असल्याचा अभिमान बाळगतो). क्वचित् त्या नांवाचा दुरुपयोगही होत असे. उदा० काठिकया अत्याकुरुते। (कठ असल्याचा गर्व वाहतो) (पाणिनिसूत्र– 'गोत्रचरणाच्छ्लाघात्याकारतदवेतेषु'। ५।१।१३४ पहा.)

या सर्व संस्था सांस्कृतिक कार्य करीत होत्या. संहिता, ब्राह्मण, आरण्यकें, उपनिषदें, श्रौत आणि धर्मसूत्रें वगैरेचें अध्यापन. निरुक्त, व्याकरण व प्रातिशाख्य सर्व शाखांना मिळून एकच असे. पहिल्यानें प्रत्येक शाखेचें प्रातिशाख्य निराळें असलें पाहिजे. पुढें तीं सर्व लुप्त झालीं. 'वृक्षादीनां शाखेवास्य वेदकल्परूहोऽवयवाः शाखाः'। शाखादिभ्यो यः। ५।३।१०३ यानें 'शाख्य' शब्द झाला. प्रत्येक 'शाख्य' तें 'प्रतिशाख्य' आणि त्याला उद्देशून रचलेलें तें 'प्रातिशाख्य' अशी 'प्रातिशाख्य' शब्दाची व्युत्पत्ति आहे.

या वेदपाठशाला अथवा 'चरण' स्वयंपूर्ण संस्था होत्या. त्यांना संघाचें स्वरूप होतें. 'शाकलाः' म्हणजे शाकल शाखेचे अनुयायी किंवा शाकलसंघ. 'वेदपारायण' म्हणजे अर्थाशिवाय केवळ संहितेचें पठन. वेदांचें पठन करून येणाऱ्याला 'श्रोत्रिय' संज्ञा होती.[१२] पारायण करणाऱ्याला 'पारायणिक' संज्ञा होती.[१३] स्मृति चांगली असल्यानें विशेष मेहेनतीशिवाय पारायण करणाऱ्यांस 'अधीयन् पारायणम्' म्हणत.[१४]

१२. श्रोत्रियंश्छन्दोऽधीते। ५।२।८४.

१३. पारायणतुरायणचांद्रायणं वर्तयति। ५।१।७२.
पारायणं वर्तयति पारायणिकः। (सि. कौ.)

१४. इङ्धार्योः शत्रकृच्छ्रिणि। ३।२।१३०. अकृच्छ्र–विनाश्रम.

तात्पर्य, अष्टाध्यायी ग्रंथापासून वर दिलेली माहिती तर मिळतेच, पण याशिवाय एतद्विषयक आणखीही बराच प्रकाश पडतो. तो आतां पाहूं.[१५]

प्राचीन शिक्षणपद्धतीचा पाया ब्रह्मचर्य होता (तदस्य ब्रह्मचर्यम् । ५।१।९४). अध्ययनापेक्षांही आचरणावर अधिक भर असे. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे गुरु-शिष्यांचा घनिष्ठ संबंध. हा केवळ व्यावहारिक नसून आध्यात्मिक (spiritual) होता. शिष्य हा खऱ्या अर्थानें 'अन्तेवासी' होता. म्हणजे तो गुरूच्या सांनिध्यांत राहत असे. त्याला 'छात्र'ही म्हणत. गुरूच्या दोषांवर आवरण घालून त्याचे गुण घेणारा (गुरोर्दोषान् छादयति सः छात्रः किंवा छत्रं शीलमस्य) किंवा गुरूचें सन्निध राहून त्याचें रक्षण करण्याचें ज्याचें ब्रीद आहे असा.

शिष्यांचे दोन प्रकार असत. एक 'दण्डमाणव' आणि दुसरा 'अन्तेवासी.'[१६] दण्डमाणव किंवा माणव हा वयानें फार लहान असून त्याच्या हातीं पळसाचा दंड असावयाचा म्हणूनच त्याला दण्डमाणव संज्ञा होती. तत्त्वबोधिनीकाराच्या मतें त्याचें उपनयन झालेलें नसे. वेदाध्ययनासाठीं तो अपात्र असे. अशा विद्यार्थिसंघाला 'माणव्य' म्हणत. आपल्याकडे जशी बिगर इयत्तेंत लहान मुलें असतात त्याप्रमाणें. पुढें 'आचार्यकरण' विधि होऊन तीं आचार्याच्या ताब्यांत गेलीं म्हणजे 'अंतेवासी' होत. हे अन्तेवासी शिष्य ब्रह्मचर्यव्रतानें गुरुसंनिध राहत. त्यांनीं परिधान केलेलें वस्त्र विशिष्ट प्रकारचें असून (uniform) मृगाजिन व कमंडलु हीं त्यांचीं वैशिष्ट्यें होतीं. चांगल्या कुलांतील

१५. " The अष्टाध्यायी throws valuable light on the evolution of different literary forms and types of compositions, educational institutions, students and teachers, methods of instruction, subjects of study and works then known – a fact of great importance for the literary history of ancient India. "

'India as known to Panini,' page 280.

१६. न दण्डमाणवान्तेवासिषु । ४।३।१३०.

गृहस्थाश्रमी लोकांजवळून त्यांना अन्न मिळत असे. अशा विद्यार्थ्यांचे सोबती ' सब्रह्मचारी ' म्हटले जात हें मागें सांगितलेंच आहे.

गुरूला 'अनूचान' म्हणजे विषय स्पष्ट करून सांगणारा व 'प्रवचनीय' म्हणजे मुखानें विद्यादान करणारा अशाही संज्ञा असत. कित्येक वेळां पिताच आचार्याचें काम करी. गुरूच्या पुत्राला गुरूइतकाच मान द्यावयाचा असे.[१७]

गुरूंचे चार प्रकार असत. (१) आचार्य, (२) प्रवक्ता, (३) श्रोत्रिय आणि (४) अध्यापक. (पा. सू. ' पोटायुवति........... ' २-१-६५). यांत आचार्य हा सर्वांत श्रेष्ठ समजला जात असे. उदा० आचार्य पाणिनि. सर्व विद्यार्थी आचार्यांच्याच नांवानें ओळखले जात. उदा० ' पाणिनीय. ' ' प्रवक्ता ' हा आचार्यांच्या मार्गदर्शनाखालीं अध्यापनकार्य करी. त्याचें काम परंपरागत शास्त्रें किंवा ' प्रोक्त ' वाङ्मय पढविण्याचें असे. प्रवक्त्याच्या खालचा वर्ग म्हणजे श्रोत्रिय. त्याचें काम म्हणजे वेद, संहिता, पद, क्रम वगैरे विद्यार्थ्यांकडून शुद्ध शब्दोच्चारासकट पाठ करवून घेणें. अशांना ' पदक ' किंवा ' क्रमक ' म्हणत. चौथा वर्ग अध्यापकांचा. यांचें काम म्हणजे व्यावहारिक शास्त्रांचें ज्ञान देणें. यालाच पुढें महाभाष्यकार पतंजलि ' उपाध्याय ' म्हणतो.

त्याही कालांत शिस्तीनें न वागणारे विद्यार्थी असतच. त्यांना ' तीर्थध्वांक्ष ' किंवा ' तीर्थकाक '[१८] अशी कमीपणा दाखविणारी संज्ञा असे. तीर्थावरचे कावळे जसे पिंड भक्षणासाठीं टपलेले असतात, त्या-प्रमाणें, किंवा जो वारंवार आपला गुरु बदलतो तो. ' खट्वारूढ ' ही निंदाव्यंजक संज्ञा त्याला लावण्यांत येई. पलंगावर निजून अध्ययन करणारा असा त्याचा अर्थ आहे. चांगल्या शिष्याचें हें काम नव्हे. अलीकडील कांहीं विद्यार्थ्यांप्रमाणें फुकट भोजनास मिळते (Free

१७. गुरुवद् गुरुपुत्रः इति यथा। कात्यायन.

१८. ' यो गुरुकुलानि गत्वा न चिरं तिष्ठति स उच्यते तीर्थकाक इति।
भाष्य १।२९१.

boarding) म्हणून पाठशालेंत जाणाऱ्यांचाही वर्ग असे. अशांना 'भिक्षामाणव' म्हणत.[१९] वाल्मीकि रामायणांत (अयोध्याकांड ३२-१८) कठ आणि कालाप पाठशालेंतील अशा विद्यार्थ्यांचा उल्लेख आहे. अशा लबाड प्रौढ विद्यार्थ्यांचींही उदाहरणें पतंजलीनें दिलीं आहेत. 'कम्बल-चारायणीयाः' म्हणजे पाठशालेंत प्रवेश केला असतां कांबळा मिळतो म्हणून जाणारे! किंवा 'ओदनपाणिनीयाः' अथवा 'घृतरौढीयाः' (भाष्य १-१९०) म्हणजे भात मिळतो म्हणून 'पाणिनीय' पाठशालेंत किंवा घृत मिळतें म्हणून 'रौढीच्या' शालेंत जाणारे उडाणटप्पू विद्यार्थी! यापेक्षांही अलीकडल्या कालाला शोभणारें काशिकाकारानें दिलेलें उदाहरण 'कुमारीदाक्षाः' हें होय. दक्षाच्या शाळेंत कुमारींशीं सहज संबंध ठेवतां येतो म्हणून प्रवेश करणारे! टिळकविद्यापीठांत विद्यार्थ्यांच्या भोजनाचीही सोय केली जात असे. पण असे भोजनभाऊ विद्येच्या नांवानें पूज्य असत म्हणून चालकांनीं पुढें हें भोजनालय (Boarding House) बंद केलें!

विद्यार्थ्यांचें नामकरण—विद्यार्थ्यांना ते शिकत असलेल्या विषयावरून किंवा त्यांच्या गुरूवरून किंवा ते शिकत असलेल्या चरण किंवा शाखा-नांवावरून नांवें दिलीं जात.[२०] उदाहरणार्थ, याज्ञिक, वैयाकरण, 'अग्निष्टोमिक' किंवा 'वाजपेयिक' हीं नांवें यज्ञ, व्याकरण या विषयांवरून व अग्निष्टोम व वाजपेय या यज्ञांवरून पडलीं हें उघड आहे. त्याचप्रमाणें अनुब्राह्मण-वाङ्मयांत निष्णात असलेल्याला 'अनुब्राह्मणी' नांव असे. वेगवेगळ्या ऋतूंत वेगवेगळ्या ग्रंथांचें अध्ययन होत असे (जसें

---

१९. 'भिक्षां लप्स्येऽहमिति माणवो (शिष्यो) भवति'। काशिका.

२०. छन्दोगौक्थिकयाज्ञिकबह्वृचनटाञ्ञ्यः। ४।३।१२९.
वैयाकरणाख्यायां चतुर्थ्याः। ६।३।७.
ऋतूक्थादिसूत्रान्ताट्ठक्। ४।२।६०.
क्रमादिभ्यो वुन्। ४।२।६१. अनुब्राह्मणादिनिः। ४।२।६२.
वसन्तादिभ्यष्ठक्। ४।२।६३. बसन्तादि गणांत इतर ऋतूंचीं नांवें आहेत.

Spring courses) त्यावरूनही नांव पडे. उदाहरणार्थ,–'वसन्तसहचरितोऽयम् ग्रन्थो वासन्तः । तमधीते वासन्तिकः।' स्मृतीवरून असें समजतें कीं, वसंतऋतूंत पाठशालांची सुरुवात माघ महिन्यांत वसंतपंचमीला होत असे व त्या वेळीं वेदपठनाच्या ऐवजीं वेदांगांचें पठन होत असे (मनु ४।९८). वसंताप्रमाणेंच वर्षा, शरद्, हेमंत आणि शिशिर याही ऋतूंमध्यें लहानसहान अभ्यासक्रम (Short-term courses) असत. त्यावरून 'वासन्तिक'प्रमाणेंच वार्षिक, शारदिक, हैमन्तिक आणि शैशिरिक अशीं नांवें असत. शाखाप्रमाणें 'कठाः' हे 'कठ' शाखेच्या विद्यार्थ्यांना नांव असे. कठऋषीनें रचलेली कठ संहिता व ते शिकणारेही 'कठ' या संज्ञेला पात्र होत हें मागें दाखविलेंच आहे.

पाठशालेंतील अध्ययनाच्या दिवसांना (working days of the school) 'अध्याय' ही संज्ञा असे. अर्थात् सुटी असल्यास 'अनध्याय' असे.[२१] गृह्यसूत्रांतून व स्मृतींतून अनध्ययनाचे दिवस सांगितले आहेत. पाणिनीनेंही 'अध्यायिन्यदेशकालात्'। ४।४।७१ या सूत्रांत याविषयीं चर्चा केली आहे. भलत्याच जागीं व भलत्याच वेळीं अध्ययन करणाऱ्यांचीं उदाहरणें दिलीं आहेत. उदाहरणार्थ, स्मशानांत किंवा चव्हाट्यावर अध्ययन करणाऱ्यांना 'स्माशानिक' किंवा 'चातुष्पथिक' असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें 'चातुर्दशिक' किंवा 'आमावास्यिक' म्हणजे चतुर्दशी व अमावास्या या दिवशीं अभ्यास करणाऱ्यांच्या या संज्ञा आहेत. खरें पाहिलें असतां हे अनध्यायाचे दिवस आहेत. कारण दर्शपूर्णमास वगैरे धार्मिक विधींचे हे दिवस आहेत. अध्ययनासाठीं देशकाल लक्षांत घेणें आवश्यक आहे हें यावरून दिसतें.

एकाच पाठशालेंत असलेल्या विद्यार्थ्यांना 'सब्रह्मचारी' ही संज्ञा असे हें मागें अनेक वेळां आलेंच आहे. त्याचप्रमाणें एकाच गुरूपाशीं शिकणाऱ्यांना 'सतीर्थ्य' किंवा 'समानोपाध्याय' अथवा 'एकगुरुक'

---

२१. अध्यायन्यायोद्यावसंहाराश्च । ३।३।१२२.

म्हणत.[२२] वेगळेवेगळे विषय शिकणारांचे गट असत. कांहीं वेळेला दोन्ही गट एकत्र जमत.[२३] वेदांचीं पदें शिकणारे 'पदक' व क्रमपाठ घेणारे 'क्रमक'; पण दोघे एकत्र आले तर 'पदक-क्रमक' असें म्हणत. पतंजलीच्या भाष्यावरून असें दिसतें कीं, वेदाध्ययनानंतरच वेदांगांचें-व्याकरण वगैरे शास्त्रांचें–अध्ययन होत असे. त्या शास्त्रांचेही भाग वयोमानाप्रमाणें व बुद्धीच्या ग्रहणशक्तीप्रमाणें ठरविले जात. ग्रंथपठन पूर्ण झाल्यावर तसें वचन घालून स्पष्ट करीत. उदा० 'साग्नि अधीते' म्हणजे शतपथ ब्राह्मणाचे ५ ते ९ अध्याय ज्यांत 'अग्निविधि' (Fire ritual) सांगितला आहे तोंपावेतों अध्ययन करतो. त्याचप्रमाणें 'सेष्टि पशुबंधमधीते.' एखाद्या विषयाची पूर्णता झाली म्हणजे 'वृत्त' म्हणत.[२४] उदा० 'वृत्तं पारायणं देवदत्तेन' देवदत्तानें पारायण संपविलें. अध्ययनाच्या पूर्ततेला 'समापन' ही संज्ञा असे.[२५]

शिक्षणशास्त्रांतील कांहीं संज्ञा—एखाद्या विषयाचें विवेचन किंवा स्पष्टीकरण करणाऱ्या गुरूस 'आख्याता' म्हणत, तर नियमपूर्वक धार्मिक शिक्षणाला 'उपयोग' नांव असे;[२६] व्यावहारिक (Secular) शिक्षण या संज्ञेला पात्र नसे. स्वाध्यायाचें धार्मिक शिक्षण देणाऱ्यास 'प्रवचनीय' म्हणत (पा. सू. 'भव्यगेयप्रवचनीय···' ३।४।६८ प्रवचनीयो गुरुः स्वाध्यायस्य) वेदांगांचें शिक्षण देणाऱ्यास 'अनूचान' संज्ञा होती.[२७] दुसऱ्या एका सूत्रांत २।१।६५ 'प्रवक्ता' ही संज्ञा सांपडते. 'प्रवचनीय' आणि 'प्रवक्ता' यांत फारसा फरक नाहीं.

---

२२. चरणे ब्रह्मचारिणि। ६।३।८६; समानतीर्थेवासी। ४।४।१०७; तीर्थे ये। ६।३।८७.

२३. अध्ययनतोऽविप्रकृष्टाख्यानाम्। २।४।५.

२४. णेरध्ययने वृत्तम्। ७।२।२६.

२५. समापनात्सपूर्वपदात्। ५।१।११२.

२६. 'नियमपूर्वकं विद्याग्रहणमुपयोगः'। 'आख्यातोपयोगे'। १।४।२९ वर काशिका.

२७. उपेयिवाननाश्वाननूचानश्च। ३।२।१०९.

गुरूजवळ अध्ययन करतांना जी पूर्वतयारी लागते तिला 'अनुप्रवचनीय' म्हणत.[२८] एखाद्या गुरूकडे जाऊन त्याला प्रार्थना करावयाची कीं कृपा करून माझ्या मुलाला शिकवा; अशा गुरूला 'अधीष्ट' म्हणतात.[२९] शिक्षणाच्या कालावरूनही शिक्षकाला नांव पडत असे; जसें 'मासिकोऽध्यापकः' (महिनाभर शिकविणारा[30]). एकापेक्षां एक शिकण्यास कठीण असे विषय असत. उदाहरणार्थ, 'कष्टः अग्निः' अग्निविषयक तंत्र शिकण्यास कठीण, 'कष्टं व्याकरणम्' त्याचप्रमाणें व्याकरण; 'ततोऽपि कष्टतराणि सामानि' पण त्याहीपेक्षां सामसूक्तें कठीण (काशिका पा. सू. ७।२।२२ 'कृच्छ्रगहनयोः कषः।'). कडक शिस्तीचे गुरु असत तसे शिस्तींत शिथिल असलेलेही असत. उदाहरणार्थ, 'दारुणाध्यापक,' 'घोराध्यापक.' सेवानिवृत्तांना 'प्राचार्य' म्हणत, तर माजी विद्यार्थ्यांना 'प्रान्तेवासी' नांव असे (पहा–भाष्य १।४१६ on कुगतिप्रादयः। २।२।१८).

मौखिक शिक्षणपद्धति— आचार्य, (वेदार्थ शिकविणारा), श्रोत्रिय (वेदपठन करवून घेणारा), प्रवक्ता (प्रोक्त वाङ्मयाचें अध्यापन करणारा), आख्याता (धार्मिक शिक्षण देणारा), अनूचान (वेदाङ्गांची माहिती देणारा) आणि अध्यापक (व्यावहारिक शिक्षण देणारा) हे सर्व अध्यापनाचें काम मौखिक पद्धतीनें करीत. पाणिनीच्या काळीं लिपि नव्हती व त्यामुळें लिपिबद्ध ग्रंथ नव्हते असें कांहीं पाश्चात्त्य विद्वानांचें मत आहे. पण त्या वेळीं लिपि, लिपिकार व ग्रंथही होते, याला पाणिनीच्या अष्टाध्यायींत भरपूर आधार आहे. मात्र ग्रंथावरून अध्ययन-अध्यापन करणें कमी प्रतीचें समजलें जात असावें. विशेषतः वेदाध्ययन हें शुद्ध उच्चार व स्वर यांवर अवलंबून असल्यानें व त्यांत अनेक बारकावे असल्यानें तें गुरुमुखांतून मौखिक पद्धतीनेंच होत असलें पाहिजे. आजही गुरुमुखाशिवाय केवळ

२८. अनुप्रवचनादिभ्यश्छः। ५।१।१११.

२९. पा. सू. 'विधिनिमंत्रणामंत्रणाधीष्ट········'। ३।३।१६१.
'अधीच्छामो भवन्तं माणवकं भवान् उपनयेत'। (काशिका)

३०. तमधीष्टो भृतो भूतो भावी। ५।१।८०.
मासमधीष्टः सत्कृत्य व्यापारितः।

पोथीवरून शुद्ध स्वरूपांत वेदाध्ययन होणें शक्य नाहीं. गुरुमुखपरंपरा नष्ट झाली व ती होणार असें दुर्दैवानें म्हणावें लागतें— तर अनेक सहस्र वर्षांची परंपरा नष्ट होऊन वेदपठन कसें होत असावें, हें केवळ आतां टेपरेकॉर्डवरून (तेंही घेऊन ठेवल्यासच) समजूं शकेल ! महाराष्ट्राबाहेर फारसें शुद्ध वेदपठन ऐकावयास मिळत नाहीं, अशी आजची स्थिति आहे.

इतर शास्त्रांचें शिक्षण—व्याकरण, निरुक्त, छंदःशास्त्र, ज्योतिष, मीमांसा यांचें अध्ययन लिपिबद्ध ग्रंथांवरून होत असावें.

पाणिनीच्या अष्टाध्यायींत लिपि अस्तित्वांत असल्याचे कांहीं पुरावे—

(१) पाणिनीच्या सूत्रांत ३।२।२१ मध्यें 'लिपि' शब्द आला असून त्या लिहिणाऱ्यांना 'लिपिकर' असा शब्द साधला आहे.[३१]

(२) पाणिनीच्या दुसऱ्या एका सूत्रांत ४।१।४९ 'यवन' शब्द आला असून त्यावर वार्त्तिककार कात्यायनानें वार्त्तिक करून 'यवनानी' म्हणजे यवनांची (ग्रीकांची) लिपि असा स्पष्ट अर्थ केला आहे.[३२]

(३) कांहीं सूत्रांतून 'ग्रंथ' शब्द आला आहे.[३३]

(४) पाणिनीच्या धातुपाठांत 'लिख' धातु तुदादिगणांत 'लिख अक्षरविन्यासे' असा पठित आहे. लिख् धातूचा अर्थ लिहिणें असाच आहे.

---

३१. दिवाविभानिशाप्रभाभास्करान्तानन्तादिबहुनान्दीकिंलिपिलिबिबलिभक्तिकर्तृचित्रक्षेत्रसंख्याजङ्घाबाह्वहर्यत्तद्धनुररुःषु। ३।२।२१,

३२. इन्द्रवरुणभवशर्वरुद्रमृडहिमारण्ययवयवनमातुलाचार्याणामानुक्। ४।१।४९.

'यवनाल्लिप्याम्'। (वार्त्तिक.)

३३. समुदाङ्भ्यो यमोऽग्रन्थे। १।३।७५; अधिकृत्य कृते ग्रन्थे। ४।३।८७; कृते ग्रन्थे। ४।३।११६.

(५) रेफ कसा लिहावा याबद्दल भाष्यांत उल्लेख आहे.

(६) अष्टाध्यायींत पूर्ववैयाकरणांच्या व्याकरणांचे उल्लेख आहेत. ते ग्रंथनिविष्टच असले पाहिजेत. हीं सर्व व्याकरणें तोंडपाठ असणें अशक्य दिसतें. पाणिनीनें वेगवेगळे स्वर, व्यंजन, विसर्ग-संधि कसे करावे याविषयीं सूत्रें दिलीं आहेत. प्रत्यक्ष लेखनकलेशिवाय हे संधि स्पष्ट करणें अशक्य आहे.

(७) गोधनाचें स्वामित्व दाखविण्यासाठीं गायींच्या कानांवर आंकडे घालण्याची पद्धत असे.[३४] कधींकधीं स्वस्तिकासारख्या खुणाही घालीत असत. उदा. स्वस्तिककर्णः । पंचकर्णः ।

(८) लिङ्गानुशासनांत ' पुस्तक ' शब्द आला आहे. इतरही अनेक पुरावे आहेत. गोल्डस्टुकर म्हणतो, पाणिनीला तर लिपि माहित होतीच पण ती तत्पूर्वींही होती. " Writing was known to Panini and even earlier and Vedic literature was available to him in Mss." (Goldstucker, ' Panini ' pp 11-47). पुढें अशोकानें आपल्या धर्माज्ञा खोदविल्या हें सर्वविश्रुत आहेच.

---

३४. कर्णे लक्षणस्याविष्टाष्टपञ्चमणिभिन्नाच्छिन्नाच्छिद्रस्रुवस्वस्तिकस्य ।
६।३।११५.

६. पाणिनिकालीन राजकीय परिस्थिति.

पार्श्वभूमि—पाणिनीचा काल इ. स. पू. सहावें शतक असा जवळजवळ निश्चित झाला आहे.[१] म्हणजे आज अडीच हजार वर्षांपूर्वी भारतांत शासनपद्धति कोणती व कशी होती हें समजावून घ्यावयाचें असल्यास पाणिनिविरचित 'अष्टाध्यायी' या व्याकरण-ग्रंथावरून कांहीं माहिती मिळते का तें पाहूं. पाणिनीनें आपलीं चार हजार सूत्रें जरी त्या वेळच्या भाषेचें व्याकरण लिहिण्यासाठीं रचलीं असलीं तरी ज्या भाषेचें व्याकरण त्यानें रचिलें ती भाषा व्यवहारांतील सर्व शब्दांना स्पर्श करीत असल्यानें त्यांत राजकीय परिस्थिति, राज्यव्यवस्था, सैन्य, वेगवेगळया जाति, जनपदें, नगरराष्ट्रें, अधिकारी वर्ग, आयुधजीवी संघ, राजे, त्यांचे सल्लागार इत्यादि विषयींचा शब्दसमूह त्यांत व्याकरणदृष्ट्या येतोच येतो. त्या शब्दांची व्युत्पत्ति साधण्यासाठीं पाणिनीनें सूत्रें रचलीं असलीं तरी इतिहास-संशोधक आपली संशोधकी दृष्टि लावून त्या व्याकरणग्रंथांतून तत्कालीन इतिहास निर्माण करतो! पाणिनीनंतर सुमारें चारशें वर्षांनीं त्याच्या अष्टाध्यायीवर पतंजलीनें महाभाष्य ही गद्यात्मक टीका लिहिली. त्यांत भूतकालाचा प्रयोग दाखविण्याकरितां त्या वेळीं नुकतीच घडलेली घटना 'यवनः साकेतमरुणत्' या वाक्यानें दाखविली. परंतु यावरून यवनांनीं (अयोनियन्स्) साकेताला वेढा दिला ही घटना कळल्यामुळें, इतिहासावरून ही घटना इ. स. पू. १५० वर्षीं घडली हें स्पष्ट असल्यानें, भाष्यकार पतंजलीचा काल डॉ. भांडारकरांना ठरविता आला. अशीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. इतिहास-संशोधक गुप्तपोलिसाप्रमाणें खरोखरच सुतानें स्वर्गाला जातो!

पाणिनीचीं सूत्रें पिंजूनपिंजून संशोधकांनीं बरीच माहिती मिळविली आहे.[२] या संशोधकांमध्यें पाश्चात्त्य विद्वानांप्रमाणें पौरस्त्यही आहेत. त्यांत

---

१. 'पाणिनीय व्याकरण-संप्रदाय' प्रकरण पहिलें पहा.

२. 'India as Known to Panini' by Dr. V. S. Agrawal.

भांडारकर, इतिहासाचार्य राजवाडे, भारताचार्य चिं. वि. वैद्य, प्रो. पाठक, डॉ. अग्रवाल यांचीं नांवें प्रामुख्यानें घेतां येतील. तत्कालीन ज्ञात वाङ्मय, शिक्षणपद्धति, शिक्षणसंस्था, भाषाभेद, प्रांतभेद, वाहतुकीचीं साधनें, कलांमध्यें गायन, नृत्य, तंतुवादन वगैरे, व्यापार–उदीम, वर्ण, जाति, विवाहसंस्था, स्त्रियांचें समाजांत स्थान, वर्णाश्रमधर्म, खाद्यपेयें, आरोग्य, वस्त्रें, केशभूषा, अलंकार, वजनें व मापें, नाणीं, नगरांची मांडणी (Town-planning), प्रपंचाला लागणाऱ्या वस्तु (Household articles), पशुधन, करमणुकीचीं साधनें, कालपरिमाण, ज्योतिषविद्येंतील प्रगति, धार्मिक आचरण, यज्ञ-याग, कृषि इत्यादि कितीतरी विषयांवर पाणिनीच्या सूत्रांवरून निष्कर्ष काढण्यांत आले आहेत. प्रस्तुत लेखांत पाणिनीकालीन राजकीय परिस्थितीपुरताच विचार कर्तव्य आहे.

जनपद राज्यें—पाणिनिकालीं सर्व भारत जनपद राज्यांनीं विभागलेला होता,[३] आणि त्यांच्या मर्यादा एकमेकांना लागलेल्या होत्या.* पाणिनि-पूर्वींच हीं जनपद राज्यें स्थापन होऊन त्यांना स्थैर्य आलें होतें. यांची तुलना ग्रीस देशांतील नगरराज्यांशीं (City states) करतां येईल. ग्रीस देशांत या नगरराज्यांत अथेंस आणि स्पार्टा हीं प्रमुख होतीं. पाणिनि-काल या वेळच्या ग्रीस देशाच्या नगरराज्यकालाशीं जुळतो. हीं राज्यें सर्वस्वीं स्वावलंबी (Self-contained) होतीं. प्रत्येक जनपद राज्याची राज्यव्यवस्था निरनिराळी असे. जनपद राज्यांची संख्या पाणिनिकालीं फार असून तीं कंबोजपासून दक्षिणोत्तर अश्मकापर्यंत, तर पूर्वपश्चिम सौराष्ट्रापासून काम-रूपपावेतों पसरलेलीं होतीं. त्यांचे मध्य, प्राच्य, उदीच्य, दक्षिणापथ, अपरान्त, विन्ध्यप्रदेश आणि पर्वत असे एकंदर सात विभाग होते. वायव्य दिशेकडे पर्वतविभागांत आयुधजीवी जनपद राज्यें होतीं.[४] यांतील कांहीं विभाग लहानमोठे होते. सिंधूनदानें पूर्व आणि अपर असे

३. जनपदतदवध्योश्च । ४।२।१२४.

* तदवधिरपि जनपद एव गृह्यते । (काशिका)

४. आयुधजीविभ्यश्छः पर्वते । ४।३।९१.

गांधाराचे विभाग पडले होते. त्याचप्रमाणें पूर्व, उत्तर आणि दक्षिण-पांचाल असे पांचाल जनपदाचे विभाग होते. या सर्वांच्या राजधान्यांना तटबंदी असे.

जनपदाची उत्क्रांति मूळ 'जन' (Clan) पासून झाली. याच 'जना' मध्यें पुढें कुलें (Families) होऊन त्यावर क्षत्रिय हुकमत चालवूं लागले. जनपदांत राहणारे नागरिक 'जनपदी' झाले.[५] वैदिक वाङ्मयांत 'जनपद' शब्द नसून 'जन' आहे. याच 'जना'ची उत्क्रांति पुढें जन, कुल, समाज, जनपद अशी झालेली दिसते[६] (Clan-family-tribe-city). आतां पाणिनिसूत्रांत 'अभिजन' शब्द आला आहे. त्याचा काय अर्थ आहे तो पाहूं.[७] त्याचा अर्थ 'मूळ देशांत राहणारा' असा आहे.[८] राज्य करणाऱ्या या क्षत्रियांस व त्यांच्या वंशीयांस पुढें 'राजन्य' नांव पडलें[९] व बाकीच्यांना 'राजन' म्हणूं लागले. कारण पुढें क्षत्रियांशिवाय इतर शूद्रादिलोकही जनपदांत राहूं लागले.

नांवें कशीं पडलीं?—पूर्वी जनपदाचें नांव त्यांत राहणाऱ्या विशिष्ट लोकांच्या नांवावरून पडलें; पण पुढें त्या लोकांऐवजीं तो भौगोलिक प्रदेशच जनपदाचें नांव म्हणून समजला जाऊं लागला व लोकांचें नांव मागें पडलें.[१०] जनपद आणि तेथील क्षत्रिय यांना एकच नांव होतें.[११]

---

५. जनपदिनां जनपदवत्सर्वं जनपदेन समानशब्दानां बहुवचने। ४।३।१००.

६. दिक्शब्दा ग्रामजनपदाख्यानचानराटेषु। ६।२।१०३.

७. अभिजनश्च। ४।३।९०.

८. 'यत्र पूर्वैरुषितं सोऽभिजनः यत्र स्वयं वसति स निवास इति विवेकः' (सि. कौ.)

९. राजश्वशुराद्यत्। ४।१।१३७. राज्ञो जातावेवेति वाच्यम्। (वा.)

१०. लुपि युक्तवद्व्यक्तिवचने। १।२।५१; विशेषणानां चाजातेः। १।२।५२; तदशिष्यं संज्ञाप्रमाणत्वात्। १।२।५३; लुब्योगाप्रख्यानात्। १।२।५४; योगप्रमाणे च तदभावेऽदर्शनं स्यात्। १।२।५५.

११. जनपदशब्दात् क्षत्रियादञ्। ४।१।१६८.
क्षत्रियसमानशब्दाज्जनपदशब्दात्तस्य राजन्यपत्यवत्। (वार्तिक)

उदाहरणार्थ, पांचाल देश आणि त्याचे राजे या दोहोंनाही ' पाञ्चाल ' असेंच म्हणत.

शासनपद्धति— या जनपदांचे शास्ते कांहीं ठिकाणीं राजे होते, म्हणजे तेथें राजशाही (Monarchy) होती, तर कांहीं ठिकाणीं संघ किंवा गण (Republics) होते. पाणिनि-सूत्रांवरून साल्वेय, गान्धारि, मगध, कलिंग, सूरमस, कोसल, अजाद, कुरु, साल्व, प्रत्यग्रथ, कालकूट, अश्मक, कम्बोज, अवन्ति आणि कुन्ति या जनपद राष्ट्रांत राजशाही होती. शिवाय विदेह, पांचाल, अंग, नीप, सौवीर आणि अंबष्ठ हींही तशींच असावींत.[१२] हीं जनपदें ' एकराट् ' म्हणजे एकाधीन होतीं, तर इतर ' गणाधीन ' होतीं. संघांमध्यें सर्व लोकांचा दर्जा समान होता, त्यांत वरचा-खालचा असा भेदभाव नव्हता (संघे चानौत्तराधर्ये। ३।३।४२). या संघ-राज्यांनाच गणराज्यें म्हणत. किंबहुना संघ आणि गण हे समानार्थीच होते.[१३] ' यौधेय ' हें संघ-जनपद-राष्ट्र होतें. असें जरी होतें तरी संघराज्यांत जेव्हां अनेक जातींचे लोक प्रविष्ट झाले, तेव्हां मूळ क्षत्रिय शास्त्यांना व त्यांच्या वंशजांनाच ' राजन्य ' म्हणत. काशिकाकार ' राजन्य ' शब्दाची व्याख्या ' अभिषिक्त वंश्य क्षत्रिय ' अशी करतो. या संघराज्यांत पक्षीय राजकारण (Party System) चाले. पाणिनि-सूत्र ८।१।१५ यांत ' द्वन्द्व ' (Two Rival Parties) ' द्विवर्गसंबन्धेन पृथगवस्थिता द्वन्द्वं व्युत्क्रान्ता इत्युच्यते ' (काशिका) आणि ' व्युत्क्रमण ' (Rivalry for power) असे शब्द आले आहेत. विरुद्ध पक्षाचे सभासद विरुद्ध बाजूस बसत. पक्षीय सभासदाला ' वर्ग्य ' (४।३।५४) किंवा ' गृह्य ' आणि ' पक्ष्य ' (३।१।११९) अशा संज्ञा असत. अन्धक आणि वृष्णि संघराज्यांत पक्षीय राजकारण असल्याचा उल्लेख पा. सू.

---

१२. साल्वेयगांधारिभ्यां च। ४।१।१६७; द्व्यञ्मगधकलिंगसूरमसादण्। ४।१।१६८; वृद्धेत् कोसलाजादाञ् ञ्यङ्। ४।१।१६९; साल्वावयव-प्रत्यग्रथकलकूटाश्मकादिञ्। ४।१।१७१; त्रियामवन्तिकुन्ति-कुरुभ्यश्च। ४।१।१७४.

१३. संघोद्घौ गणप्रशंसयोः। ३।३।८६.

४।२।३४ मध्यें सांपडतो. यांतील मंत्रिमंडळाची संख्या पांच, दहा किंवा वीस होती असें पतंजलि 'संख्यायाः संज्ञासंघसूत्रांकेषु।' ५।१।५८ या सूत्रावरील भाष्यांत म्हणतो. पाणिनि मात्र पांच किंवा दहा संख्या सांगतो.[१४] मताला (Vote) छंदस् म्हणत आणि मतें देऊन जे निर्णय होत त्यांना 'छांदस्य' संज्ञा असे.[१५] गणसंख्येचाही (Quorum) निर्देश पाणिनि-सूत्रांत आहे.[१६] प्रत्येक संघराज्याचें एक विशिष्ट चिन्ह (State emblem) असें. हें चिन्ह नाण्यावर, ध्वजावर व शिक्क्यावर (Coin, Banner and Seal) कोरलें जात असे.[१७] सैन्यांतील घोड्यांवरही अशा खुणा घातलेल्या असत.

आयुधजीवी संघ— आयुधजीवी संघांचे मुख्यतः वाहीक, पर्वत, पूग आणि व्रात असे चार विभाग होते. काश्मिरापासून तों अफगाणिस्तानपर्यंत हे पसरलेले होते. सैन्यांत यांतील लोक भरती होऊन ते आपली उपजीविका करीत. शिकंदरानें जेव्हां हिंदुस्थानवर स्वारी केली तेव्हां वाटेंत त्याला आयुधजीवी लोकांशीं तोंड द्यावें लागलें. हीं संघजनपदें कमीअधिक प्रमाणांत सुधारलेलीं होतीं. यांमध्यें 'व्रात' संघ हा अगदीं खालच्या पायरीवर होता. काशिककार यांना 'उत्सेधजीविनः संघाः व्राताः' असें म्हणतो. लुटालूट, मारामारी, जाळपोळ करूनच हे आदिवासी आपली उपजीविका करीत.[१८] हे देश निषिद्ध मानले जात. वाहीक देशांत जाण्यानें पाप लागतें असे उल्लेख सांपडतात. हे सर्व 'यौधेय' संघ होते. या 'व्रात्यांना' कांहीं धार्मिक विधि—'व्रात्यस्तोम-' करून, शुद्ध करून, त्यांना आर्यांमध्यें सामील करून घेण्यांत आलें. कै. डॉ. केतकर यांनीं त्यांची पत्नी सौ. शीलवतीबाई यांना 'व्रात्यस्तोम' करून, शुद्ध करून घेतलें होतें हें सर्वांना विदितच आहे. 'व्रात्य'

---

१४. पञ्चद्दशतौ वर्गे वा। ५।१।६०.

१५. छन्दसो निर्मिते। ४।४।९३.

१६. बहुपूगगणसङ्घस्य तिथुक्। ५।२।५२.

१७. सङ्घाङ्कलक्षणेष्वञ्यञिञामण्। ४।३।१२७.

१८. व्रातेन जीवति। ५।२।२१.

शब्दाची व्याख्या 'संस्कारहीनो व्रात्यः' अशी आहे. महाभारतांत पांडव दिग्विजयासाठीं निघाले तेव्हां त्यांना या आयुधजीवी संघांशीं युद्ध करावें लागलें असे अनेक उल्लेख आहेत. हा व्रात्यस्तोम-विधि फार साधा असून तो त्या लोकांच्या आटोक्यांत असे. आर्यांनीं शुद्धीकरणाची चळवळ जोरानें चालवून अनेक अनार्यांना आर्य करून घेतलें हें या व्रात्यस्तोम-विधीवरून स्पष्ट होतें. हा विधि चार प्रकारच्या वेगवेगळ्या कार्यांसाठीं सांगितलेला आहे. आयुधजीवी संघांचीं पाणिनि-सूत्रांत आलेलीं कांहीं नांवें देऊन हा भाग संपवितों.

वृक (५।३।११५); दामनि (५।३।११६); त्रिगर्तषष्ठ (५।३।११६); यौधेय (५।३।११७), पर्शु (५।३।११७); गणपाठांत कांहीं नांवें आलीं आहेत तीं अशीं— वाहीक, असुर, पिशाच, राक्षस, मरुत्, अशनि, सात्वत, दाशार्ह, वसु, शौभ्रेय, सौक्रेय, वार्तेय, धार्तेय, ज्याबाणेय, त्रिगर्त, उशीनर, क्षुद्रक, मालव इत्यादि.

राजा असलेल्या जनपदाला पाणिनि 'राज्य' म्हणतो. 'राजन्' शब्दापासूनच 'राज्य' शब्द झाला आहे.[१९] पाणिनि-सूत्रांत 'ईश्वर' शब्द आला आहे. तो राजाचा अधिकार दाखवितो. स्वामी म्हणजे ऐश्वर्य असणारा, म्हणजेच राजा.[२०] एका सूत्रांत 'भूपति' शब्द आला आहे. तोही ऐश्वर्य दाखवितो.[२१] त्याचप्रमाणें अधिपति, सम्राट्[२२] व त्यापासून आधिपत्य, साम्राज्य हे भाववाचक शब्द झाले. मांडलिक राजांवर अधिकार चालविणारा असा याचा अर्थ आहे. अश्वमेध यज्ञ केल्यावर तो सार्वभौमपदाला योग्य होई.

परिषद्—राजाच्या मदतीला परिषद् असे आणि 'परिषद्वलो राजा'[२३] याचा अर्थ (A King in Council) असा घ्यावयाचा. या परि-

---

१९. गुणवचनब्राह्मणादिभ्यः कर्मणि च। ५।१।१२४

२०. स्वामिन्नैश्वर्ये। ५।२।१२६.

२१. पत्यावैश्वर्ये। ६।२।१८; न भूवाक्चिद्दिधिषु। ६।२।१९.

२२. मो राजि समः क्वौ। ८।३।२५.

२३. रजःकृष्यासुतिपरिषदो वलच्। ५।२।११२.

षदेच्या सभासदाला 'पारिषद' किंवा' पारिषद्य ही संज्ञा असे.[२४] 'परिषद्बलो राजा' या शब्दसमूहानें पाणिनिकालीं सुद्धां सनदशीर राजशाही (Constitutional monarchy) होती, हें स्पष्ट होतें. त्याही वेळीं 'राजे करणारे' (King-makers) होते त्यांना राजकर्ते अशी संज्ञा असे.[२५] रामायणांत 'समेत्य राजकर्तारो भारतं वाक्यमब्रुवन् (अयोध्याकांड, ७९-१) असा त्यांचा उल्लेख सांपडतो.

राजा मुख्य मंत्र्याच्या सल्ल्याप्रमाणें चाले. मुख्य मंत्री सामान्यतः ब्राह्मणजातीचा असे. राजा क्षत्रिय आणि मुख्य मंत्री ब्राह्मण ही प्रथा अनेक शतकें भारतांत चालू होती. शक्ति आणि युक्ति (विद्या) यांचा हा गोड संगम होता. कांहीं ऐतिहासिक उदाहरणें-अजातशत्रु-वर्षकार; विडूडथ-दीर्घचारायण; उदयन-यौगंधरायण; चंद्रगुप्त-चाणक्य; अशोक-राधागुप्त; पालक-पिशुन; चंडप्रद्योत-भरतरोहक; अंशुमान्-घोटमुख; परंतप-कर्णिक-भारद्वाज; पांचालाचा-ब्रह्मदत्त-बाभ्रव्य.[२६] अशा मुख्य ब्राह्मण मंत्र्यांना 'आर्यब्राह्मण' म्हणत. कित्येक महत्त्वाच्या प्रसंगीं कोणतीही गोष्ट षट्कर्णी होऊं नये म्हणून राजा मुख्य मंत्र्याशींच फक्त खलबत करी व त्याचा सल्ला घेई. अशा मंत्राला (सल्ल्याला) पाणिनि 'अषडक्षीण मंत्र' म्हणतो. याचा शब्दशः अर्थ सहा डोळ्यांनीं न पाहिलेला (न+षडक्षीण=अषडक्षीण).[२७] परिषदेनें मान्य केलेल्या प्रस्तावांना 'पारिषत्क' संज्ञा होती. परिषदेशिवाय (Executive Council), राजसभाही (General Assembly) होती. पतंजलि चंद्रगुप्त-सभा किंवा पुष्यमित्रसभा अशीं उदाहरणें देता (सभा राजाऽमनुष्यपूर्वा। २।४।२३). बिंदुसार राजाच्या वेळीं सभा पांचशे लोकांची होती हें ऐतिहासिक सत्य आहे. अशा सभेंत बसण्यास योग्य असणाऱ्यांनाच

---

२४. परिषदे ण्यः। ४।४।१०१.

२५. राजनि युधिकृञः। ३।२।९५.

२६. 'India as Known to Panini' by Dr. V. S. Agrawal, page 401-2.

२७. अषडक्षा·········पदात् खः। ५।४।७.

'सभ्य' (सभायां साधुः) ही संज्ञा होती (सभाया यः ।४।४।१०५). आतां 'सभ्य' शब्दाचा अर्थ वेगळा आहे हें माहीतच आहे. मुख्य-मंत्र्याच्या खालोखाल पुरोहित असे व त्यानंतर सेनापति. राजाला अनेक स्त्रिया असत पण राज्याभिषेकाच्या वेळीं तो मुख्य राणीलाच होई आणि तिला 'महिषी' संज्ञा होती. इतर मुलें असलेल्या राण्यांना 'प्रजावती' असें वेगळें नांव असे. राजपत्न्या फारशा बाहेर पडत नसत हें 'असूर्यं-पश्याः राजदाराः' या शब्दसमूहावरून लक्षांत येतें, त्याचा शब्दशः अर्थ 'सूर्याला न पाहणाऱ्या राजस्त्रिया' असा होतो, म्हणजे 'अंतःपुर' असेंही म्हणतां येईल.

राजाला अनेक पुत्र असले तरी महिषीच्या पुत्रालाच राजा 'युवराजपद' (Crown prince) देत असे. युवराजाला 'आर्यकुमार' म्हणत. वयांत न आलेला राजपुत्र जेव्हां गादीवर बसे तेव्हां त्याला 'राजकुमार' म्हणत. असा राजकुमार वयांत आल्यानंतरच त्याला राज्याभिषेक होई. राजाला संरक्षक (Body-guards) असत. सामान्यतः इतर राजपुत्रां-मधूनच त्यांची निवड होई व तो मोठा मान समजला जाई.

राजाच्या अधिकाऱ्यांना निरनिराळीं नांवें होतीं. तीं सर्व दिल्यास फार विस्तार होईल म्हणून देतां येत नाहींत. पण त्यांत राजाला कुस्ती (मल्लविद्या) शिकविणाऱ्यास 'राजयुध्वा'– (राजानं योधितवान् इति) ही संज्ञा होती (राजनि युधिकृञः । ३।२।९५). देशाला चांगला राजा असल्यास त्या प्रदेशास 'राजन्वान्' (राजन्वान् सौराज्ये ।) अशी संज्ञा असे; तर इतर देश 'राजवान्' म्हणून ओळखले जात.

तात्पर्य, आतांपावेतों जनपद राज्यें व त्यांतील विविध राज्यव्यवस्था याविषयींची माहिती दिल्यानंतर या जनपदराज्यांनीं कोणतें सांस्कृतिक कार्य घडवून आणलें तें थोडक्यांत पाहूं. यांतील कांहीं राज्यांत नागरिक सुबुद्ध आणि सुशिक्षित असून त्यांनीं धार्मिक आणि वैचारिक क्रांति घडवून आणली. पाणिनि हा अशाच एका जनपदाचा–गांधाराचा–नागरिक होता. या विचारांचा आविष्कार महाभारताच्या शांतिपर्वांत

दृग्गोचर होतो. अशा विद्वानांचा गुणगौरव होई ('यथा जानपदीषु विद्यातः पुरुषविशेषो भवति'। निरुक्त १।१।५). जनपद राज्याचें ध्येय राज्यांत सुव्यवस्था राहून लोकांनीं नीतीनें वागावें असें होतें. हें ध्येय केकय राज्याच्या अश्वपति राजाच्या शब्दांत खालीलप्रमाणें होतें--

न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपः।
नानाहिताग्निर्नाविद्वान् न स्वैरी स्वैरिणी कुतः ॥[२८]
(छांदोग्य उपनिषद् ५।११।५)

विस्तारभयास्तव येथेंच थांबणें इष्ट आहे.

---

२८. 'India as Known to Panini' by Dr. V. S. Agrawal. pp. 424–454.

७. पाणिनि ते पतंजलि

थोडें प्रास्ताविक—पाणिनीची अष्टाध्यायी व तिचें तांत्रिक स्वरूप यांविषयीं मागच्या एका प्रकरणांत विवेचन आलेंच आहे. त्या वेळीं आपण असें पाहिलें कीं, पाणिनीनें वैदिक भाषेबरोबर अभियुक्त व सुसंस्कृत लोकांमध्यें त्या वेळीं प्रचलित असलेल्या भाषेचा अभ्यास करून आपला 'अष्टाध्यायी' ग्रंथ रचला. पाणिनीच्या वेळीं प्रचलित असलेली भाषा व वेदभाषा या वस्तुतः बव्हंशीं एकच होत्या व त्या दोन्ही भाषांचें एकच व्याकरण त्यानें रचिलें.[1] फक्त वेदामध्यें सांपडणारे व प्रचलित भाषेंत न सांपडणारे जे शब्द ते साधण्याकरितां त्यानें 'मंत्रे' किंवा 'छंदसि' शब्द घालून निराळीं सूत्रें रचिलीं. क्वचित् प्रसंगीं 'निगम' व 'आर्ष' असेही शब्द आहेत.[2]

पाणिनीनंतर भाषेची प्रगति—पाणिनीनें जवळजवळ ४००० सूत्रें रचिलीं हें वर दिलेंच आहे. पण दोन तीन शतकांचा काल गेल्या-नंतर स्वाभाविकच भाषेमध्यें थोडाफार फरक झाला व इतर देशांशीं संबंध आल्यानें अनेक नवे शब्द भाषेंत घुसले, त्यामुळें शब्दसमृद्धीही झाली. पाणिनीनंतर जे वैयाकरण झाले त्यांना भाषेंत झालेल्या बदलाची दखल घेणें आवश्यकच होतें. शिवाय पाणिनीनें आपल्या दृष्टीनें कितीही सर्वांगपरिपूर्ण व्याकरण रचलें तरी सूत्रें करतांना त्यानें अत्यंत लाघवाचा स्वीकार केल्यानें तीं दुर्बोध होऊं लागलीं व त्यांचें विस्तृत विवेचन करणें भाग पडलें. तें करतांना अनेक बारीकसारीक गोष्टींची नोंद अभ्यासकांना करून ठेवावी लागली. यांमध्यें सूत्राचें प्रयोजन, त्यांतील शब्दांची उपयुक्तता, तांत्रिक अडचणी, सूत्रांवरील आक्षेप, त्यांचें निराकरण,

---

१. सर्ववेदपारिषदं हीदं शास्त्रम्। तत्र नैकः पन्थाः शक्य आस्थातुम्।
(म. भाष्य भाग ५, पृ. ३०६)

२. संबुद्धौ शाकल्यस्येतावनार्षे। १।१।१६.
वा षपूर्वस्य निगमे। ६।४।९.

नवीन शब्दप्रयोग इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव झाला. कांहीं ठिकाणीं इतर प्रकारांनीं रूपांची इष्टसिद्धि होत असल्यानें कांहीं सूत्रें व सूत्रांतील पदें यांचें वैयर्थ्य दिसूं लागलें.

वार्तिक शब्दाची व्याख्या—या सर्वांचा विचार करून वार्तिककारांनीं 'वार्तिकें' रचिलीं. 'वृत्तीविषयीं जें' या अर्थीं 'वृत्ति' या शब्दाला ठक् (इक) प्रत्यय लागून 'वार्तिक' शब्द तयार झाला आहे. 'वार्तिक' शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणें आहे—

उक्तानुक्तदुरुक्तानां (द्विरुक्तानां) चिन्ता यत्र प्रवर्तते ।
तं ग्रन्थं वार्तिकं प्राहुर्वार्तिकज्ञा मनीषिणः ॥
(पराशर पुराण अ. १८)

अर्थ—सूत्रांत उच्चारलेला शब्द, तसाच न उच्चारलेला शब्द आणि भलताच कांहींतरी शब्द, पडला असल्यासारखा भासणारा शब्द किंवा द्विरुक्त असलेला शब्द यासंबंधीं सर्व प्रकारचा विचार ज्यामध्यें केला जातो त्याला 'वार्तिक' असें म्हणतात.[३] या वार्तिकांचा पाणिनिसूत्रांसारखा स्वतंत्र पाठ नाहीं व संग्रथित करून तीं एकत्र दिलेलीं नाहींत. महाभाष्यांत बहुतेक वार्तिकांचा उल्लेख असला तरी कांहीं वार्तिकें भाष्यांत आढळत नाहींत पण तीं अन्यत्र सांपडतात. **एक प्रवाद असा आहे कीं, सर्व वार्तिकें वररुचि कात्यायनानें रचिलीं; पण त्यांत तथ्य नाहीं.**

वार्तिकांचा कर्ता कोण?—गोल्डस्टुकर, वेबर वगैरे विद्वानांचें म्हणणें असें कीं, पाणिनीचे प्रमाद दाखविणारा कात्यायन हा दोषैकदृष्टि होता. तर याउलट डॉ. कील्हॉर्नचें मत असें कीं, कात्यायन हा तसा नसून चिकित्सक टीकाकार होता. कात्यायनाचीं वार्तिकें कोणतीं व भाष्यकारांचीं वचनें कोणतीं यांसंबंधीं विद्वत्तापूर्ण विवेचन 'कात्यायनाचीं

---

३. 'The Vārtikas are meant to correct, modify or suppliment the rules of Panini wherever they had become partially inapplicable.' 'Systems of Sk. Grammar' p. 29.

वार्तिकें' या शीर्षकाखालीं एक उद्बोधक निबंध लिहून डॉ. कील्हॉर्ननें केलें आहे.[४] भाष्यकारांच्या 'इष्टि' म्हणून ज्या वार्तिकांना परंपरागत मानण्यांत येतें त्या निराळ्या शोधून काढणें कठीण आहे. तरीपण 'इति वक्तव्यम्', 'इति वाच्यम्', 'इत्युपसंख्यानम्' असें साधारणपणें ज्या वार्तिकांच्या शेवटीं म्हटलें आहे व विशेषतः वार्तिक लिहिल्यानंतर वार्तिकांतील बहुतेक शब्द जसेच्या तसेच ठेवून कांहीं शब्द अधिक घालून ज्यांचें स्पष्टीकरण भाष्यामध्यें केलें आहे तीं कात्यायनाचीं वार्तिकें समजावींत असा निष्कर्ष डॉ. कील्हॉर्न यानें काढला आहे. तात्पर्य, जेथें जेथें दोनदां उच्चारण दिसून येतें, तेथें पाहिलें उच्चारण वार्तिककाराचें वार्तिक असतें व दुसरें भाष्यकारांनीं केलेलें त्या वार्तिकाचें व्याख्यान असतें; व जेथें एकच उच्चारण असतें तेथें तें वचन भाष्यकाराचें असतें असा सिद्धान्त डॉ. कील्हॉर्ननें मांडला आहे व त्याचें हें म्हणणें ग्राह्य धरण्यास हरकत नाहीं.[५]

पाणिनि आणि वररुचि-कात्यायन यांच्या कालामध्यें कांहीं वार्तिककार होऊन गेले असें भाष्यांतील उल्लेखावरून स्पष्ट दिसतें.[६] खुद्द कात्यायनानें वाजप्यायन, व्याडि, पौष्करसादि वगैरेंचा उल्लेख प्रत्यक्ष केला असून 'इत्येके' म्हणून अप्रत्यक्षही केला आहे.[७] कात्यायनानंतरही कांहीं वार्तिककार झाले. उदाहरणार्थ, भारद्वाजीय, कुणरवाडव, सौर्यभगवत् आणि कुणि यांचा उल्लेख पतंजलीनें महाभाष्यांत केला आहे.

श्लोकवार्तिकें— कांहीं वार्तिकें गद्यस्वरूपांत आहेत तर कांहीं श्लोकस्वरूपांत आहेत व त्यांनाच 'श्लोकवार्तिकें' म्हणतात. हीं

४. Indian Antiquary, Vol. V, Note 2 on the Mahābhāshya.

५. 'महाभाष्य, उपोद्घात' पान १९५, प्रा. का. वा. अभ्यंकर

६. 'इति भ्राजीयाः पठन्ति', 'क्रोष्ट्रीयाः पठन्ति', 'सौनागाः पठन्ति'। (महाभाष्य)

७. 'चयो द्वितीयाश्शरि पौष्करसादेरितिवाच्यम्' (सूत्र ८।४।४८ वरील), सरूपाणामेकशेष एकविभक्तौ। १।२।६४ यावरील वार्तिकें ३५ व ४५ पहा.

श्लोकवार्तिकें बहुधा भाष्यकारानेंच 'संग्रह श्लोक' म्हणून रचिलीं असावींत. कांहीं ठिकाणीं त्यांचे तुकडे पाडून भाष्यामध्यें स्पष्टीकरण केलें आहे व सूत्राच्या व्याख्येच्या शेवटीं संपूर्ण श्लोक दिले आहेत. यांपैकीं कांहीं काशिकाकारांनीं 'काशिका' ग्रंथांत उद्धृत केले आहेत.

कात्यायनाचा काल—वररुचि कात्यायनाविषयीं निश्चित कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. कथासरित्सागर ग्रंथांत त्याला पाणिनीचा समकालीन म्हटलें आहे; आणि आश्चर्य असें कीं, मॅक्समुल्लरासारखा संशोधक तें सत्य समजतो. पण गोल्डस्टुकरनें त्याचें पूर्णपणें खंडन केलें आहे. कारण पाणिनीच्या वेळचे कांहीं शब्दप्रयोग कात्यायनाच्या वेळीं भाषेंतून गेले तरी होते किंवा त्यांचे अर्थ तरी बदलले होते. शिवाय कत्यायानाला ज्ञात असलेलें वाङ्मय पाणिनीला ज्ञात नव्हतें. या सर्व गोष्टींवरून पाणिनि आणि कात्यायन यांमध्यें निदान दोनशें वर्षांचा तरी खंड पडला असावा. पाणिनीचा काल जसा गृहीत धरला जाईल त्यावर कात्यायनाचा काल अवलंबून राहील. म्हणून कांहींच्या मतें तो इ. स. पू ४०० ते ३०० असावा, तर काहीं त्याला अलीकडे म्हणजे इ. स. पू. ३०० ते २०० समजतात. शुक्लयजुर्वेदाच्या श्रौतसूत्रांचा कर्ता कात्यायन आहे असें कांहींचें मत आहे.

कात्यायनाचा वार्तिकपाठ—कात्यायनाचा वार्तिकपाठ म्हणून कांहीं लेखी प्रती उपलब्ध आहेत. त्या प्रतीमध्यें दिलेलीं वार्तिकें, तीं ज्या सूत्रांवरचीं आहेत तीं सूत्रें प्रारंभीं देऊन नंतर लिहिलेलीं आढळतात. भाष्यांत दिलेल्या वार्तिकांशीं तुलना करतां त्यांत पाठभेद आढळतात व कांहींतर आढळतच नाहींत. पण तीं इतर ग्रंथांत आढळतात. वार्तिकपाठांत नसलेलींही उलट महाभाष्यांत आढळतात. आश्चर्य असें कीं, या लेखी वार्तिकपाठांत ग्रंथकर्त्याचें कोठें नांव नाहीं. या लेखी वार्तिकपाठांची संख्या सुमारें बाराशें आहे. या हस्तलिखित वार्तिकपाठाशिवाय एक मुद्रित वार्तिकपाठ आहे. त्याची संख्या ५०६६ आहे. डॉ. कील्हार्नसंपादित महाभाष्य-प्रतींत जाड्या अक्षरांत मुद्रित अशीं ४२०० वार्तिकें आहेत. तात्पर्य, मोठा मुद्रित पाठ कात्यायनाचा नसून असतील-नसतील तेवढीं यांत वार्तिकें, श्लोकवार्तिकें, इष्टी, कैयट वगैरे ग्रंथकारांनीं

उद्‌धृत केलेली वार्तिकें एकत्र करून कोणीतरी नवा वार्तिकपाठ तयार केलेला असावा असें दिसतें. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या मतें पाणिनीच्या सर्व सूत्रांपैकीं १५०० सूत्रांवरच कात्यायनाची मखलाशी असून त्यांत सुमारें दहा हजार विशिष्ट बाबतींत कात्यायनानें फेरफार सुचविले आहेत. जे लोक म्हणतात कीं, कात्यायनानें वार्तिकें रचून पाणिनीच्या चुका दाखविल्या किंवा नजरचुका म्हणा, त्याचा अर्थ असा होतो कीं, पाणिनीच्या प्रत्येक सूत्रांत सुमारें किंवा सरासरीनें अडीच चुका होतात असें म्हणणें प्राप्त होतें ! अशा चुका करणारा जर पाणिनि असता तर त्याची गणना तत्कालीन विद्वानांनीं रद्दड किंवा मूर्ख म्हणून केली असती ! पण त्याचें व्याकरण सर्वत्र मान्य झालें व अखिल भारतवर्षास भूषणभूत झालें. 'शोभना खलु पाणिनेः सूत्रस्य कृतिः' असे उद्गार स्वतः महाभाष्यकार पंतजलीचे आहेत.[८] तात्पर्य, पाणिनिकालीन विद्वानांना पाणिनीची अष्टाध्यायी निर्दोष असलेली आढळून आली व त्या दोषराहित्याबद्दल पाणिनीला ते ऋषितुल्य मानूं लागले[९]. प्रा. का. वा. अभ्यंकर यांचेंही तसेंच मत आहे.[१०] कात्यायनानें पाणिनिसूत्रांवर ४२०० वार्तिकें रचिलीं हें मागें सांगितलेंच आहे. कांहीं सूत्रांवर एकदोन, तर कांहींवर पन्नासापेक्षां अधिक वार्तिकें आहेत. हीं वार्तिकें रचतांना त्यानें सूत्रांचाच क्रम स्वीकारला व वार्तिकें हीं सूत्रसदृश केलीं. त्यांत पाणिनीसारखें तंत्र वगैरे कांहीं नाहीं. ज्या सूत्रांचा अर्थ स्पष्ट आहे तीं वगळून महत्त्वाच्या अशा बाराशें (राजवाड्यांचे मतें १५००) सूत्रांवर विवरण केलें आहे. त्यांत पाणिनीच्या सूत्रांचें दृढीकरण करण्याची कामगिरी कात्यायनानें चोख बजावली आहे असेंच म्हणावें लागेल. कात्यायनाचा पाणिनीबद्दल फार आदर होता हें त्याच्याच उद्गारावरून लक्षांत येईल. एके ठिकाणीं त्यानें पाणिनीच्या मागें 'भगवान्' अशी उपाधि लावली आहे.[११] भाष्यकारांनीं

८. पहा महाभाष्य पा. सू. २।३।६६

९. राजवाडे लेखसंग्रह, भाग ३, पान १४२

१०. 'व्याकरण महाभाष्य'—उपोद्घात पान १९४, प्रा. का. वा. अभ्यंकर

११. 'एकशेषनिर्देशाद्वा स्वरभिन्नानां भगवतः आचार्यस्य पाणिनेः सिद्धम्'।

मात्र कांहीं ठिकाणीं वार्तिकांचें खंडन केलें आहे व पाणिनीला उचलून धरलें आहे. एकदा तर उपहासाने असें म्हटलें आहे कीं, कात्यायनाची एवढी खटपट कशाकरिता, तर वेळूच्या काठीवर चढून चिमणी धरण्याकरतां ![12]

वार्तिकांचे प्रकार—एकंदर विचार करतां वार्तिकांचे आठ प्रकार आहेत—(१) सूत्रव्याख्यान वार्तिकें, (२) सूत्रपदप्रयोजन वार्तिकें, (३) सूत्रप्रयोजन वार्तिकें, (४) शंकांचें समाधान करणारीं वार्तिकें, (५) सूत्रप्रत्याख्यान वार्तिकें, (६) सूत्रपदप्रत्याख्यान वार्तिकें, (७) संबद्धार्थकथन वार्तिकें व (८) स्वतंत्रार्थकथन वार्तिकें.

वार्तिककाराला 'वाक्यकार' अशीही संज्ञा दिली गेली* असून वार्तिक-वचनांना 'अनुस्मृति' किंवा 'अनुतंत्र' असेही शब्द आढळतात. त्यावरून अष्टाध्यायीला 'स्मृति' समजावी लागेल.

कात्यायनाचा जन्मदेश—पाणिनीचा काल ठरवितांना 'प्रियतद्धिता दाक्षिणात्याः' हें वचन उद्‌धृत करून पाणिनीला दक्षिण देश माहीत होता व वार्तिककार वररुचि-कात्यायन हा दक्षिणेकडील होता असें सांगून डॉ. भांडारकरांच्या आक्षेपाचें खंडन केलें आहे. पण थोडा विचार करतां पाणिनीच्या अष्टाध्यायींत 'दक्षिण' व 'पश्चिम' या शब्दांचा देशवाचक उल्लेख नाहीं. तरी पण उत्तर आणि पूर्व हे शब्द आहेत व ते सापेक्ष असल्यानें दक्षिण आणि पश्चिम या दिशांचा बोध होण्यास हरकत नाहीं. पाणिनीच्या कालीं पूर्व आणि उत्तर हे दिग्वाचक शब्द भारतवर्षाच्या कोणत्या भागाला म्हणत होते हें जरी स्पष्ट नाहीं तरी

---

१२. 'तदेतन्महतो वंशस्तम्बाल्लट्वानुकृष्यते'। ८।४।६८ सूत्रावरील शेवटचें वार्तिक (महाभाष्य भाग १, पान ५२)

* 'वाक्यकारो वार्तिकमारभते' (नागेशभट्ट); 'एषा भाष्यकारस्य कल्पना न वाक्यकारस्य (भर्तृहरि-प्रदीपिका)

कात्यायनानें 'एङ् प्राचां देशे'। १।१।७५ या सूत्रांतील 'प्राचां देशे' याचें स्पष्टीकरण श्लोकवार्तिकानें केलें आहे; तें असें—

प्रागुदञ्चौ विभजते हंसः क्षीरोदके यथा।
विदुषां शब्दसिद्ध्यर्थं सा नः पातु इरावती ॥

या श्लोकवार्तिकाला ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व आहे. इरावती नदी पूर्व आणि उत्तर विभागांचें विभजन करते असा याचा अर्थ आहे. इरावती नदी म्हणजे सध्यांची रावी नदी. प्राकृत भाषेंत 'इरावती'चें 'रावी' रूप होऊं शकतें. या रावी नदीमुळें त्या वेळीं सांस्कृतिक दृष्ट्या व भाषादृष्ट्या भारताचे दोन विभाग झाले होते व त्यांना उदक् व प्राक् अशीं नांवें देण्यांत आलीं होतीं. कारण भारतीय संस्कृतीचा प्रसार त्या वेळीं गांधार, शौरसेन, कोसल आणि मगध या चार मोठ्या उत्तर व पूर्व भागांत झाला होता. म्हणून पश्चिम व दक्षिण असे विभाग दाखविलेले नाहींत. या दृष्टीनेंच दक्षिण दिशेकडील भाग समजावयास पाहिजे व तो उज्जयिनीच्या खालीं येत नाहीं; आणि याच दृष्टीनें कात्यायनाला दाक्षिणात्य म्हणतां येईल. वार्तिककारांच्या भाषेंत त्यांचा प्राग्देश असावा असेंही अनुमान काढणें शक्य असलें तरी उत्तरदेशांतील अध्ययनाध्यापनपरंपरेचें त्याला पूर्ण ज्ञान होतें हें 'अव्ययात् त्यप्'। ४।२।१०४ या सूत्रावरील वार्तिकावरून दिसून येईल.

वररुचि कीं कात्यायन?—पतंजलीनें महाभाष्यांत 'वररुचि' या शब्दानें उल्लेख केला आहे तर पुढील वैयाकरणांनीं व सायणाचार्यांनीं वररुचि व कात्यायन हे एकच समजून उल्लेख केल्यानें वररुचि हें व्यक्तिनाम व कात्यायन हें गोत्रनाम 'कात्य' पासून झालें असावें. विक्रमादित्याच्या नऊ रत्नांपैकीं[१३] प्राकृत भाषेचें व्याकरण रचणारा वररुचि वेगळा आहे हें येथें नमूद केलें पाहिजे.

---

१३. धन्वन्तरिः क्षपणकोऽमरसिंहशङ्कु वेतालभट्टघटकर्परकालिदासाः।
ख्यातो वराहमिहिरो नृपतेः सभायां रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य॥

कात्यायनानें उद्‌धृत केलेले लौकिक न्याय व शास्त्रसंकेत—पाणिनि-सूत्रांचा योग्य अर्थ लावून भाषेंतील सर्व शिष्टसंमत शब्द साधण्याकरितां वार्तिककाराला वार्तिकें करावीं लागलीं हें वर सांगितलेंच आहे. परंतु वार्तिकांची जोड देऊन व सूत्रार्थ योग्य प्रकारें करूनही कांहीं अडचणी आल्या. त्यांचें निवारण त्यानें कांहीं लोकसिद्ध न्याय व कांहीं शास्त्रसंकेत स्वीकारून केलें.[१४] या न्यायांची व शास्त्रसंकेतांची संख्या चाळिसाच्या वर भरते. यांनाच पुढें भाष्यकारानें 'परिभाषा' असें नांव दिलें. वार्तिककारानें या न्यायांची व संकेतांची सिद्धि किंवा उपपत्ति दिली नाहीं, पण भाष्यकारानें मात्र ज्ञापकें देऊन व योग्य तीं उदाहरणें देऊन त्यांची व्यवस्था लावली. भाष्यकारानें त्यांत पुढें आणखी भर घातली. नंतरचे वैयाकरण यांचा उपयोग करूं लागले व त्यावर परिभाषावृत्ति व परिभाषेंदुशेखर असे अनेक स्वतंत्र ग्रंथ झाले. त्यासंबंधीं विस्तृत विवेचन पुढें येईलच.

वार्तिकांवरून ऐतिहासिक संशोधन—पाणिनीचा काल ठरवितांना त्याच्या सूत्रांचा आधार घ्यावा लागला हें मागील एका प्रकरणांत दाखविलेंच आहे. सूत्रांबरोबर वार्तिकेंही मदतीला धावून आलीं ! कारण पाणिनि आणि कात्यायन या दोन कालखंडांत भाषेंत बराच बदल झाला होता. उदाहरणार्थ, पा. सू. अरण्यान्मनुष्ये। ४।२।१२९ यावरील 'पथ्यध्यायन्यायविहारमनुष्यहस्तिषु इति वाच्यम्'। किंवा 'इन्द्र-वरुणभवशर्व...।' ४।१।४९ या सूत्रावर 'यवनाल्लिप्याम्' हें वार्तिक घ्या, अथवा 'कम्बोजाल्लुक्'। ४।१।१७५ यावरील 'कम्बोजादिभ्य

---

१४. (१) पहा. विभक्तौ लिङ्गविशिष्टाग्रहणम्। (वार्तिक १३, पा. सू. ७।१।१ न वा विभक्तौ लिङ्गविशिष्टाग्रहणात्।

(२) अननुबन्धकग्रहणे न सानुबन्धकस्य। वा. २, सूत्र ४।१।१५

(३) प्रत्यवयवं च वाक्यपरिसमाप्तेः। वा. १२, सू. १।१।१

(४) कृद्ग्रहणे गतिकारकपूर्वस्यापि। वा. ९, सू. १।४।१३

(५) एकदेशविकृतस्यानन्यत्वात्। माहेश्वर सूत्र २, वा.

इति वक्तव्यम् ' ह्या वार्तिकांत कम्बोजादि गणांत कम्बोज, चोल, केरल, शक आणि यवन हे नवीन शब्द घातल्यानें कोणता ऐतिहासिक शोध लागला, हें पहिल्या प्रकरणांत सविस्तर दिलेलें असल्यानें येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. तूर्त वार्तिकांविषयीं इतकी माहिती दिली ती पुरी होईल असें वाटतें.

पतंजलि आणि त्याचें ' महाभाष्य '— आतांपावेतों गेल्या कांहीं प्रकरणांत सूत्रकार पाणिनि आणि वार्तिककार कात्यायन यांच्या व्याकरण-विषयक कृतीची स्थूलरूपानें माहिती सांगितली. त्यांच्यानंतर पतंजलीनें महाभाष्य रचून महत्त्वाची कामगिरी केली. व्याकरणशास्त्राला ' त्रिमुनिव्याकरणम् ' म्हणण्याची पद्धत आहे. हे तीन मुनि म्हणजे पाणिनि, कात्यायन आणि पतंजलि हे होत. यांच्या ग्रंथांना-विशेषतः महाभाष्याला-' आकर ' ग्रंथ म्हणण्याची वहिवाट आहे. महाभाष्यानंतर व्याकरणशास्त्राची वाढ करणारा ग्रंथ लिहिण्यांत आला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. नाहीं म्हणावयास भर्तृहरीनें आपल्या ' वाक्यपदीय ' ग्रंथांत अर्थांच्या विचाराची भर घालून व्याकरणशास्त्राला शास्त्राशिवाय दर्शनाचें स्वरूप दिलें. नंतरचे जे ग्रंथ झाले ते व्याख्यान, वृत्ति अथवा टीका या स्वरूपाचे झाले असें म्हणावयास हरकत नाहीं. पतंजलीच्या महाभाष्यानें पाणिनीय व्याकरणाचें स्थान कायम केलें, इतकेंच नव्हें तर इतर पूर्व व्याकरणांचें स्थान पूर्णपणें नाहींसें केलें. वार्तिकें मात्र कायम राहिलीं. कारण तीं पाणिनिसूत्रांचें विवेचन करणारीं असल्यानें व त्यांचेंच विवेचन मुख्यत्वानें महाभाष्यांत केलें असल्यानें त्यांना स्थायी स्वरूप मिळालें.

भाष्याचें स्वरूप—मागें सूत्र आणि वार्तिक यांच्या व्याख्या दिल्या. आतां महाभाष्याची व्याख्या खालीलप्रमाणें आहे.

सूत्रार्थो वर्ण्यते यत्र पदैः सूत्रानुकारिभिः ।
स्वपदानि च वर्ण्यन्ते भाष्यं भाष्यविदो विदुः ॥

अर्थ—सूत्रांतील शब्दांसारख्याच शब्दांनीं ज्या ठिकाणीं सूत्रांचा अर्थ दाखविला जातो आणि आपणच उच्चारलेल्या पदांचा म्हणजे

वाक्याचा अर्थ सांगितला जातो, त्याला ' भाष्य ' म्हणतात.[१५] पाणिनीच्या अष्टाध्यायीला जरी वार्तिकांनीं स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला तरी सर्व वार्तिकांचा संग्रह करून त्यांच्यावर पतंजलीनें गद्य स्वरूपांत व्याख्यान केलें. तरी पण महाभाष्य हा टीकाग्रंथ नाहीं. इतर शास्त्रावरील सूत्रांच्या मानानें पाणिनिसूत्रें बरींच स्पष्टार्थ असलीं तरी त्यांच्या लाघवयुक्त रचनेमुळें पाणिनीच्या मनांतील बरोबर अर्थ कळणें मध्यंतरीं अध्ययन-अध्यापनाची परंपरा लुप्त झाल्यामुळें दुरापास्त झालें ! बादरायणाच्या सूत्रांचें तसेंच होऊन त्यावर शंकर, रामानुज, मध्व, वल्लभ, श्रीकंठ, निंबार्क, भट्टभास्कर इत्यादींचीं भाष्यें झालीं व अर्थाचा कीस निघाला ! मूळ सूत्रें एकच पण त्यांतून निष्पन्न होणारे वेदान्तविषयक सिद्धान्त मात्र निरनिराळे ! पतंजलीनें मात्र सूत्रांचें जें विवेचन केलें तें इतकें मौलिक, इतकें परिपूर्ण, कीं त्याला दुसरी तोड नाहीं. पूर्वपक्षांत सर्व शंका मांडून सिद्धान्तपक्षीं त्यांना उत्तरपक्षांत उत्तर देण्यांत आलें आहे आणि तेंही अशा भाषाशैलींत कीं संस्कृत वाङ्मयांत शंकराचार्यांचें ' शारीरभाष्य ' सोडल्यास त्याला दुसरी उपमा नाहीं ![१६]

महाभाष्यानंतर अष्टाध्यायीवर इतर भाष्यें झालीं नाहींत, तर भाष्य-रचनेला बराच काळ लोटल्यानंतर भाष्य समजावून सांगण्यासाठीं इतर ग्रंथ झाले. त्यांत भर्तृहरीचा ' महाभाष्यप्रदीपिका ' हा सातव्या शतकांतील (इ. स. ६५०) ग्रंथ होय. अद्यापि हा ग्रंथ मुद्रितावस्थेंत नाहीं. याची हस्तलिखित प्रत जर्मनींत पेटीबंद असल्याचें डॉ. कीलहॉर्नच्या बोलण्यांत आलें. पुढें प्रा. का. वा. अभ्यंकर यांनीं त्याची फोटोफिल्मच्या साहाय्यानें प्रत करवून आणली व तिच्या मुद्रणाची व्यवस्था भांडारकर इंस्टिट्यूट करीत असल्याचें ऐकतों. त्यानंतर कैयटानें ' महाभाष्यप्रदीप '

---

१५. पहा—म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर कृत महाभाष्य [illegible].

१६. 'The style of his work is unparalleled in the whole range of Sānskrit Literature, only the Śarīra Bashya of Śankar being worthy of a mention by its side !'

'Systems of Sanskrit Grammar', p. 33.

ग्रंथ रचिला. कारण भर्तृहरीच्या दीपिकेलाही चार शतकें होऊन गेल्यामुळें ती दुर्बोध व दुर्मिळही झाली होती. या महाभाष्य प्रदीपावर पांचसहा शतकांनंतर नागेशभट्टानें 'प्रदीपोद्योत' लिहून 'प्रदीप' असूनही जो मंदावला होता त्याला या उद्योतानें पुन्हां उजळा आणला! आज महाभाष्य व त्याबरोबरच प्रदीप व त्यावर उद्योत अशी मुद्रित प्रत मिळूं शकते.

पतंजलीचा काल—सुदैवानें पतंजलीचा काल ठरविण्यास महाभाष्याचा अंतर्गत पुरावा भरभक्कम आहे. पा. सू. 'वर्तमाने लट्' ३।२।१२३ या सूत्रावर व्याख्यान करतांना सहजच त्या वेळीं घडलेल्या एका घटनेचा उल्लेख उदाहरण देतांना महाभाष्यांत आला आहे. तो असा 'इह पुष्यमित्रं याजयामः' तसाच एक दुसरा उल्लेख 'अनद्यतने लङ्' ३।२।११ यांतील अनद्यतन भूतकालाचें उदाहरण देतांना 'अरुणद् यवनः साकेतान्' असा महाभाष्यांत आला आहे. पहिल्या उदाहरणांत 'पुष्यमित्राकडून आम्ही यज्ञ करवितों' असा उल्लेख आहे, तर दुसऱ्यांत 'यवन राजानें (अयोनिअन्) अयोध्येला (साकेताला) वेढा दिला' असा आहे. या दोन्ही ऐतिहासिक घटना असून त्यांचा काल निश्चित आहे.[१७] यावरही कांहीं शंका आहेत. पुष्यमित्रानें यज्ञ केला तो गादीवर आला तेव्हां का कारकीर्दीच्या शेवटीं? कारण यामुळें कालांत थोडाफार फरक पडेलच. पण ग्रीकांनीं केव्हां स्वारी केली हें ग्रीक इतिहासांत नमूद असल्यानें पतंजलीचा काल निश्चित करतां येतो व तो वर दिल्याप्रमाणें आहे. मिनॅण्डर नांवाचा यवनराजा त्या वेळीं काबूल व पंजाब प्रांतावर राज्य करीत होता. त्यानें सुमारें इ. स. पू. १५० या वर्षीं अयोध्या नगरीला वेढा दिला, असा ग्रीक इतिहासांत उल्लेख आहे.[१८] दुसराही एक मौर्यकालीन उल्लेखाचा पुरावा पुढें आणतात, पण त्याच्या अर्थाबद्दल शंका आहे, व त्यामुळें कालाविषयींही पण आहे. 'मौर्यैर्हिरण्यार्थिभिरर्चाः (अर्चाः प्रतिमाः) प्रकल्पिताः' म्हणजे मौर्य-

---

१७. पहा.— 'India in the time of Patanjali' by Dr. Murti.

१८. 'Ancient History of India' by Vincent Smith, p. 204–205.

राजांना इतकें दारिद्य आलें होतें कीं, सोन्यासाठीं त्यांनीं सुवर्णाच्या मूर्ति विकावयास काढल्या ! हा उल्लेख महाभाष्यांत आला आहे. आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, मौर्यराजांना इतकी निकृष्टावस्था केव्हां आली होती? कांहीं असो. पतंजलीचा काल थोड्याफार फरकानें निश्चित करतां येतो.

नांव व जन्मस्थळ—एक ऋषि सूर्याला अर्घ्य देत असतां त्याच्या ओंजळींत महाभाष्यकर्ता पतंजलि पडला म्हणून 'पतंजलि' (पतत् + अंजलि) असें त्याचें नांव पडलें, अशी आख्यायिका सांगण्यांत येते.[१९] तो शेषाचा अवतार होता असेंही समजण्यांत येतें. त्याच्या उक्तीला 'फणिभाषित' असें त्यामुळें म्हणतात. 'गोणिकापुत्र' व 'गोनर्दीय' अशींही नांवें भाष्यकारानें स्वतःला उद्देशून भाष्यांत वापरलीं आहेत. त्यांपैकीं दाक्षीपुत्र म्हणजे जसा पाणिनि तसा गोणिकेचा पुत्र म्हणून पतंजलि. यावरून त्याच्या आईचें नांव 'गोणिका' होतें हें उघड आहे. गोनर्द देशांत राहणारा म्हणून गोनर्दीय नांव पडलें असावें. गोनर्द हा अयोध्या प्रांतांतील एक देश असावा असें कांहीं विद्वानांचें मत आहे. तर कांहीं म्हणतात कीं, गोनर्द देश हा हल्लींच्या पंजाब प्रांताचा एक भाग असून इरावतीच्या म्हणजे रावी नदीच्या पुष्कळ पूर्वेस असल्यानें त्याला 'प्राद्देश'ही म्हणत. कांहीं म्हणतात कीं, गोनर्द याचें प्राकृत रूप 'गोंड' होत असल्यानें तो गोंड देशांतला असावा. तें कांहीं असो. महाभाष्यांत गांधार, वाहीक वगैरे देशांतील बारीकसारीक खेडीं, गांवें, तलाव इत्यादिकांचे अनेक उल्लेख असल्यानें पतंजलीचें निवासस्थान, शिक्षण-पाठशाला रावी नदीच्या आसपास कोठें तरी असावींत हें निश्चित होतें. गोनर्दीय आणि गोणिकापुत्र हे वेगवेगळे ग्रंथकार होते असें डॉ. किल्हॉर्नचें मत आहे.[२०]

---

१९. 'पतंजलिचरितम्'

२०. It has been shown by Dr. Kielhorn that they are distinct authors, as such they are quoted by so early a writer as वात्स्यायन, the author of the Kāma-Sūtra. (कामसूत्र, पान ६७, काव्यमाला प्रत)

महाभाष्याची रचना— व्याकरण-महाभाष्य हें पाणिनिसूत्रांवर रचिलें असल्यानें अर्थातच सूत्रपाठाप्रमाणें त्याचे आठ अध्याय व प्रत्येक अध्यायाचे चार पाद असे विभाग पडतात. प्रत्येक पादांतील प्रतिपाद्य-विषयाचे प्रकरणात्मक भाग पाडून पतंजलीनें त्याचे पोटविभाग केले आहेत व त्यांना ' आह्निक ' असें नांव दिलें आहे. भाष्यांत एकंदर ८५ आह्निकें आहेत. ' आह्निक ' शब्दाची व्युत्पत्ति ' अह्ना निर्वृत्तम् ' अशी आहे.[२१] म्हणजे एका दिवसांत शिष्यांना जितका भाग शिकवून झाला तितक्या भागाला ' आह्निक ' म्हटलें तर ८५ दिवसांत भाष्य सांगून झालें किंवा लिहून झालें असें समजलें पाहिजे. त्यांपैकीं पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादाचीं नऊ आह्निकें असून त्या भागास 'नवाह्निकी' भाष्य म्हणतात. त्यांत पहिल्या आह्निकाला ' पस्पशाह्निक ' असें नांव भाष्यकारानें जरी दिलें नसलें तरी तें वैयाकरण-कुलांत प्रसिद्ध असून माघ कवीनें शिशुपालवध काव्यांत त्या शब्दाचा द्व्यर्थी उपयोग केला आहे.[२२] हें पस्पशाह्निक महाभाष्याच्या प्रस्तावना-स्वरूपाचें आहे व तें अत्यंत महत्त्वाचें आहे. त्यांत अष्टाध्यायीचा प्रतिपाद्य विषय कोणता याचा विचार केला असून, ' शब्दानुशासन ' हा प्रतिपाद्य विषय आहे अशी सुरुवात ' अथ शब्दानुशासनम् ' या पदांनीं केली आहे.

शाकुंतल नाटकाच्या गौरवपर जसा श्लोक आहे तशा शैलींत म्हणावयाचें असेल तर असें म्हणतां येईल कीं, शास्त्रांत प्रमुख शास्त्र व्याकरण, त्यांतही मुख्य पाणिनीची अष्टाध्यायी, त्यांत रम्य असणारें महाभाष्य व त्यांतही पहिलें पस्पशाह्निक.[२३] व्याकरणशास्त्र, अष्टाध्यायी, महाभाष्य व पस्पशाह्निक अशासारख्या रूक्ष विषयांना ' रम्य ' म्हणणारेही वेडेपीर या जगांत आहेत असें कोणी विनोदानें म्हटलें तर

२१. ' तेन निर्वृत्तम् ' । पा. सू. ५।१।७९

२२. अनुत्सूत्रपदन्यासा सद्वृत्तिः सन्निबन्धना ।
शब्दविद्येव नो भाति राजनीतिरपस्पशा ॥ (शिशुपालवध २।११२)

२३. शास्त्रेष्वाद्यं व्याकरणं मुख्यं तत्रापि पाणिनेः ।
रम्यं तत्र महाभाष्यं रम्या तत्रापि पस्पशा ॥

तें सत्याला सोडून होईल असें नाहीं. त्याचा अर्थ इतकाच कीं, व्याकरण विषयाची ज्यांना गोडी आहे त्यांच्यापुरतेंच वरील विधान सत्य समजावयाचें. त्यांनाच शब्द व अर्थ यांचें विश्लेषण रम्य वाटणार !

महाभाष्याची मूळ संहिता (Text)— मूळ महाभाष्याच्या संहितेबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत. राजतरंगिणी आणि वाक्यपदीय (काण्ड २, ४८४-९०) या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, त्या वेळीं भाष्याचें एकच हस्तलिखित उपलब्ध होतें व तेंही विकृत स्वरूपांत होतें. तें शुद्ध करून त्याच्यावरून पुढें अनेक हस्तलिखित प्रती तयार करण्यांत आल्या. ही प्रत काश्मीरांत उपलब्ध होती व त्या वेळीं राजा अभिमन्यु तेथें राज्य करीत होता. महाभाष्यांत पाणिनीच्या सर्व सूत्रांवर व्याख्यान नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. सर्व सूत्रांवर कां नाहीं याला चमत्कारिक उत्तर ' पातंजलचरितां 'त पाहावयास मिळतें ! तें असें कीं, त्या वेळीं वटवृक्षाच्या पानांवर कोरून लिहीत असत. सर्व सूत्रांवरच प्रथमतः भाष्य लिहून तयार झाल्यावर शिष्य तो पर्णभार घरीं घेऊन जात असतां जोराचा वारा सुटला. कांहीं पानें उडून गेलीं तर कांहीं अस्ताव्यस्त झालीं. दुसरी कथा सांगते कीं, एका वानरानें (वटदलपत्रग्रासलोलः) कांहीं पानें भक्षण केलीं ! वस्तुतः स्पष्टार्थ असलेल्या सूत्रांवर पतंजलीला भाष्य लिहिण्याची आवश्यकता वाटली नाहीं हेंच खरें, म्हणून या दंतकथांना कांहीं आधार नाहीं.

भाष्यकारांची लेखनशैली— याविषयीं थोडें दिग्दर्शन मागें केलेंच आहे. त्याचाच विस्तार येथें करण्यांत येत आहे. महाभाष्य ग्रंथाचा विषय कितीही गंभीर व समजण्यास कठीण असला तरी भाषा अत्यंत घरगुती, सुबोध व प्रसादयुक्त आहे. वाक्यपदीयकार भर्तृहरीनें ' अलब्धलाभे गांभीर्याद् उत्तान इव सौष्ठवात् ' असें त्या शैलीचें वर्णन केलें आहे. लोकांच्या दैनंदिन व्यवहारांत नसलेले शब्द महाभाष्यांत नाहींतच म्हटलें तरी चालेल. त्याचप्रमाणें लांबलचक समास व श्लिष्ट शब्दरचना यांनाही त्यांत स्थान नाहीं. त्या वेळीं पाली व प्राकृत भाषा बहुजनसमाजांत होत्या यांत शंकाच नाहीं. पण अभिजात वाङ्मय व विद्वान् लोकांचा विचार-

विनिमय याला आधार संस्कृत भाषेचाच होता. तात्पर्य, शिष्ट लोकांची ग्रांथिक भाषा संस्कृतच होती इतकेंच नव्हे तर बौद्ध व जैन पंडित आपले ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहीत असत. त्यांच्या धर्मांत वेदांना स्थान नसल्यानें वैदिक प्रक्रिया किंवा स्वरप्रक्रिया यांना त्यांच्या संस्कृत व्याकरणांत— उदाहरणार्थ जैनेंद्र, कातंत्र वगैरे—स्थान नाहीं. पतंजलीनें आपल्या लोकोत्तर बुद्धीनें, प्रतिभेनें व सर्वशास्त्राभ्यासानें त्या वेळच्या संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळविलें. नेहमींच्या व्यवहारांतील दृष्टांत देऊन खेळीमेळीच्या शैलींत त्यानें महाभाष्य ग्रंथ रचिला असल्यानें त्यांतील भाषा सहजसुंदर, सरल, अर्थपूर्ण व प्रसादयुक्त असणें अगदीं साहजिक आहे. म्हणून संस्कृत व्याकरणशास्त्रांत ज्याचा थोडाबहुत प्रवेश झाला आहे त्याला तें वाचतांना कष्ट पडत नाहींत व कंटाळा येत नाहीं. भाषेंत वक्तृत्वाचा ढंग आहे, संवाद आहेत. फार काय सांगावें ? मधून मधून विनोदयुक्त वाक्यें व लौकिक दृष्टान्त घातल्यानें वाचकांची जिज्ञासा कायम राहाते. कांहीं वाक्यें येथें उद्‌धृत केल्यास स्पष्ट होईल. ‘ किं वक्तव्यमेतत् । कथमनुच्यमानं गंस्यते, ’ किंवा ‘ अस्ति प्रयोजनमेतत् । कथं तर्हि । ’ हीं संवादवाक्यें आहेत. पूर्वोत्तरपक्ष मांडून ‘ यथा न दोषस्तथास्तु ’ असें म्हणून सिद्धान्त-पक्ष कोणता हें ठरविणें तो वाचकांवर सोंपवितो. कित्येक वेळीं ‘ यथान्या-समेवास्तु ’, असें म्हणून वार्तिककाराविरुद्ध पाणिनीला उचलून धरलें जातें, तर कांहीं वेळेला दोन्ही पक्ष मान्य असले तर ‘ उभयथा गोणिकापुत्रः ’ म्हणून पतंजलि मोकळा होतो. ‘ गोणिकापुत्रः ’ असा तृतीय पुरुषी उल्लेख पतंजलि स्वतःसाठींच करतो ! कांहीं प्रसंगीं नक्की निर्णय देतां येत नसेल तर देवांनाच याविषयीं खरें काय तें माहीत असेल (‘ देवा एव जानन्ति ’ किंवा ‘ देवा ज्ञातुमर्हन्ति ’) अशा तऱ्हेचें विनोदी उत्तर मिळतें !

विषयाची मांडणी—हें झालें पतंजलीच्या भाषाशैलीविषयीं. आतां विषयाच्या मांडणीबद्दल थोडें विवेचन केलें पाहिजे. भाष्यामध्यें इतर व्याकरण-ग्रंथाप्रमाणें वृत्ति, उदाहरणें व प्रत्युदाहरणें वगैरे कांहीं नाहीं, तर सूत्रांचें प्रयोजन सांगणें, सूत्रार्थ निश्चित करणें आणि अतिदेशानें सूत्रांची व्याप्ति वाढवून किंवा कमीहि करून सूत्रार्थाचें नियंत्रण करणें असे तीन

प्रकार त्याच्या व्याख्यानपद्धतीचे दिसतात. उदाहरणार्थ, 'किमुदाहरणम्, अयं योगः (सूत्रम्) शक्योऽवक्तुम्' असा सूत्राच्या विवेचनास आरंभ होतो व सूत्रांचें नियंत्रण करणें झाल्यास 'एवं कर्तव्यम्', 'इति वक्तव्यम्' किंवा 'इत्युपसंख्यानम्' या वाक्यांनीं आरंभ होतो.

पाणिनि व वार्तिककार कात्यायन यांत मतभेद झाला असतां पतंजलीचा कल पाणिनीला आदरभावानें 'भगवान् पाणिनि' म्हणून उचलून धरण्याकडे असतो व मतभेदच दाखवावयाचा झाल्यास 'एतदेकमाचार्यस्य मंगलार्थं मृष्यताम्' किंवा 'प्रमादकृतमाचार्यस्य शक्यमकर्तुम्' असा सौम्य शब्दांत तो दाखविला जातो !

पतंजलीविषयीं इतर माहिती — पतंजलि यानें अष्टाध्यायीवर महाभाष्य रचिलें त्याप्रमाणें त्यानें योगसूत्रेंही रचिलीं. तीं 'पातंजल योगसूत्रें' या नांवानें प्रसिद्ध आहेत. शिवाय कृष्णयजुर्वेदाच्या चरकसंहितेचा कर्ता चरक व पतंजलि हे एकच असावेत असें अनुमान आहे. महाभाष्याच्या आरंभीं 'शं नो देवीः' इत्यादि कृष्णयजुर्वेदाचें वाक्य घातलेलें असल्यामुळें पतंजलि हा कृष्णयजुर्वेदाच्या चरकशाखेचा असावा असें अनुमान निघतें. चरकशाखेचे अनुयायी साधारणतः आयुर्वेदज्ञ, मंत्रज्ञ व नागाचे उपासक असतात.[२४] तात्पर्य, पतंजलीनें वाग्दोष महाभाष्यानें, मनोदोष योगसूत्रांनीं व कायदोष चरकसंहितेनें घालविले असा या श्लोकाचा अर्थ आहे. यावर मॅक्समुल्लर अशी शंका काढतो[२५] कीं, परस्परभिन्न अशा विषयांवर एकच मनुष्य कसे ग्रंथ रचूं शकेल ! लासेन आणि गार्बे (Lassen and Garbe) या विद्वांनाना मात्र तशी

२४. शब्दानामनुशासनं विदधता पातञ्जले कुर्वता । वृत्तिं राजमृगाङ्कसंज्ञकमपि व्यातन्वता वैद्यके । वाक्चेतोवपुषां मलः फणिभृतां भर्त्रेव येनोद्धतः । तस्य श्रीरणरङ्गमल्लनृपतेर्वाचो जयन्त्युज्ज्वलाः ॥ (भोजकृत योगसूत्रावलि)

२५. 'Both Lasson and Garbe seem inclined to accept the identity of two Patañjalis, but this would force us to ascribe the most heterogeneous works to one and the same author.'
(Max Mullar)

प्रकार त्याच्या व्याख्यानपद्धतीचे दिसतात. उदाहरणार्थ, 'किमुदाहरणम्, अयं योगः (सूत्रम्) शक्योऽवक्तुम्' असा सूत्राच्या विवेचनास आरंभ होतो व सूत्रांचें नियंत्रण करणें झाल्यास 'एवं कर्तव्यम्', 'इति वक्तव्यम्' किंवा 'इत्युपसंख्यानम्' या वाक्यांनीं आरंभ होतो.

पाणिनि व वार्तिककार कात्यायन यांत मतभेद झाला असतां पतंजलीचा कल पाणिनीला आदरभावानें 'भगवान् पाणिनि' म्हणून उचलून धरण्याकडे असतो व मतभेदच दाखवावयाचा झाल्यास 'एतदेकमाचार्यस्य मंगलार्थं मृष्यताम्' किंवा 'प्रमादकृतमाचार्यस्य शक्यमकर्तुम्' असा सौम्य शब्दांत तो दाखविला जातो!

पतंजलीविषयीं इतर माहिती — पतंजलि यानें अष्टाध्यायीवर महाभाष्य रचिलें त्याप्रमाणें त्यानें योगसूत्रेंही रचिलीं. तीं 'पातंजल योगसूत्रें' या नांवानें प्रसिद्ध आहेत. शिवाय कृष्णयजुर्वेदाच्या चरकसंहितेचा कर्ता चरक व पतंजलि हे एकच असावेत असें अनुमान आहे. महाभाष्याच्या आरंभीं 'शं नो देवीः' इत्यादि कृष्णयजुर्वेदाचें वाक्य घातलेलें असल्यामुळें पतंजलि हा कृष्णयजुर्वेदाच्या चरकशाखेचा असावा असें अनुमान निघतें. चरकशाखेचे अनुयायी साधारणतः आयुर्वेदज्ञ, मंत्रज्ञ व नागाचे उपासक असतात.[२४] तात्पर्य, पतंजलीनें वाग्दोष महाभाष्यानें, मनोदोष योगसूत्रांनीं व कायदोष चरकसंहितेनें घालविले असा या श्लोकाचा अर्थ आहे. यावर मॅक्समुल्लर अशी शंका काढतो[२५] कीं, परस्परभिन्न अशा विषयांवर एकच मनुष्य कसे ग्रंथ रचूं शकेल? लासेन आणि गार्बे (Lassen and Garbe) या विद्वांनाना मात्र तशी

---

२४. शब्दानामनुशासनं विदधता पातञ्जले कुर्वता। वृत्तिं राजमृगाङ्कसंज्ञकमपि व्यातन्वता वैद्यके। वाक्चेतोवपुषां मलः फणिभृतां भर्त्रेव येनोद्धृतः। तस्य श्रीरणरङ्गमल्लनृपतेर्वाचो जयन्त्युज्ज्वलाः॥ (भोजकृत योगसूत्रावलि)

२५. 'Both Lasson and Garbe seem inclined to accept the identity of two Patañjalis, but this would force us to ascribe the most heterogeneous works to one and the same author.' (Max Mullar)

शंका आली नाहीं. कारण 'धीमतां न कश्चिदविषयो नाम' ही उक्ति प्रसिद्धच आहे. नागेशभट्टांनीं अनेक निरनिराळ्या विषयांवर चाळीस ग्रंथ नाहीं का लिहिले? अलीकडच्या काळांत लोकमान्य टिळक, इतिहासाचार्य राजवाडे हेही अष्टपैलू विद्वान् होऊन गेल्याचीं उदाहरणें आहेत. असो.

पतंजलीच्या वेळची समाजस्थिति किंवा भौगोलिक परिस्थिति इत्यादि विषय प्रस्तुत विषयाशीं फारसे संबद्ध नाहींत म्हणून त्यांच्या विवेचनाचें येथें कारण नाहीं. व्याकरशास्त्राच्या प्रगतीचेंच मूल्यमापन हें विशेषतः प्रस्तुत आहे.

भाष्यकाराचे व्याकरणविषयक कांहीं मौलिक सिद्धान्त:—

पाणिनीच्या अष्टाध्यायींत कात्यायनानें काय भर घातली हें मार्गें दाखविलेंच आहे. यांत पतंजलीनें काय प्रगति केली हें पाहणें झाल्यास त्यानें कोणते मौलिक सिद्धान्त मांडले हें पाहणें इष्ट असलें तरी ते थोडक्यांत करतां येणार नाहीं. त्यासाठीं वेगळा प्रबंधच लिहावा लागेल. तरीपण थोडक्यांत दिग्दर्शन करतां येईल. पहिला सिद्धान्त 'शब्द नित्य आहेत कीं अनित्य आहेत' या विषयाचा उपन्यास करून शब्द नित्य आहेत याकडे पतंजलीचा कल दिसून येतो. महाभाष्याची सुरुवात 'अथ शब्दानुशासनम्' अशी होत असली तरी विवेचनाचा प्रारंभ 'सिद्धे शब्दार्थसंबन्धे' या वार्तिकापासूनच होतो. त्यानंतर स्फोट व ध्वनि यांत फरक सांगून ध्वनि हा केवळ शब्दाचा गुण आहे, ध्वनीपेक्षां शब्द वेगळा असून तो स्फोटानें अभिव्यक्त होतो, ध्वनिरूप शब्द अनित्य असतो, तर अर्थप्रतिपादन करणारा नित्य शब्द स्फोटरूप असतो असें विवेचन आहे. त्यानंतर शब्दांचे प्रकार, त्यांचें प्रवृत्तिनिमित्तत्व, उपसर्ग व निपात यांना अर्थ आहे कीं ते निरर्थक आहेत, उपसर्ग हे द्योतक आहेत कीं वाचक आहेत, गुणवचन शब्द व द्रव्यवचन शब्द यांतील फरक, 'पदवाक्यप्रमाण' याचा खरा अर्थ (पद म्हणजे व्याकरण, वाक्य म्हणजे मीमांसा व प्रमाण म्हणजे तर्कशक्ति) इत्यादि अनेक मूलभूत विषयांचा पतंजलीनें ओघानें खल केला आहे.

—

८. पतंजलि ते कैय्यट

मागील चार प्रकरणांत पाणिनि, कात्यायन आणि पतंजलि या त्रिमुनिप्रणीत व्याकरशास्त्राचा विचार केला. वस्तुतः व्याकरणशास्त्राच्या इतिहासाचा येथें पहिला कालखंड संपला असून पतंजलीनंतर दुसऱ्या काल-खंडास सुरुवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. पतंजलीनें महाभाष्यांत जागोजागीं पाणिनीविषयीं फार गौरवाचे उद्गार काढले आहेत.[1]

पाणिनि-पूर्वकालीं व्याकरण 'शास्त्र' म्हणून नव्हतें. प्रातिशाख्यें व निरुक्त यांसारख्या ग्रंथांनीं तशी सुरुवात केली होती, पण पाणिनीनें त्याला शास्त्राचें स्वरूप दिलें व नंतर वार्तिककारानें व भाष्यकारानें तें पूर्णावस्थेस नेण्याचा प्रयत्न केला. हें जरी खरें असलें तरी पतंजलीनंतर पाणिनीय व्याकरणसंप्रदायाला खंड पडला. त्याचें असें झालें कीं, नंतरच्या कालांत बुद्धधर्माच्या प्रसारामुळें बोलभाषा प्रचारांत आल्या. याचा परिणाम असा झाला कीं, संस्कृत भाषेचें अध्ययन कमी कमी होऊं लागलें. अर्थात् तो पाणिनीय संस्कृत व्याकरणावरही झाला. ग्रंथनिर्मिति पाली व प्राकृत या लोकभाषांत होऊं लागली. बौद्ध आणि जैन पंडितांनीं पाणिनीच्या धर्तीवर चांद्र, जैनेंद्र, कातंत्र किंवा कालाप, पाली इत्यादि व्याकरणग्रंथ अनुक्रमें चंद्रगोमिन्, देवनन्दिन्, शर्ववर्मन् व वररुचि कात्यायन (वार्तिककार कात्यायन नव्हे) यांनीं रचिले.

दुसरें कारण असें कीं, पतंजलीनंतर अल्पावधींतच न्याय, वेदान्त, मीमांसा, सांख्य, योग इत्यादि दर्शनांवर अधिकृत भाष्यग्रंथ व टीकाग्रंथ लिहिले गेले. यांचें धार्मिक स्वरूप असल्यानें लोकांचें लक्ष व्याकरण-

---

१. (१) पाणिनीयम् महत् सुविहितम् । भाष्य ४।३।६६
(२) शोभना खलु पाणिनेः सूत्रस्य कृतिः । भाष्य २।३।६६
(३) यच्छब्द आह तदस्माकं प्रमाणम् । भाष्य २।१।१
(४) सर्ववेदपारिषदं हीदं शास्त्रम् । भाष्य २।१।६८
(५) आकुमारं यशः पाणिनेः । भाष्य १।४।८९

शास्त्रासारख्या रूक्ष विषयावरून मोक्षप्राप्तीकडे वळलें. अष्टाध्यायी हा वेदांगाचा एक भाग असल्यामुळें ती वैदिकांना तोंडपाठ होती. पण भाष्य मात्र जवळजवळ लुप्त झालें! मागें चवथ्या प्रकरणांत सांगितलेंच कीं, काश्मीरांत कशीबशी एक प्रत–तीही फार अशुद्ध–शिल्लक होती व पुढें तिच्यावरूनच सुधारून घेतलेल्या इतर हस्तलिखित प्रती तयार झाल्या!

तशांत शकांच्या (Scythians) स्वाऱ्या होऊं लागल्यानें राजकीय अस्वस्थता माजली. या सर्व कारणांमुळें पतंजलीनंतर पाणिनीय व्याकरण-संप्रदायाला कांहीं शतकें ओहोटी लागली. डॉ. बेलवलकर यासंबंधीं लिहितात, ' पतंजलि 's महाभाष्य for a time marked the highest point in the development of the science of grammar. So for as grammatical speculations go, the next three or four centuries-which coincided with the bloom of the classial Prakrit literature and which also witnessed the Scythian invasions on a large scale-are a perfect blank to us. (' Systems of Sanskit Grammar,' p. 31). असें जरी असलें तरी संस्कृत वाङ्मयाच्या दृष्टीनें गुप्तकालांतील सुवर्ण युगांत बुद्धधर्माच्या ऱ्हासास सुरुवात झाली असतां पाणिनीय व्याकरणाची कांहींच कशी प्रगति झाली नाहीं याविषयीं आश्चर्य वाटतें! त्याला सातवें शतक उजाडावें लागलें. या शतकाच्या जवळजवळ उत्तरार्धांत (इ. स. ६५१) भर्तृहरि आणि काशिकाकारांची (जयादित्य-वामन) जोडी यांनीं या शास्त्रांत महत्त्वाची भर घातली. हे तिघे जवळजवळ समकालीन होते.

भर्तृहरि—इत्सिंग या चिनी प्रवाशाच्या उल्लेखावरून भर्तृहरीचा काल इ. स. ६५१ असावा असें वाटतें. कारण इ. स. ६९१ च्या सुमारास त्यानें लिहिलेल्या प्रवासवृत्तान्तांत भर्तृहरीचा उल्लेख धर्मपाल या बौद्ध पंडिताबरोबर केला आहे. पण याविषयीं मतभेदाला जागा आहे. कारण बौद्धधर्मीय दिङ्नागाचार्यांनें भर्तृहरीच्या कांहीं कारिका उद्धृत केलेल्या असल्यानें तो त्यापूर्वी सहाव्या शतकांत होऊन गेलेला असावा असें कांहीं लोक मानतात. ' शतक 'त्रयाचा (शृंगार, नीति व

वैराग्य) कर्ता राजा भर्तृहरि व वैयाकरण भर्तृहरि हे एकच असावेत असें म्हणण्याला सबल पुरावा नाहीं. भर्तृहरीच्या नांवावर वाक्यपदीय, वाक्यपदीयवृत्ति (स्वोपज्ञ) व महाभाष्यप्रदीपिका असे तीन ग्रंथ आहेत. हे तिन्ही ग्रंथ एकाच भर्तृहरीनें लिहिले आहेत यांत संशय नाहीं. तो बौद्ध होता असा समज आहे. कारण वाक्यपदीय ग्रंथाच्या तिसऱ्या कांडाला त्यानें प-इ-ण म्हणजे 'प्रकीर्ण' असें नांव दिलें आहे. शिवाय वाक्यपदीय ग्रंथावर बौद्धदर्शनग्रंथाची व विचारसरणीची छाप दिसून येते. इत्सिंगनें तर तो बौद्धमतानुयायी होता असें स्पष्ट म्हटलें आहे. तरीपण त्यानें शब्दब्रह्माचा कंठरवानें पुरस्कार केला असल्यानें तो महामीमांसक गौडपादाप्रमाणें आस्तिक व अद्वैत वेदान्ताचा पुरस्कर्ता होता यांत शंका नाहीं.[२]

भर्तृहरीनें शब्दाद्वैताचें प्रतिपादन केलें. "पूर्ववैयाकरणांनीं घातलेल्या पायावर पाणिनीनें व्याकरणशास्त्राचें मंदिर बांधलें. त्या मंदिराचें सर्वांगपरिपूर्ण काम वार्तिककारानें केलें व भाष्यकारानें त्यावर कलाकुसरीचें काम करून त्याला सजावट देऊन कळस चढविला. पण त्या मंदिरांत मूर्तिस्थापनेचें काम व्हावयाचें होतें. तें भर्तृहरीनें शब्दब्रह्मरूप मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेनें उत्तम प्रकारें केलें."

ही मूर्तीची प्राणप्रतिष्ठा त्यानें कशी काय केली हें पहावयाचें आहे.

भर्तृहरीचा 'वाक्यपदीय'—भर्तृहरीनें लिहिलेल्या सर्व ग्रंथांमध्यें 'वाक्यपदीय' हा सर्वांत श्रेष्ठ समजला जातो. व्याकरणशास्त्राचें शब्दसिद्धि हें अंग विचारांत घेतल्यास महाभाष्य हा ग्रंथ सर्वांत श्रेष्ठ समजला जातो. त्याप्रमाणें शब्दार्थविवेचनाच्या बाबतींत 'वाक्यपदीय' ग्रंथ श्रेष्ठ आहे. कारण शब्दार्थाला खरा आरंभ या ग्रंथानेंच केला. आतांपावेतों शब्दसिद्धीवर सर्व लक्ष केंद्रित झालें होतें. हा ग्रंथ श्लोकबद्ध आहे.

ब्रह्मकाण्ड—या ग्रंथाचीं तीन कांडें हल्लीं उपलब्ध आहेत व मूळचाही हा ग्रंथ त्रिकाण्डात्मक असावा. पहिल्या काण्डाचें नांव

---

२. पहा:—'व्याकरण महाभाष्य, सातवा भाग,' पान ३७८ (प्रा. का. वा. अभ्यंकर कृत)

'ब्रह्मकाण्ड' असून त्यामध्यें शब्दाच्या स्वरूपाचा साकल्यानें विचार केला आहे. 'तत्त्वान्मोक्षः' या दर्शनग्रंथांतील मूलसिद्धान्तानुसार शब्द-तत्त्वज्ञानानें मोक्ष कसा मिळूं शकतो हें या काण्डांत सांगण्याचा प्रयत्न भर्तृहरीनें केला आहे. शब्द नित्य आहे व नित्य शब्द हेंच परब्रह्माचें स्वरूप आहे, हा सिद्धांत सांगून मोक्षप्राप्तीचा उपाय सांगितला आहे. तो आकलन करणें मात्र कठीण आहे! पण यामुळें व्याकरणशास्त्र हें केवळ शास्त्र न राहतां त्याला दर्शनाचें स्वरूप प्राप्त झालें. शास्त्र आणि दर्शन यांत हा फरक आहे कीं, दर्शन मोक्षाचा मार्ग व त्याचीं साधनें दाखवितें. तात्पर्य, भर्तृहरीचा हा ग्रंथ मीमांसेला व व्याकरणाला पूरक आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण या दोन शास्त्रांचा पदाशीं व वाक्याशीं संबंध येतो व त्यांचाच विचार वाक्यपदीयांत आहे. महाभाष्याच्या पस्पशाह्निकांत याचा थोडा विचार केलेला सांपडतो. त्यानंतर स्फोटाच्या स्वरूपाचें वर्णन करून तो शब्दानें म्हणजे ध्वनीनें कसा अभिव्यक्त होतो हें सांगितलें आहे. 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म' हें या ब्रह्मकाण्डाचें तात्पर्य आहे.

वाक्यकाण्ड—वाक्यपदीयाच्या दुसऱ्या काण्डाला 'वाक्यकाण्ड' असें नांव आहे. यांत स्फोटाच्या पोटभेदांचा विचार केला असून असा सिद्धान्त प्रस्थापित केला आहे कीं, वाक्याचा पूर्ण उच्चार झाल्याबरोबर पदसमूहाच्या अर्थापेक्षां निराळा एक संघटितार्थ प्रतिभाशक्तीमुळें मनांत उद्भूत होतो. या बाबतींत मीमांसक मत भर्तृहरीला मान्य नाहीं. त्यांच्या मतें पदांना स्वतंत्र अर्थ असतो व पदसमूहाचा जो अर्थ तोच वाक्यार्थ असतो. भर्तृहरि वर्णस्फोट, पदस्फोट इत्यादि आठ प्रकारच्या स्फोटांना गौण मानतो. वाक्यानें होणारा आन्तरस्फोट केवळ मनानें ग्रहण केला जातो. याशिवाय उपाधिरहित शब्दब्रह्मरूप एक स्फोट आहे. इतक्या खोल जाण्याचा हा प्रसंग नव्हे. यावर 'स्फोटवाद' नांवाचा स्वतंत्र ग्रंथ आहे तो पहावा.

प्रकीर्ण काण्ड— वाक्यपदीयाच्या तिसऱ्या काण्डाला 'प्रकीर्ण काण्ड' असें नांव आहे आणि तें अन्वर्थक आहे. कारण यांत अनेक

व्याकरणविषयांचें विवेचन आहे. भर्तृहरीनें या काण्डाचे चौदा भाग केले असून त्यांना 'समुद्देश' असें नांव दिलें आहे. या काण्डांत मुख्यतः पाणिनिसूत्रांच्या पाहिल्या पांच अध्यायांतील सूत्रांचा अर्थात्मक विचार आला आहे. त्यांतही तिसऱ्या अध्यायांतील कृद्वृत्तीविषयीं विचार नाहीं. पाणिनीच्या अष्टाध्यायीच्या शेवटच्या तीन अध्यायांत साधारणत: अंगांना व प्रत्ययांना होणारीं कार्यें व त्यांचें पौर्वापर्य यांचेंच विवेचन असल्यामुळें त्यांत फारसा अर्थविचार नाहीं, म्हणून भर्तृहरीनें त्यांचा विचार केला नसावा. या प्रकरणांत व्याकरणशास्त्राच्या प्रगतीचा स्थूलरूप विचार करावयाचा असल्यानें अधिक खोल शिरतां येत नाहीं.

वाक्यपदीयावर टीकाग्रंथ— भर्तृहरीला वैयाकरणकुलांत नुसतें ' हरि ' म्हणण्याचा प्रघात आहे. उदाहरणार्थ, ' तथापि हरिबद्धेन सारेण ग्रन्थसेतुना ' असा उल्लेख कैयटानें आपल्या महाभाष्यप्रदीपांत कृतज्ञतेनें केला आहे. भर्तृहरीनें वाक्यपदीयावर 'स्वोपज्ञ' वृत्ति लिहिली आहे पण ती दुर्लभ आहे. याशिवाय पुंजराज व हेलाराज यांनीं टीका लिहिल्या आहेत. अर्थगांभीर्ययुक्त सूत्रपद्धतीनें लिहिलेल्या कारिकांचें अर्थज्ञान होण्यास पुंजराजाची ' प्रकाश ' नांवाची टीका उपयुक्त आहे. पहिल्या कांडावर इतरही टीका आहेत, पण त्या अप्रकाशित आहेत.

पतंजलि आणि भर्तृहरि या दोहोंमध्यें सात-आठ शतकांचा काल गेला. या कालांत संस्कृत भाषेच्या दृष्टीनें कितीतरी फरक झाला असला पाहिजे तें आपण सुरुवातीला पाहिलेंच आहे. ज्ञानेश्वर आणि एकनाथ यांच्या कालांत तीन शतकांचें अंतर पडलें व मूळ ज्ञानेश्वरीची भाषा लोकांना समजेनाशी झाली, म्हणून एकनाथानें ती शुद्ध म्हणजे तत्कालीन भाषेच्या स्वरूपांत लिहून काढली. येथें तर पाणिनि—पतंजलींच्या कालाशीं तुलना करतां हें कालाचें अंतर फारच होतें ! मधल्या कालांत व्याकरणावर कांहीं ग्रंथ झालेही असतील व ते भर्तृहरीला माहीत असावेत, पण ते आज उपलब्ध नाहींत.

महाभाष्यदीपिका— वाक्यपदीय हा भर्तृहरीचा स्वतंत्र ग्रंथ आहे, तर ' महाभाष्यदीपिका ' हा भाष्यावर टीकाग्रंथ आहे. आज हा दुर्मिळ

आहे हें मागें सांगितलेंच आहे. बर्लिनच्या रॉयल लायब्ररीमध्यें त्याचें कांहीं भाग आहेत, असें प्रा. वा. रा. अभ्यंकर यांना कळल्यावरून त्याची एक फोटोफिल्म प्रत त्यांनीं तेथून मागविली. पुढें असें कळलें कीं, अडयारला एक प्रत आहे. पण ती बर्लिनच्याच प्रतीची नक्कल आहे असें दिसून आलें. या दोनही प्रती अत्यंत अशुद्ध असून त्या विषयांतल्या वाकबगारालासुद्धां त्या नीट शुद्ध करतां येत नाहींत. पण प्रयत्न चालू आहे. ही टीका महाभाष्यावर उपलब्ध असलेल्या टीकांपैकीं जुन्यांत जुनी आहे पण अपूर्ण आहे. गणरत्नमहोदधींत (श्लोक ३) म्हटलें आहे कीं, ही टीका तीन पादांपुरतीच आहे. मात्र या टीकेचे उल्लेख इतर ग्रंथांत सांपडतात. आज ही टीका सात आन्हिकांपावेतोंच आहे. पूर्वी स्वग्रंथांत इतर वैयाकरणांचा प्रत्यक्ष नांवानें निर्देश करण्याची पद्धत नव्हती तर 'इति केचिन्मन्यन्ते, अन्ये आहुः, अपरे वदन्ति' असे अप्रत्यक्ष उल्लेख असत, त्यामुळें ते कोणाला उद्देशून होते हें कळण्यास मार्ग नाहीं. कदाचित् तत्कालीन अभ्यासकांना ते ओळखूं येत असावेत. अजूनही तशी पद्धत अस्तित्वांत आहे. 'इति वृत्तिकारः' म्हणजे काशिकाकार; 'फणिभाषित' म्हणजे भाष्य किंवा भाष्यकारांचें वचन; 'ध्वान्त' मत म्हणजे मध्वाचार्यांचें मत. कारण 'मध्व' शब्द ध्वान्त आहे. महाभाष्यदीपिकेमध्यें असे अप्रत्यक्ष उल्लेख बरेच आहेत. हा गद्य ग्रंथ असून कांहीं ग्रंथकारांचा वाक्यकार (कात्यायन), संग्रहकार (व्याडि), वाजप्यायन वगैरेचा प्रत्यक्ष नामनिर्देश असून कांहीं प्राचीन ग्रंथांचाही उल्लेख सांपडतो. वाक्यपदीय व प्रस्तुत ग्रंथ यांत विचाराच्या दृष्टीनें साम्यस्थलें अनेक आहेत. यावरून हे दोनही ग्रंथ भर्तृहरीचेच आहेत हें स्पष्ट होतें.

'भागवृत्ति' नांवाचा एक ग्रंथ भर्तृहरीच्या नांवावर मोडतो, पण त्याला सबळ पुरावा नाहीं. कोणी म्हणतात तो विमलमतीचा असावा. हा ग्रंथ उपलब्ध नसला तरी त्याचे उल्लेख इतरत्र सांपडतात.[३]

३. 'काशिकाभागवृत्त्योश्चेत् सिद्धान्तं बोद्धुमस्ति धीः ।
तदा विचिन्त्यतां भ्रातः भाषावृत्तिरियं मम ॥
भाषावृत्ति (पुरुषोत्तमदेव कृत)

भर्तृहरीचें तत्त्वज्ञान— भर्तृहरीच्या सिद्धान्ताला 'स्फोटवाद' म्हणतात व त्याच्या दर्शनाला 'शब्दाद्वैत' म्हणतात. त्याच्या तत्त्वज्ञानांत शब्दोत्पत्तीचें बीज सांगितलें असून परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी हे वाणीचे चार प्रकार सांगितले आहेत. त्यांत वैखरी ही बाह्येंद्रियांना गम्य असली तर 'परा' ही आंतरसंवेदनानेंच कळते व तिनेंच पिंड-ब्रह्मांडीं भरलेल्या नादब्रह्मरूप शब्दाचें ज्ञान होऊन शेवटीं तें मोक्षाचें साधन बनतें.

काशिकावृत्ति—आतां आपण भर्तृहरीचे समकालीन 'काशिका' ग्रंथ रचणारे जयादित्य व वामन यांच्याकडे वळूं. काशिका ग्रंथाचें कर्तृत्व जयादित्य व वामन या दोघांकडे आहे असें सर्वसाधारण मत आहे. त्यांत पहिल्या पांच अध्यायांवर जयादित्यानें वृत्ति लिहिली असून पुढील तीन अध्यायांवर वामनानें लिहिली असा समज आहे. उल्लेख करतांना इतर ग्रंथांत 'इति वृत्तिकारः' असा एकवचनीच उल्लेख येतो. इत्सिंग हा चिनी प्रवासी वृत्तिसूत्रांचा कर्ता जयादित्य होता असें म्हणतो. त्यानें आपल्या प्रवासवर्णनांत जयादित्य इ. स. ६६१ मध्यें निवर्तला असें म्हटलें आहे. वामनानेंच काशिकावृत्ति रचिली असा उल्लेख भाषावृत्ती-मध्यें पुरुषोत्तमदेवानें केला आहे.[४] पण इतरत्र जयादित्याचाच उल्लेख आढळतो.

'काशिका' हें नांव या अष्टाध्यायी ग्रंथावरच्या वृत्तीस पडण्याचें कारण कीं, हा ग्रंथ काशीनगरींत लिहिला गेला. भर्तृहरीच्या वाक्यपदीय ग्रंथानंतर या ग्रंथाची रचना झाली. असें म्हणण्याचें कारण कीं, काशिकेंत पा. सू. ४-३-८८ यांत 'वाक्यपदीय' ग्रंथाचा उल्लेख आहे. भट्टोजी दीक्षितानें प्रौढमनोरमेंत पा. सू. ५-४-४२ वर लिहितांना दोघांचा वेगवेगळा उल्लेख केला आहे.[५]

---

४. बोपदेवमहाग्राहग्रस्तो वामनदिग्गजः। कीर्तेरेवप्रसंगेन माधवेन विमोचितः॥ (पुरुषोत्तमदेव)

५. 'एतत् सर्वं जयादित्यमतेनोक्तम्। वामनस्त्वाह...' (प्रौढमनोरमा, पा. सू. ५।४।४२)

जयादित्य व वामन यांच्यासंबंधीं वैयक्तिक अशी कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. मात्र अंतर्गत पुराव्यावरून ते बौद्धमतानुयायी होते असें दिसतें. उदाहरणार्थ, पा. सूत्र १-१-३६ वर वृत्ति लिहितांना त्यांनीं लोकायतिकांचा स्पष्ट उल्लेख केला आहे.[६]

इतर उदाहरणें देतांना सुद्धां त्यांचा कल बौद्धमताकडे दिसतो. ग्रंथाचा प्रारंभ करतांना प्राचीन वैदिक परंपरेप्रमाणें ते मंगलानें प्रारंभ करीत नाहींत. शिवाय कांहीं ठिकाणीं भाष्यकाराच्या रचनेविरुद्धही त्यानें आपलें मत दिलें असलें तरी पाणिनीबद्दल त्याला आदर होता हें कांहीं ठिकाणच्या उद्गारांवरून दिसतें.[७]

' काशिका ' ग्रंथ उपयुक्त असला तरी बौद्धमतानुयायित्वामुळें म्हणा किंवा भाष्यकाराबद्दल थोडी अनादराची भावना असल्यामुळें म्हणा, हा ग्रंथ वैयाकरणांना फारसा मान्य झाला नाहीं. काशिकाकारांनीं पाणिनीच्या सूत्रांतहि ढवळाढवळ केली असून मूळ संहितेंत वीस एक सूत्रें नवीं घातल्यानें व कांहीं सूत्रांमधून वार्तिकांतले शब्द घुसडल्यानें पाणिनीच्या अष्टाध्यायीचें पावित्र्य त्यानें घालविलें अशीहि समजूत असावी. अष्टाध्यायीला वैदिक परंपरेप्रमाणें वेदाङ्ग समजण्यांत येतें तर काशिकाकार बौद्धमताचे असल्यानें त्यांना तें पावित्र्य मान्य नसावें म्हणून सूत्रांत ढवळाढवळ करण्यांत ते ' पाप ' समजत नसावेत.

या सर्व कारणांमुळें भट्टोजीचा ' सिद्धान्तकौमुदी ' हा प्रक्रिया-ग्रंथ रचला गेल्यानंतर ' काशिका ' ग्रंथ मागें पडला. निदान महाराष्ट्रांत तरी मागें पडला व कोणत्याही पाठशाळेंत तो शिकविला जात असल्याचें ऐकिवांत नाहीं.

---

६. ' चार्वी बुद्धिः। तत्संबंधादाचार्योऽपि चार्वी। स लोकायते शास्त्रे पदार्थान् नयते। उपपत्तिभिः स्थिरीकृत्य शिष्येभ्यः प्रापयति। युक्तिभिः स्थाप्यमानाः संभाविताः पूजिता भवन्ति '। काशिका, पा. सू. १।३।३६

७. ' पाणिनिशब्दो लोके प्रकाशते। ' काशिका, पा. सू. २।१।६
' महती सूक्ष्मेक्षिका वर्तते सूत्रकारस्य। ' काशिका, पा. सू. ७।१।७४

काशिका-ग्रंथ हा अष्टाध्यायींतील सूत्रांवर क्रमवार वृत्ति लिहिलेला ग्रंथ आहे. अष्टाध्यायीचें खरें स्वरूप कळण्यास काशिकेचें अध्ययन उपयोगी आहे इतकेंच नव्हें तर अत्यावश्यक आहे. कारण त्याशिवाय अनुवृत्ति, अधिकार, लाघव वगैरे पाणिनीय तंत्र कदापि लक्षांत येणार नाहीं.[८] प्रत्येक सूत्राचा अर्थ, सूत्रांतील शब्दांचा स्पष्टार्थ करून उदाहरणें व प्रत्युदाहरणें देऊन स्पष्ट केला आहे. एखादें उदाहरण देऊन काम भागलें असें होत नाहीं. कांहीं माहिती जी अन्यत्र मिळाली नसती ती काशिकेंत मिळते. उदा० पा. सू. ७-३-९५ वरच्या वृत्तींत त्यानें 'आपिशलिविधि' दिला आहे.[९] त्याचप्रमाणें पा. सू. ७-२-१७ वर महाभाष्यांत न दिलेलें सौनागांचें वार्तिक दिलें आहे. पूर्वीच्या चांद्र व्याकरणांतून काशिकेंत कांहीं भाग घेतला आहे. उदा० 'वेणुकादिभ्यच्छण् वक्तव्यः' हें वार्तिक चांद्र व्याकरणांतील ३-२-६१ सूत्र आहे. अशीं अनेक उदाहरणें लीबिश (Liebuich) नें चांद्र व्याकरणाच्या प्रतींत दिलीं आहेत.

'काशिका' वरील टीकाग्रंथ— काशिकावृत्तीवर आठव्या शतकांत (इ. स. ७५०) जिनेंद्रबुद्धि यानें 'काशिकाविवरणपञ्जिका' किंवा 'न्यास' व बाराव्या शतकांत (सन ११००) हरदत्त या महापंडितानें 'पदमञ्जरी' नांवाची टीका लिहिली. आज या दोन्ही टीका मुद्रित अवस्थेत उपलब्ध आहेत. जिनेंद्रबुद्धि स्वतःला श्रीबोधिसत्व देशीयाचार्य म्हणवीत असे. यावरून तो बौद्धधर्मानुयायी होता हें उघड आहे. एका सूचींत त्याचें नांव स्थविरजिनेंद्र असेंही सापडतें. भामहानें जिनेंद्रबुद्धीच्या न्यासाचा उल्लेख केला असल्यानें त्याला इ. स. ७५० च्या अलीकडे आणतां येत नाहीं. जिनेंद्रबुद्धीनें काशिकेंतील प्रतीकें घेऊन त्यांवर क्रमानें टीका

---

८. 'The Kāśikā is a running commentary on Pāṇini's अष्टाध्यायी, and its merit consists in the lucid manner in which it has explained the Sūtras of Paṇini clearly indicating all the अनुवृत्तिs and giving numerous illustrations for each rule.'

'Systems of Sanskrit Grammar,' p. 37.

९. 'आपिशलास्तुरुस्तुशम्यमः सार्वधातुकासु छन्दसीति पठन्ति।

काशिका-ग्रंथ हा अष्टाध्यायींतील सूत्रांवर क्रमवार वृत्ति लिहिलेला ग्रंथ आहे. अष्टाध्यायीचें खरें स्वरूप कळण्यास काशिकेचें अध्ययन उपयोगी आहे इतकेंच नव्हे तर अत्यावश्यक आहे. कारण त्याशिवाय अनुवृत्ति, अधिकार, लाघव वगैरे पाणिनीय तंत्र कदापि लक्षांत येणार नाहीं.[८] प्रत्येक सूत्राचा अर्थ, सूत्रांतील शब्दांचा स्पष्टार्थ करून उदाहरणें व प्रत्युदाहरणें देऊन स्पष्ट केला आहे. एखादें उदाहरण देऊन काम भागलें असें होत नाहीं. कांहीं माहिती जी अन्यत्र मिळाली नसती ती काशिकेंत मिळते. उदा० पा. सू. ७-३-९५ वरच्या वृत्तींत त्यानें 'आपिशलिविधि' दिला आहे.[९] त्याचप्रमाणें पा. सू. ७-२-१७ वर महाभाष्यांत न दिलेलें सौनागांचें वार्तिक दिलें आहे. पूर्वीच्या चांद्र व्याकरणांतून काशिकेंत कांहीं भाग घेतला आहे. उदा० 'वेणुकादिभ्यच्छण् वक्तव्यः' हें वार्तिक चांद्र व्याकरणांतील ३-२-६१ सूत्र आहे. अशीं अनेक उदाहरणें लीबिश (Liebuich) नें चांद्र व्याकरणाच्या प्रतींत दिलीं आहेत.

'काशिका' वरील टीकाग्रंथ— काशिकावृत्तीवर आठव्या शतकांत (इ. स. ७५०) जिनेंद्रबुद्धि यानें 'काशिकाविवरणपञ्जिका' किंवा 'न्यास' व बाराव्या शतकांत (सन ११००) हरदत्त या महापंडितानें 'पदमञ्जरी' नांवाची टीका लिहिली. आज या दोन्ही टीका मुद्रित अवस्थेत उपलब्ध आहेत. जिनेंद्रबुद्धि स्वतःला श्रीबोधिसत्व देशीयाचार्य म्हणवीत असे. यावरून तो बौद्धधर्मानुयायी होता हें उघड आहे. एका सूचींत त्याचें नांव स्थविरजिनेंद्र असेंही सापडतें. भामहानें जिनेंद्रबुद्धीच्या न्यासाचा उल्लेख केला असल्यानें त्याला इ. स. ७५० च्या अलीकडे आणतां येत नाहीं. जिनेंद्रबुद्धीनें काशिकेंतील प्रतीकें घेऊन त्यांवर क्रमानें टीका

---

८. 'The Kāśikā is a running commentary on Pāṇini's अष्टाध्यायी, and its merit consists in the lucid manner in which it has explained the Sūtras of Paṇini clearly indicating all the अनुवृत्तिs and giving numerous illustrations for each rule.'

'Systems of Sanskrit Grammar,' p. 37.

९. 'आपिशलास्तुरुस्तुशम्यमः सार्वधातुकासु छन्दसीति पठन्ति।

लिहिली आहे. आणि असें करीत असतांना अद्ययावत्–म्हणजे त्याच्या कालापावेतों माहीत झालेली–माहिती त्यानें आपल्या टीकेंत ग्रथित केली आहे.[१०]

पदमंजरीकार हरदत्त हा पद्मकुमार किंवा रुद्रकुमार याचा मुलगा आणि अग्निकुमाराचा धाकटा बंधु. तो बहुतेक तामिळ देशांतील असावा. कारण त्या भाषेंतील 'कूचिमंची' हा शब्द त्यानें उपयोजिला आहे असें शेषगिरीशास्त्री यांचें मत आहे,[११] पण हें कारण फार फसवें आहे. असे शब्द दुसरा कोणीही वापरूं शकेल! पदमंजरीचा उल्लेख माधवीय धातुवृत्तींत असून मल्लिनाथानेंही केला आहे. खुद्द पदमंजरींत 'माघ' ३।७४ आणि 'किरात' २।३५ यांचा उल्लेख आहे. जिनेंद्रबुद्धीच्या 'न्यास' टीकेवर पुनः अनेक टीका झाल्या. वास्तविक 'न्यास' हा शब्द विशेषनाम नसून सामान्यनाम आहे. जिनेंद्रबुद्धीच्या 'न्यास' टीकेपूर्वीही अनेक न्यास होते. भामहानें न्यासाचा उल्लेख केला आहे त्याप्रमाणें माघकवीनेंही केला आहे; पण तो कोणता 'न्यास' हें सांगतां येत नाहीं म्हणून त्यावरून काढलेलें अनुमान बरोबर असेलच असें म्हणतां येत नाहीं.[१२]

प्रस्तुत न्यासावर मैत्रेयरक्षितानें बाराव्या शतकाच्या प्रारंभीं 'तंत्रप्रदीप' नांवाची टीका लिहिली व म. म. मल्लिनाथ यानें चौदाव्या शतकाच्या प्रारंभीं 'न्यासोद्योत' नांवाची टीका लिहिली. मैत्रेयाच्या तंत्रप्रदीपावर पुनः 'उद्योतप्रभा' व 'आलोक' या टीका लिहिल्या गेल्या. इंदुमित्र या पंडितानें न्यासावर 'अनुन्यास' नांवाचा ग्रंथ लिहिला. इतक्या जरी न्यासावर टीका झाल्या तरी तीनचार शतकांनंतर हरदत्ताच्या पदमंजरीनें हे सर्व ग्रंथ मागे टाकले! कदाचित् हे सर्व टीकाकार बौद्ध मतानुयायी

१०. अन्यतः सारमादाय कृतैषा काशिका यथा। वृत्तिस्तस्या यथाशक्ति क्रियते पञ्जिका तथा॥

११. Report on the search of Sanskrit and Tamil Mss. for 1893-94 Madras No. 2.

१२. Vide 'Systems of Sanskrit Grammar,' p. 39.

असावेत व एकदा बौद्धमत व बौद्धधर्म यांचा ऱ्हास होऊं लागल्याबरोबर ते ग्रंथही मागें पडले ! तात्पर्य, एका काशिका ग्रंथावर जणूं काय टीकांचें जाळेंच विणलें गेलें व त्यांत अडकल्यावर मूळ ग्रंथ एका बाजूला राहून जातो !

हरदत्ताची कामगिरी— वास्तविक कैयटानंतर हरदत्ताचा काल आहे. पण काशिका ग्रंथ पूर्वींचा असल्यानें व त्यावर हरदत्तानें पदमंजरी टीका रचली असल्यानें हरदत्ताला या लेखांत अगोदर स्थान दिलें गेलें. कैयटाच्या महाभाष्यप्रदीपानंतर पदमंजरीचा काल आहे कारण त्यांत प्रदीपाचा उल्लेख आहे. उदाहरणार्थ, पा. सू. 'प्रशंसावचनैश्च' २-१-६६ किंवा 'कुमारः श्रमणादिभिः'। २-१-७० यांवरील प्रदीप आणि पदमंजरी या दोहोंची तुलना करितां वरील म्हणण्याची सत्यता पटेल.

हरदत्त विद्वान् होता खरा परंतु तसाच अहंमन्यही होता. त्याच्या ग्रंथांतून त्याची दर्पोक्ति ठायीं ठायीं दिसून येते. अगदीं ग्रंथारंभींच 'दहाही दिशांना विश्रुत असलेला हरदत्त नांवाचा बुद्धिमान् ग्रंथकार' असा त्यानें स्वतःविषयीं उल्लेख केला आहे.[१३] व पुढें म्हणतो कीं "शब्दशास्त्ररूपी आम्रवृक्षापासून त्यानें ही 'मंजरी' खुडून काढली !" किंवा 'काशिकेवर शेकडों टीका आहेत पण माझीच हृदयंगम आहे !'[१४] भाष्य मला एकट्याला कळलें आहे अशीहि बढाई मारतो.[१५] त्याचप्रमाणें 'व्याकरणप्रक्रियारूपी वनांत स्वैरसंचार करणारा सिंह' असें त्यानें

१३. 'यश्चिराय हरदत्तसंज्ञया विश्रुतो दशसु दिक्षु दक्षिणः।
उज्जहार पदमञ्जरीमसौ शब्दशास्त्रसहकारपादपात्'॥ (Introductory Stanza.)

१४. अविचारितरमणीयं कामं व्याख्याशतं भवतु वृत्तेः।
हृदयंगमा भविष्यति गुणगृह्याणामियं व्याख्या॥

१५. एवं प्रकारितोऽस्माभिर्भाष्ये परिचयः परः। तस्य निःशेषितो मन्ये प्रतिपत्तापि दुर्लभः॥

स्वतःला म्हटलें आहे.[१६] महाभाष्याचें अध्ययन केल्याशिवाय माझी पदमंजरी वाचणें वृथा होय. (माझी पदमंजरी भाष्यापेक्षां श्रेष्ठ होय हा भावार्थ.) तर त्याला टोला देण्यासाठीं दुसऱ्या एकानें म्हटलें कीं, महाभाष्याचें अध्ययन केल्यानंतर 'पदमंजरी' वृथा आहे. हा भावार्थ खालील श्लोकांत दिसून येतो.

अनधीते महाभाष्ये व्यर्था सा पदमञ्जरी ।
अधीते हि महाभाष्ये व्यर्था सा पदमञ्जरी ॥

वास्तविक विद्या विनयानें शोभते. कालिदासासारखा महाकवि विनयानें म्हणतो कीं, 'विद्वानांचें समाधान झाल्याशिवाय माझ्या कृतीला मी चांगलें म्हणणार नाहीं.' ही विनयोक्ति कोणीकडे व हरदत्ताची वरील दर्पोक्ति कोणीकडे! पण इतकें मात्र खरें कीं पाणिनीय व्याकरणसंप्रदायाला त्यानें दक्षिणेकडील देशामध्यें स्थिरता आणून दिली.

कैयटभट्ट—आतांपावेतों आपण असें पाहिलें कीं भर्तृहरीनें महाभाष्याचें पुनरुज्जीवन केलें व काशिकाकारांनीं महाभाष्याचें अध्ययनास लागणारी पूर्वतयारी व शास्त्रीय व्युत्पत्ति देण्याचें साधन तयार केलें. तरी पण महाभाष्य होऊन अनेक शतकें झालीं होतीं व त्यावर भर्तृहरीची महाभाष्यदीपिका ही टीकाही दुर्बोध झाली. आतां कैयटानें महाभाष्यावर 'प्रदीप' टीका रचून महाभाष्याच्या पांक्त अध्यायनाला बहुमोल मदत केली व स्थिरता आणली.

मधल्या काळांत चांद्र, कातंत्र, जैनेंद्र व्याकरणें लिहिलीं गेलीं व त्यावर वर्धमान, जिनप्रभ इत्यादि पंडितांनी टीकाग्रंथही लिहिले. परंतु वरील व्याकरणें अपाणिनीय होतीं. पाणिनिसूत्रावरही पुरुषोत्तमदेव यानें भाषावृत्ति व मैत्रेयरक्षित वगैरेनीं अष्टाध्यायीवर वृत्तिग्रंथ लिहिले. याच कालखंडांत भोजदेव, हेमचंद्र, वोपदेव यांनीं पाणिनिव्याकरणासारखींच सुबोध व्याकरणें लिहिलीं व भर्तृहरीच्या वाक्यपदीय ग्रंथावर टीका

१६. प्रक्रियातर्कगहनप्रविष्टो हृष्टमानसः । हरदत्तहरिः स्वैरं विहरन् केन वार्यते ॥

लिहिणारे पुंजराज (पुष्पराज) व हेलाराज याच कालांत झाले. तात्पर्य, कैयटानें आपला ' प्रदीप ' ग्रंथ लिहिला त्या वेळीं इतर बरीच सामग्री उपलब्ध होती. इतकी सामग्री होती तरी महाभाष्याध्ययनाकडे दुर्लक्ष होतें. पण कैयटभट्टांच्या ' प्रदीप ' ग्रंथानें नांवाप्रमाणें खरोखरीच पतंजलीच्या गूढ अभिप्रायावर प्रकाश पाडला. कैयटाचा प्रदीप नसता तर कित्येक ठिकाणीं महाभाष्य दुर्बोध राहिलें असतें. त्यांत भाष्यकारांनीं नुसत्या उल्लेख केलेल्या किंवा थोडक्यांत प्रतिपादन केलेल्या सिद्धान्तांचें त्यानें मुद्देसूद विवरण केलें. कैयटानें भर्तृहरीच्या ग्रंथांचा चांगलाच उपयोग केला आहे कारण ते सर्व त्याला उपलब्ध होते. भाष्याध्ययनानें व्याकरणशास्त्रावर प्रभुत्व मिळवितां येत असलें तर प्रदीपाध्ययनानें पाण्डित्य मिळवितां येतें. प्रदीपाला पुढें ग्रंथकर्त्यांचेंच नांव पडलें. जसें शेक्स्पियर (शेक्स्-पियरच्या नाटकांऐवजीं) वाचला का म्हणण्याची चाल आहे तद्वतच ' कैयट ' (प्रदीपाऐवजीं) काय म्हणतो असें म्हणतात. उदाहरणार्थ, ' तदुक्तं भाष्यकैयटयोः ' (प्रदीपयोः) असें म्हणतात.

कैयटाच्या प्रदीपावर पुनः चिंतामणि, रामचंद्र सरस्वती, नारायण, नागेश वगैरेंनीं टीका लिहिल्या व त्यांत नागेशाचा ' उद्योत ' च श्रेष्ठ आहे. त्याचें नांवच ' प्रदीपोद्योत ' असें आहे. महाभाष्याचा मराठी अनुवाद करतांना कै. म. म. वासुदेवशास्त्री यांनीं वरील दोन टीकांचाच अधिकांत अधिक उपयोग केला आहे.

कैयटाचा काल—त्याच्या नांवावरूनच तो काश्मीरी पंडित असावा. काश्मीरी पंडितांमध्यें कैयट, रुद्रट , मंमट, उव्वट, जैय्यट, वज्रट अशीं टकारान्त नांवें आढळतात. त्याच्या पित्याचें नांव जैय्यट[१७] असून आडनांव उपाध्याय होतें. मंमटाच्या काव्यप्रकाशावर टीका लिहिणारा भीमसेन (सन १७२२) म्हणतो कीं कैयट आणि उव्वट हे मंमटाचे

---

१७. महाभाष्यार्णवावारपारीणं विवृतिप्लवम् ।
यथागमं विहास्येऽहं कैयटो जैय्यटात्मजः ॥ ' प्रदीप ' प्रस्तावना.

शिष्य होते, इतकेंच न्हे तर ते मंमटाचे धाकटे बंधु होते.[१८] परंतु हें तितकेंसें बरोबर दिसत नाहीं. मंमट हा साहित्यशास्त्र जाणणारा होता तसा वैयाकरणही होता. त्याचा काल सामान्यपणें इ. स. ११०० समजला जातो. कैयटाचा उल्लेख सर्वदर्शनसंग्रहांत (सामान्यपणें इ. स. १३००) आढळतो.

कैयट स्वतः प्रस्तावनेंत म्हणतो कीं, हरीच्या (भर्तृहरीच्या) ग्रंथरूपी सेतूचा अवलंब करून महाभाष्यरूपी सागराच्या पार होण्याचा प्रयत्न एखाद्या पांगळ्या माणसाप्रमाणें मीं केला आहे.[१९] यावरून भर्तृहरीचे 'महाभाष्यदीपिका' व 'वाक्यपदीय' हे ग्रंथ कैयटाच्या समोर असले पाहिजेत.

या कालखंडांत महाभाष्यावरही अनेक विद्वानांनीं अनेक टीकाग्रंथ लिहिले. यांपैकीं **पुरुषोत्तमदेव** व **मैत्रेयरक्षित** यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. पुरुषोत्तमदेवानें व्याकरणशास्त्रावर कारककारिका, दुर्घटवृत्ति, भाषावृत्ति, उणादिवृत्ति, ज्ञापकसमुच्चय वगैरे अनेक उपयुक्त ग्रंथ लिहिले आहेत. वंगदेशचा राजा लक्ष्मणसेन यानें सांगितल्यावरून पुरुषोत्तमदेवानें 'भाषावृत्ति' हा ग्रंथ लिहिला. मैत्रेयरक्षितानें 'महा-भाष्यलघुवृत्ति' नांवाचा महाभाष्यावर विवेचनात्मक ग्रंथ लिहिला व विशिष्ट पाणिनिसूत्रांचीं अवतरणें घेऊन त्यांनीं साधल्या जाणाऱ्या कठीण रूपांची सिद्धि करणारा 'धातुप्रदीप' नांवाचा ग्रंथ लिहिला. मैत्रेय-रक्षिताचा उल्लेख पुढील ग्रंथांत 'रक्षित' या नांवानें सांपडतो. **शरण-देवानें** याच काळांत 'दुर्घटवृत्ति' लिहून साधण्यास कठीण अशा रूपांचीं सिद्धि करून दाखविली आहे.

भोजदेवाचें सरस्वतीकंठाभरण— साधारणपणें अकराव्या शतकांत

१८. श्रीमान् कैयट औवटो ह्यवरजो यच्छात्रतामागतो भाष्याब्धि निगमं यथाक्रममनुव्याख्याय सिद्धिं गतः। (भीमसेन)

१९. तथापि हरिबद्धेन सारेण ग्रन्थसेतुना।
क्रममाणः शनैः पारं तस्य प्राप्तोऽस्मि पङ्गुवत्॥ 'प्रदीप' प्रस्तावना.

धारानगरीच्या भोजराजानें 'सरस्वतीकण्ठाभरण' नांवाचें व्याकरण लिहून त्यावर वृत्ति लिहिली. हें व्याकरण पाणिनिसूत्रांवर आधारलेलें असून त्याचे आठ अध्याय आहेत. 'सिद्धिः क्रियादेः लोकात्' हें पहिलें सूत्र आहे. त्याचप्रमाणें 'भवादिः क्रियावचनो धातुः' हें दुसरें सूत्र आहे. पाणिनीचीं सूत्रें घेतलीं असलीं तरी त्यांत बरेच फेरफार त्यानें केले आहेत. अध्यायक्रम पाणिनीप्रमाणें असला तरी सूत्रक्रम बदलला आहे. 'भोजदेवानें कामापुरता सर्व व्याकरणविषय एकत्र आणून जरी साधारण-रीत्या सुलभ व्याकरण रचिलें तरी लाघवाकडे लक्ष न दिल्यानें विस्तार वाढला; व महाभाष्यासारखा व्याख्यानग्रंथ नसल्यामुळें या व्याकरणाचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं.'

सारांश पाणिनि, कात्यायन, पतंजलि यांच्या आकर-ग्रंथांनीं व्याकरणशास्त्राचा पहिला कालखंड संपतो तर भर्तृहरि, काशिकाकार, जयादित्य–वामन आणि कैयट यांच्या ग्रंथांमुळें दुसरा कालखंड संपतो. या दुसऱ्या कालखंडाला 'व्याख्यान कालखंड' असें म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतरच्या कालांत तिसऱ्या कालखंडाला सुरवात होत असून त्याला 'प्रक्रिया कालखंड' म्हणतां येईल; कारण त्यांत पाणिनीच्या अष्टाध्यायीला–तिच्या मांडणीला–वेगळें विषयवार स्वरूप देण्यांत आलें.

धारानगरीच्या भोजराजानें 'सरस्वतीकण्ठाभरण' नांवाचें व्याकरण लिहून त्यावर वृत्ति लिहिली. हें व्याकरण पाणिनिसूत्रांवर आधारलेलें असून त्याचे आठ अध्याय आहेत. 'सिद्धिः क्रियादेः लोकात्' हें पहिलें सूत्र आहे. त्याचप्रमाणें 'भवादिः क्रियावचनो धातुः' हें दुसरें सूत्र आहे. पाणिनीचीं सूत्रें घेतलीं असलीं तरी त्यांत बरेच फेरफार त्यानें केले आहेत. अध्यायक्रम पाणिनीप्रमाणें असला तरी सूत्रक्रम बदलला आहे. 'भोजदेवानें कामापुरता सर्व व्याकरणविषय एकत्र आणून जरी साधारण-रीत्या सुलभ व्याकरण रचिलें तरी लाघवाकडे लक्ष न दिल्यानें विस्तार वाढला; व महाभाष्यासारखा व्याख्यानग्रंथ नसल्यामुळें या व्याकरणाचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं.'

सारांश पाणिनि, कात्यायन, पतंजलि यांच्या आकर-ग्रंथांनीं व्याकरणशास्त्राचा पहिला कालखंड संपतो तर भर्तृहरि, काशिकाकार, जयादित्य–वामन आणि कैयट यांच्या ग्रंथांमुळें दुसरा कालखंड संपतो. या दुसऱ्या कालखंडाला 'व्याख्यान कालखंड' असें म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतरच्या कालांत तिसऱ्या कालखंडाला सुरवात होत असून त्याला 'प्रक्रिया कालखंड' म्हणतां येईल; कारण त्यांत पाणिनीच्या अष्टाध्यायीला–तिच्या मांडणीला-वेगळें विषयवार स्वरूप देण्यांत आलें.

----

९. कैय्यट ते नागेश

कैयटानंतर निरनिराळ्या प्रांतांमध्यें पूर्वीपासूनच ज्या बोलभाषा होत्या त्यांचा प्रसार अधिक झाल्यामुळें व त्यांमध्यें ग्रंथसंपत्तीही निर्माण होऊं लागल्यानें संस्कृत भाषेचें सर्वसामान्य बोधभाषा म्हणून जें स्थान होतें तें डळमळलें व तिच्यांतील चांगल्या ग्रंथांचें ज्ञान होण्याकरितां प्रथम संस्कृत व्याकरण शिकून मग भाषाज्ञान करून घेणें आवश्यक झालें. पाणिनीय व्याकरणसंप्रदायाच्या मानानें ऐंद्र, कातंत्र, हैम इत्यादि व्याकरणांतील प्रकरणात्मक विवेचनानें व्याकरणज्ञान सुलभ होतें असें अनुभवास येऊं लागलें. त्यामुळें अष्टाध्यायी-सूत्रांचें विषयवार संकलन करून प्रकरण-ग्रंथ लिहिण्याकडे वैयाकरणांची दृष्टि वळली. संस्कृत भाषेंत ती बोलभाषा न राहिल्यामुळें तिच्यांत नवीन शब्दांची भर पडणें जवळ-जवळ बंद झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें त्या भाषेच्या व्याकरणांतही फेरबदल अथवा वार्तिकरूपानें भर पडण्याचें थांबलें.[1] तशांत याच काळांत मुसलमानांच्या स्वाऱ्यावर स्वाऱ्या होऊं लागल्या, इतकेंच नव्हे तर उत्तरेकडे ते कायमचेंच ठाण मांडून बसले. याचा सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्यावर जो परिणाम व्हावयाचा तो झाला. मोठमोठ्या शहरांत विद्येचीं व शास्त्रांचीं केंद्रें मोडकळीस आलीं व सर्वशास्त्रांची पिच्छेहाट झाली. या काळांत कांहीं तुरळक ग्रंथ झालेही असतील पण ते आज उपलब्ध नाहींत. हळूहळू परिस्थितीचे हे कृष्णमेघ दूर झाले व पुन्हा एकदा नव्या दमानें ग्रंथलेखन सुरू झालें. मराठी वाङ्मयांतही ज्ञानेश्वरापासून एकनाथापावेतों म्हणजेच वरील कालखंडांत महत्त्वाची भर पडली नाहीं. एक प्रकारें हें तमोयुगच होतें!

---

१. 'Sanskrit had long been established as a classical language. It ceased to be influenced by current speech in any vital manner. Hence in grammar there was no occasion for any creative work and even the work of critical elaboration had well-nigh run its course.'

'Systems of Sanskrit Grammar', p. 43.

अशा तऱ्हेचा पहिला प्रयत्न म्हणजे विमलसरस्वतीचा ' रूपमाला ' ग्रंथ होय.[२]

रामचंद्राची प्रक्रिया-कौमुदी—प्रक्रिया-कौमुदी हा ग्रंथ आंध्र देशांतील प्रख्यात ' शेष ' नांवाच्या कुलांतील रामचंद्रशेष यानें लिहिला. याच्या वडिलांचें नांव कृष्णाचार्य होतें. इसवी सनाच्या पंधराव्या शतकांत हा ग्रंथ लिहिला गेला असावा असें विद्वानांचें मत आहे. रामचंद्र-शेषाचा पुतण्या कृष्णशेष यानें ' प्रकाश ' नांवाची टीका व नातू विठ्ठलशेष यानें ' प्रसाद ' नांवाची टीका सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत लिहिल्या व आज त्या नेपाळ दरबारच्या लायब्ररींत उपलब्ध आहेत. विठ्ठलाचार्यांच्या ' प्रसाद ' टीकेची सर्वांत जुनी प्रत संवत् १६०५–६ (सन १५४८–४९) ची उपलब्ध आहे. विठ्ठलाच्या टीकेंत कैय्यट, त्रिलोचनदास, क्षीरस्वामिन्, दुर्गसिंह, जिनेंद्रबुद्धि, भर्तृहरि, वामन, हरदत्त आणि बोपदेव या सर्वांचा निर्देश आहे. विठ्ठलाचार्य हा नृसिंहाचार्यांचा पुत्र आणि रामकृष्णाचार्यांचा पौत्र, तर त्याच्या मुलाचें नांव लक्ष्मीधराचार्य होतें. प्रक्रिया-कौमुदीवर शेषनृसिंहसूरीचा मुलगा शेषकृष्ण याची प्रक्रियाप्रकाश नांवाची एक टीका आहे. हाच शेषकृष्ण प्रसिद्ध सिद्धान्तकौमुदीकार भट्टोजी दीक्षित याचा गुरु होता.

प्रक्रिया-कौमुदीच्या पूर्वी रूपावतार, रूपमाला वगैरे प्रक्रिया-ग्रंथ झाले, पण प्रक्रिया-कौमुदी अधिक परिपूर्ण असल्यानें साहजिकच इतर पूर्वीचे ग्रंथ मागें पडले. याही ग्रंथावर प्रक्रियाप्रदीप, अमृतस्मृति, प्रक्रिया-व्याकृति, निर्मलदर्पण, तत्त्वचंद्र, प्रक्रियारंजन, प्रक्रियाविवरण वगैरे अनेक टीका झाल्या.

सिद्धान्तकौमुदी—भट्टोजी दीक्षितानें हा प्रसिद्ध ग्रंथ रचला. तत्पूर्वी दक्षिण देशांत ' शेष ' कुलांतील अनेक प्रसिद्ध विद्वान् होऊन गेले हें आपण वर पाहिलेंच आहे. याच शेषकुलांतील शेषकृष्णाचा शिष्य भट्टोजी दीक्षित होय.

---

२. इंडिया ऑफिसमध्यें या ग्रंथाची जी हस्तलिखित प्रत (क्रमांक ६१२) आहे तिच्यावर संवत् १४३७ म्हणजेच सन १३७९ चा निर्देश आहे.

भट्टोजीचा काल—भट्टोजीच्या वडिलांचें नांव लक्ष्मीधर असून त्याच्या स्वतःच्या मुलाचें नांव भानु दीक्षित अथवा वीरेश्वर दीक्षित किंवा रामाश्रम दीक्षित होतें. अमरकोशावरची भानु दीक्षिताची 'रामाश्रमी' टीका प्रसिद्धच आहे. भट्टोजी दीक्षिताला रंगोजी दीक्षित नांवाचा भाऊ असून त्याचा मुलगा कोंडभट्ट यानें 'वैयाकरणभूषण' नांवाचा अर्थविचारात्मक ग्रंथ लिहिला. शहाजहानच्या दरबारीं असलेला पंडित जगन्नाथ आपल्या 'मनोरमाकुचमर्दिनी' टीकेंत भट्टोजीविषयीं माहिती देतांना म्हणतो कीं, तो शेषकृष्णाचा विद्यार्थी होता, तर स्वतः जगन्नाथ पंडित शेषकृष्णाचा मुलगा वीरेश्वर याचा शिष्य होता. म्हणजे भट्टोजी व पंडित जगन्नाथ यांचें गुरुघराणें एकच होतें. असें असूनहि भट्टोजीनें शेषघराण्यांतील विद्वानांनीं रचलेल्या ग्रंथांवर वेळ आली असतां सपाटून टीका केली! ती शेषघराण्यापासून विद्या मिळविलेल्या जगन्नाथ पंडितासारख्या इतर विद्वानांना आवडली नाहीं. कारण त्यांच्या मतें भट्टोजीनें गुरुद्रोह केला! आणि म्हणूनच भट्टोजीच्या 'प्रौढमनोरमा' टीकेवर जगन्नाथ पंडितानें 'मनोरमाकुचमर्दिनी' नांवाची उपहासात्मक टीका लिहिली!

हीं सर्व नांवें देण्याचें कारण कीं, भट्टोजीचा काल ठरविण्याचें काम मोठ्या गुंतागुंतीचें आहे. कारण प्रक्रियाकौमुदीवर 'प्रक्रियाकौमुदी-प्रकाश' टीका कृष्णशेषानें लिहिली. तिची हस्तलिखित प्रत सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील उपलब्ध आहे, तर भट्टोजीचा काळ सतराव्या शतकाचा पूर्वार्ध (इ. स. १६३० शिवाजीमहाराजांचा जन्मकाल) अनेक उपलब्ध पुराव्यांवरून मानणें भाग पडतें. डॉ. बेलवलकर यांनाहि तो मान्य आहे. पण गुरुशिष्यांच्या कालांत त्यामुळें फार तफावत पडते! कृष्णशेष याला कल्पनातीत दीर्घायुष्य मानल्याशिवाय ही निरगांठ सुटणें शक्य नाहीं.[३] यावर प्रा. का. वा. अभ्यंकर एक समर्थन सुचवितात. तें असें–(१) भट्टोजीचा कृष्णशेष हा प्रत्यक्ष गुरु नव्हता पण त्याचा नातलग दुसरा कोणीतरी कृष्णशेष नांवाचा असावा. किंवा (२) कृष्णशेषाला

३. डॉ. गोडे यांचा B. O. R. I. Journal मधील 'भट्टोजीचा काल' यावरील लेख पहा.

परंपरा-गुरु मानणें किंवा (३) 'प्रकाश' नांवाची टीका दुसऱ्याच कोणी-तरी कृष्णशेषानें लिहिलेली असणें.[४] पण हें पटण्यासारखें नाहीं. कारण जगन्नाथ पंडितानें भट्टोजीबद्दल स्पष्ट उल्लेख केला आहे तो असा—'इह केचिन्निखिलविद्वन्मुकुटमयूखमालालालितचरणानां शेषावतंसानां श्रीकृष्ण-पण्डितानां प्रसादादासादितशब्दानुशासनाः तेषु च पारमेश्वरं पदं प्रयातेषु कलिकालवशंवदीभवन्तः प्रक्रियाप्रकाशं स्वयं निर्मितायां मनोरमायामा-कुल्यकार्षुः।', तर भट्टोजी दीक्षित आपल्या 'शब्दकौस्तुभ' ग्रंथांत 'प्रक्रियाप्रकाशे गुरुचरणैरुक्तम्' असा कृष्णशेषाचा स्पष्ट उल्लेख करतो. तेव्हां या आंध्र पंडिताचा काल इ. स. १६३० निश्चित धरावा लागतो. भट्टोजी दीक्षिताचा कृष्णशेष हा व्याकरण-विषयाचा गुरु होता, इतर विषयांचे दुसरे होते.

दोन कुलांचा विद्यावंश

लक्ष्मीधर दीक्षित — पुत्र:
- रंगोजी — पुत्र — कोंडभट्ट (वैयाकरणभूषण)
- भट्टोजी — पुत्र — भानूजी = वीरेश्वर = रामाश्रम (अमरकोश-रामाश्रमी टीका) — पुत्र — हरि दीक्षित (शब्दरत्न) — शिष्य — नागेश

शेषकृष्ण (प्रक्रियाप्रकाश कर्ता):
- शिष्य — भट्टोजी
- पुत्र — वीरेश्वर — शिष्य — जगन्नाथराय पंडित (सन १६५०) (रसगंगाधर)

४. पहा—व्याकरणमहाभाष्य, भाग ७ वा, पान ३९८ (प्रा. का. वा. अभ्यंकर)

परंपरा-गुरु मानणें किंवा (३) 'प्रकाश' नांवाची टीका दुसऱ्याच कोणी-तरी कृष्णशेषानें लिहिलेली असणें.[४] पण हें पटण्यासारखें नाहीं. कारण जगन्नाथ पंडितानें भट्टोजीबद्दल स्पष्ट उल्लेख केला आहे तो असा—'इह केचिन्निखिलविद्वन्मुकुटमयूखमालालालितचरणानां शेषावतंसानां श्रीकृष्ण-पण्डितानां प्रसादादासादितशब्दानुशासनाः तेषु च पारमेश्वरं पदं प्रयातेषु कलिकालवशंवदीभवन्तः प्रक्रियाप्रकाशं स्वयं निर्मितायां मनोरमायामा-कुल्यकार्षुः ।', तर भट्टोजी दीक्षित आपल्या 'शब्दकौस्तुभ' ग्रंथांत 'प्रक्रियाप्रकाशे गुरुचरणैरुक्तम्' असा कृष्णशेषाचा स्पष्ट उल्लेख करतो. तेव्हां या आंध्र पंडिताचा काल इ. स. १६३० निश्चित धरावा लागतो. भट्टोजी दीक्षिताचा कृष्णशेष हा व्याकरण-विषयाचा गुरु होता, इतर विषयांचे दुसरे होते.

दोन कुलांचा विद्यावंश

लक्ष्मीधर दीक्षित — पुत्र: रंगोजी, भट्टोजी

शेषकृष्ण (प्रक्रियाप्रकाश कर्ता) — शिष्य: भट्टोजी; पुत्र: वीरेश्वर

रंगोजी — पुत्र — कोंडभट्ट (वैयाकरणभूषण)

भट्टोजी — पुत्र — भानूजी = वीरेश्वर = रामाश्रम (अमरकोश-रामाश्रमी टीका) — पुत्र — हरि दीक्षित—शिष्य—नागेश (शब्दरत्न)

वीरेश्वर — शिष्य — जगन्नाथराय पंडित (सन १६५०) (रसगंगाधर)

४. पहा—व्याकरणमहाभाष्य, भाग ७ वा, पान ३९८ (प्रा. का. वा. अभ्यंकर)

सिद्धान्तकौमुदीचा विशेष— या ग्रंथाचें वैशिष्ट्य म्हणजे अष्टाध्यायींतील सर्व सूत्रांचा यांत संग्रह केला असून जुन्या ग्रंथांतील उदाहरणें न देतां त्या वेळची नवीं प्रचलित उदाहरणें दिलीं आहेत. सूत्रांचा अर्थ कळण्याकरितां आवश्यक त्या ठिकाणींच विवेचनात्मक पंक्ति घातल्या आहेत. या ग्रंथाचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे यामध्यें पाणिनि, कात्यायन आणि पतंजलि या त्रिमुनि-वैयाकरणांना असंमत असलेलीं उदाहरणें व नियम यांना मुळींच स्थान नाहीं. उलट इतर वैयाकरणांनीं तसा प्रयत्न केला असल्यास त्याचा भरपूर समाचार 'यत्तु वृत्तिकारेणोक्तं तच्चिन्त्यम्', 'क्षीरस्वामी तु अत्र बभ्राम' अशा शब्दांत घेण्यास त्यानें कमी केलें नाहीं ! यासाठीं ठिकठिकाणीं कैयटाचा 'प्रदीप' व हरदत्ताची 'पदमंजरी' यांचा वेळोवेळीं त्यानें उपयोग केला आहे.

सिद्धान्तकौमुदीचें महत्त्व गेलीं तीन शतकें टिकून आहे व पुढेंही तसेंच टिकून राहील असें वाटतें. महाराष्ट्रांत तरी या ग्रंथाला व त्याच्यावरील टीकाग्रंथांना विशेष महत्त्व आहे. पाठशालांतून आज अनेक वर्षें त्याचेंच अध्ययन-अध्यापन चालू आहे. या ग्रंथाचें विशेष महत्त्व असल्यानें त्यावर ग्रंथकर्त्यानेंच 'प्रौढमनोरमा' नांवाची टीका लिहिली, तर त्याच्या नातवानें—हरि दीक्षितानें—त्या टीकेवर पुनः शब्दरत्न (लघु व बृहत्) टीका लिहिली. हरि दीक्षिताचा प्रसिद्ध शिष्य नागोजीभट्ट यानें शब्देंदुशेखर (लघु व बृहत्) नांवाची टीका मूळ सिद्धान्तकौमुदीवर लिहिली. इतरहि अनेक टीका लिहिल्या गेल्या. कौमुदीची 'लघु' व 'मध्य' कौमुदी झाली तर प्रौढमनोरमेचीही 'बालमनोरमा' झाली ! सिद्धान्तकौमुदीचें उत्तम अध्ययन झालें तर भाष्यावरचे परिश्रम सुद्धां वृथा आहेत असे अतिशयोक्तिपूर्ण उद्गार ऐकूं येतात ![५]

ग्रंथाची रचना—सिद्धान्त-कौमुदींत प्रकरणवार रचना केल्यानें विषयप्रवेश होण्यास फार सुलभता आली आहे. अर्थात् पूर्वीच्या प्रक्रिया-ग्रंथांचा भट्टोजीनें उपयोग करून घेतलाच. सुरुवातीसच 'अइउण्' वगैरे शिवसूत्रें देऊन, त्यांपासून होणारे अण्, इण् वगैरे प्रत्याहारांची

५. 'कौमुदी यदि कण्ठस्था वृथा भाष्यपरिश्रमः'

माहिती दिली असून ते सिद्ध करण्यास लागणारीं सूत्रें एकत्र दिलीं आहेत. ग्रंथारंभींच प्राचीन परंपरेप्रमाणें त्यानें मुनित्रयाला वंदन केलें आहे.[६] त्यानंतर पाणिनीच्या अष्टाध्यायींतील सुरुवातीच्या संज्ञा व परिभाषा आवश्यक तेवढ्या देऊन 'पंचसंधि' प्रकरण पूर्ण दिलें आहे. त्यांत स्वरसन्धि, व्यंजनसंधि, विसर्गसंधि, स्वादिसंधि (विभक्तिरूपें तयार करतांना होणारे संधि) व प्रकृतिभाव (संधि न होणें) यांचा विचार केला आहे. नंतर 'षड्लिंगी' प्रकरण आपोआपच येतें. यांत स्वरान्त व व्यंजनान्त शब्द तिन्ही लिंगी कसे तयार होतात याचें विवेचन केलें आहे. यानंतर मूळ शब्दापासून स्त्रीलिंगी रूपें कोणकोणते प्रत्यय लागून तयार होतात हें सांगितल्यावर कारक किंवा विभक्त्यर्थ या महत्त्वाच्या विषयाला प्रारंभ केला आहे. त्यानंतर समास, त्यांचे मुख्य व गौण प्रकार व ते तयार झाल्यावर त्यांना लागणारे समासान्त प्रत्यय देऊन मग नामापासून ताद्धित प्रत्यय लावून वेगवेगळ्या अर्थी शब्द कसे तयार होतात हें दाखविलें आहे. हा शब्दसिद्धीचा गाभा आहे असें म्हटलें तरी चालेल. येथें ग्रंथाचा पूर्वार्ध संपतो.

उत्तरार्ध सुरू करतांना प्राचीन पद्धतीप्रमाणें ग्रंथमध्यांतही 'मंगलोच्चारण' करावें लागतें.[७] तें केल्यावर धातूंपासून होणारीं तिङन्तरूपें किंवा आख्यातें याचा सविस्तर प्रपंच केला आहे. या प्रकरणाला 'दशगणी' असें नांव आहे. कारण धातूंचे भ्वादि, अदादि असे दहा गण असल्यानें 'दशगणी' नांव पडलें. तिङन्ताचीं रूपें साधल्यानंतर प्रयोजकाचीं व नामधातूंचीं रूपें यांची प्रक्रिया देऊन क्रियापदांचे काल व अर्थ यांचें विवेचन केलें आहे. नामापासून तद्धित प्रत्यय लावून जसे तद्धितान्त शब्द तयार

---

६. 'मुनित्रयं नमस्कृत्य तदुक्तीः परिभाव्य च।
वैयाकरणसिद्धान्तकौमुदीयं विरच्यते॥ (सि. कौ.चा आरंभींचा श्लोक)

७. श्रौत्रार्हन्तीचणैर्गुण्यैर्महर्षिभिरहर्दिवम्।
तोष्टूय्यमानोऽप्यगुणो विभुर्विजयतेतराम्॥
(सि. कौ. उत्तरार्धाचा आरंभश्लोक)

होतात त्याप्रमाणें धातूला 'कृत्' प्रत्यय लावून कृदन्त शब्द कसे तयार होतात याचें विवेचन केल्यावर शेवटीं वेदांतील शब्दांचें वैशिष्ट्य व स्वर सांगून शब्दसिद्धीच्या वेळीं अन्तर्गत विकार, आदेश, आगम वगैरे व त्यानंतर षत्व, णत्व इत्यादि प्रक्रिया दिल्यावर ग्रंथ पूर्ण केला आहे. सिद्धान्तकौमुदीचा यथासांग अभ्यास केल्यावर काशिकाग्रंथाचें अध्ययन केल्यास विषयाला परिपूर्णता येते. कारण काशिका ग्रंथ अष्टाध्यायींतील सूत्रांना क्रमवार धरून रचला गेला आहे. इतकें अध्ययन झाल्यावरच जर महाभाष्याचें कैयटाच्या प्रदीपासह अध्ययन झालें तर तो 'भाष्यान्त वैयाकरण' समजण्यास हरकत नाहीं. या पूर्ण अध्ययनास बारा वर्षांचा अवधि लागतो व यालाच उद्देशून 'द्वादशवर्षैर्व्याकरणं श्रूयते' असें म्हणण्याची पद्धत आहे.

धार्मिक मतांचा परिणाम—

ज्ञानविषयक ग्रंथांत सुद्धां धर्ममतें त्या वेळीं आड येत होतीं व अजूनही येतात. बौद्ध धर्माचे ग्रंथकार व वैयाकरण यांचे ग्रंथ व व्याकरणें तीं कितीही उपयुक्त असलीं तरी वैदिक धर्माचें पुनरुत्थान झाल्यानंतर वैदिक धर्मानुयायी विद्वानांच्या मनांत त्याविषयीं आदरबुद्धि नव्हती. म्हणून तीं व्याकरणें साहाजिकच मागें पडलीं. हरदत्त या दाक्षिणात्य वैदिक धर्माभिमानी महापंडितानें काशिकेवर लिहिलेल्या पदमंजरीचा तसेंच काश्मीरमधील महाविद्वान् कैयटानें लिहिलेल्या महाभाष्यप्रदीपाचा अधिक अधिक पुरस्कार सर्वत्र झाल्यानें त्यांचाच पूर्ण आधार घेऊन व बोपदेवाच्या मुग्धबोध व्याकरणपद्धतीचा अवलंब करून त्रिमुनि-मतप्रणालीप्रमाणें भट्टोजी दीक्षितानें सिद्धान्तकौमुदी ग्रंथ रचला. शिवाय यापूर्वी अशाच पद्धतीचा प्रक्रियाकौमुदी ग्रंथ रामचंद्र शेषानें लिहिला होता. पण शेषकुलांतील विद्वान् वैष्णव होते, तर भट्टोजी शैव होता. तो जरी आंध्र होता तरी त्यानें काशींत राहून व्याकरणाचें अध्ययन केलें व तेथेंच वरील ग्रंथ लिहिला. शैव आणि वैष्णव असा भेद उत्पन्न झाल्यास शैवाकडे लोकांचा कल असल्यानें वैष्णवांचे ग्रंथ मागें पडले अशीही शक्यता आहे.

भट्टोजींचे इतर ग्रंथ—पूर्वीचे पंडित अनेक विषयांत निष्णात असत. भट्टोजी सिद्धान्तकौमुदी लिहून स्वस्थ बसला नाहीं, तर त्यानें 'शब्द-कौस्तुभ' नांवाचा महाभाष्याच्या धर्तीवर पाणिनिसूत्रांवर विवरणस्वरूपाचा ग्रंथ लिहिला. महाभाष्यासारखींच अह्निकें यांत आहेत. हा ग्रंथ आज पूर्णतया उपलब्ध नाहीं. पण तो आठही अध्यायांवर असावा. कौमुदीवर 'प्रौढमनोरमा' नांवाची टीका त्यानें लिहिली हें मागें आलेंच आहे. सध्यां उपलब्ध असलेल्या बालमनोरमेचा कर्ता मात्र आधुनिक वैयाकरण वासुदेव दीक्षित आहे. या तंजावरच्या वैयाकरणानें सतराव्या शतकाच्या शेवटीं ही 'बालमनोरमा' लिहिली. त्याचप्रमाणें सिद्धान्तकौमुदीचा संक्षेप करून वरदराजानें 'लघुकौमुदी' रचिली. ती व्याकरणशास्त्रप्रवेशास अत्यंत उपयुक्त आहे. प्रस्तुत लेखकानें तिचा विस्तृत विवेचनासह मराठी अनुवाद नुकताच प्रसिद्ध केला आहे व तो पुण्याच्या 'संस्कृत-विद्या परिसंस्थेनें' प्रसिद्ध केला आहे.

सिद्धान्तकौमुदीवरील टीकांचा नामनिर्देश मागें आलाच आहे. त्यांत भट्टोजींचे शिष्य ज्ञानेंद्रसरस्वती यांच्या 'तत्त्वबोधिनी' टीकेचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. आज या टीकेसह सिद्धान्तकौमुदीची मुद्रित प्रत बाज़ारांत मिळते. मात्र वैदिकी व स्वरप्रक्रिया यांवरील टीका आहे ती त्यांची नाहीं. ती जयकृष्णानें लिहिली आहे. या तत्त्वबोधिनी टीके-विषयीं एक दंतकथा वैयाकरणकुलांत प्रचलित आहे. असें म्हणतात कीं, भट्टोजीनें गुरुद्रोह केल्यानें मृत्यूनंतर त्याला पिशाचयोनि प्राप्त झाली व तो काशीमध्यें आपल्या निवासस्थानांत ब्रह्मसमंद होऊन राहिला होता व या स्वरूपांत राहूनच त्यानें ज्ञानेंद्रसरस्वतीस व्याकरण शिकविलें. इतकेंच नव्हे तर आपल्या अध्यापनाचें सार म्हणून 'तत्त्वबोधिनी' टीका लिहिण्यास भट्टोजीनें त्याला सांगितलें व त्यानें ती लिहिली ![८] याशिवाय रामकृष्णभट्टांची 'सुबोधिनी' टीकाही उपयुक्त आहे.

---

८. ही केवळ दंतकथा आहे. ज्ञानेंद्रसरस्वती हा वामनेंद्रसरस्वतीचा शिष्य होय. ही टीका त्यानें इ. स. च्या अठराव्या शतकाच्या पर्वार्धांत लिहिली आहे.

याशिवाय भट्टोजींनें 'वैयाकरणसिद्धान्तकारिका' नांवाचा अर्थ-विचारात्मक ७४ कारिकांचा ग्रंथ लिहिला असून अद्वैत वेदान्तावर 'तत्त्वकौस्तुभ' व धर्मशास्त्रावर कालनिर्णय, प्रवरनिर्णय, त्रिस्थली-सेतु वगैरे अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

कोंडभट्टाचा 'वैयाकरणभूषण'—कोंडभट्ट हा भट्टोजीचा पुतण्या व शिष्य. त्यानें भट्टोजीच्या वैयाकरणसिद्धान्तकारिकांवर विद्वत्तापूर्ण विवेचन करणारे 'वैयाकरणभूषण' व 'वैयाकरणभूषणसार' असे ग्रंथ लिहिले. व्याकरणशास्त्रांत प्रातिशाख्यें व निरुक्तें यांपासूनच्या पुढील ग्रंथसंपत्तीचें निरीक्षण करतां असें दिसून येतें कीं, अर्थविचारापेक्षां शब्द-विचाराचाच जास्त विचार झाला आहे. पतंजलीनें महाभाष्याची सुरुवात 'अथ शब्दानुशासनम्' अशीच केली आहे. नाहीं म्हणावयास भर्तृहरीचा वाक्यपदीय ग्रंथ अपवाद म्हणून धरतां येईल. त्याच ग्रंथाला प्रमाणभूत मानून कोंडभट्टानें वरील ग्रंथ लिहिले. या ग्रंथांतून प्रकृति, प्रत्यय, पद व वाक्य यांच्या अर्थांचें मार्मिक विवेचन केलें आहे. परंतु हा ग्रंथ त्यांतील विषयाच्या गांभीर्यामुळें समजण्यास कठीण झाला आहे. त्यावर कै. शंकरशास्त्री मारुलकर (म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांचे शिष्य) यांनीं नुकतीच 'शाङ्करी' नांवाची सुबोध टीका लिहिली असून अर्थविचाराचा दीप तेवत ठेवला आहे !

हरि दीक्षित—शेष घराण्यासारखें दीक्षितांचेंही घराणें विद्वान् पुरुषांनीं शोभिवंत केलेलें होतें. भट्टोजी दीक्षितानंतर त्यांचा पुत्र, बंधु, पुतण्या व नातू–हरि दीक्षित हे सर्व वैयाकरण होते. हरि दीक्षितानें आपल्या पितामहाच्या 'प्रौढमनोरमा' टीकेवर 'लघु' व 'बृहत्' 'शब्द-रत्न' नांवाची टीका लिहिली हें मागें सांगितलेंच आहे. यापैकीं लघु-शब्दरत्न ही टीका हरि दीक्षितांचा शिष्य नागोजीभट्ट यानें लिहून आपल्या गुरुजींना अर्पण करून त्यांच्याच नांवानें ती प्रसिद्ध केली असा प्रवाद आहे पण तो चुकीचा आहे, याला त्यांच्या ग्रंथांतील अंतर्गत

पुरात्राच आहे.[९] प्रो. का. वा. अभ्यंकर यांनींही हा प्रवाद खोडून काढला आहे.[१०]

नागेश अथवा नागोजीभट्ट—भट्टोजीच्या सिद्धान्तकौमुदीला जें आज अग्रस्थान व महत्त्व प्राप्त झालें आहे, तें नागोजीभट्टाच्या परिश्रमाचें फल होय असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. भट्टोजीनें आपल्या गुरुघराण्यांतील मतांचें खंडन केलें, तें जगन्नाथ पंडिताला आवडलें नाहीं व त्यानें भट्टोजींचा खरपूस समाचार घेतला हें मागें आलेंच आहे. पण नागेशानें कौमुदीवर 'शब्देन्दुशेखर' टीका लिहून भट्टोजींचीं मतें भाष्यसंमत आहेत असें सप्रमाण सिद्ध केलें. जगन्नाथ पंडिताला फार गर्व होता. पा. सू. 'णेरणौ यत्...'। १-३-६७ या सूत्राचा अर्थ जगन्नाथ पंडिताच्या मतें त्याला स्वतःला, पाणिनीला किंवा भाष्यकारालाच माहीत होता व वृत्तिकाराला माहीत होता कीं नाहीं अशी शंका त्यानें व्यक्त केली ! अशा अर्थाचा एक श्लोकही प्रचारांत आहे.[११] पण अशा घमेंडानंदनालाही नागेशानें गप्प बसविलें ! त्याचा परिणाम होऊन इतर सर्व व्याकरणें मागें पडलीं आणि पाणिनीय व्याकरणाचा अभ्यास देशांत सर्वत्र सुरू झाला. हा व्याकरणशास्त्राचा इतिहास थोडक्यांत खालील श्लोकांत प्रा. अभ्यंकरांनीं संग्रहित केला आहे.

"शब्दानुशासनं शास्त्रं पार्षदेषु समुद्गतम् ।
सूत्रबद्धं पाणिनिना वार्तिकैः सुदृढीकृतम् ॥
प्रपञ्चितं भाष्यकारैर्हरिणा दर्शनीकृतम् ।
वृत्तिबद्धं जयादित्यैर्व्याख्यातं कैयटादिभिः ॥
प्रक्रियाकौमुदीकारैर्दीक्षितैः सुलभीकृतम् ।
स्थिरीकृतं पल्लवितं चान्ते नागेशपण्डितैः ॥"

९. 'विस्तरस्तु अस्मत्कृते बृहत्शब्दरत्ने मदन्तेवासिकृतलघुशब्देन्दुशेखर-मञ्जषयोश्च द्रष्टव्यः'। लघुशब्देन्दुशेखर (कृदन्त प्रकरण)

१०. 'B. O. R. I. Annals 1952, Pp. 258-59-60' by Prof. K. V. Abhyankar.

११. 'णेरणाविति सूत्रार्थं भगवान् वेत्ति पाणिनिः। अहं च भाष्यकृद् वेत्ति वृत्तिकृद् वेत्ति वा न वा॥'

पुरात्राच आहे.[९] प्रो. का. वा. अभ्यंकर यांनींही हा प्रवाद खोडून काढला आहे.[१०]

नागेश अथवा नागोजीभट्ट—भट्टोजीच्या सिद्धान्तकौमुदीला जें आज अग्रस्थान व महत्त्व प्राप्त झालें आहे, तें नागोजीभट्टाच्या परिश्रमाचें फल होय असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. भट्टोजीनें आपल्या गुरुघराण्यांतील मतांचें खंडन केलें, तें जगन्नाथ पंडिताला आवडलें नाहीं व त्यानें भट्टोजींचा खरपूस समाचार घेतला हें मागें आलेंच आहे. पण नागेशानें कौमुदीवर 'शब्देन्दुशेखर' टीका लिहून भट्टोजींचीं मतें भाष्यसंमत आहेत असें सप्रमाण सिद्ध केलें. जगन्नाथ पंडिताला फार गर्व होता. पा. सू. 'णेरणौ यत्...' । १-३-६७ या सूत्राचा अर्थ जगन्नाथ पंडिताच्या मतें त्याला स्वतःला, पाणिनीला किंवा भाष्यकारालाच माहीत होता व वृत्तिकाराला माहीत होता कीं नाहीं अशी शंका त्यानें व्यक्त केली ! अशा अर्थाचा एक श्लोकही प्रचारांत आहे.[११] पण अशा घमेंडानंदनालाही नागेशानें गप्प बसविलें ! त्याचा परिणाम होऊन इतर सर्व व्याकरणें मागें पडलीं आणि पाणिनीय व्याकरणाचा अभ्यास देशांत सर्वत्र सुरू झाला. हा व्याकरणशास्त्राचा इतिहास थोडक्यांत खालील श्लोकांत प्रा. अभ्यंकरांनीं संग्रहित केला आहे.

"शब्दानुशासनं शास्त्रं पार्षदेषु समुद्गतम् ।
सूत्रबद्धं पाणिनिना वार्तिकैः सुदृढीकृतम् ॥
प्रपञ्चितं भाष्यकारैर्हरिणा दर्शनीकृतम् ।
वृत्तिबद्धं जयादित्यैर्व्याख्यातं कैयटादिभिः ॥
प्रक्रियाकौमुदीकारैर्दीक्षितैः सुलभीकृतम् ।
स्थिरीकृतं पल्लवितं चान्ते नागेशपण्डितैः ॥"

---

९. 'विस्तरस्तु अस्मत्कृते बृहत्शब्दरत्ने मदन्तेवासिकृतलघुशब्देन्दुशेखर-मञ्जषयोश्च द्रष्टव्यः'। लघुशब्देन्दुशेखर (कृदन्त प्रकरण)

१०. 'B. O. R. I. Annals 1952, Pp. 258-59-60'
by Prof. K. V. Abhyankar.

११. 'णेरणाविति सूत्रार्थं भगवान् वेत्ति पाणिनिः । अहं च भाष्यकृद् वेत्ति वृत्तिकृद् वेत्ति वा न वा ॥'

म्हणजे आतांपावेतों प्रातिशाख्यें, पाणिनि, कात्यायन, पतंजलि, भर्तृहरि, काशिकाकार जयादित्य आणि वामन व भट्टोजी दीक्षित यांच्या ग्रंथांचा विचार झाला.

नागेशानें आपल्या ग्रंथांत दिलेल्या माहितीवरून व इतर वैयाकरण-कुलांत प्रसिद्ध असलेल्या कांहीं दंतकथांवरून त्याविषयीं माहिती मिळते. ती अशी—

नागेशभट्ट मूळ महाराष्ट्रीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून त्याचे पूर्वज सातारा जिल्ह्यांत तासगांवला राहात असत. त्याचें उपनांव काळे होतें. काळे उपनांव कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे अशा ब्राह्मणांच्या तिन्ही पोटजातींत असतें हें जरी खरें असलें तरी नागेशाचे जांवई काशीस देव म्हणून होते ते देशस्थ ऋग्वेदी असल्यानें नागेशही देशस्थ ऋग्वेदी असावा असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें. त्याच्या पित्याचें नांव शिवभट्ट असून मातेचें 'सती' होतें व त्याचा आश्रयदाता शृंगवेरपुराचा राजा रामसिंह होता.[१२] शृंगवेरपुर हें गांव अलाहाबादच्या उत्तरेस कांहीं मैलांवर असून तें आतां सिंसौर या नांवानें प्रसिद्ध आहे. नागेशानें आपलें उपनांव 'उपाध्याय' असें बृहत्शब्देन्दुशेखराच्या उत्तरार्धाच्या अखेरीस दिलें आहे पण तें उपनांव नसून कुलाला मिळालेली पदवी असावी.

नदिया येथील विद्यापीठांतील एका ग्रंथांत दिलेली माहिती ज्ञान-कोशकारानें दिली आहे[१३] ती अशी– नागेश सोळा वर्षांचा होईपावेतों द्रूड होता व आखाड्यांत जाऊन मल्लविद्या शिकला. एकदां एका विद्व-त्सभेंत तो घुसून जाऊन बसला व त्यानें कांहीं वायफळ बडबड केली म्हणून त्यास हाकून देण्यांत आल्यानें त्याला तो अपमान सहन झाला नाहीं. म्हणून काशीस जाऊन त्यानें अध्ययन केलें. व्याकरण विषयांतील त्याचे गुरु भट्टोजींचा नातू हरि दीक्षित होय. इतर शास्त्रें तो इतरांपाशीं

१२. "शृङ्गवेरपुराधीशरामतो लब्धजीविकः। शिवभट्टसुतो धीमान् सतीदेव्यास्तु गर्भजः॥"

१३. पहा खंड १६ 'न', पान ७१ (ज्ञानकोश, डॉ. केतकरकृत)

शिकला असा उल्लेख बृहत्शब्देंदुशेखरांत व मंजूषेंत आहे. न्यायशास्त्राचा त्याचा गुरु रामराम भट्टाचार्य नामक वंगदेशीय होता.[१४] काशींत अशी माहिती सांगतात कीं, तो फार वृद्ध होऊन वारला. त्याच्या वार्धक्यामुळें त्याची कंबर वांकली होती व पाठीला मोठें कुबड निघाल्यानें त्याला टेकून बसतां येईना. म्हणून त्यानें भिंतीला एक छिद्र पाडून त्यांत पाठीचें कुबड घालून तो आपला लेखनव्यवसाय अव्याहत चालवीत असे.

जयपूरचा राजा सवाई जयसिंह (इ. स. १६८८-१७२८) यानें इ. स. १७१४ मध्यें अश्वमेध यज्ञ केला. त्यानें हिंदुस्थानांतल्या निवडक व प्रसिद्ध विद्वानांना त्यासाठीं निमंत्रण-पत्रिका पाठविल्या होत्या. त्यांत नागेशालाही निमंत्रण होतें. परंतु तो गेला नाहीं. त्याचें कारण त्यानें असें दिलें कीं, मी क्षेत्रसंन्यास घेतला आहे. यामुळें त्या वेळीं त्याच्या वयाला कमींतकमी ४० वर्षें तरी झालीं असावींत. म्हणजे त्याचा जन्म अदमासें १६४७ सालीं झाला असावा असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्र ज्ञानकोशांत (न–पान ७१) मात्र तो वयाच्या ६२ व्या वर्षी वारला असें म्हटलें आहे त्याला पुरावा नाहीं. याउलट म. म. हरप्रसादशास्त्री एका प्रस्तावनेंत म्हणतात कीं, नागेश स. १७७५ मध्यें वारला. यालाही लेखी पुरावा नाहीं.[१५] यावरून–ही दंतकथा खरी असल्यास–नागेशाचें वय मरणसमयीं १०० वर्षांचें असलें पाहिजे.

---

१४. 'अधीत्य फणिभाष्याब्धिं सुधींद्रहरिदीक्षितात्। न्यायतंत्रं रामरामाद्वादिरक्षोघ्नरामतः'॥

१५. 'The greatest supporter of Bhattoji Dixit, however, was Nagoji Bhatt, a pupil of Hari Dixit, who commented upon all his works and the works of his school. He had a long life and lived more than hundred years and died in 1775 on the day when Warren Hasting's life was in jeopardy on account of the Benares revolt'. (हस्तलिखित ग्रंथ-सूचीवर म. म. हरप्रसादशास्त्री यांची प्रस्तावना.)

नागेशाची ग्रंथसंपत्ति—नागेशानें व्याकरणशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. लघुकौमुदीवर 'लघु' व 'बृहत्' '**शब्देन्दुशेखर**' नांवाची टीका लिहिली. ही टीका थोडक्यांत पण मुद्देसूद विवेचन करणारी असल्यानें ती अल्पावधींत फारच लोकप्रिय झाली. तिच्यावर पांडित्यपूर्ण टीका नागेशाच्या शिष्यांनीं व प्रशिष्यांनीं लिहिल्या आहेत. दुसरा प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे '**परिभाषेंदुशेखर**' होय. या ग्रंथांत पाणिनिसूत्रांच्या यथायोग्य अर्थज्ञानाकरितां व उदाहरणसिद्धीकरितां उपयुक्त अशा १३० वर परिभाषा देऊन त्यांवर वृत्ति लिहिली आहे. हा ग्रंथ अर्थयुक्त पण लाघवयुक्त लिहिला गेल्यामुळें त्याचें लवकर आकलन होत नाहीं. या ग्रंथावर पंचविसावर टीका असून वैयाकरण-कुलांतील प्रत्येक प्रसिद्ध वैयाकरणानें त्यावर टीका लिहिलेली आहे. सर्वांत अखेरची टीका कै. म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांची 'तत्त्वादर्श' असून ती त्यांच्या चिरंजीवांनीं नुकतीच प्रसिद्ध केली आहे. तिसरा ग्रंथ म्हणजे महाभाष्यावर कैयटानें 'प्रदीप' टीका लिहिली. तिच्यावर नागेशानें '**उद्योत**' लिहून कैयटाच्या विवरणांत कांहीं अस्पष्टता राहिली ती भरून काढली. त्या-नंतर '**लघुमञ्जूषा**' व '**परमलघुमञ्जूषा**' हे अर्थग्रंथ लिहिले. 'परिभाषेंदुशेखराचे' डॉ. कील्हॉर्न यानें संपादन करून त्याच्या विद्वत्तेला साजेल असा इंग्रजी अनुवाद त्यानें केला आहे. नागेशाच्या व्याकरणग्रंथांपैकीं महत्त्वाचे ग्रंथ वर दिले. पण याशिवाय इतर शास्त्रांवरही त्यानें अनेक ग्रंथ लिहिले आहेत ते येथें देण्याचें कारण नाहीं. त्याच्या लहानमोठ्या ग्रंथांची यादी शंभरापावेतों जात असून निर्णय-सागर छापखान्यांत छापलेल्या महाभाष्याच्या प्रस्तावनेंत ती दिली आहे. यावरून ग्रंथ-लेखनाचें कार्य नागेशानें अखंडपणें चालविलें होतें असें दिसतें. त्यांच्या ग्रंथांना 'शेखर' किंवा 'मंजूषा' अशीं नांवें दिलेलीं दिसतात. पुत्रसंतान नसल्यामुळें एकदां त्यांची पत्नी दुःखीकष्टी झाली असतां नागेशानें विनोदानें उत्तर दिलें! तो म्हणाला, शेखर पुत्र व मंजूषा कन्या असतांना दुःख करण्याचें कारण काय? (शब्देन्दुशेखरं पुत्रं मञ्जूषां चैव कन्यकाम्। स्वमतौ स्वयमुत्पाद्य शिवयोरर्पितौ मया॥) असें नागेशानें मंजूषा-ग्रंथांत म्हटलें आहे.

नागेशासंबंधीं वैयाकरणांत अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. नावेंतून नदीपलीकडे जाण्यास त्याजपाशीं पैसे नव्हते. नावाड्याला हा नागेश असल्याचें माहीत नसल्यानें तो म्हणाला, 'असा कोण तूं लागून राहिला आहेस? तूं काशींतला नागेश असतास तर तुला फुकट बसूं दिलें असतें!' नागेशाला यावरून आपली खरी योग्यता कळून आली. शृंगवेरपुराच्या रामसिंहाचा आश्रय मिळेपावेतों नागेश विपन्नावस्थेंतच होता. त्याच्याकडे आश्रयाला असतां एकदा विद्वानांची सभा झाली. पण नागेश त्यांना माहीत नव्हता. एकानें नागेशाचें असें मत आहे असें सांगतांच दुसरा म्हणाला, 'कोऽयं नागेशः!' त्यावर नागेश देवघरांतून बाहेर आला व म्हणाला, 'एषोऽहं स नागेशः!' असो.

गेल्या दोन शतकांत नागेशाइतका अष्टपैलू विद्वान् झाला नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. कैयटानें जसें महाभाष्याला स्थैर्य आणलें त्याप्रमाणें नागेशानें भट्टोजी दीक्षितांच्या सिद्धान्तकौमुदीला आणलें व तें अजून कायम आहे. आज महाराष्ट्रांत जी वैयाकरणांची परंपरा आहे तिचें मूळ नागोजीभट्ट आहे.

नागेशानंतर—नागेशानंतरचा काल 'टीकाकाल' आहे. या कालांत अनेक टीकाग्रंथांचें जाळें विणलें गेलें. या जाळ्यांतून मूळ ग्रंथाचा अभ्यास होईनासा झाला. वादविवादसभेंत फड जिंकण्यासाठीं हे टीकाग्रंथ झाले! मूळ ग्रंथ सुबोध होण्याऐवजीं टीकांनीं ते जास्त क्लिष्ट वाटूं लागले! ग्रंथाचें नांव मात्र 'सुबोधिनी' किंवा अशाच अर्थाचें कांहींतरी असावयाचें! नागेशाच्या मंजूषेवर पांच, उद्योतावर दोन, शेखरावर पंधरा व परिभाषेंदुशेखरावर पंचवीस टीका आज उपलब्ध आहेत! कांहीं ग्रंथांचीं नांवें देतों म्हणजे वरील म्हणण्याची यथार्थता पटेल.

पाणिनीसूत्रांवर विश्वेश्वराचा व्याकरणसुधामहानिधि, सदाशिवमिश्राची गूढार्थदीपिनी, अन्नंभट्टाची सूत्रवृत्ति, धरणीधराचा वैयाकरणसर्वस्व, नारायण पंडिताचा शब्दभूषण, रामचंद्रभट्ट तारेची पाणिनिसूत्रवृत्ति, ओरंभट्टाची व्याकरणदीपिका, नीलकंठाचा वैयाकरणरहस्य, कृष्णमिश्राचा रत्नार्णव, रामकृष्णाचा वैयाकरणसिद्धान्तरत्नाकर, तारानाथाचा 'सरला',

वासुदेव दीक्षिताची ‘बालमनोरमा’, इत्यादी टीका झाल्या. शब्द-कौस्तुभावर नागेशाची ‘विषयी,’ हरिवल्लभाची दर्पणा, कृष्णमिश्राचा भावदीप, बाळंभट्टाचा उद्योत व राघवेंद्राचार्यांची प्रभा या व्याख्या आहेत. कोंडभट्टाच्या वैय्याकरणभूषणावर वनमालीची मतोन्मजा व भूषणसारावरही हरिवल्लभाची लघुभूषणकान्ति, मन्तुदेवाची दर्पणा व भैरवमिश्राची ‘परीक्षा’ या टीका आहेत. याशिवाय शंकरशास्त्री मारुलकरांची अगदीं आधुनिक ‘शाङ्करी’ आहे.[१६]

नागेशाची शिष्यपरंपरा

नागेशाचे प्रसिद्ध शिष्य **वैद्यनाथ पायगुंडे** होत. यांचा काल सामान्यतः सन १६९० ते १७८० समजला जातो. त्याच्या पित्याचें नांव महादेव व मातेचें नांव लक्ष्मी होतें. मिथिलेचा राजा चंद्रसिंह याची पत्नी लक्ष्मीदेवी हिचा याला आश्रय होता. गुरूच्या पावलावर पाऊल ठेवून यानेंही बरीच ग्रंथसंपत्ति निर्माण केली पण ती सर्व टीकास्वरूपाची आहे. परिभाषेंदुशेखरावर ‘गदा’, महाभाष्यप्रदीपोद्योतावर ‘छाया’, वैया-करणसिद्धान्तमंजूषेवर ‘कला’, शब्दकौस्तुभावर ‘प्रभा’, शब्दरत्नावर ‘भावप्रकाशिका’ व शब्देंदुशेखरावर ‘चिदस्थिमाला’ या टीका प्रसिद्ध आहेत. इतर शास्त्रांवरही यांचें विपुल लिखाण आहे. मिताक्षरेच्या व्यवहारकांडावर यांनीं टीका लिहिली असून तिचें नांव ‘बाळंभट्टी’ आहे. एक तर वैद्यनाथाचें दुसरें नांव बाळंभट्ट असावें किंवा त्याच्या मुलाचें तें असावें असेंही कांहींचें म्हणणें आहे.

नीळकंठशास्त्री थत्ते—यांचा काल साधारणपणें सन १७५० ते १८३४ आहे. पुण्याहून पेशव्यांनीं त्यांना मुद्दाम काशीस अध्ययनासाठीं पाठविलें होतें असें म्हणतात. त्यांना पेशव्यांच्या पडत्या काळांतही फार मान होता व दक्षिणेकडे त्यांच्या इतका तरी विद्वान् दुसरा कोणी नव्हता. नीळकंठ-

१६. व्याकरण-महाभाष्य, प्रस्तावनाखंड, भाग ७ वा, पान ४०३ (प्रा. का. वा. अभ्यंकरकृत)

शास्त्री यांनीं आपल्या प्रगुरूच्या—नागेशाच्या—नव्य मताचा पुरस्कार केला व व्याकरणविषयाचें अध्यापन करून शिष्यपरंपरा चालू केली.

नीलकंठशास्त्री थत्ते हे पेशवाईंतील पाणिनीय व्याकरणसंप्रदायांतील अखेरचे वैयाकरण होत. त्यांचा विद्यावंश वेगळा दिला आहे. रामशास्त्री प्रभुण्यानंतर पेशवे-दरबारांत तेच मुख्य शास्त्री होते. सन १८१८ त पेशवाईच्या अस्तानंतर ही परंपरा कांहीं वेळ स्थगित झाली होती, परंतु येथील गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यानें दुसऱ्या बाजीरावाच्या विश्रामबागवाड्यांत श्रावणमास दक्षिणेंतून संस्कृत-महाविद्यालय काढलें. मुख्य गुरुजी मोरशास्त्री साठे असून इतर गुरुजींमध्यें नीलकंठशास्त्री थत्त्यांचे शिष्यच होते.

हें संस्कृत-महाविद्यालय कांहीं वर्षे ठीक चाललें, परंतु पुढें इंग्रजी शाळा तेथेंच सुरू झाल्यामुळें हळूहळू हें विद्यालय सन १८३४ मध्यें बंद पडलें! इंग्रजीचें नवें वातावण सुरू झालें! पेशव्यांच्या ज्या श्रावण-मास दक्षिणेंतून हें विद्यालय चालत होतें, त्या दक्षिणेचा ओघ आतां डेक्कन कॉलेज (१८६६) व इतर संस्था यांकडे वळला! पुण्यांतील संस्कृतविद्येची परंपरा यामुळें नष्ट झाली! यामुळें झालें काय कीं, ज्यांना ही प्राचीन परंपरा पुढें चालू ठेवावयाची होती त्यांपैकीं कांहीं काशीला गेले तर कांहीं ग्वाल्हेर, धार, इंदूर वगैरे संस्थानांत स्थायिक झाले व तेथें पाठशाळा चालवून त्यांनीं विद्यार्थी तयार केले. पुणें पूर्वी राजधानीचें शहर असूनहि तेथें मात्र या विद्येचा लोप झाला!

ह्या परिस्थितींतून बाहेर पडण्याकरितां ग्वाल्हेरहून प्राचीन परंपरेप्रमाणें अध्ययन करून आलेले कै. दामोदरशास्त्री साठे यांनीं व कै. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर, प्रा. काथवटे व शेजवलकरशास्त्री यांनीं पुणें येथें सन १८८५ सालीं वसंतपंचमीच्या मुहूर्तावर संस्कृतपाठशाळा स्थापन केली. विश्रामबागवाड्यांतील संस्कृत-महाविद्यालयही वसंतपंचमीच्या दिवशींच स्थापन झालें होतें.*

* व्याकरणमहाभाष्य, उपोद्घात, पृष्ठ ५४.

या पाठशाळेंत कै. म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं सन १८९० ते १९४२ पर्यंत ५२ वर्षें अध्यापनाचें काम केलें.

कै. वासुदेवशास्त्री अभ्यंकर—शास्त्रीबुवांचें मूळ घराणें रत्नागिरी जिल्ह्यांतील पुळ्याच्या गणपतीजवळ मालगुंड येथील असून तेंच त्यांच्या पूर्वजांचें निवासस्थान होतें. शास्त्रीबोवांचे पितामह भास्करशास्त्री यांचा जन्म सन १७८३ मध्यें झाला. हे नीलकंठशास्त्री थत्ते यांचे शिष्य होते हें त्यांच्या विद्यावंशावरून कळून येईलच. हे महापंडित होते. त्यांचे शिष्य रामशास्त्री गोडबोले. मृत्युसमयीं भास्करशास्त्र्यांनीं रामशास्त्री यांना आपल्या नातवाकडे लक्ष देण्यास सांगितलें. त्याला अनुसरून रामशास्त्र्यांनीं वासुदेवशास्त्र्यांचें शिक्षण संपूर्ण केलें. त्यांना व्याकरणशास्त्रांत पारंगत केलें, इतकेंच नव्हे तर वेदान्त, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रांतही त्यांचा योग्य प्रवेश करून दिला. या दिग्गज पंडिताची प्रतिभा प्रखर होती: एकदां त्यांच्या गुरुजींच्या समक्ष दूर देशच्या पंडितांनीं त्यांची जणूं काय परीक्षाच घेतली ! 'स एवायं नागः सहति कलभेभ्यः परिभवम्' ही समस्या पूर्ण करण्यास त्यांना सांगितली. ती त्यांनीं ताबडतोब केली. ती येणेंप्रमाणें—" पुरा योऽसौ कण्ठीरवनिनदमाकर्ण्य पुरतः स्फुरन् कोपः साक्षादिव सपदि जेतुं स्म यतते। स एवायं नागः सहति कलभेभ्यः परिभवं दशामेतां प्रायोऽनुभवति हि लोको गतवयाः ॥ "

पाठशाळेंत काम करीत असतांनाच त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें सन १८९२ ते सन १९२९ पर्यंत तीन तपें अध्यापनाचें काम केलें. न्यायमूर्ति रानडे यांना शास्त्रीबोवांच्या विद्वत्तेची पारख असल्यानें त्यांच्याच सल्ल्यावरून नामदार गोखल्यांनीं त्यांची फर्ग्युसन कॉलेजमध्यें नेमणूक केली होती. याप्रमाणें फर्ग्युसन कॉलेजमध्यें सदतीस वर्षें काम केलें. त्या वेळच्या इंग्रजसरकारनें या त्यांच्या बहुमोल कामगिरीबद्दल व विद्वत्तेदाखल त्यांना सन १९२१ मध्यें 'महामहोपाध्याय' पदवी दिली. सन १८९२ ते १९४२ पर्यंत त्यांनीं संस्कृत पाठशाळेंत अध्यापनाचें काम करून अनेक शिष्य तयार केले. आज महाराष्ट्रांत जे थोडे नांव घेण्याजोगे वैयाकरण

व शास्त्री आहेत त्यांतील बहुतेक त्यांचे शिष्य आहेत! फर्ग्युसन कॉलेज-मधील विद्यार्थ्यांना तर त्यांच्या अध्यापनाचा लाभ झालाच, परंतु तेथील संस्कृत प्राध्यापकांच्या अध्यापनाचाही कस त्यांच्या मार्गदर्शनानें व शिकवणीनें वाढला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

शास्त्रीबोवा केवळ अध्यापनाचेंच काम करून राहिले नाहींत तर त्यांनीं प्रचंड ग्रंथनिर्मिति केली. पतंजलीच्या महाभाष्याचा मराठी अनुवाद केला व तो डी. ई. सोसायटीनें सहा खंडांत प्रसिद्ध केला. हें काम ते सतत बारा वर्षें करीत होते! जगांतल्या इतर कोणत्याही भाषेंत महाभाष्याचा संपूर्ण अनुवाद अजूनपावेतों झालेला नाहीं व पुढें होईलसा दिसत नाहीं! शिवाय 'तत्त्वादर्श' नांवाची परिभाषेंदुशेखरावर त्यांनीं टीका लिहिली. ती नुकतीच भां. प्रा. वि. सं. मंडळानें प्रसिद्ध केली आहे. याशिवाय इतर शास्त्रांवरही त्यांनीं जे अनेक ग्रंथ लिहिले त्यांची एकंदर संख्या पंचवीस होईल.*

पाणिनीय व्याकरणसंप्रदायांतील हा दिग्गजपंडित अखेरचा तर ठरणार नाहीं ना अशी भीति मनांत आल्यावांचून राहत नाहीं! काळाच्या पोटांत काय आहे हें एक ईश्वरच जाणें!

याप्रमाणें पाणिनीपासून अद्ययावत् पाणिनीय व्याकरणसंप्रदायाची स्थूल रूपरेषा दिली आहे. ती उपयुक्त होईल अशी आशा आहे.

नीळकंठशास्त्री थत्ते यांच्या शिष्यांत व प्रशिष्यांत आज महाराष्ट्रांतील खालील घराणीं अंतर्भूत होतात—अभ्यंकर, भट, साठे, गोडबोले, गजेंद्रगडकर, ओक, अष्टपुत्रे, कऱ्हाडकर, कार्लेकर, रानडे, मराठे, तेलंग, द्रविड, चिपळूणकर, पेंढारकर, निगुडकर, शेंड्ये वगैरे. महाराष्ट्राप्रमाणें इतर प्रांतांतही कांहीं घराणीं प्रसिद्ध आहेत. नागपुरास घाटे, घुले,

---

* महाभाष्य-प्रस्तावना, पान ४८, प्रा. का. बा. अभ्यंकरकृत.

नेपाळांत हेमराज पंडित व काशीक्षेत्रांतील अनेक घराणीं हीं पाणिनीय व्याकरण-संप्रदायांतील आहेत.[१७]

---

१७. **नागोजीभट्टांचा विद्यावंश.**

नागोजीभट्ट

वैद्यनाथ पायगुंडे

नीलकंठशास्त्री थत्ते (१७६० ते १८३४)

१ राघवाचार्य ओक
२ राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर
६ मोरशास्त्री साठे
७ नीळकंठशास्त्री भट

३ गोविंदाचार्य अष्टपुत्रे
४ मेरुशास्त्री गोडबोले
५ कुप्पाशास्त्री द्रवीड
कृष्णशास्त्री चिपळूणकर

विष्णुशास्त्री चिपळूणकर

विष्णुशास्त्री भट — पुत्र–त्रिंबकशास्त्री — पुत्र–बाबूशास्त्री भट
धोंडशास्त्री भट — शिष्य–दामोदरशास्त्री साठे — पुत्र–महादेवशास्त्री साठे (म. दा. साठे—प्रस्तुत लेखक)
हरिशास्त्री भट — पुत्र–बाळशास्त्री भट

८ भास्करशास्त्री अभ्यंकर
९ दिनकरशास्त्री खांबेटे
१० गोपाळाचार्य कऱ्हाडकर

भास्करशास्त्री अभ्यंकर — रामशास्त्री गोडबोले — वासुदेवशास्त्री अभ्यंकर — काशिनाथशास्त्री अभ्यंकर (प्रा. का. वा. अभ्यंकर)

१०. पाणिनीय व्याकरणांतील अर्थप्रक्रिया

व्याकरणशास्त्राचे शब्दप्रक्रिया व अर्थप्रक्रिया किंवा शब्दविचार आणि अर्थविचार असे दोन भाग आहेत. त्यांपैकीं शब्दप्रक्रियेचा विचार प्रातिशाख्यें व निरुक्त यांत केला असून पुढें पाणिनीनें तो आपल्या ' अष्टाध्यायी ' ग्रंथांत विस्तारानें केला. तोच क्रम पुढें वार्तिककार कात्यायनानें वार्तिकें रचून व भाष्यकार पतंजलीनें अष्टाध्यायीवर भाष्य लिहून पूर्णतेला नेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या ग्रंथांतून अर्थप्रक्रियेचा विचारच नाहीं असें म्हणतां येत नाहीं, पण तो फारच अल्पांशानें केला आहे असें म्हणावें लागतें. पाणिनीच्या सूत्रांत तो सुप्त आहे. पतंजलीनें पा. सू. वृद्धिरादैच्। १-१-१ यावर भाष्य करतांना सुरुवातीला ' सिद्धे शब्दार्थसंबन्धे ' अशा वार्तिकानें सुरुवात करून शब्द आणि अर्थ यांचा संबंध नित्य आहे असें प्रतिपादन केलें आहे.

अर्थप्रक्रियेमध्यें शब्द आणि अर्थ यांच्या परस्परसंबंधाविषयीं चर्चा केलेली असते. यालाच शब्दार्थसंबंध म्हणतात. याविषयीं वैयाकरण, मीमांसक, नैयायिक, आलंकारिक (साहित्यिक) आणि बौद्धमतानुयायी यांची विचारसरणी त्यांच्या तत्त्वज्ञानाला व सिद्धान्ताला अनुसरून भिन्न भिन्न असते व आहे. वैयाकरण शब्द आणि त्यांचा अर्थ यांचा संबंध नित्य असतो (सिद्धः शब्दः अर्थः संबन्धश्च) असें मानतात. आलंकारिकहि तसेंच मानतात. फरक एवढाच कीं, आलंकारिक हा शब्दार्थांचा नित्यसंबंध ईश्वरानें करून ठेवला आहे असें मानतात, तर वैयाकरण तो स्वाभाविक आहे असें मानतात.[1] वैयाकरण शब्दाचा ' अभिधा ' अर्थच

---

१. ' The grammarians, just as the rhetoricians, have stated that the connection between words and their senses is a permanent (नित्य) one, the only difference in their views being that the rhetoricians state that the words are related, no doubt permanently, to their senses by means of संकेत or convention which solely depends upon the will of God, while the grammarians say that the expression of the sense is only a natural function of words. cf. अभिधानं पुनः स्वाभाविकम्. Var. on Pan.' 1-2-64. ' Dictionary of Sk. Grammar, ' p. 38.

मानतात, तर आलंकारिक लक्षणा आणि व्यञ्जना असे आणखीही अर्थ मानतात. वैयाकरण अभिधेला व्यापक (Extended) अर्थ देऊन ' लक्षणा ' अर्थाचें काम भागवितात. ' गङ्गायां घोषः ' किंवा ' कुन्ताः प्रविशन्ति ' या वाक्यांत वैयाकरण लक्षणा मानीत नाहींत. असे अनेक फरक दाखवितां येतील. मीमांसक कर्मकांडाला–यज्ञयागादिकांना–महत्त्व देत असल्यानें वेदांतील ऋचांचा अर्थ कसा लावावयाचा याबद्दल विधि, नियम, परिसंख्या इत्यादि प्रक्रियांनीं तो लावतात. मीमांसक वेद अपौरुषेय मानीत असल्यानें शब्द व त्यांचा अर्थ नित्य मानतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं, तर बौद्धानुयायी सर्व जगच अनित्य मानतात ! तेव्हां ते शब्दनित्यत्व मानणें शक्यच नाहीं ! ' वैदिकशब्दः प्रमाणम्–विधिजन्यबोधविषयः अर्थः इति मीमांसका आहुः ' (न्यायकोश पान ७६). नैयायिक शब्द अनित्य मानतात. ते म्हणतात, ' शब्दस्तु आकाशमात्रवृत्तिः बाह्यैकेन्द्रियग्राह्यः द्विक्षणावस्थायी तृतीयक्षणे नश्यति च । अतएव अनित्यः इति नैयायिकराद्धान्तः ' । (न्यायकोश पा. ८६१). बौद्ध शब्दाला प्रमाण मानीत नाहींत. ' शब्दो न प्रमाणमिति सौगता आहुः ' । (प्र. प्र. ४). नैयायिक वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ असे दोनच शब्दाचे अर्थ मानतात, तर आलंकारिक व्यंग्यार्थही मानतात. 'अयमर्थो नैयायिकमते द्विविधः वाच्यः लक्ष्य इति ' । (न्यायकोश).

आतां ' शब्द ' आणि त्याचा ' अर्थ ' यांविषयीं प्रथमतः विचार करूं. ' शब्द ' म्हणजे काय, असा विचार करीत असतांना महाभाष्यकार पतंजलि ' सामान्यतः अर्थ असलेला ध्वनिसमूह ' (येन उच्चारितेन अर्थः प्रतीयते स शब्दः) किंवा ' शब्दं कुरु । शब्दं मा कार्षीः । ध्वनिं कुर्वन्नेवमुच्यते ' (म. भा. आह्निक १) असें म्हणतो. इंग्रजींत ' A phonetic unit possessed of sound ' असा ' शब्द ' याचा अर्थ करतां येईल. प्राचीन वैयाकरणांनीं 'अथ' शब्दाची व्याख्या ' अर्थः पदम् ' अशी केली आहे. ' पद्यते-गम्यते-ज्ञायते अर्थः अनेन इति पदम्' (उव्वट, वा. प्रा. ३, २) अशी ' पद ' शब्दाची व्याख्या केली आहे. शब्दापासून अर्थ कसा निष्पन्न होतो याची चर्चा ' स्फोट ' वादांत दिसून येते. शब्द ' नित्य ' आहे याचा अर्थ त्याचा ' स्फोट ' नित्य आहे.

ध्वनि कदाचित् अनित्य असेल.[२] भर्तृहरीनें आपल्या 'वाक्यपदीय' ग्रंथांत याची सविस्तर व मुद्देसूद चर्चा केली आहे. शिवाय कौंडभट्ट व नागेश यांनीं स्फोटवादावर ग्रंथ लिहिले आहेत. नैयायिकांना तो मान्य नाहीं. पा. सू. 'अवङ् स्फोटायनस्य' ६।१।१२३ यांतील स्फोटायन हा या तत्त्वाचा प्रणेता असावा असें हरदत्ताचें मत आहे.

इतकी अल्प प्रस्तावना केल्यानंतर अर्थप्रक्रियेवर कोणीकोणी कोणकोणते ग्रंथ लिहिले तें पाहूं.

पतंजलीनंतर खऱ्या अर्थानें अर्थप्रक्रियेवरील ग्रंथ प्रथमतः भर्तृहरीनें सातव्या शतकांत 'वाक्यपदीय' नांवाचा लिहिला[३]. या ग्रंथाचे पदकाण्ड किंवा ब्रह्मकाण्ड, वाक्यकाण्ड आणि संकीर्णकाण्ड असे तीन भाग असून त्यांत पहिल्या दोन काण्डांवर पुण्यराजाची टीका आहे. कोणी ही स्वतः भर्तृहरीची 'स्वोपज्ञ' टीका आहे असें मानतात. तिसऱ्या कांडावर (संकीर्णकांडावर) हेलाराजाची टीका प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचा विस्तृत विवेचनासह मराठी अनुवाद पुणें येथील टिळकविद्यापीठ लवकरच प्रसिद्ध करणार आहे असें ऐकतों. तिसऱ्या कांडावरील टीकेला 'वाक्यपदीयप्रकीर्णप्रकाश' असेंही नांव आहे. वाक्यपदीय ग्रंथ कारिकात्मक असून समजण्यास क्लिष्ट आहे. भर्तृहरीनें व्याकरणशास्त्राला दर्शनाचें स्वरूप देऊन त्या ग्रंथाची सुरुवातच खालील श्लोकानें केली आहे.

---

२. स्फोटवाद is an important theory which says that शब्द which communicates the meaning is quite different from the sound which is produced and heard and which is instrumental in the manifestation of an internal voice which is called स्फोट. 'Dictionary of Sk. Grammar,' p. 405.

३. 'वाक्यपदीय'– a celebrated work on meanings of words and sentences written by the famous grammarian भर्तृहरि or हरि of the 7th Century A. D. The work is looked upon as final authority regarding the grammatical treatment of words and sentences for the interpretation and often quoted by later grammarians'. 'Dictionary of Sk. Grammar,' p. 320.

अनादिनिधनं ब्रह्म शब्दतत्त्वं यदक्षरम् ।
विवर्ततेऽर्थभावेन प्रक्रिया जगतो यतः ॥ वा. प. ब्रह्मकाण्ड १

पुढें सहस्रवर्षें तरी अर्थप्रक्रियेवर महत्त्वाचा ग्रंथ झाला नाहीं. कैयटानें महाभाष्यावर 'प्रदीप' नांवाची टीका दहाव्या शतकांत लिहिली खरी परंतु त्यांत शब्दप्रक्रियेवरच भर दिलेला आहे. पुढें सतराव्या शतकांत भट्टोजी दीक्षितानें 'वैयाकरणसिद्धान्तकारिका' हा अर्थविचारावर ग्रंथ लिहिला. यांत फक्त ७२ कारिकाच आहेत. जणूं काय भर्तृहरीच्या वाक्यपदीयाचीच संक्षिप्त आवृत्ति! पण या कारिकांचें स्पष्टीकरण त्यानेंच 'शब्दकौस्तुभ' ग्रंथांत केलें आहे. यावर इंद्रदत्तोपाध्यायानें 'शब्दकौस्तुभगुण' व वैद्यनाथ पायगुंडे यानें 'शब्दकौस्तुभटीका' असे टीकात्मक ग्रंथ लिहिले. शिवाय नागोजीभट्टानेंही 'शब्दकौस्तुभव्याख्या' किंवा 'विषमपदव्याख्या' यावर लिहिली आहे. मूळ शब्दकौस्तुभ ग्रंथाला भट्टोजीनें महाभाष्याचाच आधार घेतला आहे.[४]

वरील ग्रंथांनीं जणूं काय समाधान न झाल्यानें भट्टोजीचा पुतण्या कोंडभट्ट यानें 'वैयाकरणभूषण' हा चतुर्दश प्रकरणात्मक ग्रंथ अर्थविचारावर स्वतंत्रपणें रचला. याचे 'बृहद्वैयाकरणभूषण' आणि 'वैयाकरणभूषणसार' असे दोन प्रकार असून त्यांच्या नांवावरूनच त्यांतील प्रकारभेद लक्षांत येईल. हा ग्रंथ कोंडभट्टानें भट्टोजीच्या 'वैयाकरणसिद्धान्तकारिकांवर' आधारलेला आहे. ('A well-known work on the grammatical interpretation of words writteu by Koṇḍabhaṭṭa as an explanatory work (व्याख्यान) on the small work consisting of 72 कारिकाs written by his uncle

४. शब्दकौस्तुभ is a treatise on grammar critically explaining and discussing the meaning of Panini's Sūtras in the order of the author himself. The work is written by भट्टोजी दीक्षित and is mainly based on the महाभाष्य.'

'Dictionary of Sk. Grammar,' p. 356.

भट्टोजी.' 'Dict. of Sk. Grammar' by Prof. K. V. Abhyankar.) या 'सार' ग्रंथावर वैद्यनाथ पायगुंड्यांचा शिष्य हरिवल्लभ यानें लिहिलेली 'दर्पणा,' गोपालदेवाची 'लघुभूषणकान्ति' व हरिनाम केशव काळे याची 'काशिका' व अलीकडील टीका म्हणजे कै. वासुदेव-शास्त्री अभ्यंकर यांचे शिष्य कै. शंकरशास्त्री मारुलकर यांची 'शांकरी' इत्यादि टीका प्रसिद्ध आहेत. अर्थप्रक्रियेवर अखेरचा स्वतंत्र ग्रंथ म्हणजे नागोजीभट्टाचा 'परमलघुमंजूषा' हा होय. वैयाकरणसिद्धान्ताची जणूं काय हा ग्रंथ म्हणजे एक प्रकारची मंजूषाच असल्यानें ग्रंथाचें नांव सार्थ आहे. ग्रंथकारानें सुरुवातच तशी केली आहे,

> शिवं नत्वा हि नागेशेनानिन्द्या परमा लघुः ।
> वैयाकरणसिद्धान्तमञ्जूषैषा विरच्यते । प. ल. मंजूषा, पृष्ठ १

यावर पंडित सदाशिवशास्त्री यांची 'अर्थदीपिका व्याख्या' प्रसिद्ध आहे. या ग्रंथांत चौदा विषयांच्या अर्थांचा विचार सुगम रीतीनें केला आहे. ते विषय खालीलप्रमाणें—(१) शब्दशक्ति–विचार, (२) लक्षणा–विचार, (३) व्यञ्जना–विचार, (४) स्फोट–विचार, (५) आकाङ्क्षा-विचार, (६) योग्यता-विचार, (७) आसत्ति-विचार, (८) तात्पर्य-विचार, (९) धात्वर्थ-विचार, (१०) निपातार्थ-विचार, (११) लादेशार्थ-विचार, (१२) कारक–विचार, (१३) नामार्थ–विचार आणि (१४) समासादिवृत्त्यर्थ-विचार.

हे अर्थविचार जरी चौदा असले तरी त्यांत कारकविचार हा अधिक महत्त्वाचा असल्यानें याविषयीं पाणिनि व त्याच्या संप्रदायांतील इतर वैयाकरण यांचें मत काय आहे तें पाहूं. एकंदर सहा कारकें आहेत. तीं येणेंप्रमाणें—

> कर्ता कर्म च करणं संप्रदानं तथैव च ।
> अपादानाधिकरणमित्याहुः कारकाणि षट् ॥ प. ल. मं. पृष्ठ ९१

प्रथमतः 'कारक' कशाला म्हणावें याचाच विचार करूं. त्याच्या अनेक व्याख्या आहेत. त्यांपैकीं 'क्रियानिष्पादकत्वं कारकत्वम्' ही एक

असून ती सहाही कारकांना लागू पडते. ती कशी ? कारण 'करोतीति कारकः' अशी 'कारक' शब्दाची व्युत्पत्ति असल्यामुळें व क्रियेला उत्पन्न करणारा असा त्याचा अर्थ होत असल्यामुळें फार तर कर्त्याला कारक संज्ञा अन्वर्थक होईल, पण तसें नाहीं. ती जरी प्रत्यक्ष कर्त्याला लागू होत असली तरी मुख्य क्रिया ही नेहमीं इतर अनेक क्रियांचा समूह मिळून होत असल्यामुळें, त्या अवांतर क्रियांना प्राधान्य दिलें असतां त्या क्रियांच्या कर्त्यांनाही 'कारक' संज्ञा देण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, 'करोति' म्हटलें म्हणजे काय, कशानें, कोणासाठीं, कोठून व कोण असे प्रश्न केल्यास निरनिराळे अर्थ ती क्रिया घडवून आणण्याच्या कामीं उपयोगी पडतात व ते अर्थही एक प्रकारें अवांतर क्रिया करीत असल्यानें त्या त्या क्रियेचे कर्ते होऊं शकतात व त्यामुळें त्यांनाही 'करोतीति कारकम्' असें म्हणतां येतें.[५] 'कर्ता' शब्दाची व्याख्या पाणिनीनें 'स्वतंत्रः कर्ता' १।४।५४ या सूत्रानें केली आहे. तरी पण बोलणाऱ्याच्या इच्छेनुरूप कर्त्याला बाजूला सारून इतर कारकांनाही स्वातंत्र्य देऊन कर्ता करण्यांत येतें हें महाभाष्यकार पतंजलीनें एक सुंदर दृष्टान्त देऊन प्रतिपादन केलें आहे. तो दृष्टान्त असा. राजा जवळ असतांना इतर अमात्य जरी परतंत्र असले तरी तो दूर झाल्यावर त्यांचें स्वतंत्र अस्तित्व असतेंच कीं नाहीं !

तात्पर्य, कारकाचा क्रियेशीं संबंध असल्यामुळें षष्ठी–विभक्ति ही सामान्यतः कारकविभक्ति होऊं शकत नाहीं, कारण तिचा क्रियेशीं संबंध नसतो. त्याचप्रमाणें उपपद विभक्तीही त्याच कारणानें कारकविभक्ति होऊं शकत नाहीं, हें पुढें अधिक स्पष्ट करण्यांत येईलच. या 'कारक' संज्ञेचा विचार भर्तृहरीनें 'वाक्यपदीय' ग्रंथाच्या तिसऱ्या कांडाच्या 'दिक्समुद्देश' प्रकरणांत केला आहे.[६]

कर्तृकारक—यापुढें प्रत्येक कारकाचा विचार करूं. पहिलें कारक

५. पहा—महाभाष्य, प्रस्तावना खंड, पृष्ठ २६२.

६. 'निमित्तभेदादेकैव भिन्ना शक्तिः प्रतीयते ।
षोढा कर्तृत्वमेवाहुस्तत्प्रवृत्तेर्निबन्धनम् ॥ (वा. प. ३।७।३७)

'कर्ता' होय आणि या कारकाची प्रथमा विभक्ति असते. त्यासाठीं पाणिनीनें वेगळें सूत्र सांगितलेलें नाहीं, तर प्रत्येक प्रातिपादिक प्रथमेंत ठेवावें असें 'प्रातिपदिकार्थलिङ्गपरिमाणवचनमात्रे प्रथमा'।२।३।४६ या सामान्य सूत्रानें सांगितलें आहे. इतर कारकांना निरनिराळ्या विभक्ति इतर सूत्रांनीं सांगितल्या आहेत. आतां कर्ता कोणाला म्हणावें? पाणिनीनें 'स्वतन्त्रः कर्ता'।१।४।५४ असें सूत्र त्याच्या स्पष्टीकरणार्थ केलें आहे. त्याचा अर्थ—'क्रियायां स्वातन्त्र्येण विवक्षितः अर्थः' असा सि. कौ. कारानें केला आहे, तर नागेशानें 'प्रकृतधातुवाच्य-व्यापाराश्रयत्वं कर्तृत्वम्' अशी कर्त्याची व्याख्या केली आहे. भर्तृहरीनें 'धातुनोक्तक्रिये नित्यं कारकें कर्तृतेष्यते' अशी केली आहे. सर्वांचें तात्पर्य हेंच कीं, क्रियेमध्यें स्वतंत्र कर्तृत्व ज्याकडे असतें तो 'कर्ता' संज्ञेला प्राप्त होतो; म्हणजे बोलणाऱ्याची तशी विवक्षा असावी लागते. अन्य कारकें मात्र प्रकृत धातूचीं वाच्य नसतात, म्हणजे त्यांचें व्यापाराश्रयत्व प्रधान नसून गौण असतें. कर्तृकारकांत कर्ता 'अभिहित' म्हणजे उक्त होतो;[७] इतर कारकें अर्थातच 'अनाभिहित' असल्या-मुळें त्यांना 'अनभिहिते' २।३।३ या अधिकारसूत्राप्रमाणें विभक्ति होतात. 'अभिहिते प्रथमा' असें वार्तिक असल्यानें कर्त्याची प्रथमा विभक्ति होते. 'क्रियानिमित्तत्वं कारकत्वम्' अशी कारकाची व्याख्या केल्यास 'देवदत्तस्य तण्डुलं पचति' या वाक्यांत 'देवदत्त' निमित्त असल्यानें अतिव्याप्तीचा प्रसंग येईल. बोलणाऱ्याच्या विवक्षेवर अर्थ अवलंबून असल्यानें 'स्थाली पचति' आणि 'असिः छिनत्ति। या वाक्यांत 'स्थाल्याम्' किंवा 'असिना' अशा स्वाभाविक कारक-विभक्ति न येतां कर्ता झाल्यानें प्रथमा विभक्ति झाली. कर्मणि प्रयोगांत

७. सामान्यतः तिङ्, कृत्, तद्धित आणि समास यांच्या योगानेंच कर्ता अभिहित होतो व त्याची प्रथमाविभक्ति होते. क्वचित् निपातानेंही होतो. उदा० तिङ्–हरिः सेव्यते; कृत्–लक्ष्म्या सेवितः; तद्धित–शतेन क्रीतः शत्यः, समास–प्राप्तानन्दः; निपात–विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम्।

कर्म अभिहित झाल्यानें त्याची प्रथमा होऊन कर्त्याची तृतीया होते. उदा० 'देवदत्तेन ग्रामो गम्यते' इत्यादि.

कर्मकारक—'कर्तुरीप्सिततमं कर्म'। १।४।४९ या सूत्रानें कर्मकारकाची व्याख्या पाणिनीनें दिली आहे. त्यावर सि. कौ. कार व्याख्यान करतांना म्हणतो कीं, 'कर्तुः क्रियया आप्तुमिष्टतमं कारकं कर्मसंज्ञं भवति.' म्हणजे कर्त्याला क्रियेनें सर्वांत इष्ट असें जें मिळविण्याचें असतें तें 'कर्म'कारकसंज्ञक होतें. 'माषेषु अश्वं बध्नाति' या वाक्यांत 'माष' हे कर्त्याला ईप्सित नसून कर्माला-अश्वाला-ईप्सित आहेत म्हणून 'माष' कर्मसंज्ञक होत नाहीं. 'ईप्सिततम' शब्द सूत्रांत घातल्यानें 'पयसा ओदनं भुङ्क्ते' या वाक्यांत 'ओदन' 'ईप्सिततम' आहे तर 'पयस्' केवळ 'ईप्सित' साधनीभूत आहे म्हणून 'पयस्' शब्द कर्मसंज्ञक होत नाहीं. कधीं कधीं क्रियेशीं युक्त असलेल्या ईप्सिततम कर्माबरोबर अनीप्सितालाही कर्मसंज्ञा होते.[८] उदाहरणार्थ, 'ग्रामं गच्छन् **तृणं** स्पृशति' किंवा 'ओदनं भुञ्जानो **विषं** भुङ्क्ते' या वाक्यांत 'तृणम्' आणि 'विषम्' ही कर्त्याला ईप्सित नसतांना सुद्धां त्यांना कर्मसंज्ञा झाली. तसेंच 'सर्पम् लङ्घयति', 'चौरान् पश्यति' या वाक्यांत 'सर्पम्' आणि 'चौरान्' हीं 'अनीप्सितें' आहेत.

द्विकर्मक धातु—संस्कृत व्याकरणांत कांहीं द्विकर्मक धातु मानले जातात त्यांचा विचार पाणिनीनें 'अकथितं च।' १।४।५१ या सूत्रानें केला आहे. त्यावर सि. कौ. कारानें 'अपादानादिविशेषैरविवक्षितं कारकं कर्मसंज्ञं स्यात्' असें व्याख्यान केलें आहे. क्रियापदाला 'अकथित' म्हणजे अपादान वगैरे कारकांची विवक्षा न केल्यास त्या अविवक्षित पदार्थाला 'अकथित कर्म' म्हणावें असा या सूत्राचा अर्थ भाष्यकार पतंजलीनेंही केला आहे. 'दुह्, याच्' वगैरे धातूंची कारिका देऊन त्या धातूंचे पर्यायही त्यांत अन्तर्भूत केले आहेत. 'गां पयो दोग्धि' किंवा 'बलिं याचते वसुधाम्' या वाक्यांत 'गो' आणि 'बलि' या शब्दाचें मूळ

८. तथायुक्तं चानीप्सितम्। १।४।५०

अपादान कारक आहे, म्हणजे ते शब्द पञ्चमी विभक्तींत ठेवण्यास हरकत नाहीं; पण वक्त्यानें तशी विवक्षाच केली नाहीं तर त्यांना द्वितीया विभक्ति होते.[९] कर्मणि प्रयोगांत मुख्य कर्माची प्रथमा करावी व गौण कर्माची षष्ठी विभक्ति घालावी असें कांहीं वैयाकरण मानतात तर गौण कर्म प्रथमेंत ठेवावें असें इतर म्हणतात. 'अश्वं स्रुघ्नं नयति' या वाक्यांत 'स्रुघ्नस्य' यांतील षष्ठी विभक्तीच्या प्रयोगालाही पतंजलि मान्यता देतो–'उभयथा गोणिकापुत्रः' अशा शब्दांनीं ती मान्यता दिली आहे.[१०] गौण कर्माला 'कल्म' असेंही नांव आहे.

याविषयीं नागेश 'प. ल. मंजूषा' या ग्रंथांत वेगळेंच मत प्रकट करतो. तो म्हणतो, "दुहादीनां व्यापारद्वयार्थकत्वपक्षे 'अकथितं च' इति व्यर्थम् पूर्वेणैवेष्टसिद्धेः। एकव्यापारबोधकत्वपक्षे तु संबन्धषष्ठी-बाधनार्थम्।" (प. ल. मं. पान ९८). त्याचें म्हणणें असें कीं 'दुहादि' धातु द्विकर्मक मानले जातात याचा अर्थच असा कीं ते व्यापारद्वयाचाच बोध करतात आणि त्यामुळें नेहमींप्रमाणें त्यांना द्वितीया-विभक्ति होण्यास हरकत नाहीं. तेव्हां 'अकथितं च' या सूत्राची आवश्यकताच नाहीं. पण दुहादि धातु एकाच क्रियाव्यापाराचे बोधक आहेत असा पक्ष मानला तर संबन्धषष्ठीचा बाध व्हावा व 'अकथित कर्म' व्हावें म्हणून मग सूत्राची आवश्यकता आहे. 'अकथित' म्हणजे इतर कोणत्याहि कारकानें सांगितलें नसलेलें. 'अकथित' कर्म हें नेहमीं गौण असतें. कर्माचे अनेक प्रकार आहेत—(१) ईप्सिततम–'अन्नं भुङ्क्ते,' (२) अनीप्सित–'व्याघ्रं पश्यति,' (३) औदासीन्येन प्राप्य–'ग्रामं गच्छन् तृणं स्पृशति,' (४) अकथित किंवा अनाख्यात–'बलिं याचते वसुधाम्' याशिवाय निर्वर्त्य, प्राप्य आणि विकार्य असेही कर्माचे प्रकार असतात. (निर्वर्त्यं च विकार्यं च प्राप्यं चेति त्रिधा मतम्'

९. कर्मणि द्वितीया। २।३।२

१०. गुणकर्मणि वेष्यते (वार्तिक). गुणकर्म म्हणजे गौणकर्म.

पदमञ्जरी on पा. सू. १।४।४९). 'कर्म' शब्दाच्या व्याख्याही अनेक आहेत.[११]

'करण'कारक—करणकारकाची व्याख्या पाणिनीनें 'साधकतमं करणम्' १।४।४२। या सूत्रानें केली आहे. त्यावर भट्टोजीनें व्याख्यान करतांना म्हटलें आहे कीं, 'क्रियासिद्धौ प्रकृष्टोपकारकं करणं स्यात्'. क्रियेच्या सिद्धीसाठीं जें अत्यंत उपकारक तें कारक करणसंज्ञक होय. इतर व्याख्या खालीलप्रमाणें आहेत—'स्वनिष्ठव्यापाराव्यवधानेन फलनिष्पादकत्वं करणम्'। 'इदमेव साधकतमत्वम्' प. ल. मंजूषा, पृष्ठ, १००; भर्तृहरीनें वेगळीच व्याख्या दिली आहे–

क्रियायाः परिनिष्पत्तिर्यद् व्यापारादनन्तरम् ।
विवक्ष्यते यदा यत्र करणं तत्तदा स्मृतम् ॥ (वाक्यपदीय)

तात्पर्य, ज्यामुळें फलनिष्पत्ति ताबडतोब होते तें 'करण'कारक होय. उदाहरणार्थ, 'रामेण **बाणेन** हतो वाली' या वाक्यांत 'बाण' करणकारक आहे. कारण बाणनिष्ठ व्यापारानें प्राणवियोगरूप फलाचा आश्रयीभूत वाली आहे. सूत्रांत 'साधकतम' शब्द असल्यानें केवळ साधक असेल तर 'करण' संज्ञा होत नाहीं. उदाहरणार्थ, 'गङ्गायां घोषः' 'गंगेवर गौळवाडा आहे' या वाक्यांत 'गंगा' साधक' असेल पण 'साधकतम' नाहीं म्हणून गंगा करणसंज्ञक होत नाहीं.

'संप्रदान' कारक— पाणिनीनें 'कर्मणायमभिप्रैति स संप्रदानम्' १।४।३५ या सूत्रानें 'संप्रदान' कारकाची व्याख्या सूत्ररूपानें दिली आहे. यावर 'दानस्य कर्मणा यमभिप्रैति स संप्रदानसंज्ञः स्यात्' असें

११. 'कर्मत्वं 'च प्रकृतधात्वर्थप्रधानीभूतव्यापारप्रयोज्यप्रकृतधात्वर्थकलाश्रयत्वेन उद्देश्यत्वम्।' प. ल. मंजूषा, पृष्ठ ९५ 'इदमेव कर्मलक्षणे ईप्सिततमत्वम्।' 'यत् क्रियते तत्कर्म'—कात्या. on पा. सू. २।४।१३

'कर्त्रा क्रियया यद् आप्यं तत् कारकं कर्म' जैनेंद्र व्याकरण, १।२।१२० सूत्र.

भट्टोजीनें सिद्धान्तकौमुदींत व्याख्यान केलें आहे. याचा सरळ अर्थ असा कीं, दानरूपी जी क्रिया तिचा कर्ता त्या क्रियेशीं ज्याचा संबंध जोडतो (अभिप्रैति-संबध्नाति-संबन्धमीप्सति) त्याला संप्रदानसंज्ञा होते. यांत 'दानक्रिया' ही उपलक्षणात्मक आहे. 'क्रियामात्रकर्मसंबन्धाय क्रियाया-मुद्देश्यं यत् कारकं तत् संप्रदानम्' अशी नागेश व्याख्या देतो.[१२] 'ब्राह्मणाय गां ददाति' या वाक्यांत दानक्रियेचें कर्म जें 'गो' त्याचा ब्राह्मणाशीं संबंध असल्यानें 'ब्राह्मण' हा दानक्रियेचा उद्देश्य झाल्यानें त्याला 'संप्रदान' संज्ञा झाली. दानक्रिया ही उपलक्षणात्मक आहे. 'इदं उपलक्षणं क्रियामात्रस्य' (त. बो.) हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें दानरूपाक्रियाच पाहिजे असें नसून क्रियेचा कर्मांशीं तसा संबंध असला म्हणजे झालें. म्हणून 'चैत्रो मैत्राय वार्ताः कथयति' इत्यादि उदा-हरणांत कथनादि क्रियांचाही यांत अंतर्भाव होतो. कथनक्रियेची तशी विवक्षा नसेल तेव्हां 'मैत्रस्य' अशी संबन्धसामान्य षष्ठी होईल. पहिल्या उदाहरणांत 'गो' आणि 'ब्राह्मण' यांचा स्वस्वामिभावसंबंध आहे, तर दुसऱ्या उदाहरणांत 'मैत्र' आणि 'वार्ता' यांमध्यें ज्ञेयज्ञेतृत्वभाव-संबंध आहे. आतां वृत्तिकार (काशिकाकार) म्हणतो कीं, 'संप्रदान' ही महासंज्ञा केली असल्यानें ती अन्वर्थक आहे.[१३] 'सम्यग् दीयते अस्मै तत् संप्रदानम्' म्हणजे 'जें दिलें गेलें त्यावरचें स्वामित्व पूर्णपणें नाहींसें झालें पाहिजे;' म्हणजे स्वत्वनिवृत्ति सर्वथा झाली पाहिजे.[१४] त्यामुळें एखादी वस्तु देऊन पुन घ्यावयाची असेल तेथें संप्रदानसंज्ञा होऊं नये. 'ब्राह्मणाय गां ददाति' या उदाहरणांत ब्राह्मणाला गाय मनुष्य कायमची देऊन टाकतो. पण रजकाला (धोब्याला) धुण्यासाठीं कपडे

---

१२. 'A relation between a noun and verbal activity with which it is connected, of the type of the donation and the donee. The word is used in connection with the bearer of such a relation.' 'Dictionary of Sk. Grammar,' p. 377.

१३. 'महासंज्ञाकरणम् अन्वर्थसंज्ञाविधानार्थम्। (काशिका)

१४. 'दानं चापुनर्ग्रहणाय स्वत्वनिवृत्तिपूर्वकं परस्वत्वोत्पादनम्' (त. बा.)

दिल्यास 'रजकाय' न म्हणतां 'रजकस्य' असाच प्रयोग बरोबर होईल. कारण धोब्याला आपण कायमचें कपडे न देतां धुतल्यानंतर ते परत घेतों. पण भाष्यकार पतंजलि 'संप्रदान' ही अन्वर्थक संज्ञा घेत नाहीं. कारण भाष्यांत त्यानें 'खण्डिकोपाध्यायः (बालशिक्षकः) शिष्याय चपेटां ददाति' असें उदाहरण दिलें आहे. या उदाहरणांत दानक्रियेचा कांहीं संबंध नाहीं. यामुळें 'तदाचक्ष्व सुरेंद्राय स च युक्तं करोतु यत्' या सप्तशतींतल्या 'सुरेन्द्राय' या प्रयोगाची संगति लागते. तेव्हां 'रजकाय' हा वरील उदाहरणांतील प्रयोग शुद्ध समजण्यास हरकत नाहीं.

आतां 'पत्ये शेते' या वाक्यांत 'शी' धातु अकर्मक असतांना पतिशब्दाला संप्रदान संज्ञा कशी झाली? याचें उत्तर असें कीं, मूळ सूत्रांतच 'कर्मणायमभिप्रैति' याऐवजीं 'क्रियया यमभिप्रैति सोऽपि संप्रदानम्' असें कात्यायनानें वार्तिक केल्यानें काम भागतें. किंवा 'अकर्मकक्रियोद्देश्यत्वं संप्रदानम्' अशी एक संप्रदानाची व्याख्या नागेशानें दिली आहे. वरील उदाहरणांत पत्युद्देश्यक नायिकेचें शयन असल्यानें (पतिमनुकूलयितुं शेते) धातु अकर्मक असूनही 'पति' शब्दाला संप्रदानसंज्ञा झाली. इतर कांहीं वैयाकरण असें समाधान करतात कीं, 'संदर्शनप्रार्थनजन्याक्रियानिरूपितकर्मत्व' अध्याहृत घ्यावें म्हणजे संप्रदानसंज्ञेचें लक्षणान्तर नको. 'दास्या संयच्छते कामुकः' या वाक्यांत 'दास्या' ही तृतीया कशी? त्याचें उत्तर असें कीं, 'अशिष्टव्यवहारे दाणः प्रयोगे चतुर्थ्यर्थे तृतीया' या वार्तिकानें अशिष्ट व्यवहारासाठीं ('रतिफलकं दानम्' त. बो.) दासीला द्रव्य दिल्यानें चतुर्थीऐवजीं तृतीया झाली.

चतुर्थी संप्रदाने। २।३।१३ या सूत्रावर भाष्यकारानें 'चतुर्थीविधानें तादर्थ्य उपसंख्यानम्' किंवा 'तादर्थ्ये चतुर्थी वक्तव्या' असें वार्तिक केलें असल्यानें संप्रदानसंज्ञेची आवश्यकताच नाहीं असें आक्षेप कैयट घेतो. कारण त्याच्या मतें तादर्थ्यामध्यें (तदर्थः एव तादर्थ्यम्-स्वार्थे ष्यञ्) सर्वांचा अंतर्भाव होईलच. या आक्षेपाला उत्तर असें कीं, केवळ 'तादर्थ्य' शब्दानें 'ब्राह्मणाला (तदर्थ) गाय देतो' असें म्हटल्यानें

दानक्रियेचें परलोकार्थत्व संभवत नाहीं. ब्राह्मणाला गाय दिल्यानें परलोक मिळतो, हें तादर्थ्य शब्दानें सूचित होत नाहीं, म्हणून 'ब्राह्मण' शब्दाला संप्रदानसंज्ञा होणार नाहीं. केवळ ब्राह्मणासाठीं गाय नसून त्यापासून दुसरें फल अभिप्रेत आहे असा वाक्यपदीयाचा टीकाकार हेलाराज याचें मत आहे. तादर्थ्यचतुर्थीचा अर्थ 'उपकार्योपकारकत्वसंबंध' असा असल्यानें 'ब्राह्मणाय दधि' या वाक्यांत 'ब्राह्मणोपकारक दहीं' असा अर्थ असल्यानें तादर्थ्ये चतुर्थी झाली. 'ब्राह्मणाय गोदानम्' या ठिकाणीं सापेक्षत्वामुळें समास होणार नाहीं. कारण तादर्थ्यरूप विभक्त्यर्थाचा दानादिक्रियेशीं अन्वय होत नसल्यानें आणि 'गो' शीं च तो होत असल्यानें वरील शब्दांचा समास न होण्याची आपत्ति संभवते. पण 'सापेक्षत्वेऽपि गमकत्वात्समासः' या वचनाप्रमाणें समास होतो.

'अपादान'कारक—ध्रुवमपायेऽपादानम् । १।४।२४ या सूत्रानें पाणिनि 'अपादान' कारकाची व्याख्या देतो. त्यावर 'अपायो विश्लेषः तस्मिन् साध्ये ध्रुवमवधिभूतं कारकं अपादानसंज्ञं स्यात्' असें सि. कौ. कार व्याख्यान करतो. 'अपाय' शब्दाचा अर्थ विश्लेष किंवा वियोग आहे. तो साध्य असतांना अवधिभूत जें ध्रुव म्हणजे अचल तें 'अपादान'-संज्ञक होतें. अवधि म्हणजे मर्यादा.[१५] म्हणजे प्रकृतधातूचें आश्रयत्व नसतांना त्या त्या क्रियेनें उत्पन्न होणारें जें विभागाश्रयत्व तें अपादान-संज्ञक होय आणि तेंच अवधित्व समजावें. उदाहरणार्थ, 'वृक्षात्पर्णं पतति' या वाक्यांत 'पत्' धातूचें आश्रयत्व पर्णावर आहे, वृक्षावर नाहीं. पण त्यानें उत्पन्न होणारें जें विभागाश्रयत्व (अपाय) तें वृक्ष असल्यानें तो अवधि (मर्यादा) असून अचल आहे म्हणून त्याला 'अपादान'-संज्ञा झाली व 'अपादाने पञ्चमी'। २।३।२८ या सूत्रानें 'वृक्ष' शब्दाची पञ्चमी विभक्ति झाली.

आतां हा विभाग किंवा विश्लेष वास्तवच पाहिजे असें नाहीं, कारण भाष्यकार पतंजलीनें 'जुगुप्साविरामप्रमादार्थानामुपसंख्यानम्' या

१५. 'तत्तत्कर्तृसमवेततत्तत्क्रियाजन्यप्रकृतधात्ववाच्यविभागाश्रयत्वमपादानत्वम् । तदेवावधित्वम् । (प. ल. मञ्जूषा, पृष्ठ १०२).

वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें आहे म्हणून. 'अधर्मात् जुगुप्सते' इत्यादि प्रयोगांत अधर्म केलेला नसतो म्हणून अधर्मापासून विश्लेष नाहीं तर बुद्धीनें कल्पना करून तो अधर्मापासून मार्गे घेतो. या वचनावरून बुद्धिपरिकल्पितही विभाग चालतो हें स्पष्ट आहे.[१६] त्याचप्रमाणें 'माथुराः पाटलिपुत्रेभ्यः आढ्यतराः' या ठिकाणीं 'पाटलिपुत्र' शब्दाला अपादान-संज्ञा झाली म्हणून त्याची पञ्चमी विभक्ति झाली. तसाच 'चैत्रात् मैत्रः सुंदरः' हा प्रयोग समजावा.

'वृक्षं त्यजति खगः' या वाक्यांत 'वृक्ष' शब्दाची पञ्चमी होऊं नये म्हणून[१७] 'प्रकृतधात्ववाच्य' शब्द व्याख्येंत घातला आहे. कारण प्रकृत धातु जो 'त्यज्' त्याचा प्रत्यक्ष संबंध वृक्ष शब्दाशीं आहे. 'परस्परात् मेषौ अपसरतः' येथें अपादान संज्ञा व्हावी म्हणून 'तत्तत्कर्तृ' हे शब्द व्याख्येंत घातले. 'वृक्षस्य पर्णं पतति' या वाक्यांत 'वृक्षात् पर्णं पतति' यांतील 'वृक्ष' शब्दाला जशी अपादानसंज्ञा झाली तशी होत नाहीं म्हणून 'अपादाने पञ्चमी'। २।३।२८ या सूत्रानें पञ्चमी न होतां 'षष्ठी शेषे'। २।३।५० यानें सामान्य संबंध षष्ठी होते. कारण विश्लेषाची विवक्षा नाहीं. या दोन वाक्यांच्या अर्थांत सूक्ष्म भेद आहे तो लक्षांत घ्यावयास पाहिजे.

'धावतोऽश्वात् पतति' किंवा 'पर्वतात्पततोऽश्वात् पतति अश्ववाहः' या वाक्यांत 'अश्व' शब्दाला तो धावत असतांना 'ध्रुव' नसल्यामुळें पञ्चमी होऊं नये असें म्हणाल तर तें बरोबर नाहीं. कारण प्रकृत 'पत्' धातूपात्त क्रियेशीं 'अवधि' चा विरोध येत नाहीं. यावर भर्तृहरीची कारिका स्पष्ट आहे.

---

१६. कारकप्रकरणांत भाष्यकार 'गौणमुख्यन्याय' मानीत नाहीं. कारण सूत्रांतील 'साधकतमम्' किंवा ईप्सिततमम्' यांतील 'तमब्' ग्रहण याचें ज्ञापक आहे.

१७. 'खगसमवेतविभागानुकूलक्रियाजन्यविभागाश्रयत्वात् वृक्षस्य अपादानत्वापत्तिः।'

अपाये यदुदासीनं चलं वा यदि वाऽचलम् ।
ध्रुवमेवातदावेशात्तदपादानमुच्यते ॥
पततो ध्रुव एवाश्वो यस्मादश्वात् पतत्यसौ ।
तस्याप्यश्वस्य पततः कुडयादि ध्रुवमिष्यते ॥
मेषान्तरक्रियापेक्षमवधित्वं पृथक् पृथक् ।
मेषयोः स्वक्रियापेक्षं कर्तृत्वं च पृथक् पृथक् ॥ (वाक्यपदीय, तृतीयकांड)

तात्पर्य, ' धावत्या घोड्यावरून पडतो ' असें म्हटलें तरी घोड्याचें शरीर (कुडि) ध्रुव म्हणजे अचल आहे. ' पर्वतावरून पडणाऱ्या घोड्यावरून पडतो ' याही ठिकाणीं तसेंच समजावें. ' दोन मेष एकमेकांपासून मार्गे सरतात ' या वाक्यांत प्रत्येकाचा अवधि पृथक् आहे. पहिलें उदाहरण ' चल ' ध्रुवाचें समजावें.

अपादान संज्ञेचे वेगवेगळे प्रकार दाखविणारे प्रयोग वर दिले आहेत. पतंजलीनें वास्तव आणि काल्पनिक वियोग एकाच स्वरूपाचे मानल्यानें ' भीत्रार्थानां भयहेतुः ' १।४।२५ व पुढील अपादान संज्ञेचीं सूत्रें नकोतच असें त्याचें मत त्यानें भाष्यांत मांडलें आहे.[१८] विस्तारभयास्तव येथेंच थांबणें इष्ट आहे.

'अधिकरण' कारक— पाणिनीनें ' आधारोऽधिकरणम् ' १।४।४५ या सूत्रांत ' अधिकरण ' कारकाची व्याख्या दिली असून ' कर्तृकर्मद्वारा तन्निष्ठक्रियाया आधारः कारकमधिकरणसंज्ञः स्यात् '। असें त्यावर भट्टोजीनें व्याख्यान केलें आहे. व ' अधिकरण ' कारक–संज्ञा झाल्यानंतर ' सप्तम्यधिकरणे च '। २।३।३६ या सूत्रानें अधिकरणवाची शब्दाला सप्तमी होते. नागेशानें ' कर्तृकर्मद्वारकफलव्यापाराधारत्वमधिकरणम् ' अशी व्याख्या ' परमलघुमंजूषा ' ग्रंथांत कारकविचार–प्रकरणांत दिली आहे. यांचा अर्थ असा कीं, कर्ता आणि कर्म यांच्या द्वारा कर्त्याचा आणि कर्माचा जो आधार तो कारक असून तें कारक

---

१८. हीं सर्व सूत्रें ' कारके '। १।४।२३ या अधिकारांतील आहेत.

'अधिकरण' संज्ञक कारक होतें. उदाहरणार्थ, 'भूतले घटः' या वाक्यांत 'अस्ति' या क्रियेचा अध्याहार आहे असें समजावें. 'कटे आस्ते' हें कर्तृद्वारा क्रियेच्या आधाराचें उदाहरण आहे तर 'स्थाल्यां ओदनं गृहे पचति' हें कर्मद्वारा क्रियाधाराचें उदाहरण आहे. कारण 'स्थाली' हें कर्मद्वारकविक्लित्तिरूप फलाधार आहे तर 'गृह' हें कर्तृद्वारकव्यापाराधार आहे.

आधार तीन प्रकारचा असतो. औपश्लेषिक, वैषयिक आणि अभिव्यापक. औपश्लेषिक (उप–समीपे श्लेषः संबन्धः तत्कृत इत्यर्थः) म्हणजे जवळचा संबंध असलेला. याचें उदाहरण, 'गङ्गायां गावः' हें देण्यांत येतें. 'गंगा' औपश्लेषिक आधार आहे. व्याकरणसूत्रांत 'इको यणचि' यांतील 'अचि' हें सप्तम्यन्त पद याचें उदाहरण म्हणून पतंजलीनें 'संहितायाम्' ।६।१।७२। या सूत्रावर व्याख्यान करतांना म्हटलें आहे (तत्र अजादिसामीप्यमेव इगादीनाम्). कैयटानें 'कटे आस्ते' हें औपश्लेषिक आधाराचें उदाहरण दिलें आहे तें भाष्यसंमत नाहीं. 'मोक्षे इच्छा अस्ति' ह्यांत मोक्षे हें वैषयिक आधाराचें उदाहरण देतां येईल तर 'तिलेषु तैलम्' किंवा 'सर्वस्मिन्नात्माऽस्ति' हीं अभिव्यापक आधाराचीं उदाहरणें मानतां येतील. औपश्लेषिक आणि अभिव्यापक आधारांव्यतिरिक्त सर्व आधार वैषयिक समजावेत. 'गोषु दुह्यमानासु स गतः' किंवा 'जले पीते तृषा शाम्यति' या वाक्यांत एक अनिर्णीत क्रिया दुसऱ्या क्रियेनें निर्णीत होते. तो गेला, केव्हां? तर गाईचें दोहन होत असतांना; किंवा त्याची तृषा शांत होते, केव्हां? तर पाणी प्यायल्यावर. पाणिनीनें 'यस्य च भावेन भावलक्षणम्' ।२।३।३७ या सूत्रांत हें स्पष्ट केलें आहे. 'ब्राह्मणेषु अधीयानेषु स गतः' हें 'कर्तरि' उदाहरण आहे तर पहिलें 'कर्मणि' आहे. ही 'सती' सप्तमीचीं उदाहरणें आहेत.

षष्ठी विभक्ति — ही कारक विभक्ति नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. त्याविषयीं विस्तृत विचार करणें आवश्यक आहे.

पाणिनीनें 'षष्ठी शेषे' ।२।३।५० या सामान्य सूत्रानें षष्ठीचें विधान केलें आहे. शेष[१९] असतांना षष्ठी विभक्ति होते. आतां 'शेष' म्हणजे काय ? यावर भट्टोजी व्याख्यान करतो कीं, 'कारकप्रातिपदिकार्थ-व्यतिरिक्तः स्वस्वामिभावादिसंबन्धः शेषः' याचा अर्थ असा कीं, इतर कारकाव्यतिरिक्त जेव्हां स्वस्वामिभावादि संबन्ध द्योत्य असून त्यांचा क्रियेशीं संबंध नसेल तेव्हां षष्ठी विभक्ति होते. उदाहरणार्थ 'राज्ञः पुरुषः' राजाचा अधिकारी–या ठिकाणीं 'राजन्' आणि 'पुरुष' या दोहों-मध्यें स्वस्वामिभाव संबंध आहे व त्याचा क्रियेशीं कांहींच संबंध नसल्यानें इतर कारकांची अपेक्षाच नाहीं. म्हणून 'राजन्' शब्दाची षष्ठी-विभक्ति होते. या 'शेष' षष्ठीला 'संबन्धसामान्ये' षष्ठी असेंहि म्हणतात. केव्हां केव्हां कारक विभक्ति असूनहि कर्त्याच्या मनांत तशी विवक्षा नसेल तर तेथें-सुद्धां षष्ठी विभक्ति घालतां येते (कर्मादीनामपि संबन्धमात्रविवक्षायां षष्ठ्येव' सि. कौ.). याचीं अनेक उदाहरणें देता येतील. उदा० 'सर्पिषो जानीते' या ठिकाणीं खरोखर करणकारक असल्यानें 'सर्पिषा' अशी तृतीया विभक्ति पाहिजे. कारण त्याचा अर्थ 'सर्पिषा उपायेन जानीते–प्रवर्तते' म्हणजे तुपाच्या वासानें प्रवृत होतो असा आहे. पाणिनीनें 'ज्ञोऽविदर्थस्य करणे' २।३।५१ या सूत्रानें 'ज्ञा' धातूचा अर्थ जेव्हां 'जाणणें' नसेल तेव्हां तृतीयेऐवजीं षष्ठीचा उपयोग करावा असें म्हटलें आहे. पाणिनीनें या सूत्राप्रमाणें आणखी आठ सूत्रें अशासाठींच सांगितलीं आहेत.[२०] यावर अशी शंका येते कीं, हीं सूत्रें पाणिनीनें

---

१९. The genitive case used in other senses than those given in the specific rules, the term शेषे षष्ठी भविष्यति is often used.
'Dictionary of Sk. Grammar,' p. 365.

२०. ज्ञोऽविदर्थस्य करणे। २।३।५१; अधीगर्थदयेशां कर्मणि। २।३।५२; कृञः प्रतियत्ने। २।३।५३; रुजार्थानां भाववचनानामज्वरेः। २।३।५४; आशिषि नाथः। २।३।५५; जासिनिप्रहणनाटक्राथपिषां हिंसायाम्। २।३।५६; व्यवहृपणोः समर्थयोः। २।३।५७; दिवस्तदर्थस्य। २।३।५८; कृत्वोऽर्थप्रयोगे कालेऽधिकरणे २।३।६४

कोणत्या हेतूनें रचिली ? कारण ' षष्ठी शेषे ' या सूत्रानें भागलेंच असतें. त्यावर असें उत्तर आहे कीं, ' सर्पिषः ज्ञानम् ' याचा षष्ठीसमास होऊन ' सर्पिर्ज्ञानम् ' असा प्रयोग होऊं नये ह्मणून. कारण वार्तिककारानें ' प्रतिपदविधाना षष्ठी न समस्यते ' असें वार्तिक केलें आहे. या ठिकाणीं झालेली षष्ठी ' ज्ञोऽविदर्थस्य करणें ' २।३।५१ या सूत्रानें प्रतिपदोक्त आहे म्हणजे त्या त्या पदाचें विधान करून सांगितली आहे. भर्तृहरीनेंही तशा प्रकारची कारिका दिली आहे.

' कारकैर्व्यपदिष्टे च श्रूयमाणक्रिये पुनः ।
प्रोक्ता प्रतिपदं षष्ठी समासस्य निवृत्तये ॥ (वाक्यपदीय)

तर मग ' मातुः स्मरणम् ' येथेंही षष्ठीसमास होता कामा नये. कारण ' अधीगर्थदयेशां कर्मणि ।२।३।५२ या सूत्रांत अधीगर्थ [अधि + इक् (इ)] स्मरणार्थक धातूनें प्रतिपदोक्त षष्ठीचें विधान केलें आहे म्हणून. मग ' हरिस्मरणम् ' किंवा ' गुणस्मरणम् ' या प्रयोगाचें साधुत्व कसें समजावयाचें ? त्यावर असें समाधान आहे कीं ती ' कृद्योगाषष्ठी ' समजावी. 'कृद्योगा षष्ठी समस्यते' असें वार्तिक असल्यानें ती प्रतिपदोक्त नाहीं म्हणून समास होण्यास हरकत नाहीं.

षष्ठी विभक्तीचे अर्थ—या विभक्तीचा अर्थ सामान्यतः ' संबंध ' आहे. टीकाकारांनीं स्वस्वामिभाव संबंध, अवयवावयवीभाव संबंध वगैरे अनेक दिले असून ते शंभरावर आहेत. ' एकशतं षष्ठ्यर्थाः ' किंवा ' बहवो हि षष्ठ्यर्थाः स्वस्वाम्यनन्तरसमीपसमूहविकारावयवाद्यास्तत्र यावन्तः शब्दे संभवन्ति तेषु सर्वेषु प्राप्तेषु नियमः क्रियते षष्ठी स्थानेयोगा इति ' काशिका on पा. सू. षष्ठी स्थानेयोगा ।१।५।४९.

जेव्हां एखादें नाम कर्ता किंवा कर्म असून त्याचा संबंध क्रियापदाशीं नसून कृदन्ताशीं असेल तर त्याची षष्ठी विभक्ति होते.[२१] उदाहरणार्थ,

२१. 'A noun standing as a subject or object of an activity is put in the genitive case when that activity is expressed by a verbal activity and not by a verb itself.'

'Dictionary of Sk. Grammar,' p. 371.

'सतां गतम्,' 'देवदत्तस्य हसितम्' इत्यादि. ('कर्तृकर्मणोः कृति' २।३।६५ कृद्योगे कर्तरि कर्मणि च षष्ठी स्यात्) कर्ता किंवा कर्म असेल तरच षष्ठी होते, करण असेल तर तृतीयाच होईल. उदा०–'शस्त्रेण भेत्ता.' या उदाहरणांत शस्त्र हें करण म्हणजे साधन आहे म्हणून षष्ठी होत नाहीं. येथें षष्ठी विभक्तीच्या अर्थाचाच विचार करावयाचा असल्यानें अपवाद–प्रत्यपवादांत खोल जाण्याचें कारण नाहीं.

'विभक्ति' म्हणजे काय?—सामान्य मनुष्याला कारक आणि विभक्ति या दोहोंतला फरक कळत नाहीं. दोन्ही शब्द संज्ञावाचक आहेत.[२२] 'कारक' कशाला म्हणावें हें या प्रकरणाच्या सुरुवातीलाच सांगितलें आहे. विभक्ति (वि + भज् + ति) म्हणजे विभजन. कशाचें विभजन? तर प्रकृतिपासून प्रत्ययाचें. पाणिनिसूत्र 'विभक्तिश्च' १।४।१०४ या सूत्राप्रमाणें नामाला लागणारे प्रत्यय (सुप्) व क्रियापदाला लागणारे (तिङ्) प्रत्यय यांना 'विभक्ति' संज्ञा होते. कांहीं तद्धित प्रत्ययांनाही पाणिनीनें 'विभक्ति' संज्ञा सांगितली आहे. त्याचें कारण असें कीं विभक्ति-प्रत्यय पुढें असतांना जीं कार्यें (बदल) सांगितलीं आहेत तीं कार्यें तद्धित प्रत्यय पुढें असतां व्हावींत म्हणून. अशा प्रकारें सुबन्तें आणि तिङन्तें तयार झालीं म्हणजे त्यांना 'पद' संज्ञा होते. पहा—पा. सू. 'सुप्तिङन्तं पदम्' १।४।१४.

कारक आणि विभक्ति यांचें मूळच वेगळें आहे. पाणिनीनें कोणत्या कारकाला कोणती विभक्ति लागते यासाठीं सूत्रें दिलीं आहेत, तीं त्या त्या ठिकाणीं उद्धृत केलींच आहेत.

याप्रमाणें कारकविचार स्थूलरूपानें थोडक्यांत मांडला आहे. या विषयावर संस्कृतांत अनेक ग्रंथ आहेत. उदाहरणार्थ—(१) वंगदेशीय

---

२२. कारक इति संज्ञानिर्देशः। साधकं निर्वर्तकं कारकसंज्ञं भवति। महाभाष्य, 'कारके'। १।४।२३ 'विभक्तिश्च'। १।४।१०४ सुप्तिङौ विभक्तिसंज्ञौ स्तः। (सि. कौ.)

वैयाकरण पुरुषोत्तमदेव याचा 'कारकचक्र;' ह्याच्या कारिका आहेत. त्यावर 'कारककौमुदी' नांवाची गद्य टीका आहे. (२) भैरवाची 'कारकटीका;' (३) 'शेष' कुटुंबांतला प्रसिद्ध वैयाकरण 'चक्रपाणि शेष' याचा 'कारकतत्त्व;' (४) वंगीय नैयायिक गदाधर चक्रवर्ती याचा 'कारकनिर्णय;' (५) रुद्रभट्टाचा 'वाक्यपरिच्छेद;' (६) शिवदेवाचा 'कारकपाद;' (७) वाराणसीचे कृष्णशास्त्री आर्दे यांचा 'कारकवाद' आणि (८) मणिकंठाचा 'कारकविचार' वगैरे.

वरील टीका-ग्रंथांवरून अर्थविचाराला व त्यांतही कारक-विचाराला किती महत्त्व आहे हें समजून येईल.

परिशिष्ट १

पाणिनीयव्यतिरिक्त (अपाणिनीय) इतर व्याकरण-संप्रदाय

आतांपावेतों पाणिनि व पाणिनीय व्याकरण-संप्रदायाचें स्थूलरूपानें विवेचन केलें. संस्कृत व्याकरणाचे पाणिनीयव्यक्तिरिक्त इतर संप्रदायही रूढ होते व कांहीं आजही आहेत. जातां; जातां त्यांचेंही दिग्दर्शन करण्यांत येत आहे.

पाणिनिपूर्वी जेवै याकरण होऊन गेले त्यांपैकीं दहाजणांचा नाम-निर्देश त्याच्या अष्टाध्यायी ग्रंथांत आला आहे, हें दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्याशिवाय इतरांचा निर्देश गणपाठांत व पुढील वैयाकरणांच्या ग्रंथांतूनही आढळतो. पण त्यांचीं व्याकरणें मात्र उपलब्ध नाहींत. एक तर तीं नष्ट झालीं असावींत किंवा पाणिनीच्या व्याकरणानें त्यांना मागें तरी टाकलें असावें. पाणिनिपूर्व वैयाकरणांच्या नांवांची एक कारिका प्रसिद्ध आहे.[1] त्यांपैकीं कांहींचीं नांवें महाभाष्यांत आढळतात. जैनेंद्र, अमरसिंह, चन्द्र यांचा उल्लेख मात्र कोठें नाहीं.

नवे संप्रदाय कां निघाले ?—पतंजलीच्या महाभाष्यानंतर संस्कृत भाषेच्या बोलभाषेचें स्वरूप बदललें. बौद्धधर्माचा प्रसार व प्रचार जोरानें होऊं लागला त्यामुळें प्राकृत व पाली भाषेंत ग्रंथ होऊं लागले. अष्टा-ध्यायीला अनुसरून सोपीं व्याकरणें रचिलीं गेलीं व त्यांचे संप्रदाय सुरूं झाले. बौद्ध व जैन वैयाकरण अवैदिक असल्यानें पाणिनीच्या अष्टा-ध्यायांतील वैदिकी प्रक्रिया व स्वरप्रक्रिया या प्रकरणांना त्यांनीं अजीबात फाटा दिला ! पाणिनीय व्याकरणसंप्रदाय व परंपरा वैदिक असल्यामुळें कांहीं काल तिची पिच्छेहाट झाली हें खरें ।

---

१. इन्द्रश्चन्द्रः काशकृत्स्नापिशाली शाकटायनः ।
पाणिन्यमरजैनेन्द्रा जयन्त्यष्टौ च शाब्दिकाः ॥ (बोपदेवकृत धातुपाठ)

(१) 'कातंत्र' व्याकरण—'कातन्त्र' म्हणजे 'लहान तंत्र', म्हणजेच संक्षिप्त व्याकरण. याला 'कालाप' किंवा 'कौमार' अशींही नांवें आहेत. या व्याकरणाच्या जन्माची कथा मोठी मनोरंजक आहे.[२] ही कथा पहिल्या शतकांतील आंध्र देशांतील शातवाहन राजाची आहे. एकदां काय झालें कीं, राणीशीं तो जलक्रीडा करीत असतां त्यानें अंगावर पाणी उडवूं नये म्हणून ती संस्कृतज्ञ असल्यानें त्याला 'मोदकं देहि राजन्' असें म्हणाली. राजानें 'मा + उदकम्' असे वेगळे शब्द न घेतां तो राणीला मोदकच देऊं लागला! पुढें त्याला आपली चूक कळून आल्यावर तो लाजला! नंतर त्यानें दरबारीं असलेल्या शर्ववर्मा नांवाच्या पंडिताला, समजण्यास सुलभ असें एक व्याकरण रचण्यास सांगितलें. पंडितानें कुमार कार्तिकेयाची प्रार्थना केली व त्यानें शिववर्म्याला सूत्रें सांगितलीं म्हणून त्याच्या व्याकरणाला 'कौमार' हें नांव पडलें. कार्तिकेयाचें वाहन 'कलापिन्' म्हणजे मोर, याचेंही अंग यांत असल्यानें या व्याकरणाला 'कालाप' असेंही नांव पडलें!

या कथेला 'कथासरित्सागर' ग्रंथांतही आधार मिळतो.

कातंत्र व्याकरणाचें स्वरूप—या व्याकरणाचा काल इ. स. चें पहिलें शतक होय.[३] यांत सन्धि, आख्यात आणि नाम अशीं तीन प्रकरणें असून ८५५ सूत्रांत सर्व व्याप आटोपता घेतला आहे. मागाहून कृदन्त प्रकरण जोडल्यानें सूत्रांची संख्या १४०० पावेतों गेली आहे. बोलून चालून तें बालकांसाठीं–व्याकरणाची सुरुवात करणाऱ्यासाठीं–रचिलें आहे. पाणिनीय व्याकरणसंज्ञांच्या ऐवजीं शर्ववर्म्यानें स्वतःच्या संज्ञा बनविल्या आहेत. त्याचप्रमाणें पाणिनीच्या प्रत्याहारसूत्रांचा वर्णानुक्रम न घेतां प्रातिशाख्यांतील घेतला आहे. कातंत्र व्याकरणाचा

२. 'कलापव्याकरणोत्पत्तिप्रस्ताव' वनमालिकृत.

३. 'We may for the present accept the first century after Christ as the century which witnessed the rise of this grammar.' 'Systems of Sk. Grammar,' p. 83.

प्रसार पूर्वेकडे बंगालमध्यें जसा झाला तसा तो काश्मीर आणि सीलोन या देशांतही झाला. या व्याकरणावर आठव्या शतकांतल्या दुर्गसिंहानें वृत्ति लिहिली असून त्या ग्रंथावरही अनेक टीका झाल्या आहेत. हे टीकाकार सामान्यतः वंगीय आहेत.

(२) '**चांद्र**' **व्याकरण**— या व्याकरणाचा कर्ता चंद्रगोमिन् किंवा चंद्र होय. या व्याकरणाचा उल्लेख भर्तृहरीच्या वाक्यपदीयांत जसा आढळतो तसा तो मेघदूतावरील मल्लिनाथाच्या टीकेंतही सांपडतो. (पहा 'नीचैराख्यं गिरिमधिवसेः' यावरील टीका). काशिकाकारानें चांद्र व्याकरणांतील कांहीं सूत्रें जशींच्या तशींच उचललीं आहेत, त्यावरून तो इ. स. ६५० पूर्वी असावा हें निश्चित होय. पण इतर कारणांवरून त्याचा काल जवळजवळ इ. स. ४७० असला पाहिजे. तो धर्मानें बौद्ध होता.

चांद्र व्याकरणाचें स्वरूप— पाणिनीपेक्षांही लाघवाकडे त्याचें अधिक लक्ष होतें. 'हयवरट्' आणि 'लण्' या दोन सूत्रांऐवजीं त्यानें एकच सूत्र केलें. पाणिनीच्या ४००० सूत्रांऐवजीं या व्याकरणाची ३१०० सूत्रेंच आहेत. चार चार पादांचे सहा अध्याय असून पाणिनीच्या पहिल्या दोन अध्यायांतील आशय या सहा अध्यायांत विखुरलेला आहे. चांद्र व्याकरणाला 'असंज्ञक' व्याकरण असेंही नांव आहे. कारण संज्ञा-परिभाषासाठीं वेगळा अध्याय नाहीं हें त्याचें कारण असावें. प्राचीन अनुपलब्ध चांद्र व्याकरणाशीं या व्याकरणाचा कांहीं संबंध नाहीं, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. चांद्र व्याकरणाचा उल्लेख अग्निपुराणांत (अध्याय २४८ ते २५८) आढळतो. चंद्रगोमीनें सूत्रांप्रमाणें उणादिसूत्रें, धातुपाठ, गणपाठ, उपसर्गवृत्ति, वर्णसूत्रें आणि लिंगानुशासन हीं प्रकरणें स्वतंत्रपणें रचिलीं व आपल्या व्याकरणावर स्वतःची वृत्ति लिहिली. हा वंगीय होता. याच्या व्याकरणाचा प्रसार बंगाल, तिबेट, त्याप्रमाणें सीलोनमध्येंही होता. बुद्धधर्माच्या ऱ्हासाबरोबर या व्याकरण-संप्रदायाचाही ऱ्हास झाला. पण तिबेटमध्यें अजून त्याला स्थान आहे. सीलोनमध्यें मात्र वरदराजाच्या लघुकौमुदीप्रमाणें काश्यपाचें 'बालावबोध' व्याकरण अधिक प्रचलित असल्यानें मूळ व्याकरणाचा लोप झाला.

(३) 'जैनेन्द्र' व्याकरण—महावीरानें–जिनानें–इंद्राला या व्याकरणाचा उपदेश केला अशी एक आख्यायिका असून या जोडनांवामुळेंच या व्याकरणाला 'जैनेन्द्र' नांव पडलें असावें.[४] परंतु पूज्यपाद देवनंदी यानें हें पांचव्या शतकांत रचलें असावें या म्हणण्याला आधार आहे.[५] या व्याकरणाच्या सर्व हस्तलिखित प्रतींत शेवटीं देवनंदीचाच उल्लेख केलेला आढळतो. देवनंदीचेंच दुसरें नांव 'पूज्यपाद' आहे. 'काशिका' ग्रंथांत या व्याकरणाचा ओझरता उल्लेख आहे (पहा— काशिका पा. सू. ३।३।४० 'उच्चयस्य प्रतिषेधो वक्तव्यः'). जैनेन्द्र व्याकरणसूत्रांत सांख्यकारिकांचा कर्ता ईश्वरकृष्ण याचा उल्लेख आहे. ईश्वरकृष्णाचा काल इ. स. ४५० आहे.[६]

जैनेन्द्र व्याकरणाचें स्वरूप—या व्याकरणाचीं दाक्षिणात्य आणि औदीच्य अशीं दोन संस्करणें (versions) आहेत. एक तीन हजार सूत्रांचें असून त्यावर अभयनंदीनें टीका लिहिली आहे; तर दुसरींत सातशें सूत्रें अधिक असून त्यावर सोमदेवानें 'शब्दार्णवचंद्रिका' नांवाची टीका रचली आहे. या टीकेचा काल सन १२०५ आहे. जैनेन्द्रव्याकरण पाणिनीच्याच अष्टाध्यायीवर आधारलेलें आहे. पण त्यांत वैदिकी प्रक्रिया व स्वरप्राक्रिया हीं प्रकरणें नाहींत व लाघवाकडे फार लक्ष आहे. उदाहरणार्थ, 'विभाषा' किंवा 'अन्यतरस्याम्' याऐवजीं तो 'वा' च वापरतो. तसेंच 'व' म्हणजे प्रथमा, 'ह' म्हणजे अव्ययीभाव, 'स' म्हणजे तत्पुरुष, 'दी' म्हणजे दीर्घ, 'घ' म्हणजे ह्रस्व अशा तऱ्हेच्या अनेक संकेतसंज्ञा त्यानें तयार केल्या आहेत. या व्याकरणांत

---

४. यदिन्द्राय जिनेन्द्रेण कौमारेऽपि निरूपितम्।
ऐन्द्रं जैनेन्द्रमिति तत्प्राहुः शब्दानुशासनम्॥

५. लक्ष्मीरात्यन्तिकी यस्य निरवद्यावभासते।
देवनन्दितपूजेशं नमस्तस्मै स्वयंभुवे॥ (Introductory Stanza)

६. शरद्वच्छुनकदर्भाग्निशर्मकृष्णरणाद् भृगुवत्साग्रायणवृषगणब्राह्मणवसिष्ठे।
३।३।१३४ (वार्षगण्यः = ईश्वरकृष्णः)

सहा नांवें आलीं आहेत–सिद्धसेन दिवाकर, प्रभाचंद्र, समंतभद्र वगैरे. ते सर्व जैन आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या व्याकरणाचा प्रचार दक्षिण भारतांत दिगंबर जैनांत दिसून येतो आणि तोही चौदाव्या शतकापर्यंत. इतर व्याकरणांची जशी वाट लागली तशी याचीही लागली !

देवनंदीनें स्वतः या व्याकरणावर न्यासवृत्ति लिहिली आहे. त्याचप्रमाणें धातुपाठ, गणपाठ, लिंगानुशासन यांचीही जोड दिली आहे.

(४) **शाकटायनाचें 'शब्दानुशासन'**— जैनेन्द्र–व्याकरण हें जैनांतल्या दिगंबरशाखेसाठीं जसें होतें तसें शाकटायनाचें 'शब्दानुशासन' हें श्वेताम्बरपक्षीय जैनांसाठीं होतें. असें जरी असलें तरी इतर धर्मांचे लोकही त्याचा अभ्यास करीत होते. हा शाकटायन अर्वाचीन म्हणजे नवव्या शतकांतील असून त्याचा पाणिनीपूर्व शाकटायनाशीं कांहीं संबंध नाहीं. या अर्वाचीन शाकटायनाचे उल्लेख 'गणरत्नमहोदधि,' 'माधवीय धातुवृत्ति' वगैरे ग्रंथांत आढळून येतात. प्राचीन शाकटायनाचा उल्लेख निरुक्तांत (१·३) आणि पाणिनीच्या अष्टाध्यायींत (सूत्रें ३।४।१११; ८।३।१८; ८।४।५०) सांपडतो. प्रो. पाठकांनी या जैन शाकटायनाविषयीं सन १९१४ च्या इंडियन अँटिक्वेरीच्या आक्टोबर अंकांत असें सिद्ध केलें आहे कीं, हा अभिनव शाकटायन राष्ट्रकूटांचा राजा पहिला अमोघवर्ष (इ. स. ८१७ ते ८७७) याच्या कारकीर्दींत होऊन गेला. कारण त्यानें स्वतः लिहिलेल्या 'अमोघवृत्तींत 'अदहदमोघवर्षोऽरातीन्' असें उदाहरण 'अनद्यतन' भूतकालाचें म्हणून दिलें आहे, तें अभावितपणें त्याच्या कालनिर्णयाला उपयोगी पडतें. असाच कालनिर्णय महाभाष्यकार पतंजलीच्या बाबतींत भाष्यांतील 'अरुणद् यवनः साकेतम्' या सामान्य भूतकालाच्या उदाहरणावरून करतां आला हें मागें दाखविलेंच आहे. शिवाय या ग्रंथाची रचना, सूत्रांत आलेले उल्लेख, रूपसिद्धि इत्यादि लक्षांत घेतां ते वरील कालाशीं सुसंगत वाटतात. प्राचीन शाकटायनानें उणादिसूत्रें रचिलीं असा समज आहे; तर तीं पाणिनीनेंच रचिलीं असें त्याच्या 'उणादयो बहुलम्' या सूत्रावरून अनुमान निघतें.

शब्दानुशासनाचें स्वरूप—शाकटायनाच्या शब्दानुशासनाचीं एकंदर ३२०० सूत्रें असून तीं चार चार पादांच्या चार अध्यायांत समाविष्ट केलीं आहेत. तीं सर्व पाणिनीच्या अष्टाध्यायीवर अधिष्ठित असून शिवाय कात्यायन, पतंजलि, चंद्रगोमिन् यांच्या व्याकरणग्रंथाचा जसा त्यानें उपयोग केला आहे तसाच जैनेंद्र व्याकरणाचाही केला आहे. प्रत्याहारसूत्रांपैकीं तेराच घेतलीं असून त्यांत 'ऌ' वगळला आहे. त्याचा अंतर्भाव 'अयोगवाहांत' केला आहे. पाणिनीच्या संज्ञा वर्ज्य करून चांद्रांतल्या घेतल्या आहेत. उदा०–निपात, सर्वनामन्, आत्मनेपद आणि परस्मैपद यांऐवजीं चादि, सर्वादि, तङ् आणि अतङ् या घेतल्या आहेत. शब्दानुशासनाशिवाय त्यानें परिभाषासूत्र, गणपाठ, धातुपाठ, उणादिसूत्रें आणि लिंगानुशासन हीं प्रकरणेंही स्वतंत्ररीत्या रचिलीं.

नेहमींच्या पद्धतीप्रमाणें या शब्दानुशासनावर टीका, उपटीका, संक्षेप (Digests) झाले; पण पुढें हेमचंद्राच्या शब्दानुशासनानें या शब्दानुशासनाला पूर्णपणें मागें टाकलें! या शब्दानुशासन-कर्त्याचें नांव पाल्यकीर्ति असेंही अर्वाचीन ग्रंथांत आढळून येतें असें प्रा. का. वा. अभ्यंकर यांचें मत आहे; पण ग्रंथांचीं नांवें त्यांनीं दिलीं नाहींत. जैन पंडितांमध्यें शाकटायनाला फार मान होता, हें ' अनुशाकटायनं सर्वे वैयाकरणाः ' ह्या प्रवादावरून दिसून येतें.

(५) **'हैम' शब्दानुशासन**—या शब्दानुशासनाला ' सिद्धहेमचंद्रशब्दानुशासन ' किंवा पूर्णतया ' सिद्धहेमचंद्राभिधस्वोपज्ञशब्दानुशासन ' अशींही नांवें आहेत. याची फोड एका टीकाकारानें अशी केली आहे कीं, त्या वेळचा गुजराथचा राजा जयसिंह किंवा सिद्धराज याच्या विनंतीवरून हेमचंद्रानें शब्दानुशासन रचिलें म्हणून या जोडनांवानें तें अन्वर्थक आहे. हेमचंद्राच्या चरित्राविषयीं बरीच माहिती उपलब्ध आहे, हें त्याचें वैशिष्ट्य होय. डॉ. बुल्हरनें (Dr. Bühler) अनेक ग्रंथांवरून तें एकत्रित केलें आणि सन १८८९ मध्यें तें जर्मन भाषेंत प्रसिद्ध केलें. हेमचंद्राचा जन्म गुजराथेंत धुंधुका गांवीं इ. स. १०८८ मध्यें (संवत् ११४५ कार्तिक शुद्ध १५) एका वैश्यकुलांत झाला. त्याचें मूळचें नांव चांगदेव होतें. या

घराण्याचा गुरु देवचंद्र होता. हेमचंद्राच्या जन्मापूर्वींच हें नूतन बालक फार कीर्तिमान् होईल असें भविष्य देवचंद्रानें वर्तविलें होतें. त्याप्रमाणें लहानपणापासूनच त्याच्या बुद्धीची तीव्रता, अलौकिक ग्रहणशक्ति, उत्तम स्मरणशक्ति व त्याबरोबरच मनाची विरक्ति हे गुण त्याच्या अंगीं दिसून आले. हेमचंद्राच्या मातेच्या स्वप्नांतच त्याच्या जन्मापूर्वीं एक दृष्टान्त झाला होता. त्याप्रमाणें तिनें हेमचंद्राला पांचव्या वर्षींच देवचंद्राच्या–कुलगुरूच्या–स्वाधीन केलें व माघ शुद्ध चतुर्दशी, रविवार या दिवशीं त्याला संन्यासदीक्षा देऊन जैन साधुसंघांत त्याला घेण्यांत आलें. पुढील बारा वर्षांत हेमचंद्रानें जुन्या वैयाकरणांनीं लिहिलेले व्याकरणग्रंथ वाचले. यास्क, आपिशलि, शाकल्य, पाणिनि, पतंजलि, देवनन्दि, जयादित्य-वामन, शाकटायन, भर्तृहरि, भोज इत्यादिकांचे उल्लेख त्याच्या 'शब्दानुशासन' ग्रंथांत आढळतात. वयाच्या बाविसाव्या वर्षीं सन ११०९ मध्यें तो 'आचार्य' झाला व तेव्हांपासून हेमचंद्राचार्य या नांवानें तो ओळखला जाऊं लागला. अनहिलपट्टण येथील राजा जयसिंह किंवा सिद्धराज जरी त्याचा भक्त झाला तरी त्यानें आपला शैव संप्रदाय सोडला नाहीं. त्याचा पुतण्या कुमारपाल हा जयसिंहाच्या मृत्यूनंतर (सन ११४३) त्याच्या गादीवर बसला व त्यानें मात्र जैन धर्माची दीक्षा घेतली !

हेमचंद्रानें व्याकरणशास्त्राप्रमाणेंच साहित्य, योग, तत्त्वज्ञान, अध्यात्मशास्त्र, न्यायशास्त्र इत्यादि विषयांवर ग्रंथ रचिले. त्यांपैकीं बरेच उपलब्ध असून प्रसिद्ध आहेत. हेमचंद्राची 'देशीनाममाला' मराठीच्या अभ्यासकाला फार उपयुक्त आहे. शेवटीं प्रायोपवेशन करून हेमचंद्रानें ८४ व्या वर्षीं इहलोक सोडला ! (सन ११७२)[७]

हैम शब्दानुशासनाचें स्वरूप— पूर्वींच्या व्याकरणांचा अभ्यास करून त्यानें 'सिद्धहेमचंद्र' नांवाचें व्याकरण रचिलें. पाणिनीच्या

---

७. हेमचंद्र who was now an octo-genarian, soon felt his end drawing near, and boldly set out to meet it by means of प्रायोपवेशन.' 'Systems of Sk. Grammar', p. 75.

अष्टाध्यायीप्रमाणेंच हेमचंद्राचें शब्दानुशासन आठ अध्यायांचें असून प्रत्येक अध्यायाचे चार पाद आहेत. एकंदर सूत्रें ४५०० असलीं तरी त्यांपैकीं जवळजवळ चौथा हिस्सा आठव्या अध्यायांत आहे. या अध्यायाचें हेंच वैशिष्ट्य कीं, त्यांत त्या वेळीं भरभराटींत असलेल्या प्राकृत भाषांचें व्याकरण आहे. इतर अध्यायांत कौमुदी-ग्रंथाप्रमाणें विषयवार मांडणी आहे. हेमचंद्रानें आपलें व्याकरण जैन मुनींना व जैन संप्रदायांतील शिष्यांना उपयुक्त व्हावें या हेतूनें लिहिलें. अर्थातच त्यांत वैदिकी प्रक्रिया येणें शक्य नाहीं. सात अध्यायांत संस्कृत व्याकरण लिहून झाल्यावर आठव्या अध्यायांत जैन आगम-ग्रंथांच्या प्राकृत भाषांचें व्याकरण लिहून शौरसेनी, पैशाची, मागधी व अपभ्रंश या प्राकृत भाषांत दिसून येणाऱ्या प्रयोग-वैशिष्ट्यांचें विवेचन केलें आहे. या अध्यायाचें इंग्रजी भाषांतर डॉ. पी. एल्. वैद्य यांनीं अभ्यासूंसाठीं प्रसिद्ध केलें आहे. या व्याकरणाचा प्रचार विशेषतः गुजराथ देशांत झाला. या व्याकरणानें इतर जैन संप्रदायांतील व्याकरणें मागें पडलीं. स्वतःच्या व्याकरणावर हेमचंद्रानें लघुवृत्ति व बृहद्वृत्ति लिहिल्या. बृहद्न्यास नांवाची विस्तृत टीकाही लिहिली. इतर अंगांचीही जोड दिली आहे. या व्याकरणावरही अनेक टीका व उपटीका आहेत. त्यांचे कर्ते व त्यांच्या टीका यांचीं नांवें विस्तारभयास्तव देतां येत नाहींत.

(६) बोपदेवाचें 'मुग्धबोध' व्याकरण—इतर व्याकरणांच्या मागें जशी कांहींतरी दैवी किंवा इतर उपपत्ति आढळते तशी या व्याकरणाच्या मागें नाहीं. इतर व्याकरणांच्या मानानें बोपदेवाचें 'मुग्धबोध' बरेंच अलीकडचें आहे. बोपदेवाचा जन्म देवगिरीच्या आसपास कोठेंतरी तेराव्या शतकांत महादेव यादव व त्यानंतरचा रामदेव यादव यांच्या कारकीर्दींत (सन १२६० ते १२७१) झाला. बोपदेव हेमाद्रीचा आश्रित होता व हेमाद्री स्वतः यादवांचा मुख्य मंत्री (श्रीकरणाधिप) होता. बोपदेवाचा पिता 'वरदा' नदीच्या तीरावर 'सार्थ' गावीं होता म्हणजे तो वऱ्हाडी होता.[८] बोपदेवाचा बाप धंद्यानें 'वैद्य' होता, पण

८. 'Dr. Bhandarkar's Early History of the Deccan,' p. 89.

आडनांव गोसावी होतें. हेमाद्रीच्या प्रेरणेवरून त्यानें मुग्धबोध, कविकल्पद्रुम, काव्यकामधेनु (त्यावरील टीका) हे तर ग्रंथ लिहिलेच, पण त्याशिवाय मुक्ताफल व हरिलीलाविवरण, (दोन्ही भागवत पुराणावरील टीका), शतश्लेकी नांवाचा वैद्यकावरील ग्रंथ व एक धर्मशास्त्रावर ग्रंथ हेही लिहिले. बोपदेवानें भागवत पुराण रचिलें असा प्रवाद आहे पण तो बरोबर नाहीं.[१]

'मुग्धबोध' व्याकरणाचें स्वरूप—बोपदेवाचा कल लाघवाकडे व साधेपणाकडे होता. कातंत्र व्याकरणाचें तंत्र त्यानें स्वीकारून पाणिनीचीं प्रत्याहार सूत्रें थोडयाफार फरकानें उपयोगांत आणिलीं. पाणिनीनें 'बहुलं छन्दसि' सूत्र करून जसे वेदांतील अनेक शब्द साधले तसें बोपदेवानें 'बहुलं ब्रह्मणि' सूत्र करून साधले. तो धार्मिक वृत्तीचा असल्यानें उदाहरणें देतांना हरि, हर, राम इत्यादि नांवें उपयोगांत आणतो. संधींचीं उदाहरणें देतांना मुरारि, लक्ष्मीश किंवा विष्णूत्सव अशीं देवतांच्या नांवांचीं देतो. त्याचप्रमाणें एनम् आणि इदम् यांचीं वैकल्पिक रूपें देतांना खालील श्लोक देतो—

इमं विद्धि हरेर्भक्तं विद्ध्यथैनं शिवार्चकम् ।
अनेन पूजितः कृष्णोऽथैनेन गिरिशोऽर्चितः ॥

बोपदेवानें पाणिनीच्या संज्ञा न घेतां नवीन तयार केल्या. उदा., धातूसाठीं 'धु'; वृद्धीसाठीं 'वृ'; शानच्साठीं 'शान'; सर्वनामासाठीं 'श्रि'; ह्रस्वासाठीं 'स'; दीर्घाला 'र्घ' व गुणाला 'णु' इत्यादि. या संज्ञांमुळें वाचकाचा गोंधळच होतो! मुग्धबोध व्याकरण मागें पडण्याचें हेंही एक कारण असावें. भट्टोजी दीक्षितानें पाणिनीय व्याकरणाचें पुनरुज्जीवन करण्यापूर्वीं दोन शतकें तरी मुग्धबोध-व्याकरण लोकप्रिय होतें. या व्याकरणांत लोकांमध्यें न आढळणाऱ्या औजिढत्—औजढत्, अचीकृतत्—अचिकीर्तत् इत्यादि रूपांच्या सिद्धीविषयीं प्रश्न उपस्थित करून कोणतें रूप शुद्ध समजावें याचें चिकित्सात्मक विवेचन

१. 'Systems of Sk. Grammar', p. 105, F. N. 3.

केलें आहे. कृत् धातूच्या लुङाचें (सामान्य भूतकालाचें) विवेचन करतांना काशिकाकाराचें मत चुकीचें आहे असें बोपदेवानें प्रतिपादन केलें. पण पुढें लवकरच धातुवृत्तिकार माधवानें काशिकाकाराला उचलून धरलें ! या प्रसंगाला उद्देशून भट्टोजी दीक्षितानें आपल्या 'शब्दकौस्तुभ' ग्रंथांत खालील श्लोक दिला आहे—

बोपदेवमहाग्राहग्रस्तो वामनदिग्गजः ।
कीर्तेरेव प्रसङ्गेन माधवेन विमोचितः ॥

अर्थ—'दिग्गज' पंडित काशिकाकार वामन याला 'कीर्त्' धातूच्या प्रसंगानें बोपदेव या महामगरानें ग्रासलें असतां धातुवृत्तिकार माधवानें त्याला मुक्त केलें.' (शब्दकौस्तुभ, आह्निक आठवें.)

मुग्धबोध व्याकरणावर अनेक टीका झाल्या. त्यांत रामतर्कवागीश्वराची प्रसिद्ध आहे. याही व्याकरणाला शेवटीं बंगालचा आश्रय इतर व्याकरणांप्रमाणें दूर देशांत घ्यावा लागला ! यासंबंधीं डॉ. बेलवलकर म्हणतात—

'It was only in the 17th century that like other non-Pāninīya systems of grammar, this school had to take refuge in a country which was farthest removed from Mahratta influence, that is, Bengal where it continues to be assiduously studied to the present day.'

'Systems of Sk. Grammar', p. 107.

(७) **'सारस्वत' व्याकरण**—या व्याकरणाच्या कर्त्याला सरस्वतीदेवीचा प्रसाद मिळाला म्हणूनच याला 'सारस्वत' नांव पडलें हें उघड आहे. या व्याकरणाचा सूत्रकार नरेंद्र असून अनुभूति-स्वरूपाचार्यानें याच्यावर वार्तिकें रचलीं आहेत. सारस्वतप्रक्रियेवरील टीकेंत क्षेमेंद्रानें शेवटीं 'इति श्रीनरेंद्राचार्यसारस्वते क्षेमेंद्रकृतटिप्पनं समाप्तम्' असें म्हटलें आहे, हा वरील म्हणण्याला पुरावा आहे. अमृतभारती नांवाचा दुसरा एक टीकाकार तेंच म्हणतो. पण हा प्रश्न वादग्रस्त असून अनुभूति-स्वरूपाचार्य हाच या सारस्वत प्रक्रियेचा जनक आहे असें सार्वमत आहे.

या व्याकरणाला उत्तेजन देणारे मुसलमानी राजे होते असें डॉ. बेलवलकर म्हणतात.[१०] मुसलमानी अमदानींतील कांहीं सुलतान व राजे उदा० माळव्याचा ग्यासुद्दिन खिलजी, सलेमशहा (इ. स. १५५५) आणि जहांगिर यांनीं सारस्वत व्याकरणाला उत्तेजन दिलें असा प्रवाद आहे. बोपदेवानें किंवा हेमचंद्रानें या व्याकरणाची दखल घेतलेली दिसत नाहीं म्हणून या व्याकरणाचा काल सन १२५० च्या पुढचाच केव्हां तरी असला पाहिजे असें अनुमान निघतें. त्याप्रमाणें तो सन १४५० च्या नंतरचाही नसावा. कारण त्या काळांत सारस्वत व्याकरणावर पुंजराजाची टीका सांपडते.

सारस्वतप्रक्रियेचें स्वरूप—या व्याकरणांत सर्व विषय सातशें सूत्रांत आटोपते घेतले आहेत. इतकें हें साधें आणि संक्षिप्त आहे. त्या मानानें पाणिनिव्याकरणाचीं सूत्रें चार हजार आहेत हें मागें दिलेंच आहे. या व्याकरणाचा प्रसार सरदार आणि इतर वरिष्ठ लोकांत विशेषत्वेंकरून होता कारण त्यांना थोडक्यांत सर्व कांहीं पाहिजे होतें! पाणिनीचे प्रत्याहार स्वीकारले आहेत पण त्यांत 'इत्' संज्ञकांची भानगड नाहीं! संज्ञा नाहींत, परिभाषा नाहींत, क्लिष्ट रूपें नाहींत, वैदिक शब्दसिद्धि व स्वर नाहींत! अजूनही या व्याकरणाचा अभ्यास कोठें कोठें चालू आहे.

हें व्याकरण समजण्यास अतिसुलभ असूनही त्यावर टीका-ग्रंथ झालेच. ग्यासुद्दिन खिलजीचा दिवाण (सन १४६९-१५००) पुंजराज यानें एक टीका (Digest) लिहिली असून परमहंस परिव्राजकाचार्य अमृतभारती यानें 'सुबोधिका' नांवाची टीका लिहिली. त्याप्रमाणेंच क्षेमेंद्र, चंद्रकीर्ति, माधव, वासुदेवभट्ट, मेघरत्न, धनेश्वर, जगन्नाथ, काशिनाथ, भट्टगोपाल, सहजकीर्ति (सन १६२३), हंसविजयगणि (सन १६५०),

१०. 'This time the demand probably came from the Muhammedan rulers of India who felt it necessary to promote the study of Sanskrit'. 'Systems of Sk. Grammar,' p. 93.

रामभट्ट इत्यादि टीकाकार होऊन गेले. वाराणशीला अजूनहि या व्याकरणाचें अध्ययन-अध्यापन सुरू आहे. पहिले संस्कृत-इंग्रजी व्याकरण यावरच आधारलें गेलें.[११]

(८) 'जौमार' व्याकरण— वादीन्द्रचूडामणि क्रमदीश्वर नांवाच्या पंडितानें तेराव्या शतकाच्या अखेरीस 'संक्षिप्तसार' नांवाचा सूत्रमय व्याकरणग्रंथ लिहिला. जुमरनन्दी नांवाच्या पंडितानें ग्रंथाचें संशोधन व संस्करणही केलें. त्यामुळें मूळ कर्त्याचें नांव या व्याकरणाला न मिळतां जुमरनंदीवरून 'जौमार' नांव पडलें. संक्षिप्तसाराची रचना भर्तृहरीच्या महाभाष्यदीपिकेप्रमाणें असून सन्धि, तिङन्त, कृदन्त, तद्धित, कारक, सुबन्त व समास असे सात पाद असून हेमचंद्राच्या व्याकरणाप्रमाणें आठव्या पादांत प्राकृत भाषांचें व्याकरण आहे. भट्टिकाव्यांतील भरपूर उदाहरणें या व्याकरणांत दिलेलीं आहेत. प्रक्रियाकौमुदींना सुरुवात होण्यापूर्वीं हें अखेरचें व्याकरण दिसतें. जुमरनंदी हा जातीनें कोष्टी होता अशी समजूत आहे. त्यानें या व्याकरणावर 'रसवती' नांवाची टीका लिहिली.

पंडित गोयीचंद्रानें यावर एक टीका लिहिली असून तिचें वैशिष्ट्य कारक प्रकरणांत विशेष दिसून येतें. गोयीचन्द्राला 'औत्थासनिक' असेंही नांव होतें. त्याचें स्पष्टीकरण 'उत्थायासनं दीयते राजादिभिरिति। अन्यमुद्दिश्य राज्ञानाभ्युत्थीयते! अस्मै आसनमपि दीयते इत्याधिक्यमास्ति।' असें चमत्कारिक आहे!

हा ग्रंथ पाणिनिव्याकरणाच्या पाऊणपट असून पश्चिम बंगालमध्यें याचें अध्ययन चालतें.

---

११. 'One of the earliest and easiest of Anglow-Sanskrit Grammar that was written was Wilkin's, the basis for which was just this same Sāraswat.' 'Systems of Sk. Grammar,' p. 104.

(९) 'सौपद्म' व्याकरण— पद्मनाभदत्त पंडितानें 'सौपद्म' व्याकरण लिहिलें. हा मैथिली ब्राह्मण असून दामोदरदत्ताचा पुत्र व श्रीदत्ताचा नातू होता. याचा काल सामान्यपणें चौदाव्या शतकाच्या अखेरीस येतो.

याचें व्याकरण पाणिनीच्या व्याकरणावरच अधिष्ठित असून तें पांच भागांत विभागलें आहे. १ संज्ञा-सन्धि, २ कारक, ३ आख्यात, ४ कृत् आणि उणादि प्रत्यय, आणि ५ तद्धित असे ते भाग आहेत. हें व्याकरण लिहितांना कोणाच्या ग्रंथांची त्याला मदत झाली हें खालील श्लोकांत दिलें आहे:

विश्वप्रकाशामरकोषटीका त्रिकाण्डशेषोज्ज्वलदत्तवृत्तीः ।
हारावली मेदिनिकोषमन्यच्चालोक्य लक्ष्यं लिखितं मयैतत् ।।

पाणिनीची नक्कल करतांना कसे फेरबदल केले आहेत याचा नमुना खालीं दिला आहे. पाणिनीचें 'आदिरन्त्येन सहेता' १-१-७१ असें सूत्र आहे तर पद्मनाभदत्तानें तें 'आदिरितान्त्येन समध्यः' असें केलें आहे!

याचा प्रसार मध्य बंगालमध्यें जेसोर, खुलना, भरतपूर, चोवीस परगणे या प्रांतांत आहे.

याच कालांत इतर लहानसहान व्याकरणें अनेक झालीं. त्यांचें महत्त्व नामनिर्देश करण्यापलीकडे नाहीं. उदाहरणार्थ, वररुचि नांवाच्या पंडितानें व्याकरण लिहिलें तें 'वाररुच' या नांवानें प्रसिद्ध आहे. उणादिसूत्रकर्ता वररुचि यानें 'वाररुच कारिका' म्हणून कांहीं कारिका लिहिल्या होत्या; त्यावर कांहीं प्रकरणें रचल्यानें त्याला 'वाररुच' हें अन्वर्थक नांव पडलें. चांगुदास नांवाच्या बौद्धमतावलंबी वैयाकरणानेंही या कालांत अर्थविचारात्मक एक व्याकरण लिहिलें आहे. या व्याकरणाला 'चाङ्गुव्याकरण' म्हणण्यांत येतें.

(९) 'सौपद्म' व्याकरण— पद्मनाभदत्त पंडितानें 'सौपद्म' व्याकरण लिहिलें. हा मैथिली ब्राह्मण असून दामोदरदत्ताचा पुत्र व श्रीदत्ताचा नातू होता. याचा काल सामान्यपणें चौदाव्या शतकाच्या अखेरीस येतो.

याचें व्याकरण पाणिनीच्या व्याकरणावरच अधिष्ठित असून तें पांच भागांत विभागलें आहे. १ संज्ञा-सन्धि, २ कारक, ३ आख्यात, ४ कृत् आणि उणादि प्रत्यय, आणि ५ तद्धित असे ते भाग आहेत. हें व्याकरण लिहितांना कोणाच्या ग्रंथांची त्याला मदत झाली हें खालील श्लोकांत दिलें आहेः

विश्वप्रकाशामरकोषटीका त्रिकाण्डशेषोज्ज्वलदत्तवृत्तीः ।
हारावली मेदिनिकोषमन्यच्चालोक्य लक्ष्म लिखितं मयैतत् ॥

पाणिनीची नक्कल करतांना कसे फेरबदल केले आहेत याचा नमुना खालीं दिला आहे. पाणिनीचें 'आदिरन्त्येन सहेता' १-१-७१ असें सूत्र आहे तर पद्मनाभदत्तानें तें 'आदिरितान्त्येन समध्यः' असें केलें आहे!

याचा प्रसार मध्य बंगालमध्यें जेसोर, खुलना, भरतपूर, चोवीस परगणे या प्रांतांत आहे.

याच कालांत इतर लहानसहान व्याकरणें अनेक झालीं. त्यांचें महत्त्व नामनिर्देश करण्यापलीकडे नाहीं. उदाहरणार्थ, वररुचि नांवाच्या पंडितानें व्याकरण लिहिलें तें 'वाररुच' या नांवानें प्रसिद्ध आहे. उणादिसूत्रकर्ता वररुचि यानें 'वाररुच कारिका' म्हणून कांहीं कारिका लिहिल्या होत्या; त्यावर कांहीं प्रकरणें रचल्यानें त्याला 'वाररुच' हें अन्वर्थक नांव पडलें. चांगुदास नांवाच्या बौद्धमतावलंबी वैयाकरणानेंही या कालांत अर्थविचारात्मक एक व्याकरण लिहिलें आहे. या व्याकरणाला 'चाङ्गुव्याकरण' म्हणण्यांत येतें.

आतांपावेतों पाणिनीयव्यतिरिक्त इतर व्याकरणें व त्यांचे संप्रदाय यांचें आरंभीं म्हटल्याप्रमाणें थोडक्यांत दिग्दर्शन केलें. हे सर्व संप्रदाय महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास लुप्त झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं; इतकेंच नव्हे तर बंगाल व बिहार सोडल्यास इतरत्र त्यांचा मागमूसही सांपडणार नाहीं ! पाणिनीय व्याकरण-संप्रदायानें त्या सर्वांना मागे टाकलें.

परिशिष्ट २

पाणिनिकालीन समाजदर्शन

पाणिनीनें आपल्या चार हजार सूत्रांनीं अनेक शब्दांची प्रक्रिया साधली आहे. समाज जसजसा प्रगत होत जातो व त्याच्या ज्ञानाची कक्षा वाढत जाते, तसतशी भाषेंतील शब्दसंख्याही वाढत जाते. अप्रगत समाजाच्या भाषेंतील शण्दसंख्या अगदीं तोटकी असते. त्यांना पांचशे शब्दसुद्धां व्यवहाराकरितां पुरतात. पण पाणिनिकालीन समाज प्रगत होता. अनेक शास्त्रें व कला परिणतावस्थेला पोहोंचलेल्या असल्यामुळें प्रत्येक वस्तूस, प्रत्येक कल्पनेस, प्रत्येक प्रक्रियेस ती स्पष्ट होण्यासाठीं तिला शब्दाचें अधिष्ठान पाहिजे असतें हें उघड आहे. त्यामुळें अनेक शब्दांची आवश्यकता आपोआपच भासते व लोकांत ते शब्द रूढ होतात. भाषेंत नवे शब्द येतात ते कांहीं नियमानें येतात, असें भाषाशास्त्र (Philology) सांगते. तें एकदां का व्यवहारांत रूढ झाले म्हणजे वैयाकरण प्रकृति-प्रत्ययांच्या साहाय्यानें शब्दसिद्धीचे नियम तयार करतो व पुढें मग त्याच नियमान्वयें नवे शब्द तयार होऊन ते भाषेंत प्रविष्ट होतात. पहिल्यानें भाषेवरून व्याकरणाचे नियम बनतात पण पुढें त्या नियमांवरून भाषेची प्रगति होते असा हा अन्योन्यसंबंध आहे.

यामुळें वैयाकरण ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंतील शब्द तपासून पाहत असतो. पाणिनीनें तिसऱ्या, चवथ्या व पांचव्या अध्यायांत कृदन्त आणि तद्धितान्त रूपें तयार करतांना तत्कालीन ज्ञात असलेले सर्व शब्द व्याकरणाच्या नियमांत बसविण्याचा प्रयत्न केला. वैकयारणाला भाषेचें ज्ञान होण्यासाठीं त्याची झेंप फार मोठी असली पाहिजे. भाषा बारा कोसांवर बदलते त्यामुळें तर ही अडचण फार असते. तरीसुद्धां पाणिनीनें तत्कालीन ज्ञात असलेल्या सर्व प्रदेशांतील शब्द, त्यांचे उच्चार वगैरे सर्व समजावून घेतले आणि मग सूत्रें रचिलीं.

त्यामुळें समाजाच्या सर्व अंगांचीं त्यानें तपासणी केली. यांत वर्ण, जाती, कुल, कुटुंबें, त्यांचे परस्परसंबंध, त्यांतील स्त्रिया, विवाह व आचार, गायनादि कला, वाहनें, कृषि, अन्न, पेय, उपभोगाच्या वस्तु, घरांतील सामान व उपकरणें, घरें, अलंकार, वस्त्रें, नगरबांधणी (Town-planning), पशु व पशुपालन, क्रीडा, समाजांतील स्त्री-पुरुषांचें नामाभिमान, वेगवेगळया आश्रमांत राहणाऱ्यांचीं कर्तव्यें, रोग, औषधें, व्यापार, वजनें व मापें, राज्यपद्धति, शिक्षण, तत्त्वज्ञान हे सर्व विषय पाणिनीनें अभ्यासून त्यांतील शब्दांची सिद्धि करून दाखविली. सारख्या सारख्या शब्दांचे गण बनविले व त्या गणांत नसलेले पण तसेच असलेले सर्व शब्द त्यानें 'आकृति'गणांत घातले. यामुळें पाणिनीच्या सूत्रांवरून त्या कालची सामाजिक परिस्थिति त्या त्या साधलेल्या शब्दांवरून लक्षांत येते.

या सामाजिक परिस्थितीच्या सर्व अंगोपांगांचें विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे व तो प्रस्तुत ग्रंथाचा विषयही नव्हे. परंतु पाणिनीच्या व्याकरणाचें यथार्थ स्वरूप लक्षांत यावें म्हणून इतका प्रपंच केला.

तरीपण हें म्हणणें स्पष्ट होण्यासाठीं सूत्रांवरून तत्कालीन कांहीं गोष्टींचें ज्ञान कसें होतें हें दाखविण्यासाठीं कांहीं विषय पुढें दिले आहेत; तें दिङ्मात्रदर्शन समजावें.

पाणिनीनें ज्या कालांत अष्टाध्यायीसारखा अद्वितीय ग्रंथ व्याकरणशास्त्रावर रचिला व ज्या ग्रंथानें पाश्चात्त्य विद्वानांचे डोळे दिपविले, त्या कालांतील सामाजिक परिस्थिति समजून घेणें उद्‌बोधक होणार आहे. याच ग्रंथाच्या सातव्या व आठव्या प्रकरणांत पाणिनिकालीन ज्ञात वाङ्मय व शिक्षणपद्धति यांची माहिती दिलीच आहे. आतां सामाजिक वगैरे बाबतींत तत्कालीन माहिती पाणिनीच्या सूत्रांवरूनच कशी काय मिळते तेवढ्यापुरता विचार करावयाचा आहे. कोणत्याही ग्रंथांत तत्कालीन सामाजिक परिस्थितीचें प्रतिबिंब उमटलेलें असतेंच. तो ग्रंथ जरी शास्त्रीय असला तरी त्याचें पूर्णपणें आकलन होण्यास ही माहिती आवश्यक असते म्हणून येथें परिशिष्टांत ती संक्षेपानें देण्याचें योजिलें आहे.

पाणिनिकालीन समाज वर्णाश्रमधर्म पाळीत होता. 'वर्ण' शब्द पाणिनीनें जातिवाचकही घेतला आहे. त्याला 'जाति' शब्दानें गोत्र आणि चरण हीं अभिप्रेत होतीं. ब्राह्मणादि चातुर्वर्ण्य त्याला मान्य होतें. कात्यायनानें 'चातुर्वर्ण्य' शब्द एका वार्तिकानें साधला असून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा आनुपूर्वीनें–क्रमानें–त्यांचा उल्लेख द्वन्द्व-समासांत व्हावा अशाविषयींही त्यानें वार्तिक केलें आहे. असे उल्लेख असलेलीं सर्व सूत्रें खालीं दिलीं आहेत—

धर्मशील**वर्णा**न्ताच्च । ५।२।१३२

ज्योतिर्जनपदरात्रि...**वर्ण**वयोवचनबन्धुषु । ६।३।८४

कतरकतमौ **जाति**परिप्रश्ने । २।१।६३

जातेश्च । ६।३।४१

गोत्रं च चरणैः सह । ४।१।६३

वा बहूनां **जाति**परिप्रश्ने डतमच् । ६।३।९३

गुणवचनब्राह्मणादिभ्यः कर्मणि च । ५।१।१२४

चतुर्वर्णादीनामुपसंख्यानम् (वा.)

वर्णानामानुपूर्व्येण । (वा.)

ब्राह्मोऽजातौ । ६।४।१७१

ब्राह्मण हा अर्थातच सर्व वर्णांमध्यें श्रेष्ठ होता. पाणिनि 'ब्राह्मण' शब्द वर्णवाचक तसाच जातिवाचक मानीत असला, तरी त्यांत भेद करीत होता. 'ब्राह्मण्य' या शब्दांत 'ब्रह्मणे हितम्' अशी व्युत्पत्ति देऊन 'अध्यात्मिक दृष्ट्या ब्राह्मणाला जें हितकर तें,' असा त्या शब्दाचा अर्थ आहे आणि केवळ 'ब्राह्मण' म्हणजे ब्राह्मण-पुत्र (ब्रह्मणः पुत्रः) असा अर्थ घ्यावयाचा. आतांच्याप्रमाणें त्या वेळचे ब्राह्मणही देशविभागा-वरून समजले जात. उदाहरणार्थ, सौराष्ट्र ब्राह्मण, महाराष्ट्र ब्राह्मण वगैरे. (ब्रह्मणो जानपदाख्यायाम् । ५।४।१०४).

ब्राह्मणांच्या नंतर दुसरा वर्ण क्षत्रियांचा. हेही गोत्रनांवावरून ओळखले जात. कांहीं गोत्रें ब्राह्मण आणि क्षत्रिय यांना समान असत. समजा,

कुरु गोत्र आहे तर ब्राह्मण गोत्राचा 'कौरव्य' तर क्षत्रिय गोत्राचा 'कौरव्यायणि' अशीं भिन्न नांवें असत. अंधक आणि वृष्णि हीं क्षत्रिय गोत्रें होत. कांहीं क्षत्रियांना ज्या प्रदेशांत ते स्थायिक झाले त्यावरून त्यांना ओळखलें जाई[१]. उदाहरणार्थ, 'पञ्चालाः क्षत्रियाः' म्हणजे 'पञ्चाल' देशांतले क्षत्रिय इत्यादि. राजवंशांतल्या क्षत्रियांना 'राजन्य' ही संज्ञा होती[२]. वैश्य ह्यांचा अंतर्भाव आर्योंतच होत होता व त्यांना आर्य समजत[३]. चवथा वर्ण शूद्रांचा. सर्व शूद्रांचा आर्यांच्या समाजांत समावेश होत नव्हता, तर जे 'अनिरवसित' म्हणजे अबहिष्कृत होते त्यांचाच अंतर्भाव होत होता.[४] आज ज्यांना–चांडालादि लोकांना आपण अस्पृश्य समजतों त्यांची गणना शूद्रांत तेव्हांपासूनच होत नव्हती. ते 'पात्रबहिष्कृत' होते; म्हणजे ज्या पात्रांत ते जेवीत तीं पात्रें आर्य निषिद्ध मानीत. तर इतर शूद्रांचीं पात्रें संस्कारानें शुद्ध होत होतीं.[५] याशिवाय कांहीं मिश्र-जाती अनुलोम अथवा प्रतिलोम असत. पाणिनिसूत्र ८।३।९७ मध्यें 'अम्बष्ठ' व 'आम्बष्ठ' या जातींचा उल्लेख सांपडतो. वार्तिककार कात्यायन 'महाशूद्र' नांवाची वेगळीच जात समजतो. त्याचें स्त्रीलिंगीरूप 'महाशूद्री' होतें.[६] शूद्र जातीची स्त्री 'शूद्रा' तर शूद्राची स्त्री 'शूद्री'.

चार वर्णांप्रमाणें त्या काळीं चार आश्रमही प्रचलित होते असें सूत्रांवरून दिसतें. (१) ब्रह्मचारी, (२) गृहस्थ, (३) प्रव्राजक व (४) भिक्षु[७].

---

१. कुर्वादिभ्यो ण्यः । ४।१।१५१; ते तद्राजाः । ४।१।१७२; जनपदशब्दात्क्षात्रियादञ् । ४।१।१६८

२. राजन्यबहुवचनद्वन्द्वेऽन्धकवृष्णिषु । ६।२।३४

३. अर्यः स्वामिवैश्ययोः । ३।१।१०३

४. शूद्राणामनिरवसितानाम् । २।४।१०

५. 'यैर्भुक्ते पात्रं संस्कारेण शुध्यति' म. भा.

६. शूद्रा चामहत्पूर्वा जातिः (वा.)

७. वर्णाद्ब्रह्मचारिणि । ५।२।१३४; गृहपतिना संयुक्ते ञ्यः ४।४।९०; मस्करमस्करिणौ वेणुपरिव्राजिकयोः; ६।१।१५४ सनाशंसभिक्ष उः । ३।२।१६८

त्रैवर्णिकांतील ब्रह्मचाऱ्याला 'वर्णी' असेंही नांव असे. त्याचें अध्ययन संपलें म्हणजे त्याला 'स्नातक' व विशेष नैपुण्य असलें तर 'निष्णात' अशा संज्ञा होत्या. असो; चार वर्ण आणि चार आश्रम यांची समग्र माहिती पाहिजे असल्यास स्मृतिग्रंथांचा अभ्यास व्हावयास पाहिजे. पाणिनीच्या सूत्रांवरूनही कांहीं माहिती मिळते. उदाहरणार्थ, गृहस्थाश्रमी माणसानें कोणते धंदे करावेत; यज्ञ, श्राद्ध वगैरे कोणते आचार पाळावेत, (पहा मनु ३.६७); त्याला अनेक स्त्रिया असल्या तरी यज्ञांत भाग घेण्याचा अधिकार असलेल्या स्त्रीसच 'पत्नी' म्हणावें वगैरे.

पाणिनिकालीन स्त्रियांची योग्यता फार मोठी होती. अविवाहित कन्या, भार्या, माता, अध्यापिका आणि यज्ञांत भाग घेणारी अशा अनेक भूमिकेंत पाणिनिकालीन स्त्रियांचा उल्लेख सूत्रांतून आढळतो. अगदीं बाल्यावस्थेंत ती कुमारी, किशोरी अथवा कन्या या नांवानें समजली जात असे (वयसि प्रथमे ।४।१।२०). कांहीं तर जन्मभर अविवाहित राहून सुद्धां त्यांना 'कुमारी'च म्हणत—इंग्रजींत 'ओल्ड मेडन' म्हणतात त्याप्रमाणें (कुमार्यां वयसि ।६।२।९५). कधीं कधीं 'वृद्ध कुमारी' किंवा 'जरत्कुमारी' असेंहि म्हणत. त्या वेळीं 'कुमारी माता'ही असत, पण केवळ अपवादच. त्यांच्या मुलाला 'कानीन' संज्ञा होती (कन्यायाः कनीन च ।४।१।११६). उपवर कन्येला 'वर्या' नांव असे तर विवाह ठरल्यावर तिला 'वृत्या' म्हणत. आईवडील विवाह ठरवीत, पण कन्येला आपला पति निवडता येत असे. पाणिनीनें त्यासाठीं 'संज्ञायां भृतॄवृ...' ३।२।४६ या सूत्रानें 'पतिंवरा' असें रूप साधलें आहे. विवाह झाल्यावर जाया, पत्नी, पतिवत्नी वगैरे शब्दांनीं तिच्या वेगवेगळ्या अधिकाराप्रमाणें व कर्तव्याप्रमाणें ती संबोधली जाई. त्या काळीं बहुपत्नीकत्व समाजांत होतें, हें पा. सू. 'नित्यं सपत्न्यादिषु' ४।१।३५ यावरून स्पष्ट होतें. मुलाचें नांव मातेच्या गोत्रावरून ठेवण्याचा क्वचित् प्रघात होता, पण ज्या वेळीं पिता कोण हें माहीत नसेल तेव्हां ! (पहा— गोत्रस्त्रियाः कुत्सने ण च ।४।१।१४७). स्त्रियांचीं नांवें ज्या वेदशाखेच्या त्या असत किंवा ज्या देशांत त्यांचें वास्तव्य असे त्यांवरून पडत. उदाहरणार्थ, 'कठी' कठशाखेचें अध्ययन करणारी, 'यौधेयी'—

'यौधेय' गणराज्यांतील वगैरे. स्वतः अध्यापन करणाऱ्या स्त्रीस 'आचार्या' म्हणत तर केवळ आचार्याच्या स्त्रीला 'आचार्यानी' म्हणत. (इन्द्रवरुण... मानुक् ।६।१।४९ आणि त्यावरील वार्तिक). कांहीं स्त्रिया अविवाहित राहून, तप करून, संन्यासाश्रमांत राहत त्यांना 'कुमारश्रमणा' म्हणत. कांहीं पुरुषासारखीं भाला-फेक वगैरे शक्तीचीं कामें करीत! (शक्तियष्टयोरीकक् ।४।४।५९). स्त्रिया या जात्याच सौंदर्योपासक असतात. त्याप्रमाणें त्या वेळींही केशरचना, कर्णभूषणें, गोंदणें वगैरे वैयक्तिक सौंदर्य वाढविण्यांत त्या निष्णात असत. तात्पर्य, पाणिनिकालीन स्त्रिया फार पुढारलेल्या, सुशिक्षित, गृहकर्मदक्ष, चतुर व निष्णात होत्या. सध्यांप्रमाणेंच पतीच्या योग्यतेवर त्यांची योग्यता अवलंबून असे हेंही तितकेंच खरें (पुंयोगादाख्यायाम् ।४।१।४८). जसें—वकिलाची पत्नी वकिलीण, डॉक्टराची डॉक्टरीण, प्रोफेसराची प्रोफेसरीण, कुंभाराची कुंभारीण वगैरे. त्या वेळच्या विवाहपद्धतीविषयीं माहिती देणारीं कांहीं सूत्रें आहेत. या विधीला 'उपयमन' असें पाणिनि म्हणतो (विभाषोपयमने १।२।१६). 'पाणिग्रहण' विधीला फार महत्त्व होतें. यथाविधिविवाह झालेल्या स्त्रीस 'पाणिगृहीती' संज्ञा असे, तर कसातरी विवाह उरकलेल्या स्त्रीला 'पाणिगृहीता' म्हणत ('यस्य हि यथाकथंचित् पाणिर्गृह्यते' म. भा. ३।२२१). पुनर्विवाहाची चाल त्या वेळीं नव्हती (कौमारापूर्ववचने ४।२।१३). विवाहित स्त्रीला 'कुमारी भार्या' व पतीस 'कौमारः पतिः' अशी संज्ञा होती. सगोत्र विवाह निषिद्ध होता.

पाणिनीच्या सूत्रांनीं साधलेल्या शब्दभांडारांतून तत्कालीन समाजाविषयीं किती व कशी माहिती मिळते हें वर दिलेल्या कांहीं गोष्टींवरून कळेल. सर्व पापुद्रे उकलून दाखवावयाचे म्हटल्यास वेगळा ग्रंथच लिहावा लागेल. पाणिनीय व्याकरणसंप्रदाय या विषयांत तो बसत नसल्यानें त्याचें संपूर्ण विवरण सोडून देणें भाग आहे. इंग्रजी ग्रंथांतून या विषयाची चिकित्सा बरीच झालेली आहे. आपल्याकडे वाराणसी हिंदु विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. व्ही. एस्. अग्रवाल, एम्. ए., पीएच्. डी., डी. लिट्., यांनीं 'इंडिया अॅज् नोन् टु पाणिनि' (India as Known to Panini) या ग्रंथांत या विषयाचें बरेंच विवेचन केलें आहे.

अभ्यासूंनीं तो अवश्य वाचाचा. तें संपूर्ण आहे असा त्यांचाही दावा नाहीं. पण सूत्रनूसूत्र तपासून त्यावरून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचें मूल्यमापन करण्याचा त्यांनीं चांगला प्रयत्न केला आहे. अंतर्गत पुरावा तो यालाच म्हणतात.

पाणिनीचें व्याकरण भाषेंतील सर्व शब्दांना स्पर्श करणारें असल्यामुळें इतर शास्त्रांतील ज्ञान असणाऱ्या विद्वानांना पाणिनीच्या सूत्राचा उल्लेख केल्यावाचून गत्यंतर नसतें* साधा 'पत्नी' शब्द घेतला तरी 'पत्युनों यज्ञसंयोगे' (४-१-३३) या सूत्राचा उल्लेख करून यज्ञांत भाग घेणाऱ्या स्त्रीलाच पाणिनि 'पत्नी' म्हणतो असें सांगतील. शूर्पणखा व शूर्पनखा यांतील भेद सांगण्यासाठीं 'नखमुखात् संज्ञायाम्।' ४-१-५८ या सूत्राचा उल्लेख केल्यावाचून राहणार नाहींत. ज्योतिष विषयांतील संशोधन असो अथवा ग्रामपंचायत असो, पाणिनीच्या सूत्रांत कोठें ना कोठें त्याचा उल्लेख आढळतो !

अभ्यासूंनीं पाणिनीच्या व्याकरण–संप्रदायाचा अभ्यास करतांना ऐतिहासिक दृष्टि ठेवल्यास दुधांत साखर घातल्यासारखें होईल 'ग्रामं गच्छन् पुष्पाण्यपि विचिनोति' यासारखें तें होईल. इत्यलम्।

---

* 'There is no doubt that Panini's grammar is one of the greatest intellectual achievements of any ancient civilizations and the most detailed and scientific grammar composed before the 19th century in any part of the world.'

'It was only on the discovery of Sanskrit by the West that a science of phonetics arose in Europe.'

'The wonder that was India' p. 238, by A. L. Basham.

डॉ. रा. शं. वाळिंबे संपादित

		किंमत
१. **अभिज्ञानशाकुंतलम्**	पृष्ठें ४९२	८ = ००
२. **अभिज्ञानशाकुंतल** (विवेचक रसास्वाद)	पृष्ठें ६४	१ = ००
३. **वेणीसंहारम्**	पृष्ठें ४८०	८ = ००
४. **वेणीसंहार** (मराठी अनुवाद)	पृष्ठें १०६	२ = ००
५. **स्वप्नवासवदत्तम्**	पृष्ठें २००	४ = ००
६. **स्वप्नवासवदत्त** (मराठी अनुवाद)		१ = २५
७. **मेघदूतम्**	पृष्ठें २००	३ = ५०
८. **मेघदूत** (मराठी अनुवाद)		१ = ००
९. **मेघदूत** (विवेचक रसास्वाद)		१ = ००
१०. **मुद्राराक्षस**	पृष्ठें ५३४	१० = ००
११. **कुटिलमती कौटिल्य** (मुद्राराक्षसाचें विवेचन)		३ = ००